महाराष्ट्राचे शिल्पकार :

# लोकमान्य टिळक

● लेखक ●

प्रा. पु. द. कोडोलीकर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

वाय १४३-१

▸▸ **लोकमान्य टिळक**

▸▸ **प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रविंद्र नाट्यमंदिर इमारत, २ रा मजला,
पु. ल. देशपांडे, महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

▸▸ **मुद्रण :**

व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय, व लेखनसामग्री भांडार,
ताराबाई पार्क, कोल्हापूर ४१६ ००३.

▸▸ **प्रथमावृत्ती २०१३**

▸▸ **किंमत :**

# निवेदन

लोकमान्य टिळक यांची अनेक चरित्रे मराठीमध्ये लिहिली गेली आहेत. लोकमान्यांचे चरित्र आणि त्यांचे जीवित कार्य यांची महती गावी तेवढी थोडीच. एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीचा महाराष्ट्र विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व लोकप्रबोधनाच्या चळवळीनी समृध्द झालेला होता. त्यामध्ये ज्वलंत अशी राजकीय जाणीव लोकमान्य टिळक यांनी आपल्या लेखणीने, वाणीने आणि कृतीने निर्माण केली व केवळ महाराष्ट्रालाच नव्हे तर, सर्व देशाला राजकीयदृष्ट्या स्वातंत्रोत्सूक बनविले. 'केसरी' आणि 'मराठा' ही वृत्तपत्रे त्यांनी राजकीय कार्यासाठी वापरलीच. परंतु तत्कालीन समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक उद्‍बोधनासाठीसुध्दा त्यांचा प्रभावी वापर केला. 'भारतीय असंतोषाचे जनक' म्हणवून घेताना तो असंतोष कृतीमध्ये उतरावा यासाठी त्यांनी जो तुरुंगवास आणि देहदंड सोसला त्याला तोड नाही. आज आपण जे स्वातंत्र्य उपभोगत आहोत. त्याचा पाया लोकमान्य टिळकांच्या प्रयत्नातून घातला गेला असे यथार्थपणे म्हणता येईल.

'महाराष्ट्राचे शिल्पकार' या चरित्रमालेमध्ये लोकमान्य टिळकांचे चरित्र प्रकाशित करताना महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाला आनंद होत आहे. लोकमान्यांच्या आजवरच्या अनेक चरित्रांमध्ये यानिमित्ताने आणखी एका चरित्राची भर पडत असली तरी ती महत्त्वाची मानली पाहिजे. प्रा. पु. द. कोडोलीकर यांनी मंडळासाठी हे चरित्र लिहीले त्याबद्दल त्यांना धन्यवाद.

**(मधु मंगेश कर्णिक)**

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

स्थळ : मुंबई

दिनांक : ४ फेब्रुवारी, २०१३

# पार्श्वभूमी .....

१८१८ साली मुंबई इलाख्याचा पहिला गव्हर्नर मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन याने शनिवार वाड्यावर युनियन जॅक फडकवला आणि पेशवाईचा अस्त झाला. छत्रपती शिवाजी महाराजांनी धर्म रक्षणासाठी स्वराज्याची स्थापना केली. ही धर्मनिष्ठा, स्वराज्य निष्ठा पेशवाईच्या उत्तर काळात उरली नव्हती. ब्रिटिश राज्यकर्ते मुत्सद्दी होते. त्यांनी तुमच्या धर्मात आम्ही हस्तक्षेप करणार नाही असे आश्वासन दिले. देशात हिंदू आणि मुसलमान यांच्यामध्ये संघर्ष होता, त्याचा फायदा ब्रिटिश राज्यकर्त्यांनी उठवला. ब्राह्मणापासून क्षत्रियांपर्यंत सर्वांनी केवळ तीस वर्षे राज्य करणाऱ्या ब्रिटिशांचे स्वागत केले आणि पेशव्यांना दूर करून ब्रिटिशांना साहाय्य केले.

ब्रिटिशांनी काही वर्षांतच भारतात आपले राज्य प्रस्थापित केले. त्यामुळे आपल्या देशात एका नव्या युगाचा प्रारंभ झाला, हे मान्य करायला हवे. परकीय राज्यकर्त्यांना राज्य करण्यासाठी प्रशासनात या देशातील नोकरवर्गाची अधिकारी वर्गाची गरज होती. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी सर्वत्र इंग्रजी माध्यमाच्या शैक्षणिक संस्था स्थापन केल्या. या माध्यमामधून त्यांनी ख्रिस्ती धर्माचा प्रचार करायचा होता. पण इंग्रजी भाषेमुळे इंग्लंड, युरोपमधील ज्ञानभांडार खुले झाले. युरोपमध्ये सोळाव्या शतकात विवेक युगाचा प्रारंभ झाला. सोळाव्या शतकापर्यंत धर्मग्रंथ, धार्मिक संस्था आणि राजे सरंजामशाही यांना महत्त्व होते. धर्मग्रंथांच्या अवाजवी महत्त्वामुळे मानवाची बुद्धी, त्याची विचारशक्ती या धार्मिक प्रभावाने बंदिस्त बनली होती. पण विवेक युगामुळे ग्रंथाला प्रमाण मानण्याची प्रवृत्ती नष्ट होऊन अनुभव आणि बुद्धी यांच्या साहाय्याने ज्ञान संपादन करून, आपण सृष्टीवर प्रभुत्व गाजवू शकतो असा या नव्या मानवाला विश्वास वाटू लागला. समाजातील मानवाच्या विकासाची दारे खुली झाली. हळूहळू राजेशाही सरंजामशाही यांचा अस्त होऊन लोकशाहीप्रधान राज्यव्यवस्थेचे विचार समाजात रुजू लागले. भारतात शास्त्री पंडितांचे वर्चस्व होते. धर्मग्रंथांना महत्त्व होते. ब्रिटिशांमुळे आणि विशेषतः इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारामुळे

युरोपमध्ये तीन शतकांमध्ये झालेल्या स्थित्यंतराची माहिती मिळत गेली. युरोपात समाजाचे हित साधणे याला महत्त्व होते. हाच त्यांच्या दृष्टीने खरा धर्म होता. राज्यकर्त्यांनी समाजावर अन्याय केला. तर सामान्य लोक संघटित होऊन क्रांती करून जुलमी राज्यकर्त्यांना सत्तेवरून खाली खेचू शकतात व जनतेचे राज्य स्थापन करू शकतात याचा प्रत्यय शिक्षण प्रसारामुळे येऊ लागला.

१८३२ साली आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठीतील पहिले साप्ताहिक सुरू केले. पाश्चात्त्य विद्या आत्मसात करून ते ज्ञान मराठी वाचकांपर्यंत पोचवण्याचे कार्य त्यांनी केले. 'दर्पण' या साप्ताहिकामधून आपल्या महाराष्ट्रातील अंधार नाहीसा होऊन ज्ञानरूपी प्रकाश सर्वत्र पसरेल आणि मराठी माणूस मागे राहणार नाही असा आत्मविश्वास त्यांनी प्रकट केला. समाजसुधारणेच्या या कार्यात सरदार गोपाळ हरी देशमुख तथा 'लोकहितवादी' यांनी 'प्रभाकर' या पत्रात लेख लिहून लोकजागृतीचे महान कार्य केले. त्यांनी धार्मिक सुधारणा करण्याच्या दृष्टीने मांडलेले विचार आजही बोधपर ठरतात. अनावश्यक धार्मिक विधींचा त्याग स्त्री-पुरुष समानता, विधवा पुनर्विवाह, गुणानुसार जातिभेद मानावा, प्रत्येक व्यक्तीस कोणताही व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य असावे, नीतिमत्ता ही महत्त्वाची मानावी, गोरगरिबांना सदैव मदतीचा हात द्यावा असे त्यांचे विचार होते. स्वदेशभक्ती, लोकसत्ता आणि ज्ञानसाधना याला लोकहितवादींनी महत्त्व दिले होते. महाराष्ट्रातील वर्णव्यवस्थेविरुद्ध आणि ब्राह्मणांच्या वर्चस्वाविरुद्ध चळवळ उभी करण्याचे श्रेय महात्मा जोतिराव फुले यांना द्यावे लागते. त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून १८४२ मध्ये पहिली मुलींची शाळा स्थापन केली. या कार्यात त्यांना त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनी साहाय्य केले. हिंदु समाजातील अस्पृश्यांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध त्यांनी आपला बुलंद आवाज उठवला. बालहत्या टाळण्यासाठी त्यांनी अनाथ बालकांसाठी आश्रम स्थापन केला. शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध त्यांनी आपल्या वाणीमधून आणि लेखणीमधून आसूड उगारला. त्यांनी विधवा स्त्रियांच्या पुनर्विवाहासाठी पुढाकार घेतला. या सर्व क्रांतिकारक समाजसुधारणेच्या कार्यात त्यांना पुण्यातील कर्मठ ब्राह्मणांनी प्रखर विरोध केला.

आपल्या समर्पित जीवनाच्या अखेरपर्यंत त्यांनी समाज सुधारणेचा संदेश महाराष्ट्रातील खेड्यात पोचविण्यासाठी अविश्रांत श्रम घेतले.

लोकहितवादींनी स्वदेश चळवळीचे विचार आपल्या लेखमालेमधून प्रभावी-पणे मांडले होते. पण ते विचार समाजापर्यंत पोचवून त्याचा प्रचार करण्यासाठी संघटना बांधण्याचे महत्त्वपूर्ण कार्य न्या. महादेव गोविंद रानडे यांनी केले. त्यांना गणेश वासुदेव जोशी यांचे बहुमोल सहकार्य लाभले. ते 'सार्वजनिक काका' या नावाने लोकप्रिय होते. न्या. रानडे यांनी स्वदेशी उद्योगधंदे बंद पडत आहेत आणि ते पुन्हा सुरू करण्यासाठी कोणते उपाय योजावेत या विषयावर मौलिक विचार मांडले. दादाभाई नौरोजी यांनी इंग्रज या देशातून कच्चा माल नेऊन आपल्या वस्तू भारतात आणून विकतात. त्यामुळे देशातील साधन-संपत्ती परदेशी जाते आणि आपल्या देशाला दारिद्र्यात राहावे लागते हे प्रभावीपणे सांगितले होते. न्या. रानडे यांनी हेच विचार आपल्या सुबोध भाषेत सांगून देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी यांत्रिक कारखाने काढण्याची गरज आहे हे जनतेस समाजावून सांगितले. न्या. रानडे यांनी पाश्चात्त्य देशातील अर्थशास्त्रज्ञांच्या ग्रंथांचा अभ्यास करून आंतरराष्ट्रीय स्तरावरील व्यापारामधून उद्योजकांचे, देशाचे भवितव्य उज्ज्वल होईल हे आपल्या लेखनामधून, व्याख्यानांमधून सांगितले. त्यामुळे देशाच्या प्रगतीसाठी भौतिकदृष्ट्या देशाने संपन्न होणे गरजेचे आहे हा विचार समाजात रुजण्यास मदत झाली. न्या. रानडे यांनी राष्ट्रीय अर्थशास्त्राचा दूरवर विचार केला होता. त्याचप्रमाणे त्यांनी सनदशीर राजकारणाचा महत्त्वपूर्ण विचार समाजापुढे मांडला. इंग्रजांनी देशावर राज्य करावे ही परमेश्वराची इच्छा आहे असे अनेकांनी मानले. न्या. रानडे यांनीही हा विचार स्वीकारला होता. इंग्रज राज्यकर्त्यांवर विश्वास ठेऊन, त्यांच्याशी एकनिष्ठ राहून आणि सनदशीर मार्गाने, राज्यकर्त्यांना अर्ज, विनंती करून देशामध्ये न्याय, समानता प्रस्थापित करावी असे त्यांचे मत होते. ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या मार्गदर्शनाखाली या देशातील जनतेला स्वराज्य मिळावे आणि त्यांना राज्यकारभार करण्याची संधी लाभावी या राजकीय ध्येयाचा न्या. रानडे यांनी पुरस्कार केला. हा विचार जसा प्रागतिक होता तसा नेमस्तही होता. आपल्या मागण्यासाठी राज्यकर्त्यांशी संघर्ष

करावा किंवा आक्रमक भूमिका घ्यावी असे त्यांना वाटत नव्हते. म्हणूनच या राजकीय धोरणासाठी 'नेमस्त' हा शब्द वापरला जातो. 'महाराष्ट्र हा थंड गोळ्याप्रमाणे बनला होता. महाराष्ट्रात चैतन्य निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य न्या. रानडे यांनी केले' असे गौरवोद्गार लो. टिळक यांनी न्या. रानडे यांच्यासंबंधी काढले होते.

न्या. रानडे, लोकहितवादी यांच्यानंतर नवी पिढी उदयाला येत होती. नव्याने उदयाला येणाऱ्या देशभक्तांना इंग्रजांचे राज्य नको होते. परकीय सत्तेविरुद्ध आंदोलन, संघर्ष करण्याची गरज आहे, असा नवा विचारप्रवाह देशामध्ये याकाळी पाहायला मिळत होता. बंगालमध्ये बाबू सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी शासकीय नोकरीचा त्याग करून नवी राजकीय संस्था स्थापन केली. 'राजकीय संस्थांनी परकीय अधिकाऱ्यापुढे ढीगभर अर्ज, विनंत्या करून काहीही साध्य होणार नाही. आयर्लंडमध्ये सामान्य जनांच्या मनात परकीय सत्तेविरुद्ध असंतोष निर्माण करण्याचे कार्य तेथील देशभक्तांनी केले. आपल्या देशातील राजकीय संस्थांनी मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्याचा विचार गांभीर्याने करायला हवा.' बॅनर्जी यांनी वृत्तपत्र चालवले आणि राष्ट्रीय शिक्षण देण्यासाठी शिक्षणसंस्था काढल्या. १८७५ ते १८८५ हा कालखंड देशाच्यादृष्टीने फार महत्त्वाचा होता. या काळात देशात क्रांतिकारक राजकीय विचारांचा प्रभाव वाढू लागला. त्याचप्रमाणे भारतीय संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाची जाणीव सर्वांना होऊ लागली. स्वामी विवेकानंद यांनी भारतीय संस्कृती, धर्म यांचे महत्त्व पाश्चात्त्य देशातील धर्मगुरुंना, विचारवंतांना आपल्या अमोघ वाणीद्वारे पटवून दिले. भारतातील अनेक राज्यांत आपल्या राष्ट्राबद्दल अभिमान वाटावा असे प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले.

महाराष्ट्रातील नव्या पिढीला न्या. रानडे यांचा नेमस्त, सनदशीर राजकारणाचा विचार मान्य झाला नाही. परकीय राज्यकर्त्यांपुढे दीनवाण्या वृत्तीने याचना करीत राहणे या नव्या पिढीला मानवले नाही. विष्णुशास्त्री चिपळूणकर, बाळगंगाधर टिळक आणि गोपाळ गणेश आगरकर यांचा महाराष्ट्रात याच काळात उदय झाला. नव्या तरुण देशभक्तांना इंग्रजांच्याविरुद्ध संघर्ष करून आपले राष्ट्र स्वतंत्र व्हावे याची तळमळ होती.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | | पा. नं. |
|---|---|---|---|
| १. | नव्या पिढीचा उदय | ... | १ |
| २. | 'केसरी' आणि 'मराठा' वृत्तपत्रे | ... | ६ |
| ३. | टिळक आणि आगरकर | ... | ११ |
| ४. | राष्ट्रीय उत्सवांचा शुभारंभ | ... | २१ |
| ५. | दुष्काळ आणि प्लेग - अस्मानी संकट | ... | २८ |
| ६. | राजद्रोहाचा पहिला खटला | ... | ३२ |
| ७. | वेदोक्त प्रकरण | ... | ३८ |
| ८. | लो. टिळक आणि राष्ट्रीय शिक्षण | ... | ४३ |
| ९. | मॅक्समुल्लर, न्या. रानडे, हर्बट स्पेन्सर आणि स्वामी विवेकानंद | ... | ५१ |
| १०. | राष्ट्रीय सभेची स्थापना आणि लो. टिळक | ... | ५७ |
| ११. | बंगालची फाळणी - चतु:सूत्रीचा स्वीकार | ... | ६३ |
| १२. | सुरत येथील राष्ट्रीय अधिवेशन | ... | ६८ |
| १३. | 'ओरायन' आणि 'आर्क्टिक होम ऑफ वेदाज' | ... | ७३ |
| १४. | मद्यपान निषेध चळवळ | ... | ७९ |
| १५. | राजद्रोहाचा दुसरा खटला | ... | ८४ |
| १६. | मंडालेचा राजबंदी | ... | ९४ |
| १७. | श्रीमद्‌भगवद्‌गीतारहस्य | ... | १०१ |
| १८. | 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे !' | ... | १०९ |
| १९. | चिरोल प्रकरण आणि लोकमान्यांचे इंग्लंडमधील प्रचारकार्य | ... | ११६ |
| २०. | अखेरच्या श्वासापर्यंत स्वराज्याचा ध्यास | ... | १२१ |
| २१. | निष्काम, ध्येयवादी वृत्तीची आज नितांत गरज | ... | १२८ |
| २२. | नि:शस्त्र क्रांतिवादाचे पुरस्कर्ते- लो. टिळक | ... | १३५ |
| २३. | समाजधारणेसाठी धर्म | ... | १४० |
| २४. | लोकमान्य टिळक - महापुरुषाचे प्रेरणादायी स्मरण | ... | १४५ |

# १

# नव्या पिढीचा उदय

बाळ गंगाधर टिळक यांचा जन्म २३ जुलै, १८५६ रोजी रत्नागिरी शहरात झाला. मधल्या आळीतील त्यांचे जन्मस्थान आता तीर्थक्षेत्र बनले आहे. टिळकांचे वडील गंगाधरपंत यांनी गणित आणि संस्कृत या विषयांत प्राविण्य संपादन केले होते. गंगाधरपंत स्थाभिमानी, नि:स्पृह आणि न्यायी सद्गृहस्थ होते. संस्कृत, गणित या विषयात लो. टिळकांनी बालपणीच आपल्या बुद्धिमतेची चमक दाखवली. टिळकांच्या माता-पित्यांचे अकाली निधन झाले.  टिळकांचा पधंराव्या वर्षी विवाह झाला. त्यांच्या पत्नीचे नाव सत्यभामा. पत्नीचे विवाहाच्या वेळी वय होत फक्त नऊ वर्षे. मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतरी टिळकांनी डेक्कन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. टिळकांची शरीरप्रकृती किरकोळ होती. आपली प्रकृती सुधारण्यासाठी टिळकांनी व्यायाम केला. त्यांनी पोहण्याची कलाही आत्मसात केली. कोणतीही गोष्ट मनापासून करायची आणि त्यात नैपुण्य संपादन करायचे हा टिळकांचा स्वभाव होता. शरीर-प्रकृती सुधारण्यासाठी त्यांनी एक वर्ष सुटी घेतली. टिळक अतिशय बुद्धिमान विद्यार्थी होते. पण केवळ परीक्षेसाठी नेमलेल्या पुस्तकांचा अभ्यास करण्याची त्यांची वृत्ती नव्हती. परीक्षेतील यशापेक्षा कठोर ज्ञानसाधना करण्याकडे त्यांचा कल होता. कॉलेजात सदरा, अंगरखा, पगडी, उपरणे, धोतर आणि पुणेरी जोडा हा त्यांचा पोशाख होता. अखेरपर्यंत त्यांचा हाच पोशाख होता. गोपाळ गणेश आगरकर हे याच काळात डेक्कन कॉलेजचे विद्यार्थी होते. आगरकरांच्या घरची परिस्थिती बिकट, आर्थिक आपत्तींना तोंड देत आगरकरांनी कॉलेज शिक्षण पूर्ण केले. टिळक बी.ए., एल्एल्.बी. झाले. आगरकरांनी एम्. ए. पदवी इंग्रजी विषय घेऊन संपादन केली.

त्या काळात पदवी संपादन केलेल्या तरुणांकडे अंमलदार, न्यायाधीश अशा प्रतिष्ठेच्या नोकऱ्या चालून येत. पण तरुण वयातच सरकारी नोकरी न करता आयुष्यात देशसेवा करण्याचा निर्धार या तरुणांनी केला होता. ज्या देशात आपल्या विद्येचा, कर्तबगारीचा उपयोग देशाच्या प्रगतीसाठी, समाजसेवेसाठी करण्यास ध्येयवादी वृत्तीचा तरुण वर्ग येत नाही तो देश जिवंत असला तरी मेल्यासारखाच आहे असे परखड मत टिळक, आगरकर यांनी व्यक्त केले होते. या ध्येयधुंद वृत्तीच्या तरुणांनी स्वत:हून दारिद्र्यात दिवस काढून नि:स्वार्थी वृत्तीने देशसेवा करण्याचा निर्णय घेतल्यामुळे त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींची घोर निराशा झाली. आपली मुले मोठे अंमलदार होतील असे स्वप्न त्यांनी पाहिले होते. १८७४ च्या सुमारास विष्णुशास्त्री चिपळूणकर या प्रखर बुद्धिमत्तेच्या तरुणाने अनेक विचारप्रवर्तक लेख लिहून महाराष्ट्रात खळबळ उडवून दिली. त्यांच्या निबंधमालेचा प्रारंभ 'मराठी भाषेची सांप्रतची स्थिती' या निबंधाने झाला आणि त्यांच्या अखेरच्या निबंधाचे शीर्षक 'आमच्या देशाची स्थिती' असे होते. त्यांचे लेखन म्हणजे मराठी अस्मितेचा उद्‌गार ! धारदार, ओजस्वी लेखनशैली, जबरदस्त व्यासंग यामुळे निबंधमालेला चांगला वाचकवर्ग लाभला. देशातील दारिद्र्य, अज्ञान, जातिभेदांनी पोखरलेला समाज याविरुद्ध चिपळूणकर यांनी प्रखर हल्ला चढवला. इंग्रजांची राजवट कितीही कल्याणकारी वाटली तरी ती सर्व अर्थाने राष्ट्राचे शोषण करीत आहे. त्यामुळे आपल्या देशाची अधोगती होत आहे असे अत्यंत परखड शब्दात त्यांनी 'आपल्या देशाची स्थिती' या लेखात स्पष्ट केले.

टिळक, आगरकर आणि चिपळूणकर यांनी पुण्यात एक शिक्षण संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेतला. ख्रिस्ती मिशनऱ्यांपैकी जेसुइट पंथाचा त्यांच्यापुढे आदर्श होता. स्वत: दारिद्र्यात राहून समाजसेवा करण्याचे खडतर व्रत या पंथाच्या धर्मगुरुंनी स्वीकारले होते. याच ध्येयवादी वृत्तीने कार्य करून नवी पिढी घडवावी हा विचार या तरुण पिढीपुढे होता. न्या. चंदावरकर यांनी न्या. रानडे यांच्याशी बोलताना या तरुणांच्या या साहसी वृत्तीबद्दल आश्चर्य व्यक्त केले, कारण न्या. चंदावरकर आणि न्या. रानडे हे दोघेही शासकीय सेवेत राहून समाजकार्य करीत होते. पण न्या. म. गो. रानडे यांनी, शासकीय नोकरीत प्रवेश न करता ध्येयवादी वृत्तीने देशसेवेला वाहून घेणाऱ्या तरुणांची पिढी पुढे येत आहे याबद्दल समाधान व्यक्त केले.

या ध्येयवादी तरुणांनी स्थापन केलेल्या 'न्यू इंग्लिश स्कूल' या संस्थेचे पुण्यातील सुशिक्षित समाजाने स्वागत केले. 'निबंधमाले' मुळे चिपळूणकर यांचे नाव घरोघरी पोचले होते. टिळकांनी बी. ए. एल्एल्बी. या परीक्षांमध्ये प्रथम वर्ग पटकावला होता. तरुण पिढीमध्ये देशाभिमान, स्वाभिमानीवृत्ती आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्याचे उद्दिष्ट या तरुणांनी पुढे ठेवले होते, शिवाय कमी वेतनावर काम करून या संस्थेला वाहून घेण्याचा त्यांनी निश्चय केला होता. श्री. वामन शिवराम आपटे या पदवीपर्यंतच्या सर्व परीक्षांमध्ये विद्यापीठाची पारितोषिके पटकावणाऱ्या तरुणाने या शाळेत नोकरी स्वीकारली. पहिल्याच वर्षी न्यू इंग्लिश स्कूलमधील विद्यार्थ्याने जगन्नाथ शंकरशेट संस्कृत शिष्यवृत्ती मिळवली.  त्यामुळे या शाळेचे नाव उज्ज्वल झाले. अनेक हुषार विद्यार्थ्यांनी सरकारी शिक्षण संस्था सोडून या शाळेमध्ये प्रवेश घेतला. मुंबईच्या गव्हर्नरनी या शाळेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले.

टिळकांनी शैक्षणिक कार्याला वाहून घेण्याचे ठरवले होते. न्यू इंग्लिश स्कूलप्रमाणे एक कॉलेजही सुरु करावे असा विचार त्यांच्या मनात घोळत होता. टिळकांच्या बुद्धिमत्तेला, त्यांच्या गणित आणि संस्कृत या विषयाच्या व्यासगांला माध्यमिक शिक्षण संस्थेच्या अभ्यासक्रमात आव्हान लाभावे अशी परिस्थिती नव्हती. त्यांच्यामध्ये वसत असलेल्या नैतिक, बौद्धिक आणि सामाजिक गुणांचा विकास उच्च शिक्षणाच्या माध्यमातूनच होऊ शकेल असा त्यांना विश्वास होता. टिळकांच्या कल्पनेने चांगले मूळ धरले. टिळक, आगरकर, आपटे, केळकर आणि गोळे यांसारखे विद्याव्यासंगी, प्रखर सामाजिक जाणीव असणारे तरुण एकत्र आले. त्यांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. न्या. रानडे, डॉ. भांडारकर, रावबहादूर पंडित यांच्या-सारख्या नामवंतांचा या संस्थेच्या कार्यात सहभाग होता. आपटे यांनी अशा प्रकारची राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या संस्थेची नितांत गरज असल्याचे सांगून समाजाला कळकळीचे आवाहन केले. उच्च शिक्षणाची द्वारे गोरगरिबांच्या मुलांना खुली व्हायला हवीत. आपल्या समाजातील सर्व स्तरावरील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाचा लाभ झाला तर समाजाची भौतिक, नैतिक, सामाजिकदृष्ट्या प्रगती होऊन पारतंत्र्यात खितपत पडलेल्या समाजात नवचैतन्य निर्माण होईल असा व्यापक विचार या ध्येयवादी तरुणांनी

समाजापुढे मांडला. या संस्थेच्या संचालक मंडळात नामवंत व्यक्ती आहेत हे पाहून समाजाने सढळ हाताने आर्थिक साहाय्य केले. कोल्हापूरच्या छत्रपती शाहू महाराजांनी या संस्थेस भरघोस देणगी दिली. या डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे पहिले अध्यक्ष होण्याचा मान त्यांना लाभला. त्यावेळेचे गव्हर्नर सर जेम्स फर्ग्युसन यांनी शैक्षणिक क्षेत्रात उदार धोरण स्वीकारले होते. २ जानेवारी, १८८५ रोजी प्रिन्सिपल वर्डस्वर्थ यांच्या शुभहस्ते या कॉलेजचे उद्‌घाटन झाले. गव्हर्नर सर जेम्स फर्ग्युसन यांचे नाव या नव्या कॉलेजला देण्यात आले. शिक्षण देणाऱ्या अशा नव्या संस्थेची स्थापना ही त्या काळातील महत्त्वपूर्ण घटना ठरली. पाश्चात्त्य देशातील ज्ञानभांडार खुले झाल्यामुळे आधुनिक काळात नव्या मूल्यांचा स्वीकार करणे, ती मूल्ये होतकरू तरुणांच्या मनात रुजवणे ही खरी काळाची गरज होती. प्राचार्य आपटे हे संस्कृतचे प्राध्यापक, प्रा. केळकर इंग्रजीचे प्राध्यापक, गोळे पदार्थविज्ञान विषयांचे प्राध्यापक होते. गोपाळ गणेश आगरकर हे इतिहास आणि तर्कशास्त्र विषय शिकवत. लो. टिळक गणित आणि संस्कृत विषय शिकवत. टिळकांची स्मरणशक्ती जबरदस्त, बौद्धिक झेप आकाशाला गवसणी घालणारी ! विद्यार्थ्यांच्या अडचणी ते तत्परतेनं सोडवत. घरी परत जाताना ते विद्यार्थ्यांच्याबरोबर चर्चा करीत जात असत. टिळक कालिदासाचे 'मेघदूत' हे काव्य समरस होऊन शिकवत. गणितातही काव्य आहे आणि काव्यातही गणित आहे हे ते विद्यार्थ्यांना उदाहरणे देऊन पटवून देत असत. प्रा. केळकर यांचे इंग्रजीवर विलक्षण प्रभुत्व होते. गोपाळ गणेश आगरकर हे अतिशय सोप्या पद्धतीने विषय मांडत असत. त्यांच्या व्याख्यानात विद्यार्थी रंगून जात. सदैव हसतमुख आणि प्रेमळ वृत्तीमुळे ते विद्यार्थीप्रिय प्राध्यापक होते.

न्यू इंग्लिश स्कूल आणि फर्ग्युसन कॉलेज च्या शिक्षणाची कीर्ती पुण्यात पसरली. या संस्थांनी अल्प काळात जनतेचा विश्वास संपादन केला. त्यावेळच्या मुंबई प्रांतातील ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांनी या संस्थेच्या प्रगतीची दखल घेतली. डेक्कन एज्युकेशन सोसायटीने डेक्कन कॉलेजही चालविण्याची जबाबदारी स्वीकारावी असा प्रस्ताव राज्यकर्त्यांनी सोसायटीकडे पाठवला. दोन युरोपियन प्राध्यापकांची नियुक्ती करावी, सरकारचे तीन प्रतिनिधी संस्थेच्या कार्यकारीणीवर असावे, या दोन अटी

सोसायटीच्या संचालकांना जाचक वाटल्या. त्यांनी डेक्कन कॉलेजची जबाबदारी स्वीकारण्यास नकार दिला. त्यामुळे राज्यकर्त्यांनी काही काळ अनुदान रोखून ठेवले. या संस्थेच्या ध्येयवादी वृत्तीच्या प्राध्यापकांनी शासनापुढे नमते घेण्यास नकार दिला. या संस्थेला जनतेचा भरघोस पाठिंबा लाभला होता. राज्यकर्ते कधी कृपादृष्टी वळवतील आणि कधी संस्था त्यांच्या रोषास पात्र होईल याचा काहीच भरवसा नव्हता. तरीही शिक्षण संस्थेचे धोरण राज्यकर्त्यांना विरोध करण्याचे नव्हते. किंबहुना शिक्षण संस्था राजकारणापासून अलिप्त ठेवण्याचे धोरण प्राध्यापकांनी, संचालकांनी स्वीकारले होते.

टिळक आणि आगरकर यांनी अपले लक्ष शिक्षणसंस्थेच्या कार्यावर केंद्रित केले होते हे खरे पण त्याच बरोबर जनजागृतीसाठी वृत्तपत्रे सुरु करण्याचा विचार ते गांभीर्याने करीत होते. शिक्षण संस्थेच्या चार भिंतींपेक्षा बाहेरील जग विशाल आहे. परकीय राज्यकर्त्यांनी सामान्य जनतेची पिळवणूक करण्याचा विडा उचलला आहे. अशा राज्यकर्त्यांना त्यांच्या जुलमी कारभाराबद्दल जाब विचारुन सामान्य जनतेच्या रास्त अडचणी त्यांच्यापुढं नि:पक्षपातीपणे, निर्भयपणे मांडण्याची नितांत गरज आहे असे त्यांना वाटू लागले. या भूमिकेमधूनच त्यांनी 'केसरी' आणि 'मराठा' ही दोन वृत्तपत्रे सुरु करण्याचा निर्णय घेतला.

●●●

# २

# 'केसरी' आणि 'मराठा' वृत्तपत्रे

१८८१ हे वर्ष मराठी वृत्तपत्रांच्या इतिहासात सुवर्णवर्ष ठरेल, प्रत्येक मंगळवारी 'केसरी' हे वृत्तपत्र प्रसिद्ध होईल असे जाहीर करण्यात आले. विष्णुशास्त्री चिपळूणकर, टिळक, वामन शिवराम आपटे, डॉ. गद्रे आणि आगरकर यांच्या सहीने एक पत्रक प्रसिद्ध करण्यात आले. 'वृत्तपत्रामध्ये नेहमीचे विषय असतील. त्याचबरोबर जनतेला सद्य:स्थितीवर लेख, नवीन ग्रंथाचे स्वागत, समीक्षा, विलायतेमध्ये होणाऱ्या राजकीय घडामोडींच्यासंबंधी लेखन, असे या वृत्तपत्राचे स्वरूप असेल. प्रत्येक विषयाचे विवेचन नि:पक्षपातीपणे करण्यात येईल. अलीकडे इंग्रज अधिकाऱ्यांवर स्तुतिसुमने उधळण्याचा प्रकार वाढत आहे. ही वृत्ती देशाच्या हिताची नाही.' 'केसरी' हे नाव निवडताना 'हत्तींच्या कळपाचा राजा उन्मत्त होऊन डोळे बंद करून पडला आहे. पर्वताच्या गुहेत सिंह आहे, तो झोपलेला आहे. मधूनमधून पर्वतांच्या खडकांना हत्ती समजून तो आपले धारदार पंजे या खडकांवर आपटीत आहे.' या अर्थाच्या संस्कृत श्लोकांचा उल्लेख करण्यात आले. आता या 'केसरी'ने उन्मत्त राज्यकर्त्यांविरुद्ध आपल्या प्रभावी लेखणीचे शस्त्र उगारले होते. यापूर्वी वृत्तपत्रे प्रसिद्ध होत होती. पण त्या वृत्तपत्रांपुढे ध्येयधोरणे नव्हती. 'केसरी' हे मराठी वृत्तपत्र आणि 'मराठा' हे इंग्रजी भाषेतील वृत्तपत्र होते. 'केसरी'च्या संपादकांपुढे इंग्लंडमधील वृत्तपत्रांचा आदर्श होता. इंग्लंडमध्ये लोकशाही होती. तिथे वृत्तपत्रांना पूर्ण स्वातंत्र्य होते. कुठेही अन्याय झाला तर तेथील वृत्तपत्रे निर्भयपणे सरकारवर टीकेची झोड उठवीत असत. विष्णुशास्त्री चिपळूणकर आपल्या लेखणीमधून राज्यकर्त्यांविरुद्ध टीका करताना अतिशय बोचरी टीका करीत. त्याचे आगरकरांसारख्या संपादकांनाही आश्चर्य वाटत असे. "मी माझी लेखणी हातात

घेतो तेव्हा माझा एक पाय तुरुंगात आहे या भावनेनेच लेखन करतो" असे उद्‌गार चिपळूणकर यांनी काढले होते. 'मराठा' इंग्रजी वृत्तपत्र सुशिक्षित वर्गासाठी होते. महाराष्ट्राबाहेरील वाचकवर्गही संपादकांच्यापुढे होता. महत्त्वाच्या राजकीय घडामोडींचे विश्लेषण करून भारतातील आणि परदेशातील इंग्रजी वृत्तपत्रांतील राजकीय, सामाजिक घडामोडींवर होणारे लेखनही 'मराठा'मधून प्रसिद्ध होत असे.

केसरीमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या लेखांची शैली संपादकांच्या स्वभावानुसार आणि त्यांच्या व्यासंगानुसार होती. टिळकांची लेखनशैली साधी, सरळ आणि अर्थवाही होती. महाराष्ट्रातील सर्वसामान्य वाचकाच्या अंत:करणाला भिडेल आणि त्याला अंतर्मुख करील असे त्यांचे लेखन होते. धर्मशास्त्र, आधुनिक काळातील राज्यघटनांचे कायदे या विषयांचा त्यांचा सखोल अभ्यास होता. आगरकर सामाजिक विषयावर लेखन करीत. कर्मकांड, धार्मिक, सामाजिक रूढी आणि स्त्रियांवर होणारे अन्याय अशा विषयांवर ते लेखन करीत. अनेक नामवंत इंग्रजी साहित्यिकांचे संदर्भ देऊन ते अतिशय खेळकर, विनोदी पद्धतीने लेखन करीत. चिपळूणकर अनेक विषयांवर अत्यंत सडेतोड पद्धतीने लेखन करीत. त्यांची मते, आवडी-निवडी त्यांच्या धारदार लेखणीमधून स्पष्ट होत असत. केसरीच्या सर्व लेखकांनी आपले विविध विषयांवरील ज्ञानभांडार मराठी वाचकांसाठी खुले केले. जनतेमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करणे, त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध अभ्यासपूर्ण लेखन करून जनजागृती करणे हे त्यांच्या विविध विषयांवरील लेखनामागील उद्दिष्ट होते.

१८८२ साली वृत्तपत्र स्वातंत्र्यावर गदा आणणारा कायदा आणण्याचा विचार राज्यकर्त्यांनी केला होता, वृत्तपत्रे ही जनतेच्या पालकाची भूमिका बजावतात. जनतेवर अन्याय, जुलूम होईल असे कायदे असल्यास त्या कायद्यांविरुद्ध आवाज उठवणे आणि जनतेच्या हिताचे संरक्षण करणे हे वृत्तपत्रांचे कर्तव्य ठरते. अशी भूमिका टिळकांनी केसरीमधून स्पष्ट केली. "आतापर्यंत आम्ही सिंहाप्रमाणे गर्जना करून गुहेच्या खडकांवर आपली नखे घाशीत होतो. तोच उन्मत्त हत्ती असल्याची आमची समजूत होती. आता तो उन्मत्त हत्ती आमच्यावर चाल करून येत आहे. तेव्हा या हत्तीवर चाल करून जाणे हे आमचे कर्तव्य ठरते" असे संपादकांनी आपल्या लेखामधून

सूचित केले होते. न्या. रानडे आणि लो. टिळकांच्या पिढीमध्ये इंग्रज सरकारच्या कायद्यांकडे पाहण्यात मूलभूत फरक होता. न्या. रानडे यांच्यासारख्या विचारवंतांना इंग्रजांचे राज्य व्हावे ही परमेश्वरी देणगी आहे असे वाटत होते. त्यामुळे राज्यकर्त्यांच्या कायद्यांना विरोध करू नये, त्यांच्या कायद्याचे पालन करावे अशी त्यांची भूमिका होती. टिळक, आगरकर या नव्या पिढीचा कायद्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण वेगळा होता. कायद्यामुळे जनतेचे कल्याण होत असेल तर अशा कायद्यांचे स्वागत करावे. पण इंग्रज राज्यकर्त्यांचे कायदेच जनतेवर घोर अन्याय करणारे असतील तर अशा कायद्याविरुद्ध आवाज उठवणे हे संपादकांचे, राजकीय नेत्यांचे कर्तव्य ठरते अशी भूमिका टिळक यांनी स्वीकारली होती. अशा अन्यायकारक कायद्यांना प्रखर विरोध करताना त्यासाठी शिक्षा, कारावास पत्करावा लागला तरी त्याची फिकीर करू नये. अन्यायाविरुद्ध दाद न मागता कायद्यांचे निमूटपणे पालन करणे टिळकांसारख्या नेत्यांना मुळीच मान्य नव्हते.

केसरीच्या संपादकांनी संस्थाने आणि संस्थानिक यांच्याबद्दल नेहमी प्रेम आणि अभिमान व्यक्त केला होता. संस्थानिकांच्या राज्यात इंग्रज राज्यकर्त्यांनी हस्तक्षेप करू नये असे मत केसरीने नेहमी व्यक्त केले होते. दादाभाई नौरोजी यांच्यासारखे विचारवंत काही काळ बडोदा संस्थानचे दिवाण होते. त्यांनी इंग्रज राज्यकर्त्यांच्या प्रतिनिधींच्या हस्तक्षेपाविरुद्ध आणि राज्यकारभारात ढवळाढवळ करण्याच्या प्रवृत्तीविरुद्ध प्रखर संघर्ष केला होता. अखेर त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. न्या. रानडे यांनीही नौरोजींना पाठिंबा दिला होता. कोल्हापूरचे राजे हे छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज. त्यामुळे कोल्हापूर या संस्थानाबद्दल महाराष्ट्रात आदराची भावना होती. १८७१ साली श्री. शिवाजी महाराज यांनी कोल्हापूरचे महाराज म्हणून संस्थानचा कारभार पाहण्यात सुरुवात केली. श्री. शिवाजी महाराज हे दत्तकपुत्र होते. रावबहाद्दूर गोपाळराव बर्वे कारभारी आणि त्यांचे साथीदार यांनी कटकारस्थान शिजवून श्री. शिवाजी महाराज यांची मानसिक स्थिती बिघडल्याचे जाहीर केले आणि महाराजांना गादीवरून हटवण्याचे कारस्थान रचले. 'मराठा' या वृत्तपत्रात रावबहादूर बर्वे यांनी लिहिलेल्या काही पत्रांना ८ जानेवारी, १८८२ रोजी प्रसिद्धी

दिली. या पत्रांच्या प्रसिद्धीमुळे कोल्हापूरच्या महाराजांना धोका आहे, त्यांचे जीवन सुरक्षित नाही अशी जनतेची समजूत झाली. रावबहादूर बर्वे यांनी 'मराठा' आणि 'केसरी' यांच्या संपादकांविरुद्ध बदनामीचा खटला दाखल केला. कोर्टात ती पत्रे बनावट असल्याचे सिद्ध झाले. संपादकांनी त्याबद्दल दिलगिरी व्यक्त केली. तरीही कोर्टाने टिळक आणि आगरकर यांना चार महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली. पण सर्वसामान्य जनतेला महाराजांच्या जीविताबद्दल काळजी वाटत असल्यामुळे जनतेने टिळक आणि आगरकर यांच्या भूमिकेला पाठिंबा दिला. २५ डिसेंबर, १८८३ रोजी शिवाजी महाराजांची अहमदनगरच्या किल्ल्यात प्राणज्योत मालवली. त्यांचा मृत्यू अत्यंत संशयास्पद परिस्थितीत झाला होता. या सर्व दुर्दैवी आणि घृणास्पद प्रकाराबद्दल केसरीमध्ये कडक शब्दात अग्रलेख लिहून लो. टिळकांनी जनतेला महाराजांबद्दल वाढणाऱ्या प्रेमाची दखल घेतली. टिळक आणि आगरकर यांनी १०१ दिवस डोंगरी येथील तुरुंगात काढले. त्यांना सामान्य कैद्याप्रमाणेच वागविण्यात आले. तुरुंगातील भयानक स्थिती, अतिशय निकृष्ट दर्जाचे जेवण यामुळे दोघांची प्रकृती बिघडली. वजन घटले. डोंगरी तुरुंगातील १०१ दिवस या शीर्षकाचे एक पुस्तक श्री. आगरकर यांनी लिहिले आणि ते गाजले.

स्वातंत्र्य संग्रामात सहभागी झालेल्या नेत्यांना तुरुंगात डांबल्यामुळे त्यांना शारीरिक त्रास सहन करावा लागला हे खरे आहे. पण टिळक, आगरकरांसारखे विद्वान, विचारवंत लेखक यांना एरव्ही शांतपणे विचारविनिमय करण्यास वेळ मिळत नसे. तुरुंगातील निवांतपणाचा लाभ झाल्यानंतर त्यांना महत्त्वाच्या सामाजिक, राजकीय प्रश्नांवर गंभीरपणे चर्चा करण्यास वेळ मिळाला. त्या काळातील तुरुंगवासाची ही जमेची बाजू. तुरुंगात लेखन, वाचन आणि चिंतन यासाठी वेळ होता. आगरकरांनी 'डोंगरी तुरुंगातील १०१ दिवस' हे पुस्तक लिहून आपले तुरुंगातील अनुभव सांगितले आहेत. टिळक आणि आगरकर यांनी सामाजिक, राजकीय विषयावरील आपली मते प्रांजळपणे व्यक्त केल्यानंतर या दोन थोर विचारवंतामध्ये राजकीय, सामाजिक प्रश्नासंबंधी मतभेद असल्याचे स्पष्ट झाले. आगरकरांनी सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचे ध्येय आपल्या उराशी बाळगले होते. या ध्येयपूर्तीसाठी सनातनी, कर्मठ

विचारांच्या धर्ममार्तंडाविरुद्ध संघर्ष करण्याची आणि त्यासाठी कोणतीही किंमत मोजण्याची मानसिक तयारी त्यांनी ठेवली होती. टिळकांच्या दृष्टीने सामाजिक सुधारणेपेक्षा देशाचे स्वातंत्र्य महत्त्वाचे होते. भारत परकीय, जुलमी राजकर्त्यांच्या जोखडातून मुक्त झाल्यानंतर सामाजिक सुधारणेच्या 'प्रश्नाला चालना मिळेल आणि तो प्रश्न सहज सुटेल असा विचार टिळकांनी स्वीकारला होता. डोंगरी तुरुंगवासापासून टिळकांच्या सार्वजनिक जीवनाचा खऱ्या अर्थानं प्रारंभ झाला. कोर्टाचा निकाल त्यांच्याविरुद्ध लागला पण त्यांनी जनतेच्या हृदयात आदराचे, प्रेमाचे स्थान संपादन केले. टिळक आणि आगरकर यांचे सर्वांनी जोरदार स्वागत केले आणि त्यांचा जाहीर सत्कार केला. टिळकांनी संस्थानिकांची बाजू घेऊन तुरुंगवासही पत्करला हे पाहून संस्थानिकांना त्यांच्याबद्दल आत्मीयता वाटू लागली. तुरुंगवास आणि तिथे सहन करावा लागणारा शारीरिक आणि मानसिक त्रास यामुळे टिळक खचून गेले नाहीत. उलट आपले ध्येय साध्य करण्यासाठी त्यांना अधिक मानसिक, नैतिक बळ प्राप्त झाले.

याच सुमारास १७ मार्च, १८८२ रोजी विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे वयाच्या अवघ्या बत्तिसाव्या वर्षी अकाली निधन झाले. विष्णुशास्त्री यांची प्रखर बुद्धिमता, त्यांचा विविध विषयांवरील जबरदस्त व्यासंग, तेजाने तळपणारी त्यांची धारदार लेखणी यामुळे त्यांनी महाराष्ट्रामध्ये जनमानसात अढळ स्थान मिळवले होते. त्यांच्या आकस्मिक निधनामुळे टिळक आणि त्यांच्या सहकाऱ्यांना मोठा धक्का बसला. "पाच पांडवामध्ये विष्णुशास्त्रींना सर्वांनी धर्माचा मान दिला होता. विष्णुशास्त्री गेले तरी ते ज्या तडफतेने राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी लढत होते त्याच जिद्दीने आम्ही त्यांचे काम पूर्ण करण्यासाठी झटू" अशी ग्वाही केसरी, मराठाच्या संपादकांनी दिली.

●●●

# ३

# टिळक आणि आगरकर

पारतंत्र्यामध्ये जनतेची सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी प्रथम देशाच्या स्वातंत्र्यासाठी राजकीय आंदोलन करणे आवश्यक ठरते हे टिळकांचे मत. आगरकर हे कडवे सुधारणावादी होते. सामाजिक सुधारणेचे कार्य हाती घेतल्याखेरीज प्रखर राजकीय आंदोलन यशस्वी होणार नाही असे आगरकरांचे ठाम मत होते. जुन्या सामाजिक रुढी आणि धार्मिक रुढी समाजात अनेक शतके रुजल्यामुळे त्या नष्ट करण्यासाठी आक्रमक भूमिका स्वीकारल्यास समाजात दुफळी माजेल याची टिळकांना भीती वाटत होती. टिळक, आगरकर यांच्यामधील वैचारिक मतभेद जाहीर होण्यासाठी एक निमित्त घडले. बेहरामजी मलबारी या मुंबईच्या गृहस्थाने 'बाल प्रतिबंधक विधेयक' सरकारने मांडावे यासाठी जोरदार मोहीम सुरु केली. महाराष्ट्रातील पुरोगामी विचारांच्या नागरिकांचा बालविवाहास विरोध होता. समाजातील काही सुशिक्षित नागरिकांच्या गटाने हिंदुसमाजातील ही रुढी बंद करण्यासाठी कायदा असावा या मताला विरोध दर्शविला. न्या. रानडे यांच्यासारख्या पुरोगामी विचाराच्या नेत्यांनी या प्रस्तावास पाठिंबा दिला. न्या. तेलंग यांच्यासारख्या नेत्यांनी विधेयकास विरोध केला. टिळकांनी केसरीमधून विधेयकास पाठिंबा देणाऱ्या व्यक्तींची मते आणि विरोध करणाऱ्या व्यक्तींची मते स्पष्ट केली. पण त्यांनी बालविवाह प्रतिबंधक कायद्याविषयी स्वत:चे मत नोंदवले नाही. आगरकरांनी या विधेयकास पाठिंबा व्यक्त करणारे विचार मांडले आणि त्यांनी आपल्या लेखाखाली आपली स्वाक्षरी केली. संपादक मंडळातील सर्व सदस्य डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्य होते.

त्यामुळे या विधेयकाचे पडसाद या शिक्षण संस्थेत उमटले. सोसायटीच्या बहुसंख्य सदस्यांनी टिळकांच्या मताला पाठिंबा व्यक्त केला. मात्र टिळकांनी बालविवाहाचा निषेध केला नाही. फक्त सामाजिक, धार्मिक रूढी बदलण्यासाठी कायदा नको. सामाजिक सुधारणेसाठी कायद्याचा हस्तक्षेप मंजूर नाही अशी संदिग्ध भूमिका टिळकांनी घेतली. त्यामुळे सनातनी कर्मठ विचाराच्या लोकांनी टिळकांच्या भूमिकेचे स्वागत केले. 'ऐक्य ही शक्ती' हे डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे ब्रीदवाक्य ! सामाजिक प्रश्नावरुन मतभेदांना प्रारंभ झाला. टिळकांनी वेतनवाढीस विरोध केला. तसेच सोसायटीच्या प्राध्यापकांनी अन्य सार्वजनिक कामांची जबाबदारी स्वीकारु नये असे आपले मत आग्रहपूर्वक नोंदवले. त्यांनी संस्थास्थापनेच्या वेळी मिशनरी ज्येसुइट पंथाच्या धर्मगुरूंच्या त्यागी जीवनाचे आपल्या सहकाऱ्यांना स्मरण करून दिले. पण या पंथाचे धर्मगुरु ब्रह्मचर्य व्रत स्वीकारतात. त्यांना स्वत:साठी मालमत्ता करता येत नाही. त्यांचे जेवण, राहणे एकत्र असते. याही गोष्टी सदस्यांनी सभेत मांडल्या. प्राध्यापक विवाहित होते. त्यांना त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची काळजी होती. तसेच संस्थेबाहेरची कामे जवळजवळ सर्व प्राध्यापक करीत होते. पाठ्य- पुस्तकांचे लेखन, ना. गोखले यांचा सार्वजनिक सभेच्या कार्यातील सहभाग स्वत: टिळकही केसरीचे संपादक होते आणि ते दर आठवड्याला अभ्यासपूर्ण संपादकीय लिहीत असत. शिक्षणसंस्था स्थापन करताना सामान्य जनतेचे प्रबोधन करून त्यांना सद्य:स्थितीची जाणीव करून देण्याचा विचारही संस्थापकांनी केला होता. अखेर मतभेद विकोपाला गेले. टिळकांनी सोसायटीमधून बाहेर पडण्याचा निर्णय जाहीर केला. त्यांनी आपल्या चाळीस पानांच्या राजीनाम्यात संस्थेपासून दूर होण्याची कारणमीमांसा अतिशय तर्कशुद्धपणे मांडली. टिळकांना शैक्षणिक क्षेत्र, अध्यापनाचे कार्य अतिशय प्रिय होते. सोसायटीमधून बाहेर पडताना त्यांना दु:ख झाले. जीवनातील कोणत्याही कठीण प्रसंगांना सामोरे जाण्यासाठी त्यांची मानसिक तयारी होती. त्यांची ही खंबीर निर्णय घेण्याची व धीरोदत्त वृत्ती तसेच कोणत्याही गंभीर प्रसंगांना सामोरे जाण्याची मानसिक तयारी याचे प्रत्यंतर त्यांच्या पुढील जीवनात देशाच्या प्रत्ययाला येणार होते. आक्टोबर, १८८७ मध्ये आगरकर आणि गोपाळकृष्ण गोखले यांनी केसरीमधून

बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आणि 'सुधारक' या नव्या नियतकालिकाच्या माध्यमातून सामाजिक सुधारणेविषयीचे आपले विचार परखडपणे मांडण्याचा निर्धार केला.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या दोन दशकांमध्ये सामाजिक, राजकीय समस्यांवरून वादविवादांना तोंड फुटले. पण अशा घटनांमुळे समाजामध्ये जागृती होते. धार्मिक, सामाजिक रुढींबद्दल विवेकवादी दृष्टीकोणातून विचार करण्याची प्रवृत्ती बळावते. पाश्चात्त्य देशातही सनातनी, धार्मिक विचारांचा प्रभाव होता. पण सोळाच्या शतकातच पाश्चात्त्य देशात पुनरुज्जीवनाचे रेनासान्सचे तेजस्वी पर्व सुरु झाले. आपल्या देशात इंग्रजांचे राज्य स्थिरावल्यानंतर आणि इंग्रजी भाषेचा प्रसार झाल्यानंतर या तेजस्वी पर्वाचा प्रारंभ झाला. हिंदू समाजात पुरुषप्रधान संस्कृतीमधील स्त्रियांचे दुय्यम स्थान, स्त्री पुरुषांना स्थावर जंगम मालमत्तेवरील समान हक्क, जातिव्यवस्था आणि विवाहविषयक कायदे याबद्दल विचारमंथन सुरु झाले. वादविवादाच्या फैरी झडू लागल्या. १८८६ साली रखमाबाई दादाजी प्रकरणामुळे या प्रश्नाने गंभीर स्वरुप धारण केले. डॉ. सखाराम अर्जुन यांनी आपल्या रखमाबाई या कन्येचा विवाह आपल्या नात्यातील दादाजी यांच्याशी लावून दिला. डॉ. सखाराम यांनी रखमाबाईंना दादाजींच्या घरी पाठविण्यास नकार दिला. डॉ. सखाराम यांचे निधन झाले. दादाजींनी आपली पत्नी रखमाबाईचा ताबा मिळवण्यासाठी कोर्टात दावा दाखल केला, पण रखमाबाईंनी पतीच्या घरी जाण्यास नकार दिला. इंग्रजी वृत्तपत्रांनीही या घटनेला प्रसिद्धी दिली. हा विवाह रखमाबाईची संमती न घेताच पार पडला होता म्हणून रखमाबाईंवर पतीकडे जाण्याची सक्ती करता येत नाही. अशा प्रकारे रखमाबाईच्यावतीने कोर्टात तिची बाजू मांडण्यात आली. यासाठी रखमाबाईंवर पतीकडे जाण्याची सक्ती करता येणार नाही. हिंदू कायद्यामध्ये अशी तरतूद नव्हती तरीही न्यायमूर्तींनी रखमाबाईच्या बाजूने निकाल दिला. दादाजींनी उच्च न्यायालयाचे दार ठोठावले. उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींनी दादाजींचा दावा मान्य करुन रखमाबाईंनी पतीच्या घरी गेलेच पाहिजे असा निकाल दिला. या प्रकरणामुळे हिंदू समाजात खळबळ माजली. समाजसुधारकांनी हिंदू कायदा कालबाह्य आणि प्रतिगामी वृत्तीचा आहे असे सांगून रखमाबाईंना पाठिंबा दिला. रखमाबाईही

खंबीर मनाच्या. उच्च न्यायालयाच्या निकालाप्रमाणे पतीकडे जाण्यास त्यांनी नकार दिला. कोर्टाचा अवमान झाल्याप्रकरणी शिक्षा झाली तरी तुरुंगात जाण्याची तयारी दाखवली. कोर्टाने दादाजींच्या मागणीला पाठिंबा दिला आहे. हे प्रकरण यापुढे वाढवू नये असे अनेकांनी मत व्यक्त केले. दादाजींनीही स्वस्थ बसण्याचा निर्णय घेतला.

काहींनी रखमाबाईंची तुलना डॉ. आनंदीबाई जोशी यांच्याशी केली. डॉ. आनंदीबाई जोशीनी प्रतिकूल परिस्थितीशी टक्कर देत अमेरिकेत राहून एम्. डी. ही पदवी संपादन केली होती. टिळकांनी केसरीमधून डॉ. आनंदीबाईंच्या बुद्धिमत्तेची आणि कर्तृत्वाची प्रशंसा केली. डॉ. आनंदीबाईंनी हिंदू समाजापुढे आदर्श जीवनाचा वस्तुपाठ ठेवला आहे असे त्यांनी आपल्या लेखात स्पष्ट केले. उलट रखमाबाईंच्या वर्तनामुळे हिंदू समाजातील कुटुंब व्यवस्थेमध्ये अस्थिरता निर्माण केली असल्याचे त्यांनी सांगितले. समाजातील दुष्ट रुढी, अनिष्ट प्रवृत्ती या नष्ट करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न व्हायला हवेत. यासाठी कायदे पास करण्यापेक्षा समाजप्रबोधनाची नितांत गरज आहे, असे केसरीचे मत आहे असे त्यांनी जाहीर केले.

न्या. रानडे यांनी आपल्या जाहीर भाषणात रखमाबाईंना पाठिंबा व्यक्त केला. विवाहविषयक कायदा स्त्रियांवर अन्याय करतो आणि पुरुषांची बाजू उचलून धरतो. पण हा कायदा पुरुष आणि स्त्रिया यांना समान हक्क देतो. हिंदू धर्मशास्त्रांमध्येही स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोण उदार आहे. टिळक हे हिंदू धर्मशास्त्राचे आणि कायद्याचे गाढे अभ्यासक. त्यांनी आपल्या तर्कशुद्ध युक्तिवादाने न्या. रानडे यांची मते चुकीची असल्याचे सिद्ध केले. न्या. रानडे यांनी धर्मशास्त्रामध्ये लुडबुड करु नये असाही त्यांनी सल्ला दिला. टिळकांनी विवाहविषयक कायदे करणाऱ्याविरुद्ध प्रखर हल्ला चढवला. त्यांनी आपल्या विवेचनात रखमाबाई या सुशिक्षित आहेत आणि दादाजी हे निरक्षर आहेत याकडे सोयिस्कररीत्या दुर्लक्ष केले. कायदा कठोर असतो. तो मानवी भावनांची कदर करीत नाही. पण रखमाबाई दादाजी प्रकरणात रखमाबाईंच्या मानसिकतेचा सहानुभूतीपूर्वक विचार करण्याची गरज होती. टिळकांनी फक्त धर्मशास्त्र आणि कायदा यांचाच तटस्थपणे विचार केला.

बेहरामजी मलबारी हे पारशी गृहस्थ त्यांचे स्वत:चे इंग्रजी वृत्तपत्र होते. त्यांनी १८८७ पासून विधिमंडळामध्ये कायदे पास करुन घेऊन सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी निकराचे प्रयत्न केले. त्यांचे इंग्रज अधिकाऱ्यांशी चांगले संबंध होते. इंग्लंडमधील आपल्या वास्तव्यात भारतामध्ये सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी ब्रिटिश पार्लमेंटने पुढाकार घ्यावा यासाठी ते प्रयत्नशील होते. या समाजसुधारणा कशा असाव्या हे स्पष्ट करण्यासाठी त्यांनी नऊ कलमी कार्यक्रम प्रसिद्ध केला. बेहरामजी मलबारी यांच्या या छुप्या कारवाईची 'केसरी' या वृत्तपत्रामध्ये दखल घेण्यात आली होती. लो. टिळकांनी याविरुद्ध 'केसरी'मध्ये संपादकीय लिहिले. एका जाहीर सभेत टिळकांनी मलबारी यांच्या या कृत्याचा जाहीर निषेध केला आणि जनतेच्या इच्छेविरुद्ध अशा प्रकारचे कायदे पास करु नयेत अशा आशयाचे निवेदन इंग्रज सरकारकडे पाठविण्याचा निर्णय घेतला. २ जानेवारी, १८९१ रोजी विवाहावेळी वर आणि वधूच्या वयावर बंधन घालणारे विधेयक पास झाले. तत्कालीन व्हाईसरॉय यांनी धार्मिक बाबतीत सरकारचे हस्तक्षेप करण्याचे धोरण असणार नाही हे जाहीर केले. न्या. तेलंग आणि रावबहाद्दूर नूलकर यांनी या विधेयकास पाठिंबा व्यक्त केला. न्या. तेलंग यांनी 'पुरोहिताला पैसे दिले की धर्माच्याविरुद्ध गेल्याच्या पापातून सहज मुक्तता होते !' असे जाहीरपणे सांगितले. साहजिकच लो. टिळकांनी न्या. तेलंगांच्या या वक्तव्यावर केसरीमधून टीका केली. सरकारने हिंदू धर्माच्या चालीरीतीमध्ये हस्तक्षेप करु नये अशी टिळकांची भूमिका होती. बहुसंख्य समाज रुढीप्रिय असतो. पण समाजसुधारकांना जनतेच्या हिताच्या दृष्टीने कायदे करणे गैर नाही असे वाटत होते.

ख्रिस्ती मिशनऱ्यांप्रमाणे हिंदू समाजात संस्था स्थापन करून रुढी बदलण्यासाठी प्रचार करायला हवा. जनतेमध्ये मतपरिवर्तन घडवून आणायला हवे, हा विचार टिळकांनी मांडला. डॉ. भांडारकर हे प्रकांडपंडित, विद्वान ! हिंदुधर्मशास्त्राच्या त्यांचा सखोल अभ्यास होता. त्यांनी विवाहविषयक, कायद्यास पाठिंबा दिला. शिवाय त्यांनी आपल्या मताच्या समर्थनासाठी हिंदू धर्मशास्त्राचा उल्लेख केला. टिळकांनी डॉ. भांडारकर यांना विरोध केला नाही. पण केसरीमधील आपल्या अग्रलेखांमधून हिंदू धर्मशास्त्र, रुढी यांचे जोरदार समर्थन करून हिंदुधर्मातील उज्ज्वल परंपरेला

विरोध करणाऱ्या सुधारकांविरुद्ध अतिशय आक्रमक शैलीत लेखन केले. सनातनी विचाराच्या जनतेच्या मागे उभे राहून टिळकांनी धर्मातील रुढींचे आपल्या खास आक्रमक शैलीत, आपल्या धर्म आणि कायदेविषयक ज्ञानाच्या सर्व अस्त्रांचा वापर केला. समाजसुधारकांनी सामाजिक सुधारणा करण्यासाठी सरकारी यंत्रणेचा, कायद्याचा वापर करू नये हे टिळकांचे मत होते. पण तसे करताना टिळकांनी प्रतिगामी विचाराच्या गटामागे आपली शक्ती उभी केली. तरीही सनातनी विचाराच्या गटाला रुढी बदलाव्या पण सरकारचा हस्तक्षेप नको ही टिळकांची भूमिका पसंत नव्हती.

या सनातनी गटाला टिळकांना अडचणीत आणण्यासाठी 'ग्रामण्य प्रकरणा'ची साथ लाभली. गोपाळराव जोशी हे महाउद्योगी आणि मिस्कील गृहस्थ. त्यांनी मिशनऱ्यांच्या शाळेत एक व्याख्यान आयोजित केले आणि सर्वांना निमंत्रणे पाठवली. टिळक, रानडे यांच्यासह अनेक महत्त्वाच्या व्यक्ती या व्याख्यानास उपस्थित होत्या. व्याख्यानानंतर चहापाणी, बिस्किटे हा कार्यक्रम होता. ख्रिस्ती लोकांच्या शाळेत चहा पिणे, बिस्किटे खाणे योग्य नव्हते. काहींनी कप तोंडाला लावल्याचे नाटक केले. काहींनी चहा घेतला. गोपाळराव जोशींनी सर्व उपस्थितांच्या नावासह वृत्तपत्रांमधून या कार्यक्रमाला प्रसिद्धी दिली. या घटनेमुळे पुण्यात खळबळ माजली. अखेर शंकराचार्यांनी चौकशीसाठी समिती नेमली. टिळकांनी शास्त्राचा आधार घेऊन प्रायश्चित घेतले. तरीही टिळकांना धर्मकार्यासाठी काही काळ भटजी मिळाला नाही. न्या. रानड्यांनी प्रायश्चित घेतले त्याबद्दल त्यांनी जाहीर खुलासा केला. काहींनी रानडे यांच्यावर टीका केली. टिळकांनी अशा टीकाकारांना कडक शब्दात उत्तर दिले. ज्यांना शंकराचार्यांचा निर्णय मान्य होत नाही त्यांनी हिंदू धर्माचे पुढारी म्हणून मिरवावे याचे आश्चर्य वाटते. आगरकरांनी मात्र या 'ग्रामण्य' प्रकाराविरुद्ध अतिशय परखड पण विनोदी शब्दात झोड उठवली. दररोज पुणेकर आगगाडीने प्रवास करतात. कोणत्याही जातीच्या व्यक्तीकडून ओला चुना घेतात, बर्फ घेतात, गाडीत सोडावॉटर, चहा, बिस्किटे यावर ताव मारतात. त्यांना ग्रामण्याचे संकट भेडसावत नाही. आज

एकविसाव्या शतकामध्ये आणि वैश्विक अर्थव्यवस्थेच्या संदर्भात या ग्रामण्याच्या प्रकारासंबंधी ऐकून करमणूक होणे साहजिक आहे.

आगरकर आणि टिळक यांच्यामधील वैचारिक मतभेदाची माहिती करून घेणे अगत्याचे ठरते. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील मतभेद केवळ महाराष्ट्रामध्येच होते असे नाही. बंगाल, पंजाब या राज्यांतही या वैचारिक मतभेदावरून वादळे माजल्याचे पाहायला मिळते. देशातील सामाजिक सुधारणेची मुहूर्तमेढ रोवण्याचा मान बंगालचे थोर समाजसुधारक राजा राममोहन रॉय यांच्याकडे जातो. भारताच्या प्रबोधनपर्वाचे ते आद्यप्रवर्तक होत. वैचारिक पुनरुज्जीवनाचा तेजस्वी कालखंड रॉय यांच्या पुरोगामी भूमिकेमुळे सुरु झाला. पंजाबमध्ये स्वामी दयानंद सरस्वती यांनी सांगितले की, हिंदू समाजाने वेदातील विचारांना प्राधान्य न देता केवळ धार्मिक विधींना महत्त्व दिल्यामुळे हिंदू समाजाची प्रगती खुंटली. हिंदू समाजातील दुष्ट, धार्मिक, सामाजिक रुढी नष्ट करून समाज आधुनिक काळात प्रगतीपथावर नेण्याची गरज आहे असे स्वामी दयानंद यांनी स्पष्ट केले. ख्रिश्चन धर्मगुरूंच्या मिशनरी कार्यपद्धती प्रमाणेच स्वामीजींच्या अनुयायांनी हिंदू धर्मात परिवर्तन घडवून आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले.

बाळशास्त्री जांभेकर यांनी १८४१ पासून ते त्यांच्या १८४६ साली झालेल्या त्यांच्या अकाली निधनापर्यंत 'दर्पण' या साप्ताहिकामधून बालविधवा पुनर्विवाह, स्त्रियांना शिक्षण, हिंदू धर्मातून परधर्मात गेलेल्यांना पुन: स्वधर्मात घेणे या विषयांवर निर्भयपणे लेखन केले. सामाजिक, धार्मिक सुधारणाबाबतीत त्यांची वृत्ती प्रागतिक होती. १८४९ साली गोपाळ हरी देशमुख तथा लोकहितवादी यांनी आपल्या 'प्रभाकर' या पत्रामधून स्त्री-शिक्षण, विधवा विवाह, जातिव्यवस्था या विषयांवर निर्भिडपणे आपले विचार मांडले. दुष्ट सामाजिक, धार्मिक रुढींमुळे देशाची अवनती होत आहे हे त्यांनी स्पष्ट केले. महात्मा जोतिराव फुले यांनी स्त्रियांवरील अन्याय, जातिव्यवस्था, अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी १८७३ साली पुण्यात सत्यशोधक समाजाची स्थापना केली. १८६७ साली न्या. महादेव रानडे आणि डॉ. भांडारकर यांच्यासारख्या विद्वान, व्यासंगी व्यक्तींनी जातिव्यवस्था, मूर्तिपूजा, अंधश्रद्धा या हिंदू धर्मातील अनिष्ट

प्रवृत्ती नष्ट करुन सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचा विचार प्रभावीपणे मांडला. बंगालच्या ब्राह्मो समाजाच्या धर्तीवर त्यांनी महाराष्ट्रात प्रार्थनासमाजाची स्थापना केली. १८८० नंतर टिळक, आगरकर या नव्या पिढीचा उदय झाला. राजकीय, सामाजिक विषयांवरील विचार केवळ लेखनामधून व्यक्त न करता ते विचार समाजामध्ये रुजविण्याची गरज आहे असे त्यांना वाटत होते. आगरकर हे सुधारणावादी विचारवंत, त्यांनी आपल्या आक्रमक आणि अभ्यासपूर्ण लेखनामधून दुष्ट सामाजिक रुढी-विरुद्ध प्रखर टीका करुन सामाजिक सुधारणेचे शिंग फुंकले.

समाज सुधारणेच्या कार्यात आगरकरांनी व्यक्तिस्वातंत्र्याला प्रथम स्थान दिले होते. दुष्ट सामाजिक, धार्मिक रुढी, समाजातील जातिव्यवस्था या बंधनामुळे स्त्री-पुरुषांना हिंदू धर्मामध्ये स्वातंत्र्य नव्हते. समाजामध्ये विचारस्वातंत्र्य, विवाहस्वातंत्र्य आणि व्यवसायस्वातंत्र्य हवे. असे स्वातंत्र्य असेल तरच समाज प्रगतिपथावर राहील असे आगरकरांचे ठाम मत होते. या समाजात व्यक्तिस्वातंत्र्य नसल्यामुळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होऊ शकत नाही.

लो. टिळकांनी या विषयावर नि:संदिग्ध शब्दांत कधी आपली मते मांडली नाहीत. वर्णव्यवस्थेमुळे समाज हजारो वर्षे टिकून आहे. समाजाची पुनर्रचना पाश्चात्त्य देशातील समाजव्यवस्थेप्रमाणे करावी हा विचार टिळकांनी फेटाळून लावला. त्यांच्यामते पाश्यात्त्य समाजव्यवस्थेतही दोष आहेतच. पाश्चात्त्य देशात स्पर्धा हा समाजव्यवस्थेचा पाय आहे. त्यामुळे श्रीमंत वर्ग आणि गरीब वर्ग यामध्ये प्रचंड दरी आहे. पाश्चात्त्य देशात विवाह हा एक करार असतो. त्यामुळे विधवा स्त्रियांची संख्या कमी असेल पण अविवाहित स्त्रियांची संख्या लक्षणीय आहे.

लोकमान्यांनी अखेरीस स्वराज्याच्या लढ्यात शांततेने आणि स्वार्थत्यागाने लढणारे ते सर्व ब्राह्मणच आहेत, मग ते जातीने कोणीही असोत, असा उपदेश करुन याच वृत्तीचा अवलंब केल्याने जन्मसिद्ध चातुर्वण्य नष्ट होऊन गुणकर्मप्रधान वर्णव्यवस्था स्थापन होऊ शकेल असे 'राष्ट्रसभानिष्ठ लोकशाही पक्ष' स्थापन करताना लोकांना सांगितले. आपल्या देशात लोकशाही येत आहे, हळूहळू सामाजिक व

धार्मिक विचारात फेरफार होत जातील. पण समाजसुधारणेला महत्त्व दिल्यामुळे लोकांचे लक्ष या गौण गोष्टीकडे खेचून घेतले जाईल. त्यामुळे स्वराज्याच्या कार्यात अडथळे निर्माण होतील असे मत लो. टिळकांनी व्यक्त केले होते. हे आचार्य जावडेकर यांनी 'आधुनिक भारत' या ग्रंथात नमूद केले आहे.

आगरकरांच्यापुढे अंतिम ध्येय कोणते होते ? आगरकर हे प्रखर बुद्धिवादी विचारवंत होते. जे योग्य असेल ते बोलणार आणि त्या प्रकारे आपण वागणार हा त्यांचा बाणा होता. टिळक धार्मिक वृत्तीचे, परंपरा, रूढी मानणारे होते. आगरकरांचा मूर्तिपूजेवर, देवावरील श्रद्धेवर विश्वास नव्हता. 'देव न मानणारा देवमाणूस' अशा शब्दात ज्ञानपीठ पारितोषिक विजेते ख्यातनाम साहित्यिक श्री. वि. स. खांडेकर यांनी आगरकरांचे वर्णन केले आहे. समाजसुधारणा म्हणजे काय ? या प्रश्नाचे उत्तर आगरकर यांनी नि:संदिग्ध शब्दात दिले होते. समाजात सत्ता आणि संपत्ती यांची समान विभागणी करणे, जातिभेद मोडणे, धर्म सुधारणा करणे. मदिरा आणि मांस यांचे सेवन बंद करणे हे त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. सर्व स्तरावरील स्त्री-पुरुषांना शिक्षणाची संधी मिळायला हवी. प्रत्येक व्यक्तीस आपला उदरनिर्वाह करण्यासाठी व्यवसायज्ञान मिळाले पाहिजे. शिवाय प्रत्येक व्यक्तीस त्याच्या आवडीप्रमाणे वाचन, करमणूक, विश्रांती किंवा चिंतन यासाठी वेळ मिळाला पाहिजे. पूर्वजन्म, पुनर्जन्म अशा कल्पनांच्यामागे न लागता प्रत्येक व्यक्तीचे ऐहिक जीवन सुखाचे, समाधानाचे झाले पाहिजे. सुख हा शब्द आगरकरांनी व्यापक अर्थाने वापरला होता. सुखामध्ये परोपकार, सदाचार, सत्यनिष्ठा, आत्मसंयम या गुणांचा समावेश होता.

लो. टिळकांनी स्वराज्याच्या लढ्यात ध्येयवादी वृत्तीने लढणारे सर्व ब्राह्मणच आहेत असे आपल्या जीवनाच्या अखेरच्या काळात म्हटले होते. पण धार्मिक, सामाजिक जागृती होणे आवश्यक असले तरी स्वराज्याच्या लढ्यात जाती मोडा, धर्मबंधने तोडा असे जनतेस सांगणे टिळकांना योग्य वाटत नव्हते. तसे केल्यास समाजात मतभेद निर्माण होईल, आणि स्वराज्याची हानी होईल असे त्यांना वाटत होते. आगरकराची मते तर्कशुद्ध आहेत आणि ते समाजक्रांतिकारक आहेत याची टिळकांना जाणीव होती. पण स्वातंत्र्यलढ्यामध्ये तरुणांची शक्ती धार्मिक, सामाजिक

क्रांतीमध्ये गुंतवणे टिळकांना मान्य नव्हते. म्हणून भारतीय संस्कृतीचा अभिमान बाळगून स्वातंत्र्याच्या संग्रामात तरुणांनी सहभागी व्हावे असा ठाम विचार टिळकांनी मांडला. अखेर संस्कृतीच्या अभिमानाच्या बळावरच जहाल राजकारण प्रभावी ठरेल या निर्धाराने त्यांनी जहाल राजकारणाचा विचार स्वीकारला.

टिळक, आगरकर यांच्यामधील वैचारिक मतभेद टोकाला गेले होते. केसरी आणि आगरकरांचा 'सुधारक' या माध्यमामधून त्यांच्यामध्ये शाब्दिक युद्धाच्या फैरी नेहमी झडत असत. एकमेकावर शाब्दिक वार करताना दोघेही आक्रमक होत असत. पण दोघांच्यामध्ये प्रारंभी जी आत्मीयता, जो जिव्हाळा निर्माण झाला होता तो आजही कायम होता. आगरकरांना दम्याचा त्रास होता. १७ जून, १८९५ रोजी आगरकरांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या अकाली निधनामुळे टिळकांना अतिशय दु:ख झाले. आगरकरांविषयी मृत्युलेख लिहिताना टिळकांसारख्या धीरोदात्त वृत्तीच्या थोर व्यक्तीस आपल्या भावना आवरणे कठीण झाले. "आम्ही दोघांनी तरुण वयातच देशसेवेचे व्रत स्वीकारण्याचा निर्णय घेतला होता. आगरकरांचे बालपण दारिद्र्यात गेले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देत आगरकरांनी आपले शिक्षण पूर्ण केले. आगरकरांनी स्वार्थत्याग, प्रखर ध्येयवाद, सामाजिक परिवर्तनाचा घेतलेला अखंड ध्यास अशा उदात्त विचारांचा आणि आचरणाचा वस्तुपाठ आपल्या समर्पित जीवनातून त्यानी समाजापुढे ठेवला" अशा गौरवपूर्ण शब्दात अतिशय दु:खी, जड अंत:करणाने टिळकांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली. गोपाळ गणेश आगरकरांच्या अकाली, दु:खद निधनामुळे एका तेजस्वी युगाचा अंत झाला. त्यांच्यानंतर समाज-सुधारणेची ज्योत मंदावली आणि स्वराज्याच्या संग्रामाला अधिक महत्त्व प्राप्त झाले.

●●●

# ४

# राष्ट्रीय उत्सवांचा शुभारंभ

टिळक आपली मते अत्यंत विचारपूर्वक व्यक्ती करीत. त्याचे प्रत्यंतर जनतेस आणि केसरीच्या वाचकांना येत असे. पंडिता रमाबाई यांच्या शारदासदनचे प्रकरण गाजले आणि या वेळी टिळकांची भूमिका स्पष्ट आणि सडेतोड होती याची जनतेला खात्री पटली. पंडिता रमाबाई या अनंतशास्त्री डोंगरे या चित्पावन ब्राह्मणाच्या कन्या. डोंगरेशास्त्री विद्वान होते. आपल्या पत्नीला त्यांनी संस्कृत शिकवण्यास प्रारंभ केला म्हणून त्या काळातील कर्मठ, सनातनी ब्राह्मणांनी त्यांना समाजामधून बहिष्कृत केले. अखेर त्यांनी आताच्या तामीळनाडू राज्यातील जंगलात आश्रम स्थापन केला. इथे रमाबाईंचा जन्म झाला. त्यानंतर डोंगरे शास्त्रींवर अनेक संकटे कोसळली आणि रमाबाई आपल्या भावास घेऊन कलकत्त्यामध्ये आल्या. इथे रमाबाईंच्या विद्वतेची ख्याती पसरली. रमाबाईंनी बिपिन मेधावी या वकिलांशी विवाह केला. आपल्या पतीच्या अकाली निधनानंतर रमाबाई पुण्यात आल्या. रमाबाईंनी हिंदू धर्मावर व्याख्याने दिली आणि स्त्रियांच्या सबलीकरणाचा, शिक्षणाचा विचार त्यांनी मांडला. पुण्याच्या कर्मठ ब्राह्मणांनी रमाबाईंना कडवा विरोध केला. रमाबाई इंग्लंड, अमेरिकेत गेल्या. त्यांनी ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला आणि भारतात येऊन ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या मदतीने अनाथ विधवा स्त्रिया, परित्यक्ता यांच्यासाठी १८८९ मध्ये 'शारदासदन' या संस्थेची स्थापना केली. या संस्थेमध्ये न्या. रानडे, डॉ. भांडारकर, न्या. तेलंग यांच्यासारख्या पुरोगामी विचाराच्या नेत्यांनी सल्लागार मंडळावर काम करण्याची तयारी दर्शवली.

प्रथम पंडिता रमाबाईंना ख्रिस्ती धर्मप्रसार करणाऱ्या संस्थाकडून आर्थिक मदत घ्यायची नव्हती. परंतु हिंदू समाजामध्ये अशा संस्थांना मदत करण्याऐवजी या संस्थांबद्दल संशय व्यक्त करण्याची प्रवृत्ती होती. इतकेच नव्हे तर या संस्थेची प्रगती होऊ नये, उलट ही संस्था बंद पडावी असे प्रयत्न हिंदू समाजाकडून होत होते. अशी भीती वाटल्यामुळे प. रमाबाईंनी ख्रिस्ती लोकांचे सहकार्य संपादन केले. अशा कामात ख्रिस्ती संस्था सहकार्य करण्यासाठी पुढे येतात. यामुळेच धर्मप्रसार होतो. पं. रमाबाईंना आर्थिक साहाय्य मिळाले. पण याच वेळी त्यांनी स्थापन केलेल्या 'शारदासदन' या संस्थेमधील दोन मुलींनी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला म्हणून लो. टिळकांनी या संस्थेविरुद्ध 'केसरी'मधून कडक शब्दात टीका केली. आपला स्त्री-शिक्षणास विरोध नाही, पण शिक्षणाच्या बुरख्याखाली स्त्रियांना धर्मांतर करण्यासाठी प्रवृत्त करण्यास विरोध आहे असे त्यांनी जाहीर केले. हिंदू स्त्रियांनी धर्मांतर केल्याच्या बातम्या पसरल्या. न्या. रानडे, डॉ. भांडारकर यांनी सल्लागार मंडळाचे राजीनामे दिले. अखेर रमाबाईंनी आपली संस्था बंद केली. त्यांनी केडगाव या गावी आपल्या संस्थेचे कार्यालय हलवले. रमाबाईंच्या या धर्मविरोधी कारवायांवर प्रकाशझोत टाकून हिंदूंना सावध केल्याबद्दल टिळकांना हिंदू धर्माच्या जनतेने धन्यवाद दिले. त्यांच्या नि:स्पृह आणि निर्भिड वृत्तीचे जनतेला कौतुक वाटले. टिळकांबद्दल सामान्य जनतेमध्ये आदराची भावना निर्माण झाली.

टिळकांच्या नि:स्पृह आणि निर्भिड वृत्तीचे जनतेला कौतुक वाटले आणि त्यांच्याबद्दल सामान्य जनतेत आदराची भावना निर्माण झाली.

टिळकांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. निर्वाहासाठी त्यांचा दोन-तीन साधनावर भर होता. दरवर्षी काही रक्कम पदरात पडेल या आशेने त्यांनी लातूर येथे कापूस पिंजण्याचा कारखाना (जिनिंग फॅक्टरी) काढला होता. केसरी-मराठ्याचा खर्च भागवून आणि कर्जाचा हप्ता भागवून त्यांच्या उत्पन्नातून जी रक्कम उरेल ती-एवढेच निर्वाहाचे साधन होते. लातूरचा कारखाना एक तृतीयांश भागीदारीचा होता. त्यासाठी टिळकांना कर्ज काढावे लागले होते. केसरी-मराठ्याची जबाबदारी ही कर्जबाजारीच होती. आता उत्पन्नाचे साधन म्हणजे

कायदे शिक्षणाचा वर्ग. पंचवीस पन्नास विद्यार्थ्यांसाठी एक दालन त्यांनी भाड्याने घेतले. कायदेविषयाचा त्यांचा व्यासंग आणि विद्वता हेच त्यांचे भांडवल. गोरगरीब विद्यार्थ्यांना ते सवलत देत. ते पुराव्याच्या कायद्यामध्ये पारंगत होते. जुन्या धर्मशास्त्राच्या ग्रंथांचे त्यांनी वाचन केले होते. सामाजिक चळवळीतील वादासाठी त्यांनी धर्मशास्त्राचा सूक्ष्म अभ्यास केला होता. 'हिंदू लॉ' हा विषय ते उत्तमरीतीने शिकवत, तसेच कॉंट्रॅक्ट ॲक्ट, इक्विटी हा भाग ते उत्तमरीतीने शिकवत. श्री. महादेव गोविंद रानडे यांची हायकोर्टाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झालेली नव्हती. न्या. रानडे एकदोन वेळा या वर्गात येऊन गेले. टिळकांची व्याख्याने ऐकून त्यांनी समाधान व्यक्त केले ! टिळकांच्या कायद्याच्या व्यासगांची त्यांनी प्रशंसा केली.

१८९३ साली प्रथमच मुंबईत हिंदू मुसलमान यांच्यामध्ये दंगल झाली. या दंग्याच्यासदंर्भात टिळकांनी असामान्य धैर्य प्रकट केले. केसरीमधून त्यांनी नि:पक्षपातीपणे लिहिले. या लेखांमधून त्यांची स्वाभिमानी वृत्तीही दिसून येते. अनेक उदाहरणे देऊन त्यांनी सरकारी अधिकारी मुसलमानांची बाजू घेतात आणि दंग्यास खतपाणी घालतात असे सरकारविरुद्ध आरोप केले. सौराष्ट्रामध्येही प्रभासपट्टण या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी हिंदू-मुसलमानामध्ये दंगल उसळ्ली. हिंदूंना मदत करण्यासाठी मुंबईत एका सभेचे आयोजन करण्यात आले. तेथे मुसलमानांनी काठ्या घेऊन हिंदूंना मारहाण केली. यावेळी हिंदूंनी या मारहाणीचा बदला घेण्याची भाषा केली. तेव्हा पोलीस सावध झाले. पोलीस अधिकारी हिंदूंनाच अनेक कारणे पुढे करून दोषी ठरवत. टिळकांनी सरकारी अधिकाऱ्यांचा पक्षपात हे दंग्यामागील खरे कारण आहे हे स्पष्टपणे जाहीर केले. यासाठी सरकारी अधिकाऱ्यांना बाजूला ठेवून हिंदू-मुसलमान पुढाऱ्यांनी एकत्र येऊन सलोख्याने प्रश्न मिटवावे असे त्यांनी सांगितले. याच काळात महाराष्ट्रात वाई, धुळे, पुणे या ठिकाणी जातीय दंगली झाल्या. टिळक केवळ माहितीच्या आधारे लिहीत नसत. ज्या ठिकाणी दंगल झाली त्या ठिकाणी समक्ष जाऊन टिळक परिस्थितीचा अभ्यास करीत. टिळकांनी या काळात निर्भयपणे संचार करून दंगलीचा अभ्यास केला आणि त्या माहितीचा त्यांनी निर्भयपणे वापर केला. १८९४ साली पुण्यात दंगा होणार अशी हवा होती. पण दंगा झाला नाही.

आमच्या पालखीला मुसलमानांचा विरोध तर त्यांच्या ताबुताला आमचा विरोध असा पवित्रा हिंदूंनी घेतला. पोलिसांनी मुसलमानांना फूस लावून पुण्यातील ब्राह्मणांविरुद्ध सरकारकडे अर्ज करण्यास सांगितले. गणेश विसर्जनाच्या वेळी पुण्यात मुसलमानांनी दंगा केला. हिंदूंनी मशिदीचे नुकसान केले. सुदैवाने जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष घालून दंगल आटोक्यात आणली. टिळकांनी जिल्हाधिकाऱ्यांचे आभार मानले. ब्राह्मणांना दिलेल्या शिव्यांबद्दल गव्हर्नरने माफी मागावी असे त्यांनी केसरीत लिहिले. सामाजिक, धार्मिक प्रश्नांमध्ये जातीने लक्ष घालून टिळक किती तळमळीने कार्य करीत होते याची अशा प्रसंगातून कल्पना येते.

टिळकांनी 'राष्ट्रीय उत्सवांचा विचार केसरीमध्ये मांडला. ग्रीस, रोम येथे पूर्वी राष्ट्रीय स्तरावर धार्मिक उत्सव भरत असत. त्याच धर्तीवर आपल्या देशामध्येही राष्ट्रीय उत्सवांचे आयोजन व्हावे असा विचार त्यांनी मांडला. राष्ट्रीय उत्सवांचे आयोजन करण्यामागे त्यांनी दोन उद्देश समोर ठेवले. उत्सावामुळे सामान्य जनांची करमणूक होते. उत्सवाच्या निमित्ताने जनतेचे प्रबोधन करण्यासाठी प्रभावी व्यासपीठाचा लाभ होतो. अशा उत्सवांमुळे राजकीय जागृती होऊ शकते. उत्सावाच्या निमित्ताने देशातील उद्योगांनी तयार केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन मांडता येते. उत्सवाच्या निमित्ताने सामाजिक, धार्मिक, राजकीय आणि औद्योगिक उद्दिष्टे साध्य करुन घेणे शक्य होते. टिळकांच्या या कल्पनेचे जनतेने उत्साहाने स्वागत केले. महाराष्ट्राच्या सर्व शहरांत आणि लहान गावातही गणेशोत्सव उत्साहाने साजरे होऊ लागले. उत्सवाच्या व्यासपीठावरुन गाणी, नृत्य, शारीरिक कवाईत याबरोबरच स्वदेशी वस्तूंचा प्रचार; मद्यपानविरोधी प्रचार, राजकीय विचारांचा प्रचार अशा अनेक गोष्टी साध्य करणे शक्य झाले. त्यामुळे टिळकांचे नाव घरोघरी पोचले. ते खऱ्या अर्थाने 'लोकमान्य' झाले.

जनतेमध्ये जागृती करण्याच्या दृष्टीने गणेशोत्साचा उपक्रम फार फलदायी ठरला. विशेष म्हणजे या उत्सवामध्ये सर्व हिंदू समाज सहभागी होत होता. राष्ट्राचे भवितव्य उज्ज्वल करण्यासाठी, समाजामध्ये ऐक्याची भावना वाढीला लागण्यासाठी उत्सवांची नितांत गरज आहे हे टिळकांनी पटवून दिले. 'राष्ट्रीय महोत्सवाची आवश्यकता' या विषयावर लेख लिहून सुशिक्षितांनी काय करावे यासंबंधीही मार्गदर्शन

करण्यात आले. इंग्रज सरकारच्या शिक्षण खात्याने शिवाजी महाराजांचे कर्तृत्व थोड्या वेगळ्या प्रकारे पाठ्यपुस्तकांमधून मांडले होते. लोकहितवादींनी शिवाजी महाराजांनी बंड केले नव्हते तर अभूतपूर्व क्रांती घडवून आणली होती असे विचार आपल्या लेखांतून मांडले होते. म. फुल्यांनी शिवचरित्रावर पोवाडा लिहिला. शिवाजी महाराजांच्या अजोड कार्याबद्दल कादंबरी लेखन होऊ लागले. शिवाजी महाराजांच्या समाधीची देखभाल होत नाही. अशा युगप्रवर्तक शिवरायांच्या समाधीची उपेक्षा होऊ नये असा विचार डग्लस या लेखकाने आपल्या ग्रंथात मांडला. या पुस्तकामुळे शिवरायांच्या समाधीची काळजी घेण्यासाठी संस्थानिक-इनामदार यांनी देणग्या जाहीर केल्या. टिळकांनी यात लक्ष घातले. एखाद्या प्रकरणात लक्ष घातले की ते प्रकरण तडीस नेण्याचा लो. टिळकांचा स्वभाव होता. रायगडावर उत्सव करण्याचा विचार त्यांनी पक्का केला. लो. टिळकांनीच विश्रांती न घेता रात्रीच रायगड चढून जाण्याचे ठरवले. टिळकांच्या या अदम्य उत्साहातून प्रेरणा घेऊन शेकडो लोक त्यांच्याबरोबर गड चढून गेले. शिवाजी महाराज आणि मावळे अंधाऱ्या रात्रीच गड चढून जात होते. त्याचे स्मरण सर्वांना झाले. 'शिवाजी महाराजांसारख्या महापुरुषाचे स्मरण सदैव करणे गरजेचे आहे. त्यामुळे राष्ट्रीयत्वाची ज्योत प्रखर तेजाने तळपत राहील. या महापुरुषाने जातिभेद न करता सर्व जातीतील गुणीजनांना एकत्र आणून क्रांती घडवून आणली' असे लोकमान्यांनी जनतेस सांगितले. केसरीमधून 'शिवजयंती' प्रत्येक वर्षी उत्साहाने का साजरी करावी हेही त्यांनी स्पष्ट केले. या महापुरुषाच्या अलौकिक कार्याबद्दल कृतज्ञताभाव व्यक्त करणे आणि राष्ट्रीय ऐक्याची भावना वृद्धिंगत करणे ही दोन उद्दिष्टे त्यांनी जनतेपुढे ठेवली. शिवाजी महाराजांनी हिंदूंवर होणारा जुलूम नाहीसा केला. पण त्यांनी मुसलमानांच्या मशिदी फोडल्या नाहीत आणि धर्मावरून कोणालाही त्रास दिला नाही. शिवाजी महाराजांसारख्या महापुरुषांची जयंती महाराष्ट्रात उत्साहाने साजरी होऊ लागली त्यामुळे देशातील अनेक राज्यात ज्यांनी अतुलनीय धैर्य प्रकट करून, स्वाभिमानापोटी रणांगणावर पराक्रम केला अशा थोर वीरपुरुषांचे उत्सव साजरे करण्यात येऊ लागले. राजस्थानात महाराणा प्रतापसिंह यांच्या अजोड पराक्रमाचे स्मरण करून तेथे उत्सव साजरा होऊ लागला. बंगालमध्ये प्रतापादित्य या वीरपुरुषाचे स्मरण उत्सवातून होऊ लागले.

इंग्रज राज्यकर्ते असले तरी त्यांनी आपल्या प्रशासन व्यवस्थेवर टीका करण्याचे स्वातंत्र्य जनतेला, पत्रकारांना दिले होते. देशात पूर्वी असलेल्या प्रशासन व्यवस्थेपेक्षा इंग्रज राज्यकर्त्यांची प्रशासन व्यवस्था जनतेचे कल्याण साधण्याच्या दृष्टीने अधिक चांगली होती हे लो. टिळकांनी मान्य केले होते. विचारस्वातंत्र्याचा टिळकांनी पुरेपूर लाभ उठवला आणि जनतेची गाऱ्हाणी दूर करण्यासाठी ते अहोरात्र दक्ष राहिले. क्रॉफर्ड हा आय.सी.एस. अधिकारी हुशार पण अतिशय आळशी होता. ऐशाआराम, मौजमजेत दिवस घालवण्याची त्याला भारी हौस. अनेक इंग्रज स्त्रियांना तो महागड्या भेटवस्तू देत असे. उत्पन्नापेक्षा खर्च अफाट. खर्च भागवण्यासाठी त्याने कर्ज घेतले पण कर्ज फेडण्याची त्याला बुद्धी झाली नाही. लोकांच्या कडून तो अतिशय महागवस्तू भेट म्हणून स्वीकारत असे, याची चौकशी झाली क्रॉफर्डला निलंबित करण्यात आले. त्याचा साथीदार हणमंतराव यांच्यावर खटला भरण्यात आला आणि त्याला दंड आणि सश्रम कारावासाची शिक्षाही झाली. काही मामलेदारांनी क्रॉफर्ड लाच घेत असे, असे जबाब दिले. यासाठी चौकशी आयोग नेमण्यात आला. आयोगाने क्रॉफर्ड निर्दोष आहे असे सांगून मामलेदारांवर रीतसर कारवाई अशी शिफारस केली. एकूण आठ मामलेदारांना नोकरीतून बडतर्फ करण्यात आले. क्रॉफर्ड हा इंग्रज म्हणून तो निर्दोष आणि मामलेदार भारतीय म्हणून दोषी ! क्रॉफर्डला वाचविण्यासाठी आठ मामलेदारांना बळी देण्यात आले. ही घटना लो. टिळकांच्या लक्षात आली. टिळकांनी या अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यासाठी जाहीर सभा घेतली, केसरीत लेख लिहिले. "क्रॉफर्ड आज आहे उद्या नाही. पण आम्ही न्यायदेवतेला सातत्याने आवाहन करीत राहू." अखेर सत्याचाच जय होतो ! टिळकांनी मामलेदारांचे निवेदन वरिष्ठांकडे पाठवले. लो. टिळकांचा कायद्याचा अभ्यास सूक्ष्म आणि चौफेर होता. त्यांनी आपले कायदेविषयक कौशल्य पणाला लावले अखेर मामलेदार सुटले ! टिळकांनी या कामाबद्दल मामलेदारांकडून पैही स्वीकारली नाही. क्रॉफर्ड मात्र दुखावला गेला. त्याने इंग्लंडमधील वृत्तपत्रांमधून पुण्याच्या ब्राह्मणांविरुद्ध लेख लिहिले. लो. टिळकांच्या या अभूतपूर्व विजयामुळे जनमानसात त्यांना मानाचे, आदराचे स्थान लाभले.

लो. टिळक आपल्या मित्रांच्या पाठीशी किती खंबीरपणे उभे राहून त्यांना संरक्षण देत हे त्यांनी बापट यांच्या सुटकेसाठी केलेल्या प्रयत्नावरुन दिसून येते.

बापट हे टिळकांचे जिवलग मित्र. ते बडोदा संस्थानात असिस्टंट कमिशनर म्हणून काम करीत होते. इलियट या अधिकाऱ्याविरुद्ध अनेक तक्रारी होत्या. इलियट इंग्रज. त्याने बापटांचा बळी देऊन सर्व प्रकाराला बापटच जबाबदार आहेत असा वरिष्ठांकडे अहवाल पाठवला बापटांची लो. टिळकांना या प्रकरणी मदत करावी अशी विनंती केली. इंग्रजी अधिकाऱ्यांनी बापटांना दोषी ठरवून त्यांना सश्रमकारावासाची शिक्षा ठोठावली. बडोद्याचे महाराज परदेशाहून परत आले. त्यांनी पुन्हा या प्रकरणाची चौकशी केली. लो. टिळकांनी सर्व पुराव्याचा कसून अभ्यास केला. त्यांनी सर्व पुरावे चौकशी समितीपुढे ठेवले. अखेर बापट या प्रकरणात निर्दोष आहेत हे सिध्द झाले. लो. टिळकांनी कधी वकील म्हणून काम केले नाही. पण त्यांचा कायद्याचा अभ्यास सखोल आणि गाढा होता. त्यांनी वकिली केली असती तर याही क्षेत्रात त्यांनी अढळ स्थान संपादन केले असते हे त्यांच्या कायद्याच्या व्यासंगावरुन सिद्ध होते.

●●●

# ५

# दुष्काळ आणि प्लेग - अस्मानी संकट

लो. टिळकांचे कार्यक्षेत्र सातत्याने वाढत जात होते. संपादक या नात्याने ते जागतिक पातळीवरील घडामोडींचा अभ्यास करुन त्याविषयी केसरीत लिहीत होते. १८९४ च्या सुमारास जपान आणि चीन यांच्यामध्ये युद्ध झाले. या युद्धात जपानने चीनचा पराभव केला. जपानच्या विजयामुळे पूर्वेकडील राष्ट्रांमध्ये नवी जागृती निर्माण होत असल्याचे मत लो. टिळकांनी व्यक्त केले. त्यामुळे भारताच्या स्वराज्याच्या लढ्यास अधिकबळ लाभेल असा विश्वास त्यांना वाटत होता. १८९६ साल लो. टिळकांच्या खासगी आणि सार्वजनिक जीवनातील संघर्षमय दिवस होते. या काळात ना. म. जोशीसह टिळकांचे अनेक सहकारी कालवश झाले. अशा संघर्षमय काळात न. चिं. केळकर यांच्यासारखा  बाहुआयामी व्यक्तिमत्त्व असलेला विद्वान सहकारी लाभला. लो. टिळक सार्वजनिक कामात गुंतलेले असल्यामुळे त्यांच्या कौटुंबिक व्यवहाराची जबाबदारी त्यांनी त्यांच्या भगिनीचे पुत्र श्री. गंगाधरपंत विद्वांस यांच्यावर सोपवली होती. सार्वजनिक कामाचा व्याप सांभाळण्याची जबाबदारी चित्रशाळा छापखान्याचे व्यवस्थापक श्री. वासुदेवराव जोशी यांच्यावर सोपविण्यात आली होती.

लो. टिळक मुंबई कायदेमंडळाचे सदस्य होते. त्यांनी अंदाजपत्रकाचे कागद वेळेवर मिळत नसल्याची तक्रार केली. अंदाजपत्रकामध्ये महसुलाची रक्कम अयोग्य मार्गाने जमा करण्यात येत असल्याचे सांगितले. पंचाहत्तर वर्षाच्या इंग्रजांच्या राज्यात दारुविक्रीमुळे महसूल वाढला तरी तो समाजाच्या हिताच्या दृष्टीने हानिकारक आहे

म्हणून काही ठिकाणी मद्य विक्री दुकाने बंद करण्याची त्यांनी शिफारस केली. जमीनसारा, जंगल आणि अबकारी याद्वारे महसूल गोळा करण्यात येतो. पण या महसुलाचा विनियोग या भागातील जनतेचे राहणीमान सुधारण्यासाठी होत नाही असे मत त्यांनी मांडले. ग्रामीण भागातील शिक्षण, उद्योग, रस्ते, नाले यासाठी अंदाजपत्रकात अधिक रकमेची तरतूद हवी असे त्यांनी सांगितले. या कायदेमंडळावर लो. टिळकांची १८९७ साली फेरनिवड झाली. या काळात प्लेग आणि दुष्काळ या जनतेवर कोसळलेल्या संकटावर मात करण्यासाठी लो. टिळकांनी जिवाचे रान केले आणि नि:स्थार्थी समाजसेवेचा आदर्श समाजापुढे ठेवला.

देशात दुष्काळ वारंवार पडत असे. पण १८७६ च्या दुष्काळापेक्षा १८९६ साली पडलेल्या दुष्काळाचे स्वरुप फार भीषण होते. या दुष्काळामध्ये अन्नाअभावी मृत्युमुखी पडणाऱ्या दुर्दैवी माणसांची संख्या खूप होती. जवळजवळ चाळीस लाख दुष्काळ-पीडितांना सरकारी योजनेचा लाभ झाला. सरकारने 'फॅमिन रिलीफ कोड' अंमलात आणल्यामुळे पीडितांना सर्वतोपरी साहाय्य करण्याची जबाबदारी सरकारने स्वीकारली होती. लो. टिळकांनी रिलीफ कोडचे मराठी भाषांतर जनतेस उपलब्ध करुन द्यावे अशी विनंती केली. जनतेस रिलीफ कोड समजावे म्हणून केसरीमध्ये त्याचे भाषांतर प्रसिद्ध करण्यात आले. सरकारी यंत्रणा संथपणे कार्य करीत होती, अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे मदत जनतेपर्यंत पोचत नव्हती. टिळकांनी भाषांतरांच्या प्रती सर्वत्र वाटण्याची व्यवस्था केली. 'कर्ज काढून सारा देऊ नका' असे त्यांनी वृत्तपत्रामधून आवाहन केले, याविरुद्ध सरकार खटला भरणार होते. पण 'सारा देऊ नका' असे म्हटले नव्हते. 'कर्ज काढून सारा देऊ नका' असे म्हटले होते, त्यामुळे खटला टिकू शकला नाही. टिळकांनी आपले प्रतिनिधी सर्वत्र पाठवले. सरकारी अधिकाऱ्यांना न घाबरता शेतकऱ्यांनी दुष्काळात कायद्याप्रमाणे मदत मागावी असे आवाहन शेतकऱ्यांना करण्यात आले. लोकमान्य टिळकांनी केसरीमधून वारंवार लेख लिहून शेतकऱ्यांना आवाहन केले. पुढारी आणि जनता यांच्यामध्ये धीटपणा, चिकाटी, परोपकार हे गुण निर्माण व्हावे असा जाणीवपूर्वक प्रयत्न लो. टिळकांनी केला. हे राज्य कायद्याचे आहे. अन्याय झाला तर त्याविरुद्ध ओरड करणे हे आमचे काम आहे. दुष्काळामध्ये

श्रीमंत नागरिकांविरुद्ध आंदोलन होऊ नये, जनतेने लुटालूट करु नये असे आवाहन टिळकांनी नेहमी केले. सार्वजनिक सभेच्या माध्यमामधून, कार्यकर्त्यांच्या मदतीने त्यांनी जनतेची गाऱ्हाणी सरकारपर्यंत पोचवून त्यांना न्याय मिळवून दिला. टिळकांनी शेतकऱ्यांना आपल्या हक्कांची जाणीव करून दिली, त्याचबरोबर हक्कासाठी निर्भयपणे लढा देण्याची गरज असते हेही त्यांनी पटवून दिले. दुष्काळ का पडतो याचाही टिळकांनी अभ्यास केला. देशातील उद्योगधंदे ही इंग्रजांची मक्तेदारी होती. त्यामुळे जमिनीचा अधिक वापर होऊन जमीन नापीक होत असे. कमी पाऊस पडल्यामुळे दुष्काळ पडतो हे जरी खरे असले तरी देशातील वाढत्या दारिद्र्यास इंग्रज सरकारच जबाबदार आहे. मात्र सरकारी अधिकाऱ्यांना चांगले वेतन देण्यात येत होते. या घणाघाती प्रचारामुळे सरकारने काही कार्यकर्त्यांवर खटला भरला. "हे कायद्याचे राज्य आहे. जनतेस कायदा समजावून सांगणे हा गुन्हा असेल तर हेच कार्य मी मोठ्या प्रमाणात करीत आहे. तेव्हा सरकारने माझ्यावरही खटला भरावा असे लो. टिळकांनी जाहीर केले. अन्यायाविरुद्ध लढताना तुरुंगात जाण्याची, शिक्षा भोगण्याची मानसिक तयारी हवी, असे लो. टिळक नेहमी सांगत."

दुष्काळात सरकारने सोलापूर येथील विणकऱ्यांना खडी फोडण्याचे काम दिले. दुष्काळपीडित निरनिराळ्या व्यवसायाचे असतात. त्यांना खडी फोडण्याचे काम देण्यापेक्षा त्यांना आर्थिक मदत देऊन त्यांचा व्यवसाय करण्याची संधी द्यावी असे लो. टिळकांनी सरकारला आवाहन केले. सरकारकडे तसा अर्ज गेला. नेहमीच्या सवयीप्रमाणे सरकारने अर्जाकडे दुर्लक्ष केले. लो. टिळक स्वत: सोलापुरला गेले. त्यांनी गिरणी मालकांचे, श्रीमंत व्यापाऱ्यांचे साहाय्य घेऊन 'विव्हर्स गिल्ड' स्थापन केली. यामुळे साळी, कोष्टी विणकरांना काम मिळाले, त्यांची परस्थिती सुधारली. दुष्काळासारख्या संकटाशी सामना करताना लो. टिळकांनी सरकारशी न्यायासाठी संघर्ष करावा लागला.

याच सुमारास मुंबई आणि नंतर पुणे येथे प्लेगची साथ पसरली. या भयानक साथीला तोंड देण्यासाठी सरकारने रँड या सनदी अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. प्लेग निवारण्यासाठी सरकारने केलेले उपाय म्हणजे व्याधीपेक्षा औषध भयंकर असा जनतेस अनुभव आला. प्लेग हा संसर्गजन्य रोग. रुग्णाला

इस्पितळात पोचवून नातेवाईकांची गावाबाहेर सोय करण्याची योजना सरकारने हाती घेतली. ज्या घरात प्लेगची लागण झाली त्या घराची साफसफाई करताना पुरुषांना विशेषत: स्त्रियांना त्रास होऊ लागला. बंदोबस्तासाठी गोरे आणि काळे शिपाई होते. गोरे शिपाई बेधडक घरात शिरून देवघर, स्वयंपाकघर येथे नासधूस करीत. या गोऱ्या शिपायांनी स्त्रियांना रस्त्यावर आणून त्यांची तपासणी केली. स्त्री-पुरुषांशी ते सभ्यपणाने वागत नव्हते. त्यामुळे स्त्री-पुरुषांच्या मनात या शिपायांबद्दल भीतीची भावना निर्माण झाली. या गोऱ्या शिपायांच्या दुष्ट कारवायांची भीती घेऊन काही नागरिक प्राणास मुकले. नागरिकांच्या गाऱ्हाण्यांची दाद घेण्यास कुणी अधिकारी फिरकत नव्हते. सरकारी इस्पितळ योग्य नाही हे पाहून लो. टिळकांनी जनतेचे साहाय्य घेऊन दुसरे इस्पितळ उघडले. इथे रोग्यांना चांगल्या प्रकारची वागणूक मिळाल्याने जनतेने सरकारी इस्पितळापेक्षा या इस्पितळात जाणे पसंत केले. टिळक स्वत: इस्पितळाच्या व्यवस्थेकडे लक्ष देत होते. 'हिंदू प्लेग हॉस्पिटल' या नावाने ते ओळखले गेले. टिळकांनी दु:ख निवारण समितींची स्थापना केली. नातेवाईकांना मोकळ्या हवेशीर ठिकाणी नेण्यात आले आणि त्यांच्या राहण्याची, जेवणाची व्यवस्था करण्यात आली. रोग्यांनी पळून जाऊ नये म्हणून शहराभोवती लष्कराचे शिपाई होते. रात्री अपरात्री फिरण्यास पासची सोय होती. पास नसल्यास शिपाई अडवणूक करीत आणि दागिने, पैसे लुबाडत. 'शिपाई कायदा हातात घेत असतील तर त्यांना विरोध करावा. चोरी करेल त्याचा हात खुशाल धरावा' असे लो. टिळकांनी केसरीमध्ये जाहीर केले. श्रीमंत नागरिक बाहेर गेले, त्यामुळे शिपाई गरिबांना त्रास देत होते. प्लेगचे संकट दूर होताच टिळक विश्रांतीसाठी सिंहगडावर गेले. दुष्काळ आणि प्लेग यांनी ज्या काळात थैमान घातले त्या काळात लो. टिळकांनी अविश्रांत श्रम घेऊन ग्रामीण भागातील जनता तसेच शहरातील सर्व स्तरावरील नागरिक यांना शासनाकडून तसेच समाजसेवी कार्यकर्त्यांकडून मदतीचा ओघ कायम ठेवला. या काळात लो. टिळकांनी गव्हर्नर आणि इतर अधिकारी यांनी केलेल्या उपाययोजनेबद्दल समाधान व्यक्त केले होते. जनतेने सरकारी बंदोबस्ताबद्दल रिकाम्या शंका घेऊ नये असेही त्यांनी जनतेला बजावले होते.

●●●

# ६

# राजद्रोहाचा पहिला खटला

प्लेगच्या आपत्तीमध्ये शिपायांकडून जनतेचा छळ चालू होता. याचवेळी २७ जून, १८९८ रोजी रात्री प्लेग समितीचे अध्यक्ष रँड आणि लेफ्टनंट आयर्स्ट यांचा खून झाला. गणेशखिंड येथील गव्हर्नरच्या बंगल्यामध्ये महाराणींच्या हीरकमहोत्सवाच्या-निमित्ताने मेजवानी आयोजित करण्यात आली होती. लो. टिळकही या मेजवानीस उपस्थित होते. रँड, लेफ्टनंट आयर्स्ट याच्याबरोबर घोडागाडीतून परत येत होता. गणेशखिंडीत त्यांच्यावर गोळ्या झाडून त्यांचा खून करण्यात आला. या खुनामुळे प्रचंड खळबळ माजली. त्या काळी इंग्रज राज्यकर्त्यांवर स्तुतिसुमने उधळून सरकारच्या टीकाकारांवर अतिरंजित भाषेत आगपाखड करणारी इंग्रजी वृत्तपत्रे होती. 'टाईम्स ऑफ इंडिया' हे प्रमुख इंग्रजी वृत्तपत्र आघाडीवर होते. 'इंग्रज सरकारचे राज्य उलथवून टाकण्यासाठी पुण्यातील ब्राह्मणवर्ग प्रयत्नशील आहे. तसेच मराठी वृत्तपत्रे आक्रमक भाषेत लेखन करून हिंसाचार करण्यास प्रवृत्त करतात' असे सनसनाटी आरोप या इंग्रजी वृत्तपत्रांनी केले. त्यांचा रोख लो. टिळकांवर होता. पुण्यातील जिल्हाधिकाऱ्यांनी प्रमुख नागरिकांची सभा बोलावून सरकारविरुद्ध प्रचार, हिंसचार करणाऱ्याविरुद्ध कट, राजद्रोह, खून या कलमाखाली खटले भरण्यात येतील असा सज्जड दम दिला. लो. टिळकांनी रँड याचा खून ही भयंकर घटना आहे असे सांगून मारेकरी सराईत गुन्हेगार असावेत. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी आणि टाईम्स सारख्या वृत्तपत्रांनी अत्यंत प्रक्षोभक भाषेत बदनामीकारक मजकूर लिहिणे बरोबर नाही असे आपल्या लेखात स्पष्ट केले. जनतेने निराश न होता सरकारला साहाय्य करावे असे त्यांनी आवाहन केले. टिळकांनी हाती घेतलेल्या गणेशोत्सव, शिवजयंती

अशा उपक्रमांमुळे सर्वसामान्य बहुजन समाजामध्ये जागृती निर्माण होत होती. सरकारी अधिकाऱ्यांना ही जागृती जाचक वाटत होती. सरकारने आणि इंग्रजी वृत्तपत्रांनी या खुनासाठी मराठी वृत्तपत्रे, इंग्रजी शिकून बाहेर पडणारे तरुण, शिवाजी जयंती आणि गणेशोत्सव यांना जबाबदार धरणे योग्य नाही असे सरकारला ठणकावून सांगितले, "राज्य करणे म्हणजे सूड उगवणे नव्हे" या शीर्षकाखाली त्यांनी अग्रलेख लिहिला. सरकार कितीही चांगले असले तरी खून, दरोडे होतातच. याचा फटका सरकारी अधिकाऱ्यांनाही बसू शकतो. सर्व गुन्ह्यांची चौकशी, निकाल न्यायव्यवस्थेनुसार लागला पाहिजे. तसेच लो. टिळकांनी जनतेस धीर देऊन संयम पाळण्याची विनंती केली. इंग्लडमध्ये लोकसभेत टिळकांची भाषणे आणि लेख यांचा विचार करुन त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरण्यात यावा अशी सदस्यांनी मागणी केली. या आरोपाला उत्तर देताना टिळकांनी एखादा कायदा किंवा अधिकारी यांच्या कारभाराविरुद्ध टीका केली म्हणून तो राजद्रोहाचा गुन्हा ठरत नाही असे 'राजद्रोह कशाला म्हणतात ?' या अग्रलेखात स्पष्ट केले. इंग्रज सरकारचे राज्य आम्ही स्वीकारले आहे. इंग्रजी भाषेमुळे आम्हाला कायदा समजत आहे. इंग्रजीमुळे जे ज्ञान मिळाले त्या ज्ञानाचा उपयोग करून आम्ही जनतेची गाऱ्हाणी सरकारपुढे मांडीत आहोत. इंग्रजांचे राज्य नष्ट व्हावे किंवा राज्यकर्त्यांचा अपमान करावा हा आमचा हेतू नाही.

शिवजयंतीच्या निमित्ताने अफझलखानाच्या वधासंबंधी जी नामवंत वक्त्यांची आणि विशेषत: लो. टिळकांची भाषणे झाली त्याची गंभीर दखल सरकारने घेतली अफझलखानाचा वध हा गुन्हा नव्हता. अटीतटीच्या राजकारणात घडलेली ही एक घटना होती. लो. टिळकांनी आपल्या भाषणात सांगितले, "शिवाजी महाराजांनी अफझलखानाला मारले हे चांगले की वाईट असा प्रश्न निर्माण होतो. या खुनासाठी इंडियन पीनल कोड किंवा धर्मशास्त्रे यांचा आधार घेण्याची गरज नाही. कायदे, शास्त्रे सामान्य माणसासाठी असतात. महापुरुष हे नीतितत्त्वांच्या फार वरच्या दर्जाचे असतात. महाराजांनी स्वत:च्या स्वार्थासाठी हे कृत्य केले नाही. जनतेच्या हितासाठी त्यांनी अफझलखानाचा वध केला. श्रीकृष्णानेही गीतेमध्ये आपल्या नातेवाईकांना, गुरुंना ठार मारा असा उपदेश केला आहे. ठार मारण्याचे कृत्य निष्काम बुद्धीने

व्हायला हवे. ईश्वराने मुसलमानांना राज्य करण्याचे ताम्रपट दिले नव्हते. शिवाजी महाराजांनी त्यांना आपल्या जन्मभूमीपासून दूर ठेवण्यासाठी अफझलखानाचा खून केला. महापुरुषांच्या कर्तृत्वाचा विचार अशा व्यापक दृष्टिकोणातून व्हायला हवा."

लो. टिळकांच्या या भाषणाचा विपर्यास राज्यकर्त्यांनी आणि इंग्रज सरकारची सातत्याने पाठराखण करणाऱ्या देशातील आणि इंग्लंडमधील वृत्तपत्रांनी केला. जस्टिस हे टोपण नाव घेऊन लेखकांने 'टाईम्स'मध्ये पत्र लिहून शिवजयंती, शिवसमाधीचा जीर्णोद्धार यामागे दुष्ट हेतू असल्याचा आरोप केला. मुसलमानांना राज्य करण्याची सनद किंवा ताम्रपट कुणी दिला नव्हती या वाक्याचा ख्रिस्ती आणि युरोपियन असा अर्थ लावला. इंग्लंडमधील वृत्तपत्रांनीही मराठी वृत्तपत्रे व भारतीय नेते यांच्यावर टीकेची झोड उठवली. रँड यांचा खून पुण्यातच झाला याचे कारण पुणे हे देशद्रोही कारवायांचे आणि बंडांचे केंद्र आहे. विशेषत: पुण्यातील सुशिक्षित ब्राह्मण अशा प्रकारची कट-कारस्थाने करण्यात प्रवीण आहेत. इंग्रज सरकारविरुद्ध बंड करणे हाच या खुनामागील हेतू आहे असे आरोप इंग्लंडमध्ये करण्यात आले. ना. गोपाळ कृष्ण गोखले इंग्लंडमध्ये होते. त्यांनी वृत्तपत्रांना मुलाखत देताना प्लेगच्या काळात गोऱ्या शिपायांनी गोरगरिब जनतेवर, स्त्रियांवर अत्याचार केले हे खरे आहे असे सांगितले. यासंबंधी तक्रारी करण्यात आल्या पण या तक्रारींना अधिकाऱ्यांनी केराची टोपली दाखवली असाही आरोप ना. गोखले यांनी केला. पण इंग्लंडच्या परराष्ट्र मंत्र्यांनी ना. गोखले यांचे आरोप अतिरंजित असल्याचे लोकसभेत सांगितले.

जनतेच्या तक्रारी इंग्रजी वृत्तपत्रांपर्यंत पोचवण्यासाठी लो. टिळक मुंबईला गेले. २७ जुलै, १८९८ रोजी रात्री त्यांना अटक करण्यात आली. त्यांना जामीन नाकारण्यात आला. लो. टिळकांनी आपण गुन्हा केला असा जबाब देण्यास नकार दिला. 'माझ्या स्वच्छ चारित्र्यामुळे माझी जनमानसात प्रतिमा उजळ आहे. अशा खटल्यापुढे मी मान तुकवली आणि सरकारला शरण गेलो तर जनता काय म्हणेल ? कायद्याच्या दृष्टीने माझ्यावरील आरोप टिकणार नाहीत' हेही त्यांनी स्पष्ट केले. 'पुण्यातील नेत्यांची मानहानी करणे हा या खटल्यामागील उद्देश आहे. आम्ही जनतेचे सेवक आहोत. जनतेचा विश्वासघात करून त्यांची निराशा करण्यासारखे कृत्य मी

मुळीच करणार नाही.' लो. टिळकांच्यावरील या खटल्याचे पडसाद देशभरात उमटले. मुंबई, कलकत्ता येथे टिळकांच्या संरक्षणासाठी निधीचा ओघ सुरु झाला.

१४ सप्टेंबर, १८९७ रोजी टिळकांवरील खटल्याची सुनावणी उच्च न्यायालयात सुरु झाली. न्या. स्ट्रॅची हे न्यायाधीश होते. खटला मराठी भाषेतील वृतांच्या आधारे भरण्यात आला होता. सरकारी भाषांतरकारांने मराठीचे इंग्रजी भाषांतरे केले होते. तो मुसलमान होता. त्याने कडक शब्दात भाषांतर केले होते. त्यामुळे राजद्रोहाच्या आरोपाला बळकटी आली. केसरी, मराठीतील लेख आणि टिळकांची भाषणे यांची तपासणी झाली. इंग्रज सरकारविषयी अप्रीती निर्माण करण्याचा यामागे हेतू होता असे सरकारतर्फे सांगण्यात आले. 'मराठा'मध्ये लंडनला जाणाऱ्या राजेरजवाड्यांची कुचेष्टा करण्यात आली. कारण इंग्लंडमध्ये राजपुत्र हे सर्कसवाले आणि त्याच्या इशाऱ्याप्रमाणे नाचणारे राजेरजवाडे ! हा राजद्रोहासाठी पुरावा मानण्यात आला. पण संपादकीय आणि संपादकांना येणारी पत्रे यामध्ये फरक असतो असे लो. टिळकांच्यावतीने सांगण्यात आले. मराठीतील मजकूर हे वाचकाचे पत्र होते. संपादकाने सरकारवर टीका केल्यामुळे राजद्रोह केला असे सिध्द होत नाही असे सांगण्यात आले. पण 'अप्रीती' याचा अर्थ लावताना न्यायाधीशांनी द्वेष, द्रोह, तिरस्कार असा अर्थ लावला. राज्य सरकारविरुध्द टीका करताना काही बंधने कायद्याप्रमाणे पाळावी लागतात. सरकारवर केवळ टीका न करता सरकार उलथून पाडण्याच्या दृष्टीने संपादकांनी लिहिले आहे का याचा विचार न्यायाधीशांनी केला. ज्युरीच्या नऊ सभासदांपैकी सहाजणांनी टिळकांविरुध्द निकाल दिला. टिळकांनी आपले मनोगत व्यक्त करताना "ज्युरीचा निकाल काहीही असो मी निरपराध आहे. ज्युरींना मराठी शब्दांचे अर्थ नीट समजले नाहीत. राजद्रोह करण्याचा उद्देश नव्हता. वाचकांवरही त्याचा तसा परिणाम झालेला नाही. "असे सांगितले. न्यायाधीशांनी लो. टिळकांच्या कुशाग्रबुध्दीची, कर्तृत्वाची वाखाणणी करून या गुणांचा दुरुपयोग झाला असे मत व्यक्त केले. अखेर लोकमान्य टिळकांना दीड वर्षाच्या सक्तमजुरीची शिक्षा त्यांनी दिली.

हा निकाल ऐकण्यासाठी हजारो लोकांनी गर्दी केली होती. पण लो. टिळकांना बंद गाडीतून मागील दरवाजाने नेण्यात आले. इंग्लंडमध्ये प्रीव्ही कौन्सिलकडे अपील

करायचे ठरले. न्यायाधीशांच्या निकालाची प्रत लो. टिळकांकडे नव्हती. त्यांनी एकाग्र-चित्ताने निकाल ऐकला होता. त्याच्या आधारे त्यांनी अपीलाचा मजकूर तयार केला. लो. टिळकांच्या बुद्धिमत्तेबद्दल, कायद्याच्या ज्ञानाबद्दल बॅरिस्टरना आदर होता. लो. टिळकांनी तयार केलेला अपीलाचा मजकूर वाचून बॅरिस्टर प्रभावित झाले. त्यांचा लो. टिळकांबद्दलचा आदर वाढला. उच्च न्यायालयाने अपील करण्यास परवानगी नाकारली. तेव्हा खास अपील करण्यात आले. रँडच्या खुनाशी लो. टिळकांचा संबंध आहे असा संशय होता. पण ज्याने रँडचा खून केला त्या चाफेकरांनी लो. टिळकांचा उल्लेख केला नव्हता. फाशी जाण्यापूर्वी चाफेकरांनी आपली आत्मकथा लिहिली. त्यावरुन चाफेकरांचे टिळकांविरुद्ध मत होते हे स्पष्ट झाले. त्यात लोकमान्यांची प्रकृत्ती ढासळत असल्याच्या बातम्या पसरल्या. देशातील अनेक नामवंतानी टिळकांची सुटका व्हावी म्हणून सरकारकडे निवेदन पाठवले. या निवेदनावर काळे गोरे अधिकारी पार्लमेंटचे सदस्य आणि मॅक्समुल्लरसारख्या महापंडितांच्या सह्या होत्या. मॅक्समुल्लर यांना लो. टिळकांच्या विद्वतेबद्दल आदर होता. काँग्रेसचे अध्यक्ष सुरेंद्रनाथ बानर्जी यांनी आपल्या भाषणात टिळकांची लोकप्रियता अफाट असल्याचे जाहीर केले. अखेर काही अटीवर लो. टिळकांची सुटका करण्यात आली. लो. टिळकांनी सरकारात सहभागी होऊ नये आणि अप्रीती निर्माण होईल असे लेखन करू नये अशा दोन अटी होत्या. कायद्याच्या मर्यादा सांभाळून आपण लेखन करु असे लोकमान्यांनी सांगितले. यानंतर दोन महिने लोकमान्यांनी सिंहगडावर जाऊन विश्रांती घेतली. त्यानंतर 'पुनश्च हरि ॐ' असा अग्रलेख लिहून टिळकांनी आपल्या कार्याची सूत्रे पुन्हा हाती घेतली.

यानंतर लो. टिळक आणखी एका भयंकर संकटाच्या फेऱ्यात सापडले. कोल्हापूरचे बाबा महाराज हे लो. टिळकांचे मित्र. दुर्धर आजारानंतर त्यांचे निधन झाले. त्यांनी मृत्युपत्र तयार केले होते. आणि विश्वस्तांमध्ये लो. टिळकांचे नाव घातले. बाबा महाराजांच्या पत्नी त्यावेळी गरोदर होत्या. बाई प्रसूत होताच मुलाचे अकाली निधन झाले. त्यामुळे दत्तकाचा प्रश्न उभा राहिला. बाबा महाराजांचे कारकूनही विश्वस्त होते. त्यांनी कपट कारस्थान रचले. त्यात ताई महाराजांना क्षयरोग झाला.

दत्तक प्रकरणाला वेग आला. दादासाहेब खापर्डेही एक विश्वस्त होते. कारस्थानी मंडळींनी बाईंचे कान फुंकले. आपला मुलगा गेला तेव्हाच विश्वस्तमंडळ बरखास्त झाले असे समजून बाईंनी विश्वस्तांना नोटीस दिली. ॲस्टन हे लो. टिळकांच्या विरुद्ध होते. ॲस्टनने प्रोबेट रद्द केले आणि लो. टिळकांवर अपहार, फसवणूक, दंगा करणे या गुन्ह्यासाठी खटला भरावा असा आदेश दिला. पोलीस अधिकाऱ्यांनी लो. टिळक गुन्हेगार आहेत अशा तऱ्हेने चौकशी केली. खटला उभा राहिला. न्यायाधीशाने लो. टिळक नि:स्वार्थी आहेत असे मानले. म्हणूनच त्यांना दीड वर्षाच्या सक्तमजुरीची आणि दंडाची शिक्षा दिली. पोलिसांनी लो. टिळकांना हातकड्या घातल्या हे ऐकून जनतेने, वृत्तपत्रांनी जोरदार निषेध नोंदवला. टिळकांना तुरुंगात नेण्यात आले. टिळकांच्या वकिलांनी या निकालाविरुद्ध हायकोर्टात दाद मागितली. या कामात तीन चार दिवसांचा काळ लोटला. चार दिवस टिळकांना तुरुंगात काढावे लागले. हायकोर्टाने टिळक संपूर्णपणे निर्दोष असल्याचे जाहीर केले. हायकोर्टाने सरकारी वकिलाने टिळकांविरुद्ध केलेले आरोप खोटे आहेत हे सरकारतर्फे जाहीर करावे असा आदेश दिला ! टिळक निर्दोष सुटले. पण त्यासाठी टिळकांना जबर किंमत मोजावी लागली. टिळकांचे चारित्र्य उज्ज्वल, शुद्ध आहे याची जनतेस खात्री पटली. तसेच आपल्या मित्रांसाठी कोणत्याही संकटांना सामोरे जाण्याची निर्भय वृत्ती टिळकांमध्ये आहे हे सिद्ध झाले !

●●●

## ७

# वेदोक्त प्रकरण

सप्टेंबर, १८९८ मध्ये टिळकांची तुरुंगातून सुटका झाली. 'सुधारक' या नियतकालिकाच्या प्रतिनिधीने त्यांची दीर्घ मुलाखत घेतली. 'टाईम्स ऑफ इंडिया' या इंग्रजी वृत्तपत्राने लोकमान्याविरुद्ध खोडसाळपणे प्रचार केला. या वृत्तपत्राविरुद्ध फिर्याद करण्याचा त्यांचा प्रथम विचार होता. पण त्यांनी फिर्याद केली नाही. 'जस्टिस' या टोपण नावाने या इंग्रजी वृत्तपत्रामध्ये कोण लिहिते यासबंधंधीही तर्क लढवले जात होते. त्यामध्ये डॉ. भांडारकर, श्रीकीर्तने यांची नावे घेतली गेली. पण लो. टिळकांनी या दोन विद्वानांबद्दल मुळीच शंका घेतली नाही. तुरुंगात गालिच्यासाठी लोकर व सूत रंगविण्याचे काम त्यांनी केले. कोरड्या भाकरीमुळे त्यांची पचनशक्ती बिघडली. वजन घटले. अखेर इंग्लंडमधील संस्थेने अर्ज केल्यानंतर त्यांना दूध, तूप देण्यात येऊ लागले. त्यांना कैद्याचा गणवेश देण्यात आला होता. रात्री वाचनासाठी दिव्याची सोय झाली. पुस्तकेही आणण्याची परवानगी मिळाली. त्यांनी रात्री तीन तास दररोज ऋग्वेदाचा अभ्यास केला. टिळकांच्या बचावासाठी त्रेपन्नहजार रुपयांचा निधी जमला होता. त्यापैकी नऊ हजार शिल्लक होते. तुरुंगातून सुटल्यानंतर त्यांना अशक्तपणा जाणवला. पायात त्राण नव्हते. दोन महिने सिंहगडवर विश्रांती घेऊन त्यांनी आपल्या सार्वजनिक कामाला पुन: पाहून घेतले.

त्या काळाच्या मद्रास शहरात कॉंग्रेसचे अधिवेशन भरले होते. अधिवेशनात त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. अनेक ठिकाणी त्यांचे सत्कार करण्यात आले. त्यांनी रामेश्वर, सिलोन, तंजावर या भागाचा दौरा केला. रामेश्वरातील भव्य मंदिरे पाहून ते प्रभावित झाले. त्यांनी हिंदू धर्माच्या ऐक्याचा आणि वैभवाचा अनुभव

इथे घेतला. तंजावरच्या राजघराण्यातील संस्थानिकांनी मराठी भाषा आणि मराठी संस्कृती यांची गेले तीन शतके निष्ठेने जपणूक केल्याचे त्यांनी पाहिले. सिलोनमध्ये सामाजिक सुधारणा होऊनही धर्मातील रूढी, जातिव्यवस्था टिकून असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. लोमकमान्यांनी ब्रह्मदेशला भेट दिली. तेथे हिंदू व्यावसायिकांनी हिंदू धर्माच्या धार्मिक विधींचे, रूढींचे पालन केल्याचे पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले.

लो. टिळकांनी हिंदू धर्माचा, हिंदू धर्मातील चालीरीतींचा, रुढीचा विशेष अभिमान होता. हिंदू धर्मातील सामाजिक सुधारणा समाजाचा विरोध होणार नाही अशा प्रकारे हळूहळू करण्यात यावा असा त्यांचा विचार होता. जातिव्यवस्थेसंबंधी त्यांनी वेळोवेळी व्यक्त केलेल्या विचारांमध्ये विसंगती दिसून येते. अस्पृश्यता निर्मूलनाबाबतीतही त्यांची भूमिका संदिग्ध होती. पुण्यात भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात म. फुले यांच्या अनुयायांनी "भारत देश हा एका महारथाप्रमाणे असून या महारथाला ओढण्यासाठी मराठा, माळी, कुणबी, महार, मांग आणि भिल्ल यांना जुपले आहे. या महारथामध्ये बसण्याचा मान इंग्रज राज्यकर्त्यांना आणि समाजातील उच्चवर्णियांनाच मिळतो. खालच्या जाती निमूटपणे महारथ ओढतात. त्यांना खायला, प्यायलाही नीट मिळत नाही" 'दीनमित्र' या दलित समाजाच्या नियतकालिकामध्ये या अनुयायांनी खालच्या समाजाला या अन्यायाविरुध्द लढण्यासाठी आवाहन केले होते.

गणेशोत्सव, शिवजयंती अशा धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांमधून लो. टिळकांनी जनजागृती घडवून आणली. दुष्काळ आणि प्लेग या संकटकाळात त्यांनी सामान्य जनतेसाठी नि:स्वार्थीपणे अहोरात्र मेहनत घेतली. पण सामाजिक सुधारणेला मात्र त्यांनी नेहमी कडवा विरोध केला होता. त्यामुळे खालच्या जातीच्या समाजाला ते सनातन, कर्मठ, धार्मिक वृत्तीचे ब्राह्मण आहेत असेच वाटत होते. ब्राह्मणेतर चळवळीला वेग यावा अशी घटना कोल्हापूर येथे घडली. कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज हे क्षत्रिय. स्थानिक ब्राह्मणांनी शाहू महाराज हे क्षत्रिय आहेत हे मान्य केले नाही. त्यांच्या मते ते शूद्र होते. या ब्राह्मणांनी त्यांच्याकडे धार्मिक कार्य करण्यास साफ नकार दिला. श्री. राजोपाध्ये हे दरबारचे पुरोहित. त्यांनीही धार्मिक कार्य करण्यास

नकार दिला. छत्रपती शाहू महाराजांनी राजोपाध्यांची मालमत्ता, जमीनजुमला जप्त केला. त्यांनी मराठा समाजातील जाणत्या व्यक्तींना शंकराचार्याची पदवी देऊन वेदोक्त पद्धतीने धार्मिक विधी करण्याचे अधिकार आहेत असे जाहीर केले. हे 'वेदोक्त प्रकरण' महाराष्ट्रात गाजले. छत्रपती शाहू महाराजांनी ब्राह्मणेतर चळवळीला सतत उत्तेजन दिले.

छत्रपती शाहू महाराजांनी पुरोहित ब्राह्मण वर्गास दिलेल्या आव्हानाचे पडसाद महाराष्ट्रात उमटले. ब्राह्मणतर समाजात शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळे त्यांना ब्राह्मणांच्या वर्चस्वाची जाणवी होऊ लागली. या ब्राह्मणी वर्चस्वाला विरोध करुन मराठा आणि इतर मागासवर्गीय, पददलित समाज यांच्या उत्कर्षासाठी या समाजातील नेत्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्यनिवारणाची मोहीम हाती घेतली. लो. टिळकांनी शिवाजी महाराज क्षत्रिय होते म्हणूनच काशीच्या ब्राह्मणांनी त्यांच्या राज्यभिषेक समारंभात धार्मिक कार्य केले असा खुलासा केला. पण वेदोक्त पद्धतीने धार्मिक विधी करण्याचे अधिकार ब्राह्मणेतर समाजाला देता येतील का ? या प्रश्नाचे उत्तर लो. टिळकांनी दिले नाही. 'छत्रपती शिवाजी महाराज यांना जो सन्मान लाभला तो लाभण्यासाठी त्यानंतरच्या मराठा राजांनी कोणते कर्तृत्व गाजवले ?' असा टिळकांनी प्रश्न केला. केवळ वेदांचा अभ्यास केला म्हणजे हिंदू समाजामध्ये इतरांना ब्राह्मणांचे स्थान मिळणार नाही. युरोपातील विद्वानही वेदांचा अभ्यास करतात. पण त्यांना हा मान कधीही मिळणार नाही. 'वेदोक्त हक्क' मिळवल्यामुळे जातिव्यवस्था नष्ट होईल असे मानणे चुकीचे आहे. कारण ब्राह्मण स्त्रियांनाही वेदांचा अभ्यास करण्याचा अधिकार नाही. ब्राह्मणेतरांना वेदोक्त हक्क नाकारण्यामागे ब्राह्मण वर्गाला आपले वर्चस्व, आपली मिरासदारी टिकवायची होती. ब्राह्मणेतर समाजाला या ब्राह्मणांच्या तथाकथित वर्चस्वालाच आव्हान द्यायचे होते. छत्रपती शाहू महाराजांनी हे क्रांतिकारक धोरण स्वीकारले यामागे ब्राह्मणी वर्चस्वाला सुरुंग लावण्याचा त्यांचा स्पष्ट हेतू होता. राजकीय क्षेत्रात समता प्रस्थापित करण्याचे धोरण स्वीकारले तर त्यानंतर सामाजिक क्षेत्रातही समानतेच्या मागणीचा आग्रह ब्राह्मणेतर समाज धरणार हे उघड होते. या समतेच्या आग्रहामागे जातिद्वेष

नव्हता. सामाजिक आणि धार्मिक हक्कासाठी मागणी ही एक नैतिक तत्त्वावर आधारलेली मागणी होती. या मागणीला ब्राह्मण विरोधी प्रखर संघर्ष करण्याचे स्वरुप प्राप्त झाले हे मान्य करावे लागेल.

आर्यसमाजाच्या कार्यकर्त्यांनी थिऑसॉफीच्या पुढाऱ्यांना भारतात येण्यास निमंत्रण दिले. थिऑसॉफी हा संप्रदाय अमेरिकेत स्थापन झाला. थिऑसॉफी हा सर्वधर्म संग्राहक विचार संप्रदाय होता. लो. टिळक सनातनी धार्मिक विचाराचे होते. आर्यसमाजासारख्या हिंदू धर्माचा विचार करणाऱ्या संस्थांनी थिऑसॉफी या संप्रदायाला विरोध केला. पण मिसेस बेझंट आणि त्यांच्या थिऑसॉफी संप्रदायावर टीका करण्यात आली हे लो. टिळकांना आवडले नाही. त्यांनी १९०४ मध्ये लेख लिहून या संप्रदायाबद्दल निर्माण झालेले गैरसमज दूर केले "ॲनी बेझंट या युरोपियन आहेत म्हणून त्यांच्या संप्रदायाविरुद्ध टीका करणे योग्य नाही." थिऑसॉफी या संप्रदायाचं हिंदू धर्माला झालेले योगदान अधोरेखित करताना लो. टिळकांनी लिहिले." हिंदू धर्माचे तत्त्वज्ञान विषद करण्याची आपली पद्धती जुनी झाली आहे. या बदलत्या काळात प्राचीन हिंदू धर्माचे तत्त्वज्ञान या बदललेल्या परिस्थितीच्या संदर्भात नव्याने समजून सांगण्याची गरज आहे. वैज्ञानिक प्रगतीमुळे धर्मावर टीका होते. धर्माच्या तत्त्वज्ञानामध्ये बदल न करता ते नव्या बदलत्या संदर्भात जनतेपुढे मांडल्यामुळे सुशिक्षित समाजाला थिऑसॉफी या संप्रदायाचे आकर्षण वाटले." महाराष्ट्र धर्म, रामकृष्ण मिशन आणि आर्यसमाज यांनी जनतेमध्ये क्रांतिकारक राजकीय वृत्ती निर्माण केली. थिऑसॉफीच्या विचारसरणीमुळे अशी जागृती निर्माण झाली नाही. १८७५ ते १८९५ या वीस वर्षांत भारतातील निरनिराळ्या राज्यांमध्ये सांस्कृतिक विचारांना क्रांतीचे स्वरूप लाभले. अशा सर्व चळवळींमुळे राष्ट्रीय वृत्तीचे जहाल राजकारणात रुपांतर झाले. अशा राजकारणाचा प्रारंभ महाराष्ट्रात झाला. त्याचे श्रेय लो. टिळकांच्या दूरदृष्टीकडे जाते. स्वराज्य स्थापनेच्या कार्यासाठी आपली संस्कृती सक्षम आहे हा विश्वास त्यांनी जनतेच्या मनात निर्माण केला. त्यांनी समाज सुधारणेला विरोध केला हे जरी क्षणभर मान्य केले तरी राष्ट्रीय जहाल राजकारणाचा विचार सुशिक्षित वर्गात रुजविण्याचे श्रेय लो. टिळकांना द्यायला हवे !

म्हणूनच कोल्हापूर येथे जाहीर समारंभात १९०० साली टिळकांना 'लोकमान्य' हा बहुमान प्रदान करुन त्यांचा यथोचित गौरव करण्यात आला. सार्वजनिक जीवनात लो. टिळकांनी ध्येयवादी वृत्तीचा, त्यागाचा, नि:स्वार्थी समाजसेवेचा, राष्ट्रासाठी कोणत्याही संकटाला सामोरे जाण्याचा एक आदर्श वस्तुपाठ समाजापुढे ठेवला. त्यादृष्टीने ते खऱ्या अर्थाने जनतेच्या प्रेमास व आदरास पात्र होते. 'लोकमान्य' असा बहुमान त्यांना प्रदान करुन जनतेने त्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये वसत असलेल्या अलौकिक गुणांचा गौरव केला होता.

●●●

# ८

# लो. टिळक आणि राष्ट्रीय शिक्षण

लो. टिळकांनी शिक्षण या विषयावरील आपली मते आपल्या विविध लेखांमधून, भाषणांमधून व्यक्त केली आहेत. हे विचार 'राष्ट्रीय शिक्षण' या शीर्षकाखाली मांडण्यात आले. डेक्कन एज्युकेशन सोसायटीमधून बाहेर पडल्यानंतर लोकमान्यांचा शिक्षण-संस्थांशी प्रत्यक्ष संबंध नव्हता. सोसायटीच्या एक दोन सभासदांचा 'सुधारक' या पत्राशी संबंध होता. त्यामुळे सरकार सोसायटीवर नाराज होते. सोसायटीच्या कार्यकारिणीच्या संमतीनेच सदस्यांनी सार्वजनिक कार्यात भाग घ्यावा असे ठरले होते. जातीजातीमध्ये वैमनस्य होईल, समाजात संघर्ष निर्माण होईल अशा सार्वजनिक क्षेत्रापासून सदस्यांनी दूर राहवे असा कार्यकारिणीने निर्णय घेतला. कार्यकारिणी ही आठ सदस्यांची होती. तीन आजीव सदस्य आणि पाच बाहेरील मान्यवर सदस्य अशी कार्यकारिणी होती. अभ्यासक्रम, पुस्तके, शिक्षकांच्या नियुक्ती, रजा, बढती वगैरे निर्णय कार्यकारिणीने घ्यायचे होते. सोसायटीने सरकारच्या या अटी कबूल केल्यामुळे लो. टिळकांनी संस्थेच्या या धोरणाविरुद्ध टीका केली. "दहा वर्षांपूर्वी पुण्यात स्वतंत्र शिक्षण संस्था स्थापन करण्यात आल्या तेव्हा या संस्था देशाच्या प्रगतीला उपकारक ठरतील असे वाटले होते. आता ती आशा मावळली आहे" असे स्पष्ट मत लो. टिळकांनी नोंदवले होते. त्यांनी 'बनारस महाविद्यालया'चे उदाहरण देऊन हे महाविद्यालय सरकारी अनुदानाविना चालू शकते तर डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या संस्था याच तत्त्वावर चालवणे शक्य आहे असेही सांगितले.

शिक्षण संस्था या राजकीय चळवळीपासून अलिप्त असाव्या हे खरे. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष राजकारणात भाग घेऊ नये. पण तरुण पिढीस राजकीय चळवळीचा परिचयही

असू नये असे म्हणणे अयोग्य ठरते. तसेच खासगी शिक्षण संस्थांमधील शिक्षकांनी राजकीय चळवळीत भाग घेऊ नये हा विचारही टिळकांना मान्य नव्हता. 'खासगी शिक्षणावरील सरकारची करडी नजर' या लेखामधून लोकमान्यांनी आपले विचार मांडले. स्वतंत्ररीतीचे शिक्षण लोकप्रिय व स्वस्त केल्यास शिक्षणाचा प्रसार होईल. सरकारी शिक्षणसंस्था देशहिताचा विचार करीत नाहीत. त्यामुळे अशा संस्थांना सरकारचा विरोध होईल. न्यू इंग्लिश स्कूलचे कार्य अत्यंत समाधानकारकरीत्या चालले होते. पाच वर्षानंतर या शाळेस सरकारी अनुदान मिळू लागले. लो. टिळक स्वत: गणित आणि संस्कृत हे विषय शिकवीत होते. पण या शाळेच्या अध्यापनामधून विद्यार्थ्यांमध्ये आपल्या देशाबद्दल प्रेम वाटावे आणि त्यांचा स्वराज्याच्या चळवळीशी परिचय व्हावा असे काही झाले नाही. विद्यापीठाचा अभ्यासक्रम पूर्ण करायचा, विद्यार्थ्यांना गुणवत्ता संपादन करण्यासाठी अत्यंत परिश्रमपूर्वक अध्यापन करायचे एवढेच उद्दिष्ट शिक्षकांपुढे होते.

लो. टिळकांच्या जीवनाची दुर्दैवी अखेर होण्याच्या काळात म. गांधीनी राष्ट्रीय शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे स्थापन करण्यात पुढाकार घेतला होता, पण म. गांधीजींच्या या प्रयत्नाला फारसे यश लाभले नाही. त्यांच्या देखरेखीखाली कार्यरत असलेल्या गुजराथ विद्यापीठामध्येही विद्यार्थ्यांची संख्या मोजकीच होती. गांधीजींनी सरकारी-निमसरकारी संस्थांवर बहिष्कार टाकला. प्रारंभी विद्यार्थ्यांनी संस्थामधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. पण हा बहिष्काराचा उत्साह फार दिवस टिकला नाही. याच विद्यार्थ्यांनी अन्य शिक्षणसंस्थांमध्ये प्रवेश घेतला. काही राष्ट्रीय पातळीवरील नेत्यांना गांधीजींचे विचार पटत नव्हते. भूगोल, गणित या विषयांमध्ये 'राष्ट्रीय' काय शिकवणार ? हा त्यांचा प्रश्न होता. इतिहास हा विषय स्वदेशाचा स्वाभिमान या दृष्टिकोणातून शिकवता येईल. अर्थशास्त्र शिकवतानाही देशातील दारिद्र्याच्या समस्येवर विचार मांडता येतील. काही शिक्षक अध्यापन करताना हा राष्ट्रीय वृत्तीचा दृष्टीकोण समोर ठेवून शिकवीत, असे लो. टिळकांच्या भाषणांमधून स्पष्ट होते.

ध्येयवादी दृष्टिकोण समोर ठेवून समर्थ विद्यालयाची स्थापना करण्यात आली. समर्थ विद्यालयाला आर्थिक साहाय्य करण्यासाठी लो. टिळकांनी अनेक भागात दौरे

केले. त्या ठिकाणी शिक्षण याविषयावर आपले विचार मांडले. राष्ट्रीय शिक्षणाविरुद्ध एक महत्त्वाचा आक्षेप होता. या शिक्षणामुळे विद्यार्थ्यांची शिस्त बिघडेल असा आक्षेप होता." विद्यार्थ्यांना चोऱ्या करा असे शिक्षण आम्ही देणार आहोत का ?" असा टिळकांचा खडा सवाल होता. राष्ट्रीय शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना सरकारी नोकऱ्या मिळणार नाहीत असा दुसरा आक्षेप होता.

"राष्ट्रीय शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाटेल. स्वाभिमान जागृत होईल. असे विद्यार्थी उदरनिर्वाहासाठी सरकारी नोकरीवर अवलंबून राहणार नाहीत. ते स्वावलंबी बनतील" असा लो. टिळकांचा विश्वास होता. दादाभाई नौरोजी, दत्त या सारख्या विचारवंतांनी देशातील दारिद्र्याचे व्यासंगपूर्ण विश्लेषण करून या दारिद्र्यास इंग्रज सरकार जबाबदार आहे असा निष्कर्ष काढला. देशातील उद्योगधंदे बंद करून येथील कच्चामाल परदेशात नेऊन, परदेशी वस्तू जनतेस विकत घेणे भाग पाडले. विद्यार्थ्यांना आपल्या देशाची अवनती कशी व कुणामुळे झाली हे त्यांना विद्यार्थिदशेतच समजणे गरजेचे आहे. हे खरे राष्ट्रीय शिक्षणाचे बीज आहे. देशात जातिभेद, जातिद्वेष थैमान घालत आहे. यामुळे समाजव्यवस्था पोखरून गेली आहे. या दुष्ट रुढी नाहीशा करण्यासाठी विद्यार्थ्यांचे संस्कारक्षम वयातच प्रबोधन व्हायला हवे. शाळांमधून धार्मिक शिक्षणाचीही सोय व्हायला पाहिजे. सरकारी शाळांमधून संस्कारक्षम वयात गुलामगिरीचे संस्कार करण्यात येतात. या वयात त्यांच्या मनात स्वाभिमानाची, राष्ट्रभक्तीची ज्योत प्रज्वलित व्हायला हवी. एवढेच नव्हे तर या तरुण पिढीने पाश्चात्य शास्त्रही आत्मसात करणे अगत्याचे ठरते. विद्यार्थ्यांनी राजकीय सभांना उपस्थित राहणे यात गैर काहीच नाही. लो. टिळकांनी एका व्याख्यानात अभ्यासक्रमामधून 'धर्मशिक्षण, स्वभाषेतून शिक्षण, औद्योगिक शिक्षण आणि राजकीय शिक्षण' याचा अंतर्भाव असावा असे मत व्यक्त केले.

१९०५ मध्ये स्वदेशी बहिष्काराची चळवळ जोरात चालू होती. पुण्यात यानिमित्ताने एक सभा आयोजित केली होती. या सभेत फर्ग्युसन कॉलेजच्या विद्यार्थ्याने भाषण केले. हा विद्यार्थी कॉलेजच्या बोर्डिंगमध्ये राहत होता. या विद्यार्थ्याने या बहिष्कार चळवळीसाठी आयोजित केलेल्या सभेत कॉलेजच्या अधिकाऱ्याच्या

परवानगीशिवाय या सभेत भाग घेतला आणि भाषण केले. म्हणून कॉलेजचे प्राचार्य सेल्वी यांनी या विद्यार्थ्यांची बोर्डिंगमधून हकालपट्टी केली आणि त्याला, दहा रुपयाचा दंड केला. तेव्हा एका माजी विद्यार्थ्यांने प्राचार्यांना विद्यार्थ्यांनी चळवळीत भाग घ्यावा की नको यासंबंधी मार्गदर्शन करावे अशी विनंती केली. प्राचार्य सेल्वी यांनी याविषयी पत्र लिहिले. ते पत्र त्यांच्या संमत्तीने 'इंदुप्रकाश' मध्ये प्रसिद्ध झाले. प्राचार्य सेल्वी यांच्या पत्रातील मजकूर असा होता. "या विद्यार्थ्याने बहिष्कार चळवळीच्या सभेत भाग घेतला. राजकीय चळवळ ही इंग्रज राज्यकर्त्याविरुद्धच असते. विद्यार्थ्यानी अशा चळवळीत भाग घेतल्यामुळे कॉलेजची शिस्त बिघडते. त्यामुळे प्राध्यापकांबद्दल त्यांना आदर वाटत नाही. गुरुशिष्यामध्ये जर उदात्त संबंध राहिला नाही तर सरकारी कॉलेजातील प्रोफेसर हे 'टास्क मास्टर' ठरतील. कॉलेजातील प्रिन्सिपॉलशी बोलताना कोणती मर्यादा ठेवली पाहिजे हे लक्षात ठेवले पाहिजे. कै. न्या महादेव गोविंद रानडे, न्या. तेलंग यासारख्या थोर विद्वान व्यक्तींचा आदर्श विद्यार्थ्यांनी समोर ठेवावा."

या आशयाचे पत्र प्रसिद्ध होताच लो. टिळकांनी केसरीमध्ये 'ते आमचे गुरुच नव्हेत' या शीर्षकाखाली तीन लेख लिहीले. ते लेख आणि न्या. टिळकांचे शिक्षणाविषयीचे विचार एक शतक उलटल्यानंतरही तितकेच महत्त्वपूर्ण आणि प्रेरक ठरतात. गुरु कोणाला म्हणावे ? हा प्रश्न विचारुन लो. टिळकांनी भारतातील आणि पाश्चात्त्य विद्यापीठातील उदाहरणे देऊन आपले विचार मांडले आहेत. प्राचीन भारतात गुरु आश्रमात राहत. शिष्य काही वर्षे आश्रमात राहत. हे गुरु व्यवहारातील सर्व लोभांपासून अलिप्त होते. ते शांत, ज्ञानसंपन्न, नि:स्पृह आणि सत्त्वशील होते. या गुरुंनी नव्या पिढीवर ज्ञान, विनय, शौर्य यांचे संस्कार केले. अशा गुरुंबद्दल शिष्यांच्या मनात सदैव आदराची भावना वसत होती. पुराणामध्ये कितीतरी कथा आहेत. मोठमोठे राजेमहाराजे बिकट प्रसंगी आश्रमामध्ये जाऊन, त्यांना वंदन करून त्यांच्या मार्गदर्शनाची अपेक्षा करीत. ते गुरुही ज्ञानसंपन्न, नि:स्पृह आणि निर्मळ अंत:करणाचे होते. ज्ञानासारखी जगांत कोणतीही पवित्र गोष्ट नाही. पण स्वार्थासाठी, पोटासाठी ज्ञानाची विक्री करण्यास माणसे तयार असतात. देशात इंग्रजांचे राज्य आहे. राज्यकर्ते शिक्षणसंस्था, विद्यापीठे यांवर आपले नियंत्रण ठेवून देशातील जनतेला

गुलाम बनविण्याचा प्रयत्न करतात. जनतेचा आपल्या राजकीय धोरणासाठी उपयोग करून घेतात. इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स आणि जर्मनी ही स्वतंत्र राष्ट्रे आहेत. हिंदुस्थानातील विद्यापीठे आणि या स्वतंत्र राष्ट्रांतील विद्यापीठे यामध्ये खूप फरक आहे. स्वतंत्र राष्ट्रांतील विद्यापीठांतील प्राध्यापक देशांतील सार्वजनिक चळवळीसंबंधी आपली मते निर्भिडपणे मांडतात व जे राष्ट्राच्या हिताचे आहे त्यासंबंधी ते विद्यार्थ्यांना पटवून देतात. लो. टिळकांनी रशियाचे उदाहरण दिले आहे. या देशात कितीतरी प्राध्यापक, विद्यार्थी चळवळीत भाग घेत आहेत आणि बादशहाविरुद्ध आपली मते निर्भयपणे मांडत आहेत. विद्यार्थ्यांना राष्ट्रहिताच्या गोष्टी सांगून, त्यांच्या संस्कारक्षम मनावर देशहिताचे संस्कार करणारे खरे गुरु. कारण गुरुचे ते कर्तव्यच ठरते. हिंदुस्थानात सरकारने युनिव्हर्सिट्या आणि कॉलेजीस काढली खरी पण तेथे सरस्वती देवीस राजसत्तेची दासी बनवली आहे. इथे सेल्वी असोत किंवा मॅकमिलन असोत, ते सरकारने नेमलेले गोरे अधिकारी आहेत. 'राजकीय चळवळ इंग्रज सरकारविरुद्ध आहे' असे सेल्वी म्हणतात. म्हणूनच लो. टिळकांनी 'ते आमचे गुरु नव्हेत' या शीर्षकाखाली लेख लिहिले. आपले शिष्य हे राष्ट्राचे अवयव आहेत. त्यांनी सुधारलेल्या राष्ट्रांच्या बरोबरीने वाढावे. त्यासाठी शिष्याने प्रयत्नशील राहवे यासाठी गुरूने विद्यार्थ्यांना हिंमत, प्रेरणा द्यायला हवी. पण अशी सेल्वीसारख्या गुरुंची इच्छा आहे काय ? शेक्सपियर, बेकनसंबंधी शंका विचारणे योग्य. पण राष्ट्रभक्ती, राष्ट्रदिन, राजकीय चळवळ, राजकीय उन्नतीचे प्रयत्न यासंबंधी विद्यार्थ्यांनी शंका विचारायची नाही. हा कुठला न्याय ? सेल्वी गुरुशिष्यामधील उदात्त संबंधाबद्दल लिहितात. हा उदात्त संबंध नसेल तर गुरु 'टास्कमास्टर' ठरतात. लो. टिळक म्हणतात, जो गुरु शिष्याच्या, राष्ट्राच्या हिताची कदर करीत नाही तो गुरुच नाही !

'हे आमचे गुरुच नव्हेत !' या शीर्षकाच्या दुसऱ्या क्रमांकाच्या लेखामध्ये ज्या देशात न्यायाधीश आणि विद्यागुरु सत्ताधारी राज्यकर्त्यांच्या तंत्राने वागतात त्यांच्याकडून योग्य न्यायाची आणि खऱ्या विद्येची अपेक्षा करता येत नाही, असे लो. टिळकांनी सांगितले. हे परदेशातील गुरु विद्यार्थ्यांच्या मनात राष्ट्रभक्तीची ज्योत प्रज्वलित करणारच नाहीत. जपानमध्ये परदेशातील विद्वान आणून त्यांची विद्या आत्मसात

केली आणि त्यांना परत पाठवले. पण जपानमधील जनतेत तेथील मुत्सद्द्यांनी अनेक उपाय योजून जनतेवर राष्ट्रप्रेमाचे संस्कार केले. सेल्वीसारखे प्राध्यापक विद्वान खरे पण त्यांनी फक्त शेक्सपियर, मिल्टन, बेकन यांच्यावर व्याख्याने द्यावी. त्यांची मर्यादा एवढीच. शुक्राचार्यांनी कर्णाला फक्त विद्या दिली. हिरण्यकश्यपूने आपला मुलगा प्रल्हाद यास आपल्या मताप्रमाणे शिकवण्यासाठी गुरु नेमले. पण प्रल्हाद विष्णुचा भक्त. प्रल्हादाला वेगळीच विद्या शिकवणाऱ्या गुरुंचे वर्णन वामन पंडितांनी 'पापतरु' असे केले आहे. त्याचप्रमाणे सरकारी कॉलेजांतील गुरु अयोग्य आहेत. त्यांचे वर्णन टिळकांनी 'पोटभरु' अशा शब्दांत केले आहे.

विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय चळवळीत पडू नये, त्यामुळे शिस्त बिघडते. विद्यार्थी गुरुंना मान देणार नाहीत, असे सेल्वी म्हणतात. प्रल्हादाने कृष्णाचा-विष्णुचा ध्यास घेतला होता. त्याने आपल्या गुरुंचा उपदेश झुगारुन दिला. त्याचप्रमाणे सरकारी कॉलेजांतील गुरुंचा उपदेश विद्यार्थ्यांनी बाजूला ठेवला पाहिजे. लो. टिळकांनी शिस्त, 'डिसिप्लिन' यासंबंधी आपले विचार मांडले आहेत. एखाद्या घरांत वडील माणसांनी आपला मुलांना देवदर्शनास जाण्याची मनाई केली आणि देवदर्शनाला गेल्याबद्दल मुलांना शिक्षा केली तर याला डिसिप्लिन म्हणायचे की मूर्खपणा म्हणायचा? असा प्रश्न लो. टिळकांनी उपस्थित केला आहे. टिळकांनी बाबू सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांचे उदाहरण दिले आहे. बॅनर्जी एका कॉलेजचे प्रिन्सिपॉल आहेत. ते आपल्या व्याख्यानांमधून, आपल्या वर्तनामधून विद्यार्थ्यांपुढे एक आदर्श ठेवत आहेत. टिळकांनी या विषयावर महाभारतात अनेक ठिकाणी चर्चा झालेले आहे हे स्पष्ट केले. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय वृत्ती निर्माण व्हायला पाहिजे. जो गुरु याच कारणासाठी आपल्या विद्यार्थ्यांना छळतो तो गुरुच नव्हे ! सेल्वी साहेबांनी 'टास्क मास्टर' हा शब्द वापरला आहे. अभ्यासाच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी गुरुंना जरुर मान द्यावा. पण ज्या गोष्टी राष्ट्र हिताच्या आहेत त्यादृष्टीने वागताना गुरुची आज्ञा मानण्याची गरज नाही. इथे अशा गुरुंना मान दिला तर ते पढतमूर्खांचे लक्षण ठरेल असे लो. टिळक बजावून सांगतात.

तिसऱ्या क्रमांकाच्या याच विषयावरील लेखामध्ये लो. टिळकांनी सरकारने बंगाल, तसेच महाराष्ट्र या राज्यातील खासगी शिक्षण संस्थांवर नियंत्रण ठेवण्याचा

प्रयत्न चालवला आहे, याबद्दल कठोर शब्दात नाराजी व्यक्त केली आहे. विद्यार्थ्यांवर राष्ट्रभक्तीचे संस्कार व्हावे, सामाजिक, राजकीय चळवळीसंबंधी त्यांना प्रबोधन करावे या हेतूंनी प्रेरित होऊन खासगी संस्था स्थापन करण्यात आल्या. पण यावरही नियंत्रण ठेवण्याचे सरकारचे धोरण पाहून लो. टिळकांनी नाराजी व्यक्त केली.

लो. टिळकांनी सेल्वी यांनी कै. न्या. रानडे आणि न्या. तेलंग यांचा आदर्श विद्यार्थ्यांनासमोर ठेवावा असे म्हटले. इथे न्या. रानडे यांनी राष्ट्रहिताच्या ज्या चळवळी चालू आहेत त्यांचे शिक्षण, विद्यार्थ्यांना विद्यार्थिदशेतच मिळावे असे स्पष्ट मत पुणे येथे भरलेल्या राष्ट्रीय सभेत मांडले होते. राष्ट्रीय सभा, सामाजिक आणि औद्योगिक परिषद, शिवाजी-गणेश उत्सव अशा सार्वजनिक चळवळींमध्ये विद्यार्थ्यांनी आवडीप्रमाणे भाग घ्यावा, तसे संस्कार त्यांच्या मनावर व्हावे असे टिळकांनी या लेखात स्पष्ट केले आहे. सर्व प्राचीन, अर्वाचीन शास्त्रे वडीलांना, गुरूंना मान द्यावा असे सांगातात. भीष्म आणि परशुराम यांच्यामध्ये मतभेद झाला तेव्हा लढाई सुरु होण्यापूर्वी वृथाभिमानी गुरुचा शिष्याने त्याग करावा' हे वचन भीष्माने परशुरामाला सांगितले. सध्याचे गुरु हे काम, क्रोध, लोभ, भय, मोह किंवा बुद्धिभ्रंश यांच्या तडाख्यात सापडले आहेत. ते पोटभरु आहेत. सरकारी नोकर या नात्याने ते विद्यार्थ्यांना चळवळीपासून दूर ठेवतात. 'हे आमचे गुरुच नव्हेत !' हे लो. टिळकांनी ठणकावून सांगितले.

तसेच 'खरे विद्यापीठ कोणते !' या आपल्या लेखामध्ये उच्च शिक्षणासंबंधी जे विचार मांडले आहेत ते एक शतकानंतरही संदर्भहीन ठरत नाहीत. विद्यापीठे स्थापन होऊन दीडशे वर्षाचा काळ लोटला आहे. भारताला स्वातंत्र्यप्राप्ती होऊन आता साठ वर्षाचा काळ लोटला आहे. लो. टिळकांनी १८९६ साली लिहिलेल्या लेखामध्ये महाविद्यालये, विद्यापीठ यामध्ये पाश्चात्त्य देशांतील विद्वानाप्रमाणे विद्वान निर्माण होत नाहीत. विद्यार्थ्यांवर विद्वान प्राध्यापकांच्या विद्वतेचा, चारित्र्याचा प्रभाव पडायला हवा. आपल्या देशात असे चित्र दिसत नाही. परीक्षेत पहिला क्रमांक मिळवून विद्यार्थी पैसे कमावण्यात धन्यता मानतात. न्या. तेलंग, न्या. रानडे, डॉ. भांडारकर यांच्यासारखे विद्वान विद्यापीठामधून बाहेर पडले. आमच्या विद्यापीठात

विद्याव्यासंगी गुरु नाहीत. विद्यापीठांमध्ये बी.ए., एम.ए. चे शिक्के ठोकण्यापलीकडे दुसरे काम होत नाही. विद्यापीठ म्हणजे विद्यामंदिर नाही. ती तर परीक्षा घेण्याकरता रजिस्टर्ड झालेली कंपनी आहे. विद्यापीठ म्हणजे विद्वानांची, विद्वत्तेची माहेरघरे व्हायला हवीत. ज्या ग्रंथालयामध्ये प्रयोगशाळांमध्ये सतत विद्याव्यासंग आहे, संशोधन चालू आहे असे दृश्य विद्यार्थ्यांना सातत्याने दिसले पाहिजे. दुर्दैवाने तशी परिस्थिती विद्यापीठांमध्ये दिसत नाही. हे लो. टिळकांचे चिंतन आजही मार्गदर्शक ठरते.

कलकत्ता भरलेल्या सातव्या काँग्रेसच्या अधिवेशनामध्ये 'शिक्षण आयोग' नेमण्याचा ठराव मांडण्यात आला. लो. टिळकांनी या ठरावास पाठिंबा दिला. त्यांनी जपान आणि भारत या दोन देशातील शिक्षण पद्धतीची तुलना केली. जपानसारख्या राष्ट्राने नेत्रदीपक प्रगती केली याचे कारण तेथील शिक्षण पद्धती स्वतंत्र होती. जपानमध्ये विद्यार्थ्यांना अद्ययावत तंत्रज्ञान शिक्षण दिले जात होते. भारतातील परिस्थिती नेमकी याविरुद्ध होती. भारतात हुशार, बुद्धिमान विद्यार्थ्यांची प्रगती येथील शिक्षण पद्धतीमुळे खुंटत होती. प्राचीन भारतातील शिक्षण पद्धतीमध्ये काही ठळक वैशिष्ट्ये होती. विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानलालसा निर्माण करण्याचे सामर्थ्य प्राचीन शिक्षण पद्धतीमध्ये होते. म्हणून काही विद्वान संशोधकांनी संपूर्ण जगात नावलौकिक संपादन केला होता. आपल्याकडे रँग्लर परांजपे, डॉ. जगदीशचंद्र बोस यांच्यासारख्या बुद्धिमान संशोधकांचा गौरवाने उल्लेख होतो. पण परांजपे आणि बोस यांची उदाहरणे अपवादात्मक आहेत. एकूण शिक्षण पद्धती निराशजनकच आहे. भारतातील शिक्षण पद्धती इंग्रज राज्यकर्त्यांच्या हस्तकाप्रमाणे कार्य करते. शिक्षण पद्धतीमध्ये ज्ञानदेवता प्रसन्न होईल आणि राष्ट्राची प्रगती होईल असे वातावरण निर्माण झाले पाहिजे. पाश्चात्त्य देशाशी बरोबरी करायची असेल तर शिक्षण पद्धतीमुळे आमूलाग्र बदल झाला पाहिजे असे ठाम मत लो. टिळकांनी या सभेपुढे मांडले.

●●●

# ९

# मॅक्समुल्लर, न्या. रानडे, हर्बट स्पेन्सर आणि स्वामी विवेकानंद

१९०० ते १९०५ च्या दरम्यान भारतात आणि भारताबाहेर नामवंत व्यक्तींचे दु:खद निधन झाले. काही व्यक्ती लो. टिळकांच्याबरोबर कार्य करणाऱ्या होत्या. काही देशातील आणि परदेशातील थोर व्यक्तींनी लो. टिळकांच्या कार्यात प्रेरणा दिली होती. लो. टिळक आपल्या लेखांमधून अशा घटनांची आवर्जून नोंद घेत आणि त्या थोर व्यक्तींच्या कार्याचे मूल्यमापन अत्यंत तटस्थपणे आणि तितकेच आत्मीयतेने करीत असत.

जागतिक कीर्तीचे संस्कृतचे आणि भारतीय तत्त्वज्ञानाचे प्रकांड पंडित आणि भाष्यकार प्रो. मॅक्समुल्लर यांचे १९०० मध्ये दु:खद निधन झाले. भारतीय तत्त्वज्ञान, वेद याचा अभ्यास मॅक्समुल्लर यांना किती परिश्रमपूर्वक आणि निष्ठेने केला यासंबंधीची माहिती त्यांच्या आत्मकथनामध्ये मिळते. सातत्याने छत्तीस तास अभ्यास करून मगच ते थोडी फार विश्रांती घेत असत. भारतीय तत्त्वज्ञान, धर्म हे किती श्रेष्ठ दर्जाचे आहेत, हे मॅक्समुल्लर या जर्मन संशोधकाने जगाला पटवून दिले. भारतामध्ये अशा प्रकारे ज्ञानसंपादन करण्यासाठी स्वत:ला गाडून घेण्याची वृत्ती पाहायला मिळत नाही याबद्दल लो. टिळकांनी खेद व्यक्त केला. देश पारतंत्र्यामध्ये असल्यामुळे भारतातील गुणी व्यक्तींना आपले कौशल्य, ज्ञान प्रकट करण्याची संधी मिळत नाही जे जरी मान्य केले तरी विविध विषयांत मौलिक संशोधन करून देशाची कीर्ती जगभर पसरविण्याचे कार्य विद्वान जरूर करू शकतात. लो. टिळकांचे हे विधान

फार महत्त्वाचे आहे. कारण त्यांनी आपल्या समर्पित जीवनात कारावास भोगला, अनेक संकटांना त्यांनी निर्भयपणे तोंड दिले. इतके संघर्षमय जीवन त्यांच्या वाटेला आले तरीही त्यांनी गीतारहस्य, ओरायन यासारखे संशोधनपर ग्रंथ लिहिले. त्यामुळे लो. टिळक हे केवळ थोर नेते नाहीत. ते एक विद्वान, व्यासंगी पंडित आहेत याची जगाला प्रचिती आली. मॅक्समुल्लर हे ख्रिश्चन होते. पण 'विश्वचि माझे घर' अशा वृत्तीने त्यांनी अन्य धर्मांचा अभ्यास केला. संस्कृतवर प्रभुत्व संपादन केले आणि जगाला भारतीय तत्त्वज्ञानाचे श्रेष्ठत्व पटवून दिले. जानेवारी, १९०१ मध्ये ब्रिटिश साम्राज्याच्या राणी व्हिक्टोरिया यांचे निधन झाले. लो. टिळकांनी राणी व्हिक्टोरिया यांच्या व्यक्तिमत्त्वामधील सद्‌गुणांची मुक्तकंठाने प्रशंसा केली. आपल्या रौप्यमहोत्सवी वर्षामध्ये राणी व्हिक्टोरिया यांनी इंग्रज सरकार भारतीयांच्या धार्मिक, सामाजिक व्यवहारामध्ये कधीही हस्तक्षेप करणार नाही असे जाहीर केले होते.

१६ जानेवारी, १९०१ रोजी न्या. महादेव गोविंद रानडे यांचे वयाच्या एकोणसाठाव्या वर्षी दु:खद निधन झाले. १८७० ते १८८० या कालखंडामध्ये महाराष्ट्रावर न्या. रानडे यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव पडला होता. १८८० ते १८९५ या काळात महाराष्ट्रामध्ये सामाजिक, राजकीय आणि धार्मिक क्षेत्रात विचारमंथन झाले. न्या. रानडे हे न्यायाधीश असल्यामुळे त्यांनी राजकीय क्षेत्रास प्रत्यक्ष स्पर्श न करता सामाजिक, धार्मिक क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्यासाठी निष्ठेने प्रयत्न केले. १९७१ च्या सुमारास न्यायाधीश म्हणून न्या. रानडे पुण्यात आले. त्यावेळी पुण्यातील सामाजिक, सांस्कृतिक जीवनातील चैतन्य लोप पावले होते. पुणे निष्क्रिय होते. न्या. रानडे यांनी सरकारी नोकरीच्या चौकटीत कार्य करून चतुरस्त्र मुत्सद्देगिरी प्रकट केली. सनदशीर राजकारणाचा पाया घालून त्यांनी पुण्यात नवचैतन्य निर्माण केले. स्वत: लो. टिळकांनी "महाराष्ट्र देश थंड गोळा होऊन पडला होता. महाराष्ट्र सजीव करण्याचे कार्य न्या. रानडे यांनी केले." अशा शब्दात न्या. रानडे यांच्या कार्याचा गौरव केला आहे. न्या. रानडे यांच्या अथक प्रयत्नामुळे पुणे ही बौद्धिक आणि राजकीय क्षेत्राची राजधानी बनली. न्या. रानडे यांनी सार्वजनिक जीवनाचे नेतृत्व आपल्या हाती घेतले. त्यांनी १९७० साली पुण्यात स्थापन केलेल्या

संस्थेस राजकारणी संस्थेचे स्वरुप प्राप्त झाले. श्री. गणेश वासुदेव जोशी तथा 'सार्वजनिक काका' यांनी न्यायमूर्तींच्या मार्गदर्शनाखाली कार्य केले. 'लोकहितवादी' यांनी १८४८ साली स्वदेशी चळवळीचे विचार आपल्या लेखामधून मांडले होते. स्वदेश चळवळीचा प्रचार आणि त्याप्रमाणे आचरण असे कार्य न्या. रानडे यांच्या प्रयत्नामुळे सुरू झाले. न्यायमूर्तींनी देशातील उद्योगधंद्यांच्या ऱ्हासाबद्दल आणि या उद्योगाच्या उन्नतीबद्दल आपल्या व्याख्यानांमधून अभ्यासपूर्ण विचार मांडले. न्या. रानडे यांनी हिंदी अर्थशास्त्राचा पाया घातला. न्या. रानडे यांनी इंग्रजांची सत्ता देशात असावी यामागे ईश्वरी प्रेरणा आहे असे मानले. म्हणून त्यांनी सनदशीर राजकारणाचा नेहमी पुरस्कार केला. इंग्रज राज्यकर्त्यांशी एकनिष्ठ राहावे, कायद्याचे पालन करावे, सर्व व्यवहारात धर्म, वंश, जातिभेद न मानता न्याय प्रस्थापित व्हावा असा विचार त्यांनी मांडला होता. राजकारणात ते प्रागतिक होते तसे नेमस्तही होते. इंग्लंडमध्येही प्रागतिक, उदारमतवादी आणि नेमस्त, भांडवलशाहीचा पुरस्कार करणारे असे दोन पक्ष होते. न्या. रानडे यांनी उदारमतवादी पक्षाप्रमाणे आपले राजकारण असावे असे स्पष्ट केले होते. पण सामाजिक, राजकीय किंवा धार्मिक क्षेत्रात क्रांतिकारक विचारांना स्थान नसावे असे न्या. रानडे यांचे धोरण होते. "न्या. रानडे हे एक विद्वान न्यायाधीश आहेत. भारतीय तत्त्वज्ञानाचा, अर्थशास्त्राचा आणि इतिहासाचा त्यांचा गाढा व्यासंग आहे. सॉक्रेटीस या ग्रीस तत्त्वज्ञाची प्रखर बुद्धिमत्ता लाभलेले हे न्यायमूर्ती हे थोर देशभक्त आहेत "अशा शब्दात राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षांनी न्या. रानडे यांचा गौरव केला होता.

४ जुलै, १९०२ रोजी स्वामी विवेकानंद यांचे महानिर्वाण झाले. स्वामी विवेकानंद यांचे व्यक्तिमत्त्व आणि जागतिक पातळीवरील कार्य अत्यंत प्रेरणादायी होते. मॅक्समुल्लर आणि स्वामी विवेकानंद यांच्या कार्याचा प्रभाव लो. टिळकांच्या व्यक्तिमत्त्वावर पडला होता. स्वामी विवेकानंद हे ब्राह्मण नव्हते. ते कायस्थ होते. त्यांना संन्यास घेण्याचा अधिकार नाही अशी टीका संकुचित वृत्तीच्या बंगालमधील कर्मठ ब्राह्मणांनी केली होती. स्वामी विवेकानंदांनी हिंदू धर्मातील तत्त्वज्ञानाचा प्रगल्भ आशय आधुनिक काळाच्या संदर्भात भारतीयांना, परदेशी नागरिकांना समजावून सांगितला.

स्वयंपाकघरातील सोवळेओवळे या संकुचित वृत्तीचा त्याग करण्याचे त्यांनी आवाहन केले. आद्य शंकराचार्य यांना जंगलातील आश्रमात अद्वैताचा साक्षात्कार झाला. हे अद्वैत गरीब शेतकऱ्याच्या झोपडीपर्यंत आपल्याला पोचवायचे आहे असे स्वामीजींनी जाहीर केले. देशातील गरिबी, माणसामाणसांमध्ये द्वेष निर्माण करणारी जातिव्यवस्था नष्ट करण्याचे त्यांनी आपल्या प्रभावी भाषणांमधून आवाहन केले. पाश्चात्त्य देश आपल्या भौतिक प्रगतीचा अभिमान बाळगून होता. भौतिक प्रगती आणि इंग्रजी भाषेचा प्रभाव यांच्यामुळे भारतीय जनता पाश्चात्त्य विचारांच्या आहारी जात होती. स्वामी विवेकानंदांनी प्राचीन भारतीय तत्त्वज्ञान आपल्या अमोघ वाणीद्वारे विषद करुन त्यांनी भारतीय तत्त्वज्ञान श्रेष्ठ असल्याची ग्वाही सर्वांना दिली.

कोणत्याही धर्माचा वृथा अभिमान बाळगणे अयोग्य असल्याचे स्वामीजींनी स्पष्ट केले. त्यांनी 'सहिष्णुता' या शब्दाला विरोध केला. 'मी सर्व धर्मांना वंदनीय मानतो. हिंदूनी चांगले हिंदू होण्याचा प्रयत्न करावा. ख्रिश्चनांनी चांगले ख्रिश्चन व्हावे असे त्यांचे व्यापक विचार होते. अमेरिकेत शिकागो येथे भरलेल्या जागतिक धर्मपरिषदेमध्ये, आपल्या वक्तृत्वपूर्ण भाषणामध्ये त्यांनी हिंदू धर्माचे तत्त्वज्ञान हे श्रेष्ठ असून; सर्व जगातील नागरिकांमध्ये प्रेम, श्रद्धा निर्माण करण्याचे आणि जागतिक स्तरावर ऐक्य साधण्याचे सामर्थ्य या तत्त्वज्ञानामध्ये आहे हे सर्व धर्मगुरुंना, विचारवंतांना पटवून दिले. त्यांच्या या सभेतील भाषणामुळे त्यांची कीर्ती जगभर पसरली. हिंदू धर्माचे पुनरुज्जीवन होणे अगत्याचे आहे असे सांगून ही जागृती जनतेमध्ये झाल्याखेरीज, भारत हे बलशाही राष्ट्र होणार नाही असे त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले होते. लो. टिळकांनी स्वामी विवेकानंद हे भारताला लाभलेले दुसरे शंकराचार्य होते. स्वामी विवेकानंदांच्या अकाली, दुर्दैवी निर्वाणामुळे भारत एका थोर धर्मगुरुंना मुकला आहे अशा शब्दात लो. टिळकांनी त्यांच्या पवित्र स्मृतीला श्रद्धांजली वाहिली होती.

१५ डिसेंबर, १९०३ रोजी हर्बट स्पेन्सर या प्रख्यात ब्रिटिश तत्त्वज्ञाचे निधन झाले. लो. टिळकांनी हर्बट स्पेन्सर यांच्या तत्त्वज्ञानाची प्रशंसा करुन त्याविषयी केसरीत स्पेन्सर यांना श्रद्धांजली अर्पण केली. स्पेन्सर यांचे तत्त्वज्ञान वेदान्त विचाराशी

सुसंगत आहे. ते बुद्धिवादी जनतेसही पटण्यासारखे आहे. लो. टिळक आणि आगरकर या दोघांनीही या तत्त्वज्ञानाचा स्वीकार केला होता. अद्वैत वेदान्तातील निर्गुण परब्रह्म आणि स्पेन्सर यांनी वर्णन केलेले 'अज्ञेय जगत्कारण' हे एकच आहेत असे लो. टिळकांनी तसेच आगरकरांनी मानले. सुप्रसिद्ध लेखक विल ड्युरांट यांनी आपल्या गाजलेल्या 'दी स्टोरी ऑफ फिलॉसॉफी' या ग्रंथामध्ये स्पेन्सर यांच्या तर्कशुद्ध वैचारिक मांडणीची प्रशंसा केली आहे. प्रश्न कितीही गहन, गुंतागुंतीचा असो हर्बट स्पेन्सर त्याची मांडणी अतिशय तर्कशुद्ध आणि सुबोध भाषेत करीत असत. त्याकाळी स्पेन्सरसारख्या विचारवंताची फार गरज होती. नाना प्रकारच्या विचारांचे काहूर तत्त्वज्ञांनी माजवले होते. स्पेन्सर यांनी आपल्या प्रवाही, अर्थवाही लेखणीद्वारे या विचारांच्या घनदाट जंगलामध्ये स्वच्छ सूर्यकिरणाचा प्रकाश आणला ! विश्वाच्या निर्मितीसंबंधी अनेक तत्त्वज्ञांनी विचार मांडले आहेत पण आजपर्यंत या निर्मितीचे गूढ कायमच आहे. म्हणून स्पेन्सरने अज्ञेयवादाचा पुरस्कार केला. स्पेन्सर यांनी सांगितलेकी, वैज्ञानिक सिद्धांत हे विश्वाच्या निर्मितीविषयी आहेत, धर्मशास्त्राने विश्वाच्या निर्मितीमागील अनाकलनीय स्थितीसाठी धर्मशास्त्रांमधून काल्पनिक कथा रचल्या. म्हणून या दोन भिन्न प्रवृत्तीमध्ये समन्वय साधण्यासाठी स्पेन्सर यांनी अज्ञेयवादाचाविचार मांडला, लो. टिळकांनी हा स्पेन्सर यांच्या आधुनिक शास्त्रांच्या अभ्यासाचा उल्लेख करून वेदान्तामधील परब्रह्म- ही असेच अज्ञेय, निर्गुण, निराकार आहे व असे म्हटले. तेच सत, चित्त आणि आंनदरूप आहे. प्राचीन भारतीय तत्त्वज्ञान आत्मा हा अमर आहे असे मानते. तो अविनाशी आहे. तो देहाचे अस्तित्व संपल्यानंतरही राहू शकतो असे भारतीय तत्त्वज्ञान मानते. पण स्पेन्सर यांना आत्मा अविनाशी आहे हे तत्त्व मान्य नव्हते. देहाबरोबरच त्याच्या शरीरातील चैतन्य, मेंदू नाहीसा होतो असे स्पेन्सर यांचे मत ! भारतातील तत्त्वज्ञ चार्वाक याने ईश्वर, आत्मा, स्वर्ग यांचे अस्तित्व नाकारले होते. कारण त्यांचे अस्तित्व सिद्ध करता येत नाही. स्पेन्सर यांचे मत चार्वाकाच्या मताशी जुळणारे नाही. स्पेन्सरने उत्क्रांतीच्या तत्त्वाचा स्वीकार केला आहे. या उत्क्रांतीचा प्रत्यय विश्वाच्या निर्मितीपासून येतो. निसर्गामध्ये ज्याप्रमाणे सातत्याने उत्क्रांती होत आहे त्याच प्रमाणे मानवामध्येही अशी उत्क्रांती होत राहील हा महत्त्वाचा विचार

स्पेन्सरने मांडला आहे. एकूण परमेश्वर, जीव आणि जडसृष्टी यासंबंधीची स्पेन्सर याची मते वेदान्त, चार्वाक आणि सांख्य यांच्या मतांच्या मिश्रणाने झाली आहेत असे मत लो. टिळकांनी व्यक्त केले आहे. स्पेन्सर यांच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव भारतीय विचारवंतांवर अधिक पडला होता असे लो. टिळक, आगरकर यांनी त्यांच्या तत्त्वज्ञानाविषयी केलेल्या विवेचनावरून दिसून येते. चार्वाक या तत्त्वज्ञाने भारतीय तत्त्वज्ञान नाकारले होते. तसेच त्याने ऐहिक सुखाचाच पुरस्कार केला होता. आपल्या जीवनात सुख कसे मिळवले याचीच चिंता माणसाने करावी. पुनर्जन्म, स्वर्ग, नरक यांचा विचार त्याने मुळीच करु नये. पण स्पेन्सर यांचे सुखासंबंधीचे विचार अधिक प्रगल्भ होते. मानवी जीवन हे उत्क्रांतीच्या मार्गावर कार्यरत असले पाहिजे. मानवतेच्या कल्याणाचा, सुखाचा विचार करून मानवी जीवन सुंदर, सुखी करण्याचा प्रयत्न मानवाने करावा यासाठी त्याने परोपकारी वृत्ती अंगी बाणवावी हा स्पेन्सर यांचा विचार लो. टिळकांना महत्त्वाचा वाटला होता. लो. टिळक, स्वामी विवेवकानंद, मॅक्समुल्लर, न्या. रानडे, हबर्ट स्पेन्सर, या थोर व्यक्तींच्या निधनानंतर केवळ औपचारिकपणे केसरीमधून त्यांना श्रद्धांजली वाहिलेली नाही. टिळकांनी आपल्या लेखांमधून या थोर व्यक्तींनी आपल्या क्षेत्रांमध्ये केलेल्या संस्मरणीय योगदानाचे अभ्यासपूर्ण विश्लेषण केले आहे. न्या. रानडे यांनी जनजागृतीसाठी संस्था उभ्या केल्या. मॅक्समुल्लर आणि विवेकानंद यांनी हिंदू धर्माचे श्रेष्ठत्व जगाला पटवून दिले. मॅक्समुल्लर यांनी हिंदू धर्मातील प्राचीन ग्रंथांतील मौलिक विचारधनाचा परिचय जगाला करून दिला. लो. टिळकांच्या या लेखांमधील विश्लेषणामधून त्यांनी या थोर व्यक्तींच्या जीवनकार्यावर प्रकाशझोत टाकला आहे.

●●●

## १०

# राष्ट्रीय सभेची स्थापना आणि लो. टिळक

१८८० पासून देशातील तरुण पिढीच्या मनात देशातील दारिद्र्य, अज्ञान यास इंग्रजांची जुलमी राज्यव्यवस्था आहे हा विचार प्रामुख्याने येत होता. दारिद्र्य, अज्ञान दूर करायचे असेल तर या परकीय सत्तेविरुद्ध संघर्ष करणे हाच एक मार्ग आहे असे या तरुणांना वाटत होते. अशा परिस्थितीमध्ये देशातील संस्थानिक, धनिक मंडळी या परदेशी गोऱ्या अधिकाऱ्यांवर स्तुतिसुमने उधळीत आहेत. त्यांचे लांगुलचालन करीत आहेत हेही दृश्य या तरुण पिढीला पसंत नव्हते. त्यांना या वृत्तीचा संताप येत असे. देशात सनदशीर मार्गाने जनजागृती करणारा एक वर्ग होता. त्याचप्रमाणे सशस्त्र क्रांतीचा मार्ग स्वीकारण्यास साहसी तरुण प्रवृत्त होत होते. या क्रांतिकारकाचा वेष संन्यासाचा होता. हे तरुण संन्यासी क्रांतिकारक इंग्रजांच्या सत्तेविरुद्ध बंड करतील अशी भीती ए. ओ. ह्यूम या भारताच्या गृहमंत्र्यांच्या सचिवाने व्यक्त केली होती. वासुदेव बळवंत फडके या साहसी तरुणाने इंग्रज राज्यकर्त्यांविरुद्ध शस्त्र उगारले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा त्याग करण्यास सिद्ध असणाऱ्या या तरुणास फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली. पुण्यातील रस्त्यावरून वासुदेव बळवंत फडके यांना नेत असताना लोकांनी त्यांच्या नावाचा जयजयकार केला. फ्रेंच राज्यक्रांतीप्रमाणे देशातही राज्यक्रांती होईल असे काही भारतातील नेत्यांना वाटत होते. थोर विचारवंत आणि मुत्सद्दी दादाभाई नौरोजी यांनी हीच भीती व्यक्त केली होती. इंग्रज राज्यकर्ते भेदनीतीचा अवलंब करून राज्य कारभार करतात. जनतेवर जुलूम करतात. पण त्यांचे हे फूट पाडण्याचे धोरण फार काळ यशस्वी ठरणार नाही असा इशारा नौरोजी ह्यांना दिला होता. राजकीय आणि औद्योगिक क्षेत्रात वैचारिक

क्रांती होत आहे. ब्रिटिश मालावर बहिष्कार घालण्याची चळवळ अधिक आक्रमक होत आहे. यानंतर ब्रिटिश सरकारच्या बहिष्काराची चळवळही होऊ शकेल असे दादाभाई नौरोजींनी १८८० सालीच ब्रिटिश सरकारला उद्देशून सांगितले होते.

भारतात राजकीय क्षेत्रात आपले विचार प्रभावीपणे मांडण्यासाठी राष्ट्रातील प्रतिनिधींची एक राष्ट्रीय संस्था किंवा सभा स्थापन करावी असे वातावरण निर्माण झाले होते. ज्यांना क्रांती करायची आहे त्यांना राष्ट्रसभेसारख्या संस्थेची उभारणी करण्यात रस नव्हता. नेमस्त प्रागतिक राजकारण करण्यामध्ये बंगालचे सुरेंद्रनाथ बानर्जी, मुंबईचे काशिनाथ त्रिंबक तेलंग, दादाभाई नौरोजी, फेरोजशाह मेथा, न्या. रानडे आघाडीवर होते. १८७७ पासून हा विचार चालू होता. राष्ट्रसभेच्या स्थापनेसाठी ॲलन्स ऑक्टेव्हिअन ह्यूम, सर विल्यम वेडरबर्न आणि सर हेन्री कॉटन हे प्रयत्नशील होते. 'ब्रिटिश राज्य' तलवारीच्या जोरावर टिकलेले नाही, जनता ते चालवू देते म्हणून हे राज्य टिकून आहे, असे या अधिकाऱ्यांचे मत होते. हे अधिकारी उदारमताचे, स्वातंत्र्यप्रेमी आणि मुत्सद्दी होते. पण त्यांची ब्रिटिश साम्राज्यावरही निष्ठा होती. इंग्रज सरकारच्या नोकरशाहीने देशात अस्थिरता निर्माण केली होती. ब्रिटिश साम्राज्याच्या वर्चस्वाखाली स्थिर राष्ट्रीय सरकारची स्थापना करणे हे ध्येय ह्यूम यांच्यासमोर होते. ह्यूम यांनी १८८५ साली राष्ट्रसभेची स्थापना केली. बंगाल, मद्रास आणि मुंबई या प्रांतातील इंग्रजी भाषा उत्तम जाणणाऱ्या राजकीय नेत्यांनी या सभेचे सदस्यत्व स्वीकारावे असे ह्यूम यांनी आवाहन केले. ह्यमू यांनी व्हाईसरॉयची भेट घेऊन त्यांची सहानुभूती मिळवली. राष्ट्रसभेची पहिली सभा मुंबईत भरली. या सभेस देशातील एकोणऐंशी प्रतिनिधी उपस्थित होते. भारतात लोकसत्ताक राज्य उभे करणे हे उद्दिष्ट असून ब्रिटिश साम्राज्याशी संघर्ष करण्याचे, राजद्रोह करण्याचे आपले धोरण असणार नाही हे नेत्यांनी स्पष्ट केले.

राष्ट्रसभेची एकूण आठ अधिवेशने भरली. राष्ट्रसभेचे अध्यक्षपद ख्रिस्ती, मुस्लीम, पारशी नेत्यांनी भूषविले. राष्ट्रसभा लोकप्रिय होत आहे हे ह्यूम यांच्या लक्षात आले. ह्यूम यांनी इंग्लंडमधील जनतेने हाती घेतलेल्या चळवळीप्रमाणे भारतातही अशी चळवळ राष्ट्रसभेने हाती घ्यावी असा विचार मांडला. 'सरकार जर जागे होत

नसेल तर सरकारला जाग आणण्यासाठी चळवळ उभारली पाहिजे' असे ह्यूम यांनी नेत्यांना सांगितले. ह्यूम आणि दादाभाई नौरोजी यांनी चळवळ उभी करण्याचा विचार मांडला, त्याचा गांभीर्याने सभेने विचार केला नाही. राष्ट्रीय सभेला राष्ट्रीय संमेलनाचेच स्वरुप राहिले. ह्यूम यांनी यापुढे राष्ट्रसभेने चळवळ करण्याची आवश्यकता असल्याचे एक गोपनीय पत्र राष्ट्रसभेच्या सदस्यांना पाठविण्याची विनंती केली. हे गोपनीय पत्र गंभीर स्वरुपाचे, धोक्याचे आहे असे मानून ते गोपनीय पत्र पाठविण्यास सचिवानीं नकार दिला. या गोपनीय पत्रामुळे राष्ट्रसभेवर देशद्रोहाचा आरोप केला जाईल अशी भीती मुंबई समितीने व्यक्त केली. या प्रकाराबद्दल लो. टिळक आणि आगरकर यांनी संताप व्यक्त केला. त्यांनी हे गोपनीय पत्र प्रसिद्ध करुन आपल्यावर राष्ट्रद्रोहाचा खटला भरण्याचे आव्हान दिले. लो. टिळकांनी केसरीमध्ये पुढील शब्दात या प्रकाराचा निषेध केला. "या नेत्यांना राष्ट्रसभेची केवढी काळजी ! नि:स्वार्थीपणे कार्य करण्याचे धोरण ह्यूम यांचे ! राष्ट्रहितासाठी निर्भयपणे निर्णय घेण्याची या राष्ट्रसभेच्या नेत्यांमध्ये हिंमत नाही. त्यांना आपला भित्रेपणा कसा झ‌ाकावा हे चांगले समजते !" लो. टिळकांनी १८९५ साली राष्ट्रसभेच्या कार्याकडे दृष्टिक्षेप टाकताना केसरीमध्ये आपले विचार मांडले होते. राष्ट्रीय सभा ही राज्यकारभारातील दोष दूर करुन लोकांचे कल्याण साधण्यासाठी स्थापन झाली आहे. राष्ट्रीय सभेने काही समस्या सरकारपुढे मांडल्या. त्याची सरकारला दखल घ्यावी लागली. कौन्सिल सुधारणेचा कायदा पास झाला. प्रशासन सेवेसंबंधीचे विचार सरकारने स्वीकारले. त्यामुळे भारतीय तरुणांना या सेवेत प्रवेश करण्याचा मार्ग मोकळा झाला.

याच काळात महाराष्ट्रात एका तरुण बुद्धिमान नेत्याचा उदय होत होता. त्यांचे नाव नेक नामदार गोपाळ कृष्ण गोखले. ना. गोखले हे लो. टिळकापेक्षा दहा वर्षांनी लहान होते. ना. गोखले यांचे बालपण, तारुण्य आर्थिक अडचणींमुळे खडतर गेले. पण त्यांनी परिश्रमपूर्वक अभ्यास करुन इंग्रजी भाषेवर अभूतपूर्व प्रभुत्व संपादन केले होते. १८८७ पासून पुढील दोन दशकांचा इतिहास म्हणजे ना. गोखले आणि लो. टिळक या दोन नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करणाऱ्या अखिल भारतीय

पक्षांचाच इतिहास ठरतो, ना. गोखले यांनी न्या. रानडे यांना आपल्या कार्यात गुरु मानले होते. न्या. रानडे यांच्या प्रमाणेच नेक नामदार गोखले यांचा इंग्रज राज्यकर्त्यांच्या न्यायबुद्धीवर विश्वास होता. ते आगरकरांचे सहकारी होते. फर्ग्युसन महाविद्यालयामध्ये त्यांनी १० वर्षे प्राध्यापक म्हणून काम केले होते. त्यांनी नेमस्त पक्षाच्या धोरणाचा नेहमी पुरस्कार केला. ते काही काळ राज्यस्तरावरील कायदेमंडळाचे आणि नंतर व्हाईसरॉय यांच्या वरिष्ठ मंडळाचे सदस्य होते. म्हणूनच त्यांना नामदार गोखले या नावाने ओळखले जाते. गोखले यांनी राजकीय कार्याला स्वार्थत्यागाचे, आध्यात्मिक वृत्तीचे अधिष्ठान प्राप्त करुन दिले होते. 'भारत सेवक समाज' ही एक अपूर्व संस्था स्थापन करुन त्यांनी सार्वजनिक जीवनात त्याग आणि सेवा या तत्त्वावर कसे काम करावे याचा एक आदर्श समाजापुढे ठेवला. भारत सेवक समाजात समाजामध्ये केवळ प्रतिष्ठेने मिरवणाऱ्यांना स्थान नाही तसेच श्रीमंत वर्गाच्या संरक्षणासाठी झटणाऱ्या व्यक्तींना स्थान नाही हे त्यांनी स्पष्ट केले होते. म. गांधींनी त्यांना गुरुस्थानी मानले होते. ना. गोखले यांना सामाजिक सुधारणांबद्दल आस्था होती. तसेच राजकारणामध्ये ते नेमस्त होते. त्यामुळे ते लो. टिळकांच्या विरोधी गटातील नेते होते. भारताच्या जमाखर्चाची तपासणी करण्यासाठी वेल्बी यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमण्यात आला होता. ब्रिटिश साम्राज्यशाहीचा सर्व खर्च भारतावर लादल्यामुळे भारतात दारिद्र्य वाढत आहे अशात तक्रारींची चौकशी करण्यासाठी हा आयोग होता. या आयोगाचे सदस्य म्हणून दादाभाई नौरोजी यांची नियुक्ती झाली होती. कलकत्ता, मद्रास, मुंबई येथील ज्येष्ठ नेत्यांनी आयोगापुढे साक्षी दिल्या. या आयोगापुढे ना. गोखले यांनी साक्ष दिली. ना. गोखले या नेत्यांमध्ये सर्वात तरुण ! पण त्यांचे इंग्रजी भाषेवरील असाधारण प्रभुत्व, आर्थिक समस्यांचा त्यांनी केलेला सखोल अभ्यास आणि आपले विचार अतिशय मुद्देसूद पण प्रभावी भाषेमध्ये मांडण्याचे त्यांचे कौशल्य यामुळे ना. गोखले यांची साक्ष सर्वात उत्कृष्ट ठरली. लो. टिळकांनीही ना. गोखले यांच्या विद्वत्तेची आणि इंग्रजीवरील प्रभुत्वाची मनापासून प्रशंसा केली. ना. गोखले यांचे सनदशीर मार्गाने, अर्ज विनंती करुन सरकारपुढे देशाच्या समस्या मांडण्याचे धोरण होते. त्यांच्या सौम्य स्वभावाला जहाल राजकारणाचे धोरण मानवण्यासारखे नव्हते. इंग्रजांची सत्ता उलथवून टाकल्यास देशात अनर्थ माजेल.

तरुणांनी सनदशीर मार्गाने राज्यकारभारात सुधारणा करण्याचा प्रयत्न करावा असा ना. गोखले यांनी तरुणांना उपदेश केला. देशातील इंग्रजी वृत्तपत्रांनी लो. टिळकांची तुलना पार्नेल या नेत्याशी केली. पार्नेल हे आयर्लंडच्या स्वातंत्र्यासाठी लढणारे नेते. पण लो. टिळक पार्नेलपेक्षा अधिक तेजस्वी, विद्वान आणि चारित्र्यसंपन्न होते. शिवाय भारत आयर्लंडपेक्षा वीसपटीने मोठा. भारतासारख्या मोठ्या राष्ट्रामध्ये जागृती करण्यासाठी लो. टिळकां- सारख्या निष्काम कर्मयोग्याची आवश्यकता होती. इंग्रजी वृत्तपत्रांनी ना. गोखले यांची तुलना इंग्लंडचे नेते ग्लॅडस्टन यांच्याशी केली होती. पण ग्लॅडसन हा लठ्ठ पगार घेऊन देशाचा राज्यकारभार पाहणारा नेता. ना. गोखले यांनी स्वार्थत्याग करून, दारिद्र्यात राहून राष्ट्रसेवा करण्याचे खडतर व्रत स्वीकारले होते. ना. गोखले आणि लो. टिळक यांच्यामधील राजकीय धोरणातील मतभेद लॉर्ड कर्झन या व्हाईसरॉयच्या कारकिर्दीमध्ये अधिक तीव्र बनले.

लो. टिळकांचे जागतिक घडामोडीवर बारीक लक्ष होते. १९०४ मध्ये जपान आणि रशिया यांच्यामध्ये झालेल्या युद्धात जपानने प्रचंड विजय संपादन केला. लो. टिळकांनी या निमित्ताने साम्राज्यशाहीवर प्रखर हल्ला चढवला. आशियाई आणि आफ्रिका देश हे परमेश्वराने जणू आपल्याला कुरण म्हणून आंदण दिले आहेत अशा समजुतीत हे राज्यकर्ते आहेत. जपानने स्वातंत्र्यप्राप्तीसाठी प्रखर लढा दिला आणि हे राष्ट्र विजयी झाले. परकीय राजसत्तेच्या वरवंट्याखाली भारत चिरडला जात आहे याची जाणीव जनतेला व्हायला हवी. 'स्वराज्य' हाच एक महान मंत्र आहे. तरीही लो. टिळकांनी सावधगिरीने याचा अर्थ इंग्रज सरकार लगेच उलथून टाकावे असा होत नाही असाही लेखामध्ये खुलासा केला.

या घटनांमुळे लो. टिळकांनी जहाल राजकारणाचा पुरस्कार करण्याचा निर्णय घेतला. पण राष्ट्रसभेमध्ये नेमस्त विचारांच्या राजकीय नेत्यांचे वर्चस्व होते. राष्ट्रसभेचे कार्य अधिक प्रभावी करण्यासाठी केवळ व्यासपीठावरून ठराव न करता जनतेच्या समस्यांशी समरस होऊन त्यांच्या पाठिंब्याने चळवळ उभी करावी असा निर्णय त्यांनी घेतला. लो. टिळक राजकारणात जहाल पण सामाजिक, धार्मिक सुधारणामध्ये नेमस्त होते. अनेक लोकांना या विसंगतीचे आश्चर्य वाटले. पण थोर विचारवंत

आचार्य जावडेकर यांनी 'स्वतंत्र राष्ट्रामध्ये सत्ता जनतेच्या हाती असते. अशा राष्ट्रात सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक सुधारणा करताना जहाल राजकारणाचा स्वीकार होऊ शकतो. पण पारतंत्र्यातील राष्ट्रांमध्ये सामाजिक, धार्मिक सुधारणा करण्यास विरोध होतो" असे मत पाश्चात्त्य राष्ट्रातील उदाहरणे देऊन स्पष्ट केले आहे. आचार्य जावडेकर यांनी लो. टिळकांच्या विचारांमध्ये मुळीच विसंगती नव्हती असे निस्संदिग्धपणे आपले मत मांडले आहे. लो. टिळकांना क्रांती हवी होती. तरीही त्यांनी सनदशीर, कायदेशीर मार्गानेच राजकारण केले. राष्ट्रसभेच्या कार्यात, चळवळीत जोपर्यंत सामान्य जनता मोठ्या संख्येने सहभागी होत नाही तोपर्यंत यशस्वीरीत्या क्रांती घडवून आणणे शक्य नाही असे लोकमान्यांचे ठाम मत होते. त्यांनी आपल्या समर्पित जीवनात राष्ट्रसभा ही जनतेची प्रतिनिधी कशी होईल आणि सभेचे राजकारण नेहमी पुरोगामी कसे राहील या विचारांनी प्रेरित होऊन कार्य केले. शिवाय कोणतेही निर्णय घेताना त्यांनी बहुमताचा आग्रह धरला. लो. टिळकांनी आपल्या चाळीस वर्षाच्या राजकीय कार्किदीमध्ये या तत्त्वाविरुद्ध कधीही आचरण केले नाही.

१८९९ साली भारताचे व्हाईसरॉय म्हणून लॉर्ड कर्झन यांची नेमणूक झाली. लॉर्ड कर्झन अतिशय उद्दाम, लष्करी सामर्थ्याचा अहंकार असलेले आणि पारतंत्र्यात असणाऱ्या राष्ट्रातील जनतेबद्दल तुच्छता प्रकट करणारे अधिकारी होते. लो. टिळक आणि ना. गोखले यांची तुलना त्यांनी औरंगजेबाशी केली. लॉर्ड कर्झन आले आणि देशात दुष्काळ, प्लेग यांनी थैमान घातले. लॉर्ड कर्झन यांची कारकीर्द म्हणजे सरकारची भरभराट आणि जनतेची उपासमार ! सुरेंद्रनाथ बानर्जी यांनी आपल्या राष्ट्रसभेच्या अध्यक्षीय भाषणात सर्व दुष्काळांमध्ये दीड कोटी लोक मृत्युमुखी पडल्याचे सांगितले. देशातील प्रागतिक राजकारणाचा पाया खणून काढणे हेच लॉर्ड कर्झन यांचे धोरण होते. ब्रिटिश राणीचा जाहीरनामा, ब्रिटिश मुत्सद्यांनी दिलेली आश्वासने लॉर्ड कर्झन यांनी फेटाळून लावली. देशातील जनतेने राज्यकर्त्यांशी नम्रपणे वागावे. त्यातच त्यांचे कल्याण आहे. साम्राज्य टिकवण्याकरता शिपायांनी प्रजेचे हातपाय तोडावे, त्यांचा नेहमी हिरमोड करावा असे लॉर्ड कर्झनचे धोरण होते. लो. टिळकांनी केसरीमध्ये लॉर्ड कर्झनच्या उद्दाम वृत्तीबद्दल कडक शब्दात लिहिले आहे.

●●●

# ११

# बंगालची फाळणी - चतुःसूत्रीचा स्वीकार

साम्राज्यशाहीमध्ये जनतेवर जुलूम होतो. राज्यकर्त्यांना प्रजेचा छळ केला की आपण यशस्वी झालो असे वाटते. पण अशा दडपशाहीत साम्राज्यशाहीच्या नाशाची बिजे पेरली जातात. लॉर्ड कर्झन यांनी जुलियस सीझरप्रमाणे साम्राज्य बळकट करण्याचे धोरण स्वीकारले. राज्यकारभारामध्ये कार्यक्षमता आली त्याच प्रमाणात नेत्यांमध्ये आणि सामान्य जनतेमध्ये असंतोषाची लाट पसरली. कर्झन यांच्या क्रूर, दडपशाहीच्या वृत्तीमुळे भारतीय राष्ट्रीय सभेचे काँग्रेसचे धोरण अधिक आक्रमक बनले. त्यामुळे चळवळ, बहिष्कार या आक्रमक वृत्तीने राष्ट्रीय सभेने आपला असंतोष नोंदवला. लो. टिळकांनी केसरीमधून या परिस्थितीचे विश्लेषण अचूक शब्दात केले होते. जनता अन्नावाचून तडफडत आहे आणि लॉर्ड कर्झन ब्रिटिश साम्राज्याची भरभराट होत आहे असे सर्वांना सांगत आहेत. लॉर्ड कर्झन यांच्या क्रूर आणि भावनाशून्य कार्यपद्धतीमुळे कर्झन आणि इंग्रज राज्यकर्ते यांच्याबद्दल देशामध्ये संतापाची लाट उसळ्ली आहे.

लॉर्ड कर्झन यांनी देशात मुस्लीम-हिंदू यांच्यामध्ये फूट पाडण्यासाठी बंगालची फाळणी केली. त्यांनी बंगाल राज्याचे दोन तुकडे केले. पूर्व बंगाल हा मुस्लीम समाजाचा प्रांत आणि पश्चिम बंगाल हिंदूंचा. या फाळणीला मुस्लीम समाजाचा पाठिंबा मिळेल अशी त्यांची समजूत होती. त्या दृष्टीने त्यांनी प्रयत्न केला. ही फाळणी करताना कोणत्याच प्रांतात हिंदूंचे बहुमत होऊ नये असा उद्देश राज्यकर्त्यांनी समोर ठेवला होता. मात्र पूर्व बंगालमध्ये मुस्लिमांचे बहुमत असेल याची दक्षता घेण्यात आली होती. ही भेदनीती करण्याचे कारण उघड होते. बंगालमध्ये स्वराज्याची

चळवळ रुजत होती. त्या चळवळीला सुरुंग लावण्याचे कारस्थान लॉर्ड कर्झन यांनी केले. पण राज्यकर्त्यांची फूट पाडण्याची नीती त्यांच्यावरच उलटली. सर्व देशात क्रांतिकारक राष्ट्रवाद पसरला. औरंगजेबाचे रुप घेऊन कारस्थान रचणाऱ्या लॉर्ड कर्झन यांचे आणि साम्राज्याचे आसन डळमळले. या चळवळीचा प्रारंभ ७ ऑगस्ट, १९०५ रोजी झाला. बंगालमध्ये मोठ्या शहरात सभा झाल्या. प्रचंड गर्दीत फाळणीचा निषेध करण्यात आला. इंग्रजी मालावर बहिष्कार घालण्याच्या शपथा घेण्यात आल्या. लो. टिळकांनी "आणीबाणीची वेळ" या मथळ्याचा लेख अतिशय स्फूर्तिदायक शब्दात लिहिला. त्यांनी आपल्या लेखामध्ये स्वावलंबी स्वतंत्र राजकारणाचा विचार प्रभावी भाषेत मांडला. "लॉर्ड कर्झन हुशार, कर्तबगार आहेत. पण वैभव, सत्ता याचा त्यांना अहंकार वाटत असल्याने त्यांची बुद्धी भ्रष्ट झाली आहे. बंगालमधील प्रचंड सभांना राजे, महाराजे, बॅरिस्टर, व्यापारी सर्व क्षेत्रांतील प्रमुख नागरिक उपस्थित होते. राज्यकर्त्यांचे नाक दाबल्याखेरीज त्यांचे तोंड उघडणार नाही. यासाठी परदेशी मालावर सर्वांनी बहिष्कार टाकावा." बंगाल हा त्या जनतेच्या भावनाप्रधान वृत्तीबद्दल प्रसिद्ध आहे. महाराष्ट्रातील प्रकृती बुद्धिवैभव प्रकट करुन टीकेचे प्रभावी अस्त्र सोडण्याची आहे. जनतेच्या प्रक्षुब्ध भावनांचा अंदाज घेऊन त्याचा उपयोग विरोधाची धार अधिक तीव्र करण्यासाठी नेते वापर करतात. लो. टिळकांनी या तापलेल्या वातावरणाचा पुरेपूर उपयोग करून घेतला. बंगालच्या फाळणीमुळे राष्ट्रीय चळवळीला वेगळे परिमाण लाभले. या फाळणीमुळे स्वातंत्र्य लढ्याच्या चळवळीने उग्र रूप धारण केले. सनदशीर राजकारण स्वतंत्र देशात उपयोगी पडते. इथे इंग्रज राज्य करतात. जनतेच्या मताला ते किंमत देत नाहीत. बंगाल फाळणीमुळे लाखोंच्या सभा झाल्या. यापुढे सनदशीर मार्गाचा उपयोग होणार नाही. कारण लाखो संख्येने निषेध करणाऱ्या जनतेची दखल राज्यकर्त्यांनी घेतली नाही. राष्ट्रीय काँग्रेसच्या सभेत भाषणे होत. पण ते विचार सामान्य जनतेपर्यंत पोचत नाहीत हे लो. टिळकांच्या लक्षात आले. ना. गोखले आणि पंजाबचे तरुण नेते लाला लजपतराय हे इंग्लंडला गेले. ना. गोखले यांनी राष्ट्रसभेची बाजू राज्यकर्त्यांपुढे आपल्या प्रभावी निवेदनाद्वारे मांडली. लो. टिळकांनीही त्यांची स्तुती केली. "हातघाईवर आले" या मथळ्याचा

अग्रलेख लो. टिळकांनी लिहिला. राष्ट्रीय सभा राज्यकर्त्यांपुढे हात पसरुन भीक मागत आहे. त्याचा राज्यकर्त्यांवर काहीच परिणाम झाला नाही. ना. गोखले, लाला लजपतराय, दादाभाई नौरोजी यांनी बहिष्कार चळवळीचे जोरदार समर्थन केले. टिळकांनी लिहिले, "प्रजेचा निग्रह आणि प्रजेने केलेला संप यामधून जनतेची शक्ती प्रकट होते. रशियासारख्या प्रचंड देशातही जनतेने एकजूट करुन रशियाच्या झारला नमवले. मुंग्याही हत्तीला नमवू शकतात." बंगालमध्ये सुरेंद्रनाथ बानर्जी यांनी आपल्या पद्धतीने राज्यकर्त्यांविरुद्ध आग पाखडण्यास सुरुवात केली होती. लो. टिळकांची भाषा सरळ पण थेट अंत:करणाला भिडणारी. त्यांचे लेख वाचून वाचकांच्या अंत:करणात राज्यकर्त्यांविरुद्ध असंतोषाची, संतापाची लाट उसळत असे. त्यांच्या लेखांमधून त्यांच्या प्रखर बुद्धिमतेचे, राष्ट्रभक्तीचे आणि व्यासंगाचे दर्शन वाचकांना घडत असे. त्यांनी बहिष्काराच्या धोरणाला 'बहिष्कार योग' असे समर्पक नाव दिले. नेमस्त राजकारण्यांनी बहिष्काराच्या धोरणाविरुद्ध आपले आक्षेप नोंदवले. नेमस्तांना विरोधही सनदशीर मार्गानेच व्हावा असे वाटत होते. त्यांना जनतेने उभारलेल्या आंदोलनाची एकप्रकारे भीती वाटत होत होती. लो. टिळकांनी त्यांच्या या बोटचेप्या वृत्तीबद्दल नापसंती व्यक्त केली. "तरुण पिढी आणि गोरगरीब अतिशय उत्साहाने बहिष्काराला पाठिंबा देतात. पण श्रीमंत आणि मध्यम वर्गातील लोक मात्र बहिष्काराचे नाव घेण्यासाठी कचरतात" नेमस्तांना स्वदेशी गिरण्या सुरु करुन स्वदेशी वस्तू, तयार व्हाव्या असे वाटत होते. मगच लोक स्वदेशीकडे वळतील असा त्यांचा दावा होता. पण लो. टिळकांनी त्यांच्या या मताची खिल्ली उडवली. स्वदेशी वापरण्यासाठी लोकांमध्ये स्वदेशाबद्दल प्रेम निर्माण केले पाहिजे. लोकांनी 'बहिष्कार योग' स्वीकारला तर स्वदेशी वस्तूंच्या निर्मितीला साहजिकच चालना मिळेल हे लो. टिळकांचे विचार योग्य होते. लो. टिळकांनी एखादा विचार स्वीकारला की, ते त्या विचारांचा पाठपुरावा प्राणपणाला लावून करीत असत. लो. टिळकांनी सूतगिरण्या आणि कापडगिरण्या याविषयावर केसरीमध्ये अभ्यासपूर्ण लेखन केले. त्यांनी या उद्योगांच्या प्रगतीसाठी कोणत्या दिशेने प्रयत्न व्हावेत याचे तर्कशुद्ध विवेचन केले. ते ज्याप्रमाणे आंदोलन करण्यास जनतेस प्रवृत्त करीत त्याचप्रमाणे आंदोलनापुढे विस्थापित होणाऱ्या जनतेचे पुनर्वसन करण्यासाठी विधायक सूचनाही करीत. देश स्वावलंबी व्हायचा असेल तर

त्यासाठी थोडा फार स्वार्थ-त्याग करण्याची मानसिक तयारीही करावी लागेल असे त्यांनी जनतेस पटवून दिले.

वरिष्ठांशी तीव्र मतभेद झाल्यामुळे लॉर्ड कर्झन यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. पूर्व बंगालचे गव्हर्नर म्हणून सर बॅंफिल्ड फुल्लर याची नेमणूक करण्यात आली. फुल्लर याने दडपशाहीचे धोरण अधिक तीव्र केले. त्याचे वर्तन हुकूमशहासारखे होते. त्याने 'वंदे मातरम्' वर बंदी घातली. त्यामुळे बंगामध्ये आगडोंब उसळला. लो. टिळकांनी फुल्लर याची तुलना पिसाळलेल्या कुत्र्याशी केली. स्वदेशी चळवळ ही स्वराज्यासाठी उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे. त्यामुळे स्वदेशी उद्योगांना चालना मिळेल. म्हणूनच फुल्लर याने पिसाळलेल्या कुत्र्याचे रुप धारण करून जनतेच्या आवाज चिरडून टाकण्याचा प्रयत्न चालवला आहे असे लो. टिळकांनी आपल्या लेखांमधून, भाषणांमधून स्पष्ट केले.

ह्यूम आणि दादाभाई नौरोजी यांनी 'अखंड चळवळ करा' असा संदेश दिला 'आपल्या सर्व दु:खांवर स्वराज्य हाच एक सर्वश्रेष्ठ उपाय आहे' ना. गोखले हे नेमस्त पक्षाचे नेते. त्यांचे वक्तृत्व आणि उत्साह स्वराज्यासाठी पुरे पडणार नाही, 'धैर्य आणि कोणासही हार जाणार नाही' या लो. टिळकांच्या गुणांचाच राष्ट्रसभेला उपयोग होईल. हे वृद्ध, जेष्ठ नेत्यांनी ओळखले होते. ऑस्ट्रेलिया, कॅनडा या देशात लोकसत्ताक राज्यपद्धती होती. तशी राज्यपद्धती भारतात हवी असा लो. टिळकांचा आग्रह होता. बंगालचे तरुण पुढारी बाबू बिपिनचंद्र पाल यांनी राष्ट्रसभेमध्ये राजनिष्ठ आणि राष्ट्रनिष्ठ असे दोन पक्ष आहेत असे प्रतिपादन केले. राजनिष्ठ पक्ष सनदशीर मार्गाचा आग्रह धरतो. बिपिनचंद्र पाल यांनी राजनिष्ठेवरील आपली नापसंती तीव्र शब्दात व्यक्त केली. राष्ट्रभक्ती हाच राजकारणाचा खरा आधार असू शकतो हे त्यांनी ठामपणे सांगितले. लो. टिळक म्हणजे बाळ, बाबू बिपिनचंद्र पाल म्हणजे पाल आणि लाल लजपतराय म्हणजे लाल या तीन नेत्यांनी राष्ट्रसभेच्या मागण्या सरकारकडून मंजूर होण्यासाठी जनतेमध्ये जागृती करुन, जनता संघटित होण्याची गरज आहे असा विचार राष्ट्रसभेपुढे मांडला. 'लाल, बाल, पाल' अशा शब्दांत या तीन नेत्यांचा उल्लेख नेहमी करण्यात येतो. पण जहाल राजकारण करणाऱ्या नेत्यांचा

हेतू सफल होऊ द्यायचा नाही असा पवित्रा सर फेरोजशाह मेथा, ना. गोखले यासारख्या नेत्यांनी घेतला.

बनारस येथे भरलेल्या राष्ट्रसभेच्या अधिवेशनात जहालगट आणि नेमस्त गट यांच्यामधील वैचारिक दरी कमी होईल असे वाटत होते. पण कलकत्ता येथे दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या अधिवेशनामध्ये ही वैचारिक दरी अधिकच वाढली. बंगालमध्ये फाळणीच्यानिमित्ताने चळवळीने उग्र स्वरूप धारण केले होते. जहाल राजकारण करणाऱ्या गटाला सनदशीर मार्गाने जनतेचे प्रश्न सुटणार नाहीत असे वाटू लागले. नेमस्तही आपले सभेवरील वर्चस्व कायम ठेवण्यास प्रयत्नशील होते. लो. टिळकांना चळवळीला क्रांतीचे स्वरूप यावे असे वाटत होते. केसरीमधील आपल्या अग्रलेखामध्ये त्यांनी महाभारतातील प्रसंगाचे उदाहरण दिले. भीम आपले ज्येष्ठ बंधू धर्मराज यांना, 'मनधरणी करण्याची सौम्य भूमिका आता सोडा ! क्षत्रियांप्रमाणे लढाऊ, आक्रमक वृत्ती धारण करा ! असा सल्ला देतो. राष्ट्रसभेलाही असाच उपदेश करण्याची वेळ येऊन ठेवली आहे. फेरोजशाह मेथा यासारख्या नेत्यांनी जमिनीविषयक कायद्याला विरोध करण्यासाठी कायदेमंडळाच्या सभेतून सभात्याग केला. सरकारने या निषेधाची दखल घेतली नाही. सनदशीर मार्गाकडे सरकारची उपेक्षेने, तुच्छतेने पाहण्याचीही वृत्ती ! कलकत्त्याच्या सभेत अध्यक्ष, या नात्याने दादाभाईंनी "स्वराज्यासाठी एक व्हा. सतत संघर्ष करा आणि स्वराज्याचे उद्दिष्ट साध्य करून घ्या" असा संदेश दिला. बहिष्काराच्या ठरावाला प्रारंभी नेमस्तांनी विरोध केला पण अखेर ठराव पास झाला. लो. टिळकांनी दादाभाई नौरोजी यांनी इंग्रज सरकारच्या देखरेखीखाली जनतेच्या प्रतिनिधींचे सरकार असे शब्द न वापरता 'स्वराज्य' हा शब्द जाणीवपूर्वक वापरला याचा आपल्या लेखामधून उल्लेख केला. यावरून दादाभाईंचा जहाल राजकारणाला पाठिंबा आहे हे सिद्ध होते. राष्ट्रीय काँग्रेस सभेने अर्ज, विनंती करण्याच्या धोरणाचा त्याग केला नाही हे खरे पण याच सभेत राष्ट्रीय शिक्षण स्वदेशी, बहिष्कार आणि स्वराज्य या चतु:सूत्रीचा स्वीकार या सभेत करण्यात आल्याचे लो. टिळकांनी आवर्जून सांगितले.

●●●

# १२

# सुरत येथील राष्ट्रीय अधिवेशन

बंगालच्या फाळणीच्या निमित्ताने जी प्रचंड शक्ती निर्माण झाली होती त्या शक्तीचे रूपांतर नि:शस्त्र क्रांतीमध्ये करण्याचे प्रयत्न लो. टिळकांनी १९०५ ते १९०८ या काळात केले. लाला लजपतराय आणि बिपिनचंद्र पाल यांच्या सहकार्याने 'बहि:ष्कार योग' या विचाराचा आधार घेऊन नव्या नि:शस्त्र क्रांतिकारक पक्षाची स्थापना केली असे लाला लजपतराय यांनी आपल्या लेखात म्हटले आहे. इंग्लंडमध्ये उदारमतवादी प्रागतिक पक्षाचे मंत्रिमंडळ सत्तेवर आले. नेमस्त पक्षाला आता बंगालची फाळणी रद्द होईल असे वाटले. पण मोर्ले यांनी फाळणी रद्द होणार नाही. राज्यघटनेतही सुधारणा सत्वर होणार नाहीत असे जाहीर केले. 'भ्रमाचा भोपळा फुटला' असा लो. टिळकांनी लेख लिहिला. आपल्या देशाची उन्नती स्वदेशी चळवळ आणि बहिष्कार या मार्गानेच होईल. आपण आपल्या निर्णयावर ठाम आहोत हे सरकारला समजले की मोर्ले किंवा फॉक्स आपले म्हणणे आदराने ऐकून होईल हे लो. टिळकांनी या लेखात ठणकावून सांगितले. नेमस्तांची प्रागतिक पक्षावर भिस्त होती म्हणून टिळकांनी हा लेख लिहिला. लो. टिळकांनी सत्याग्रहाच्या मार्गाची घोषणा केली. याच वेळी बाबू बिपिनचंद्र पाल यांनी संपूर्ण स्वातंत्र्य हे आमचे ध्येय आणि नि:शस्त्र प्रतिकार हे आमचे साधन आहे असे आपल्या 'वन्दे मातरम्' या पत्रातून जाहीर केले. त्यावेळच्या राजकारणाकडे दृष्टिक्षेप टाकल्यास नेमस्त किंवा मवाळपक्ष आणि जहालपक्ष यांच्यामधील मतभेदामुळे राष्ट्रीय काँग्रेस सभा दुभंगू नये असे काही नेत्यांना वाटत होते.

१९०७ साली राष्ट्रीय सभेचे अधिवेशन नागपूर येथे भरवण्यात यावे असा विचार होता. नागपुरात अधिवेशन घेतल्यास राष्ट्रसभेचे दोन तुकडे होतील अशी

भीती ना. गोखले यांना वाटत होती. ही बातमी मोर्ले यांच्यापर्यंत पोचली. ना. गोखले यांनी जहाल पक्षाच्या नादी लागू नये अशी इच्छा प्रागतिक पक्षाच्या इंग्रज राज्यकर्त्यांनी व्यक्त केली. मोर्ले यांनी या पक्षास मधाचे बोट दाखवले. कलकत्ता येथे पास झालेले ठराव आपल्याला मान्य आहेत अशी हमी जुन्या पक्षाने दिली असती तरी सभा दुभंगली नसती. मवाळ पक्षाने जहाल पक्षाशी तडजोड होणे शक्य नाही असे धोरण सभेच्या सुरुवातीपासूनच जाहीर केले होते. टिळकांना नामोहरम करण्यासाठीच मवाळ पक्षाने सुरत येथे अधिवेशन घेण्याचे ठरवले होते. लो. टिळकांचे सुरतमध्ये अत्यंत उत्साहाने स्वागत करण्यात आले. त्यांची मिरवणूक काढून त्यांचा सन्मान केला. दादासाहेब खापर्डे हे लो. टिळकांचे निकटचे सहकारी, त्यांचे गुजराथी भाषेवर प्रभुत्व असल्यामुळे त्यांनी लो. टिळकांची भूमिका जनतेस पटवून दिली. लो. टिळकांची जाहीर सभेत भाषणे झाली. पण या सभेच्यावेळी मवाळ आणि जहाल पक्षांचे प्रतिनिधी वेगवेगळ्या ठिकाणी राहिले होते. लो. टिळकांनी सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांची भेट घेतली. कलकत्त्याचे ठराव बदलणार नाही अशा आश्वासनाची लो. टिळकांनी विनंती केली, पण बॅनर्जींनी त्या विनंतीस मान न देता आश्वासन देण्यास नकार दिला. तडजोडीसाठी टिळकांनी एक समिती नेमली. पण या समितीस समर्थपणे काम करता आले नाही. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी लो. टिळक आणि खापर्डे व्यासपीठावर होते. दुसऱ्या दिवशी ते प्रतिनिधींच्या जागेत बसले. अध्यक्षांची निवड झाल्यानंतर उपसूचना मांडण्यासाठी लो. टिळक व्यासपीठावर चढले. प्रारंभी अध्यक्षांशी त्यांचा थोडा वाद झाला. त्यानंतर आरडाओरड सुरू झाली. खुर्च्या फेकण्यात आल्या. जोडे फेकण्याचेही अनुचित प्रकार घडले. सुरतेचे काँग्रेस अधिवशन अशा प्रकारे उधळण्यात आले. अखेर पोलिसांनी मंडपात प्रवेश करून मंडपाचा ताबा घेतला. काँग्रेस मोडल्यानंतर ना. गोखले यांच्याविरुद्ध जी विधाने केली होती ती खोटी होती असे स्पष्ट करण्यासाठी ना. गोखले यांनी सविस्तर, निवेदन प्रसिद्ध केले. स्वराज्याचा अर्थ 'बादशाही वसाहत' असे ना. गोखले यांचे ध्येय आहे असे आक्षेप ना. गोखले यांच्याबद्दल घेण्यात आले. भारत सेवक समाजाच्या उद्दिष्ट पत्रकात 'स्वराज्य' हेच आपले ध्येय आहे हे स्पष्ट म्हटले आहे. लो. टिळकांनी मी 'बादशाही वसाहत' मागतो असा खोटा प्रचार केला असे ना. गोखले यांनी म्हटले. मात्र लो. टिळकांनी

आपले ध्येय स्पष्ट शब्दात मांडले नाही असेही ना. गोखले यांनी आपल्या उत्तरात म्हटले. 'वसाहतीचे स्वराज्य पाहिजे' हेच आपले ध्येय आहे असे लो. टिळक म्हणतात. बंगाली नेत्यांनी स्वातंत्र्याचा झेंडा फडकावला, की ते स्वातंत्र्यवादी बनतात. लो. टिळकांनी आपले ध्येय स्पष्ट शब्दात मांडले नाही याचा ना. गोखले यांनी पुन्हा उच्चार केला. समेटासाठी आपल्याला कोणीही भेटले नाही हे ना. गोखले यांनी जाहीर केले.

काँग्रेसची सभा उधळण्यात आली आणि नेमस्त पक्षाच्या नेत्यांनी जहाल गटाच्या नेत्यांना विचार मांडण्याची संधी दिली नाही याचा लो. टिळकांना खेद वाटला. राष्ट्रीय काँगेस ही सर्व राजकीय नेत्यांच्या विचारविनिमयासाठी व्यासपीठ आहे. ते एक श्रद्धेचे केंद्र आहे अशी टिळकांची भावना होती. झाल्या प्रकारामुळे त्यांना दु:ख झाले पण संस्था मोडावी असा विचार त्यांनी केव्हाही केला नाही. आपण उपसूचना मांडणार आहोत असे लो. टिळकांनी स्वागताध्यक्षांना अगोदरच कळवले होते. तरीही त्यांना  उपसूचना मांडू दिली गेली नाही. ही मनाई निमूटपणे सहन करण्यास लो. टिळकांनी नकार दिला. त्यामुळे सभेत दंगल माजली. आपले वर्तन पूर्णपणे कायदेशीर होते असे अनेक आधार देऊन लो. टिळकांनी केसरीमधील आपल्या लेखांमध्ये सांगितले. मवाळ आणि जहाल या पक्षांमध्ये मतभेद असूनही कलकत्त्या येथे ठराव पास झाले होते. तेच ठराव त्यामध्ये बदल न करता सुरतेच्या सभेत पास व्हावेत अशी लो. टिळकांची विनंती होती. पण विषय नियामक समिती याविषयी कोणता निर्णय घेईल हे सांगता येत नाही हे कारण ना. गोखले आणि अन्य नेत्यांनी पुढे केले. ना. गोखले, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, लो. टिळक आणि लाला लजपतराय या नेत्यांनी एकमताने मांडलेला ठराव विषय नियामक समितीने नामंजूर केला नसता. प्रतिपक्षाशी समेट करण्याची सलोख्याची भावना दुसऱ्या पक्षामध्ये असेल तर सभेचे ऐक्य टिकू शकते. पण जहाल पक्षाला बहुमताच्या जोरावर नामोहरम करण्याचा निर्णय मवाळ नेमस्त पक्षाने अगोदरच घेतला होता. फेरोजशहा मेथा यांनी दोन्ही पक्षाची एकत्र राष्ट्रीय सभा घेण्याचा विचार फेटाळून लावला. फेरोजशहा मेथा यांनी लोकशाहीचे संकेत पाळून समेटासाठी प्रयत्न करणे आवश्यक होते. त्यांनी वापरलेली भाषा असमंजसपणाची होती. राष्ट्रीय काँग्रेसमध्ये फूट पडू नये

अशी तीव्र भावना बंगाली नेत्यांनी व्यक्त केली होती. बाबू सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी या शब्दात फेरोजशहा मेथा यांच्या या विधानाबाबतीत आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या होत्या. एकूण नेमस्त गटाचे धोरण हे राष्ट्रामध्ये स्वराज्यासंबंधी व्यक्त होणाऱ्या भावनांच्याविरुद्ध होते हे स्पष्ट झाले.

नेमस्तांनी काँग्रेसवर आपले वर्चस्व प्रस्तापित करण्याचा प्रयत्न केला खरा पण राष्ट्रीय काँग्रेस ही जनतेचे प्रतिनिधित्व करणारी, लोकशाहीवर विश्वास प्रकट करणारी संस्था आहे हे लो. टिळकांनी आपल्या केसरीमधील लेखामध्ये स्पष्ट केले. भारतामध्ये अद्याप पाश्चात्त्य पद्धतीचे संस्थांविषयीचे विचार रुजलेले नाहीत. पाश्चात्त्य देशात राजकीय क्षेत्रातील संस्थामध्ये मतभेद होतात पण त्यामुळे संस्था दुभंगण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. भारतामध्ये मात्र या लोकशाही मार्गाचा अवलंब दुर्दैवाने होत नाही. लो. टिळकांनी अप्रत्यक्षरीतीने नेमस्त पक्षावर लोकशाही विरोधी वर्तन केल्याचा आरोप केला होता. नेमस्त पक्षांतील काही नेत्यांनी जहाल राजकारणाच्या नेत्यांना स्वतंत्र पक्ष स्थापन करावा अशी जाहीर सूचना केली होती. त्याला उत्तर म्हणून लोकमान्यांनी केसरीमधून आपले विचार मांडले. इंग्लंडसारख्या देशात लोकसभा आहे. ती लोकशाही तत्त्वाच्या आधारे कार्य करते. राष्ट्रीय काँग्रेस ही राष्ट्राचे-राष्ट्राच्या जनतेचे प्रतिनिधित्व करते. लोकसभा किंवा राष्ट्रीय काँग्रेससारखी संघटना जनतेच्या विचारांचे प्रतिनिधित्व करते. आपल्या देशाचे कल्याण व्हावे, देशातील सामान्य जनतेला न्याय मिळावा असा उदात्त हेतू समोर ठेवून ध्येयवादी वृत्तीच्या नेत्यांनी काँग्रेसची स्थापना केली. ह्यूम हे ब्रिटिश सरकारचे निवृत्त अधिकारी, जनतेच्या समस्या सनदशीर मार्गाने राज्यकर्त्यांपुढे मांडण्यासाठी, ह्यूमसारख्या विचारवंतांनी काँग्रेसच्या स्थापनेत पुढाकार घेतला. ह्यूम आणि त्यांचे सहकारी यांच्या या दूरदृष्टीबद्दल कृतज्ञता बाळगणे अगत्याचे ठरते.

नेमस्तांचे नेते फेरोजशाह मेथा यांचा स्वभाव हट्टी होता. कोणत्याही मार्गाचा अवलंब करून जहाल गटाला धडा शिकवायचा असा त्यांनी पहिल्यापासूनच चंग बांधला होता. विरोधकांना तुच्छतेने वागविण्यात त्यांना विशेष आनंद वाटत असे. 'फेरोजशहा मेथा यांनी त्यांना योग्य वाटेल ते निर्णय जरूर घ्यावे पण प्रत्येकवेळी

नेमस्त पक्षाची सरशी होईल अशा भ्रमात त्यांनी राहू नये. सभेला प्रत्येक अधिवेशनास सुरतसारखे सुरक्षित शहर मिळेलच असे नाही" असा इशारा लो. टिळक यांनी केसरीतील आपल्या लेखांमधून नेमस्त नेत्यांना दिला. या सर्व प्रकारामध्ये लो. टिळकांनी विधायक भूमिका स्वीकारली होती. नेमस्त आणि जहाल गटामध्ये असलेले मतभेद सामंजस्याने सोडवावे असे लो. टिळकांना वाटत होते. तडजोड करताना मतभेद मिटवताना माझी अनेक वेळा मानहानी झाली तरी मी तक्रार करणार नाही. हे राष्ट्रीय कार्य आहे. राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने जे योग्य ते केले पाहिजे. आमचे इंग्रज सरकारशी भांडण आहे. नेमस्ताशी भांडण्यामध्ये आम्हाला रस नाही. यासाठी समेट होणे हे राष्ट्राच्या हिताचे आहे." हे लो. टिळकांचे उद्‌गार आहेत.

सुरत येथे भरलेल्या काँगेसमध्ये आरडाओरडा, गदारोळ, खुर्च्या फेकणे असे गैरप्रकार झाले तरी सर्वसामान्य सदस्य निराशावादी नव्हते. यातूनही तडजोडाचा मार्ग निघू शकेल अशी त्यांना अशा वाटात होती. गुरुकुलचे संस्थापक आणि संन्यासी स्वामी श्रद्धानंद यांनी अधिवेशन संपल्यानंतर लगेचच सुरतला भेट दिली. "ज्या पक्षाची जहाल गट म्हणून संभावना होते हाच पक्ष अखेरीस देशाला स्वराज्य मिळवून देईल" असे स्वामीजींनी उद्‌गार काढले. अधिवेशनानंतर बंगालचे नेते श्री. अरविंद घोष यांच्या अध्यक्षतेखाली एक सभा झाली. लो. टिळकांनी भावनावश होऊन आपले विचार मांडले नाहीत. त्यांनी सर्व परिस्थितीचे विश्लेषण अत्यंत तटस्थपणे आणि तर्कशुद्धरीतीने केले. त्यांनी वैचारिक मतभेद स्पष्ट करताना वैयक्तिक हेव्यादाव्यांना स्पर्शही केला नाही. "सुरत काँग्रेसमध्ये घडलेल्या घटनांमुळे भारतीय राजकारणाचे क्षितिज आता नव्या प्रकाशामुळे उजळून जात आहे. या नव्या प्रकाशाच्या दिशेने आपण वाटचाल करणे अगत्याचे आहे. राजकारण ही एक गतिमान प्रक्रिया आहे. बंगालची फाळणी, फाळणीविरुद्ध झालेले तीव्र आंदोलन, स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण या आधारे देशात स्वराज्यासंबंधी जागृती निर्माण करण्याचे नवे धोरण यामुळे देशात नवचैतन्य निर्माण झाले आहे." लो. टिळकांनी स्वराज्यासाठी हाती घेतलेली चळवळ अधिक तीव्र, संघर्षमय करण्याचा निर्धार या प्रसंगी व्यक्त केला.

●●●

# १३

# 'ओरायन' आणि 'आर्क्टिक होम ऑफ वेदाज'

लो. टिळकांच्या कौटुंबिक जीवनात दु:खद घटना घडत होत्या. पुण्यामध्ये प्लेगची साथ फैलावली तेव्हा त्यांचा ज्येष्ठ पुत्र विश्वनाथ याचे दु:खद निधन झाले. विश्वनाथ विशेष बुद्धिमान नव्हता. पण होतकरू होता. टिळकांनी त्याची मनापासून शुश्रूषा केली. आपण प्रयत्नांची शिकस्त केली असे त्यांना वाटले. प्लेगच्या साथीत ते सहकुटुंब एका राहुटीत राहत होते. त्यांचा धाकटा मुलगा रामभाऊ हाही तापाने फणफणत होता. पण सत्यभामाबाईंनी हे लो. टिळकांना कळवले नाही. लो. टिळकांचे केसरीसाठी लेखन, समाजकार्य चालूच होते. त्यांनी नंतर आपल्या धाकट्या मुलाची चौकशी केली. विश्वनाथ गेल्याची जाणीव त्यांना अधूनमधून अस्वस्थ करीत होती पण त्यांच्या शांत वृत्तीत कधी फरक पडला नाही. लो. टिळकांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये जबर कर्तव्यनिष्ठा आणि अतुल धैर्य हे गुण वसत होते, याचा प्रत्यय त्यांच्यावर वेळोवेळी कोसळलेल्या संकटांच्या मालिकेमधून येतो. याच वेळी त्यांच्या दोन वृद्ध नातेवाईकांचेही निधन झाले होते. त्यांचे चुलते गोविंदराव आणि त्यांच्या पत्नी यांच्यावर लो. टिळकांचे प्रेम होते. टिळकांच्या सुखदु:खामध्ये त्यांनी लोकमान्यांना सदैव साथ दिली होती.

लो. टिळकांच्यामागे नेहमी खटल्यांचे शुक्लकाष्ठ लागलेले असे. अधूनमधून शारीरिक व्याधींना त्यांना तोंड द्यावे लागले. जवळच्या नातेवाईकांचे मृत्यू त्यांनी सहन केले. लो. टिळकांचे धैर्य अद्धितीय होते. त्याचप्रमाणे त्यांची बुद्धिमत्ताही अलौकिक होती. अशा संघर्षमय काळात त्यांचा व्यासंग, चौफेर वाचन, अखंड चिंतन यामध्ये खंड पडला नव्हता ! अशा प्रतिकूल परिस्थितीतही 'ओरायन' आणि 'आर्क्टिक होम

इन दि वेदाज' हे अभ्यासपूर्ण ग्रंथ त्यांनी पूर्ण केले. १८७२ पासून त्यांचे भगवद्गीतेवरील चिंतन आणि व्यासंग चालू होता. गीतेच्या दहाव्या अध्यायामध्ये

बृहत्साम तथा साम्नां गायत्री छन्द सामहम् ।
मासानां मार्गशी र्षोऽहमृतूनां कुसुमाकर ।।

मराठी- सामांत मी बृहत्-साम गायत्रीमंत्र-सारथी
मी मार्गशीर्ष मासांत ऋतूंत फुलला ऋतु

मार्गशीर्ष महिन्याचा असा उल्लेख का ? यावर त्यांनी तीन वर्षे अखंड संशोधन करून 'ओरायन' या नावाचा प्रबंध लिहिला. या विषयावर त्यांनी व्याख्याने दिली. हा प्रबंध त्यांनी पुस्तकरुपाने १८९३ मध्ये प्रसिद्ध केला. पाश्चात्त्य विद्वानांनी वैदिक संस्कृती ख्रिस्तपूर्व चोवीशे वर्षांपेक्षा जुनी नाही असा सिद्धांत मांडला होता. मॅक्समुल्लर या विद्वान संशोधकांचेही हेच मत होते. पाश्चात्त्य विचारवंतांनी एकांगी पद्धतीने संशोधन केल्यामुळे त्यांनी हा निष्कर्ष काढला याची लो. टिळकांना खात्री पटली. लो. टिळकांनी केवळ तर्कावर अवलंबून राहून आपले मत मांडले नाही. त्यांनी नक्षत्रांच्या गणिताचा सखोल अभ्यास केला. या गणिताच्या आधारे जे निष्कर्ष प्राप्त झाले त्याचा आधार घेऊन त्यांनी 'ओरायन' प्रबंध लिहिला. वैदिक संस्कृती किती प्राचीन आहे याचा काही विद्वानांनी अभ्यास करुन आपला निर्णय जाहीर केला होता. त्यांनी लो. टिळकांच्या मताला दुजोरा दिला नाही. पण लो. टिळकांचे संशोधन स्वतंत्र आणि मूलभूत आहे. वैदिक कालगणनेने यात काही तर गूढ आहे हे लोकमान्यांनी जाणले. प्राचीन भारतीयांनी प्रत्येक महिन्याला नक्षत्रांची नावे दिली आहेत. आज चैत्र महिन्यापासून वर्षाचा शुभारंभ होतो असे आपण मानतो. पण देशाच्या काही भागात कार्तिक, आषाढ, भाद्रपद या महिन्यापासूनही वर्षाचा शुभारंभ होतो. जोतिषशास्त्रामध्ये वेदांग ज्योतिष हाच एक प्राचीन ग्रंथ आहे. नंतर ग्रीकांची ज्योतिर्विद्या आली. शालिवाहन विक्रमांचे शक-सवंत आले. त्याचा परिणाम वैदिक कालगणनेचे विस्मरण होण्यात झाला. लो. टिळकांनी या प्रश्नावर दीर्घकाळ चिंतन- मनन केले. त्यांनी नक्षत्रांच्या गणिताच्या आधारे वेदांचा प्राचीन काळ चार हजार वर्षापूर्वीचा आहे हे संशोधन करुन सिद्ध केले.

वैदिक संस्कृतीचा यज्ञ हा पाया. यज्ञ आणि सूर्य यांचा जवळचा संबंध. यज्ञ करायचा तर काळाचे भान हवे. महिने, ऋतू, वर्ष यांचे ज्ञान हवे. यज्ञाचा प्रयोग वर्षभर चालत असे. सकाळ, संध्याकाळ, पौर्णिमा, अमावस्या यांना धरून होमवहन वर्षभर चालत असे. वर्ष संपताच यज्ञाची समाप्ती होत असे. म्हणून यज्ञ आणि वर्ष किंवा संवंत्सर हे समानार्थी शब्द बनले. यज्ञकर्ते काळाचा हिशेब ठेवणारे होते. त्यांनी तीस दिवसाचा महिना. बारा महिने म्हणजे वर्ष असा हिशेब केला. चांद्रवर्ष ३५४ दिवसांचे व ३६० तिथींचे होते. सौरवर्षाशी याचा मेळ व्हावा म्हणून त्यांनी अधिक मासाची योजना केली. असे गणित कळण्याइतकी प्राचीन आर्यांची प्रगती झाली नव्हती असा आक्षेप पाश्चात्त्यांनी घेतला. सूर्याचे पृथ्वीभोवती भ्रमण होते. ते वर्ष ठरविण्याचे साधन होते. सूर्याजवळ जे नक्षत्र येते ते पाहायचे. त्या नक्षत्राजवळ सूर्य पुन्हा येईल त्यावेळी वर्ष संपले असे मानायचे. त्याकाळी अशी प्रगती झाली होती. उत्तरायण आणि दक्षिणायन याविषयी भारतातील ज्योतिषविषयक विद्वानांमध्ये एकवाक्यता आहे. उत्तरायणाचे दोन अर्थ आहेत. एक दक्षिण टोकाकडून उत्तरेकडे जाणे. दुसरा अर्थ विषुववृत्ताच्या उत्तर प्रदेशातले भ्रमण. त्यामुळे वसंत ऋतू आणि वर्षारंभ एकाचवेळी येतो. 'वसंत हाच पहिला ऋतू' याला वैदिक वचनांचा आधार आहे. गीतेच्या आठव्या अध्यायामध्ये शुक्ल कृष्णगती याचा भावार्थ सुबोध भाषेत दिला आहे. शतपथ ब्राह्मणात वसंत, ग्रीष्म, वर्षा हे देवांचे ऋतू- शरद, हेमंत आणि शिशिर हे पितरांचे ऋतू असे स्पष्ट विधान आहे. वैदिक आर्य हे भारतात कायमचे राहण्यास आल्यानंतर त्यांनी निसर्गनियमानुसार हे फरक केले. दर दोन हजार वर्षांनी ऋतू मागे हटतात. त्याप्रमाणे कालगणनेत दुरुस्ती करावी लागते. 'कृत्तिका नक्षत्र पूजेत सूर्य आहे' या वैदिक वचनाच्या आधारे हे सिद्ध करता येते. याचा अर्थ एकदा माघ महिन्यात वर्षारंभ मानला जात होता. इच्छामरणी भीष्माने उत्तरायणाची वाट पाहत माघाच्या शुक्ल पक्षात प्राण सोडला. उत्तरायणाचा स्वामी देव. कृत्तिका ते विशाखा नक्षत्रांपर्यंतही देवाची घरे. दक्षिणायनाचा स्वामी- यम. इथे पहिले नक्षत्र अनुराधा शेवटचे अपभरणी. सूर्य कृत्तिकामध्ये सन २३५० पूर्वी होता. त्यावरून वैदिक ग्रंथांची प्राचीनता पाश्चात्त्य विद्वानांना मान्य नाही. चीन आणि इजिप्त या संस्कृती अधिक प्राचीन होत्या असे पाश्चात्त्य विचारवंत म्हणतात. मग वेद प्राचीन

आहेत हे त्यांनी का मानू नये ? याबद्दल लो. टिळकांनी आश्चर्य व्यक्त केले होते. कृत्तिका नक्षत्राचा विचार करताना कालमानाचे कोष्टक बदलते. फाल्गुनी पौर्णिमा या वर्षारंभाचा विचार करताना आणखी दोन हजार वर्षे मागे जावे लागते. लो. टिळकांनी वैदिक वचनांचा शास्त्रोक्त पुरावा देऊन हे मत मांडले. फाल्गुनी पौर्णिमेचा वर्षारंभ हे पितृपक्षाचे कोडे सोडविण्यास उपयोगी पडते. पारशी समाजातही पितृपक्ष याचवेळी पाळतात. पारशी आणि वैदिक एकत्र राहत होते हे यावरून सिद्ध होते. ओरायन हा पाश्चात्त्य नावाचा नक्षत्रपुंज आहे. मृगशीर्ष आणि ओरायन हे एकच आहेत. ही नावे शिरच्छेद सुचवितात. ग्रीक पुराणात ओरायनविषयी तुटलेल्या डोक्याची कथा आहे. वैदिक ग्रंथांमध्ये रुद्राने प्रजापतीचे डोके उडवल्याची कथा आहे. इंद्राचा शत्रू मृगाचे रूप घेऊन आला म्हणून इंद्राने त्याचे डोके तोडले. सूर्य विषुववृत्ताखाली दक्षिण गोलार्धात आणि नंतर सहा महिन्यांनी उत्तर गोलार्धात प्रवेश करतो. ही स्वर्गाची दारे आहेत. ती राखण्यासाठी कुत्री आली. पारशांनी देवलोक, पितृलोक जोडण्यासाठी पुलाची कल्पना केली आहे. त्यांनीही कुत्री ठेवली आहेत. ऋग्वेदात यमाची कुत्री आहेत. ग्रीक पुराणात नरकाच्या दाराशी तीन डोळ्यांचे कुत्रे दिसते. 'ओरायन' हा शब्द ग्रीक समजला तरी 'आग्रायण' या शब्दापासनू 'ओरायन' हा शब्द आला असला पाहिजे असे टिळकांनी म्हटले आहे. यावरून त्यांचा भाषाभ्यास सिद्ध होतो. उपसंहारात लो. टिळकांनी वैदिक संस्कृतीचे चार खंड सुचविले आहेत. पहिला आग्रयण पूर्व ६००० ते ४००० दुसरा ४००० ते २५००. याच काळात ग्रीक, पारशी आणि वैदिक यांची एकत्र वस्ती होती. त्यानंतर हे वेगळे झाले.

वेद चार हजार वर्षाइतके जुने आहेत याची लो. टिळकांना खात्री पटली. त्यांनी आपले पुरावे मांडताना ते तर्कशुद्ध होतील याची काळजी घेतली. त्यांनी केवळ वेदांचाच अभ्यास केला नाही. अनेक देशांचे प्राचीन वाङ्मय, प्राचीन दंतकथा, निरनिराळ्या भाषेतील शब्द, त्यांचा उच्चार यांचा त्यांनी सखोल अभ्यास केला. आपल्या गणिताचे निष्कर्ष सिद्ध करण्याकरता त्यांनी सर्वांची ज्योतिषशास्त्रांची पुस्तके वाचली. 'ओरायन' हे पुस्तक केवळ अडीचशे पानाचे आहे पण हे संशोधन शास्त्रशुद्ध करण्यासाठी त्यांनी किमान पंचवीस हजार पृष्ठे वाचली. 'ओरायन' प्रसिद्ध झाल्यानंतर पाश्चात्त्य विद्वानांनी त्यांच्या निर्णयाला पाठिंबा दिला.

'आर्क्टिक होम इन वेदाज' 'वेदांत सापडणारे आर्क्टिक प्रदेशातील गृहस्थान' या ग्रंथाची तयारीही लोकमान्य 'ओरायन' बरोबरच करीत होते. 'ओरायन' या प्रबंधात त्यांनी वेदांचा काळ साडेचार हजार वर्षापूर्वी होता हे गणिताच्या साहाय्याने सिद्ध केले. त्या काळात मूळ आर्य कुठे राहत होते याचेही त्यांनी संशोधन केले. वेदांतील सूक्तांमधून सूर्य, उषा आणि रात्र याविषयी विचित्र वाटणारी विधाने दिसतात. त्या विधानांचा त्यांनी चिकित्सक पद्धतीने शोध घेतला. यासाठी त्यांनी पृथ्वीच्या घडामोडीच्या ज्ञानाचा अभ्यास केला. त्याला भूस्तर शास्त्र म्हणतात. हा अभ्यास करताना पृथ्वीच्या स्थित्यंतरांची लाखो वर्षांची माहिती मिळते. जगातील हवामान केव्हा, कुठे, कसे होते याचाही शोध घेता येतो. त्यांनी ओरायनमधील आपला सिद्धांत ठामपणे मांडला. त्याकाळी आर्य उत्तर ध्रुवाखालच्या प्रदेशात राहत असले पाहिजेत असे त्यांना अभ्यासानंतर कळून चुकले. त्यांनी वेद, ब्राह्मण, आरण्यके आणि उपनिषदे यांच्यावर चिंतन, मनन केले. या चिंतनामधून आर्य त्याकाळी कुठे राहत होते हे त्यांना दीर्घ संशोधनानंतर उमगले. आपला सिद्धांत अधिक ठाम करण्यासाठी टिळकांनी भूस्तर, उत्खनन, ज्योतिष, भाषा अनेक देशांच्या प्राचीन कथा यांचाही सूक्ष्म पद्धतीने अभ्यास केला, मगच त्यांची आर्य त्याकाळी उत्तर ध्रुवाच्या प्रदेशात राहत असल्याची खात्री पटली. साडेचार हजार वर्षापूर्वी उत्तर ध्रुवाच्या खालचा प्रदेश मनुष्यवस्तीला अनुकूल होता. त्याकाळात सूर्य सकाळी उगवून रात्री मावळत नसे. सूर्य उगवल्यानंतर त्याचा प्रकाश तीन महिने टिकत असे. रात्रही तीन महिन्याची होती. प्रत्यक्ष सूर्य दिसेपर्यंत उषःकाल चालू राही. त्यानंतर सूर्यदर्शन होत असे. मनुष्याला सहन होणार नाही असे थंडीचे युग संपले. दुसरे युग सुरू झाले. याकाळात आर्यांची तिथे वस्ती होती. याच काळात वेद वाङ्मयाची निर्मिती झाली. वेद वाङ्मयामध्ये दीर्घ रात्र, दीर्घ दिवस आणि दीर्घ उषःकाल असे उल्लेख येतात. भूस्तरशास्त्राच्या आधारे टिळकांनी आर्क्टिक प्रदेशाचे वातावरण याचे विवेचन केले आहे. ऋग्वेदामध्ये डोक्यावरील खगोलाचे चाकासारखे फिरणे याचा उल्लेख आहे. सहा महिने दिवस, सहा महिने रात्र आणि मेरूपर्वत यांचे उल्लेख आहेत. महाभारतातही मेरूपर्वताचे वर्णन आहे. पुराणात एक वर्ष म्हणजे देवाचा एक दिवस असा उल्लेख आहे. पारशी धर्मग्रंथांनीही पितृयान हे अशुभ व देवयान

शुभ ही आर्यांची समजून स्वीकारली. पितृयानात गडद काळोख असतो. म्हणून या काळात मरू नये. उत्तरायणात मरावे. दक्षिणायनात उत्तर ध्रुवाच्या प्रदेशात कडक हिवाळा असतो. त्यामुळे पार्थिक देहावर अग्निसंस्कार करणे कठीण जाते. म्हणून उत्तरायणात मरावे असा निर्णय दिला आहे. ग्रीस, नॉर्वे या देशांच्या प्राचीन कथांमधूनही हा विषय येतो. त्यावरून आज विविध भागात विखुरलेले समाज एकत्र राहत असावेत या विधानाला पुरेसा आधार मिळतो. ऋग्वेदामधील उषासूक्ते फार सुंदर आणि अर्थपूर्ण आहेत. या सूक्तांमधून उषेचा उल्लेख अनेक वचनात येतो याचा सूक्ष्म अभ्यास लोकमान्यांनी केला. त्याचा अर्थ सूर्योदयापूर्वी उषःकाल एक महिनाभर राहतो असा होतो. सूर्योदयापूर्वी पुष्कळ दिवस गेले अशा अर्थाच्या मंत्रांचा त्यांनी सूक्ष्म अभ्यास केला. टिळकांनी अनेक मंत्रांचा तर्कशुद्धरीतीने अभ्यास केला. टिळकांनी रामायणाची बिजे असलेल्या प्राचीन कथांचा अभ्यास केला. रामाचा शत्रू दहा तोंडाचा. दहा रथांचा दशरथ. कुंभकर्णाची झोप सहा महिन्यांची. काही लोकांत हिवाळ्यात देव कैदेत असत. त्यांची सुटका उन्हाळ्यात होत असे, असे एका पाश्चात्त्य पंडिताने सांगितले. रावणांनेही देवांना कैदेत ठेवले आणि रामाने त्यांना सोडवले. याचा अर्थ अंधार संपताच प्रकाश पडला असा होतो 'आर्क्टिक होम इन दि वेदाज' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. या ग्रंथांची वृत्तपत्रांनी, विद्वानांनी दखल घेतली. अमेरिकन विद्वान पंडितांनी लोकमान्य टिळकांच्या सखोल, तर्कशुद्ध व्यासंगाची मुक्तकंठाने प्रशंसा केली. एक आवृत्ती संपल्यानंतर टिळकांना या ग्रंथाची दुसरी आवृत्ती प्रकाशित करायची होती. त्या दृष्टीने भूस्तर शास्त्रज्ञांनी जर्मनीमध्ये या विषयावर नवे संशोधन केले आहे का याची त्यांनी चौकशी केली. पण तुरुंगवास नंतर राजकारण यात टिळकांची शक्ती खर्च पडल्यामुळे त्यांना पुन्हा ग्रंथ लेखनाला सवड मिळाली नाही.

●●●

# १४

# मद्यपान निषेध चळवळ

सुरत काँग्रेसच्या दुर्दैवी प्रकारानंतर लो. टिळक पुण्यात आले. देश जागृतीसाठी त्यांनी आपले अविश्रांत कार्य चालू ठेवले. काँग्रेसमध्ये समेट घडवून आणण्याचे प्रयत्न चालू होते. पण त्याहीपेक्षा त्यांच्यादृष्टीने जनजागृतीचे कार्य अधिक महत्त्वाचे होते. वर्षभर ते महाराष्ट्रात फिरत होते. व्याख्याने देत होते. दुसरीकडे नेमस्त पक्षाच्या नेत्यांनीही एक सभा आयोजित करून ब्रिटिश साम्राज्याच्या आधिपत्याखाली असलेल्या कॅनडा आणि ऑस्ट्रेलिया, या देशातील सरकारप्रमाणे भारतातही जनतेचे राज्य व्हावे असे मत मांडले. शिवाय या पक्षाने सनदशीर मार्गाने आपल्या मागण्याच्या पद्धतीवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब केले. लो. टिळक मात्र स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण या विषयांवर भर देऊन लोकजागृती करीत होते. स्वदेशी चळवळीच्या निमित्ताने त्यांनी पैसा फंडाचा पुरस्कार केला. लहानसहान स्वदेशी उद्योग सुरू करावे ही कल्पना अंताजी दामोदर काळे या स्वार्थत्यागी देशभक्ताची होती. पण लो. टिळकांनी ती कल्पना स्वीकारली आणि त्यासाठी त्यांनी खूप मेहनत घेतली. विजापूरकरांच्या समर्थ विद्यालयाकरिता, निधी गोळा करण्यासाठी लोकमान्य प्रयत्नशील होते. त्याचप्रमाणे त्यांनी पैसा फंडासाठी व्याख्याने दिली. तळेगाव येथे उभारलेला काच कारखाना या पैसा फंडाच्या निधीमधून चालू झाला. याच काळात मजूर पक्षाचे जहाल विचारसरणीचे ब्रिटिश नेते जेम्स केरहार्डी यांनी पुण्यास भेट दिली. पुण्यातील संस्था त्यांनी पाहिल्या. जेम्स केरहार्डी आणि लो. टिळक यांची सिंहगडावर भेट झाली. त्यांच्याबरोबर 'मँचेस्टर गार्डियनचे पत्रकार नेव्हिन्सन होते. या पत्रकाराने दी न्यू स्पिरीट इन् इंडिया 'भारतातील नवचैतन्य' अशा शीर्षकाचा इंग्रजी ग्रंथ लिहिला.

लो. टिळकांनी आपली मते स्पष्ट शब्दात या इंग्रज मुत्सद्द्यांपुढे मांडली. शस्त्रे, संघटना अशा बळांचा वापर करून ब्रिटिशांना आव्हान देण्याचे आपले धोरण नाही. राज्यकारभारात जनतेचा मोठ्या प्रमाणात सहभाग असावा हे आपले उद्दिष्ट आहे. नोकरशाही अतिशय जुलमी आहे. या जुलमी नोकरशाहीवर दडपण आणण्यासाठी आमचा पक्ष सदैव प्रयत्नशील राहील. सनदशीर मार्गाने काहीच साध्य होत नाही. अखेर स्वदेशी, बहिष्कार या मार्गाचा अवलंब करण्यावाचून गत्यंतर उरले नाही हे धोरण लोकमान्यांनी स्पष्ट केले.

लो. टिळक आणि श्री. अरविंद घोष यांची या विषयावर पुणे येथे चर्चा झाली. श्री. अरविंद घोष यांनी क्रांतिकारक राष्ट्रवादाचा पुरस्कार केला होता." मातृभूमी परकीय राजकर्त्यांच्या क्रूर, जुलमी राजवटीखाली पिचत आहे. आपली या जुलमी राजवटीपासून त्वरित मुक्तता व्हावी अशी मातृभूमीची इच्छा आहे." लो. टिळक मुत्सद्दी होते. ते या राष्ट्रीय समस्येचा व्यावहारिक दृष्टिकोणातून विचार करीत होते. काँग्रेस दुभंगल्याचा फायदा इंग्रज सरकार घेईल आणि बहिष्काराची चळवळ दडपून टाकण्यासाठी आपल्या पाशवी शक्तीचा वापर करेल अशी भीती लाला लजपतराय यांनी व्यक्त केली होती. सशस्त्र उठाव करण्यासाठी राष्ट्रातील सर्व शक्ती एकत्र आल्या तरच तो प्रयत्न यशस्वी होईल असे लो. टिळकांचे मत होते. अशा सशस्त्र क्रांतीसाठी योग्य वेळ अद्याप आलेली नाही. अधूनमधून गोऱ्या अधिकाऱ्यांचे खून केल्यामुळे परकीय राज्यकर्ते अधिकच आक्रमक धोरण स्वीकारतील. लो. टिळकांनी आपल्या अनेक लेखांमधून हे विचार व्यक्त केले. आयर्लंडसारख्या देशात ब्रिटिश सत्तेविरुद्ध प्रखर आंदोलन छेडले जात आहे. तेथे या आंदोलनात सर्व पक्षांचे नेते एकत्र येऊन एकजुटीने हा लढा लढवित आहेत हे टिळकांनी आपल्या लेखांमधून पटवून दिले. लो. टिळकांनी पक्षाच्या कार्यपद्धतीमध्ये लोकशाहीला महत्त्व द्यावे. सर्वांनी एकाच व्यासपीठावरून समंजसपणाने, ऐक्याची भावना दृढ करून परकीय सत्तेशी लढा द्यावा असे परोपरीने सर्वांना पटवून दिले.

ब्रिटिश राज्यकर्त्यांविरुद्ध असंतोषाची लाट उसळावी असे गंभीर प्रसंग उद्‌भवले. लाला लजपतराय हे पंजाबमधील अत्यंत लोकप्रिय नेते. पंजाबमध्ये इंग्रजांनी

शेतकीसंबंधी कायदा करण्याचा घाट घातला होता. त्यामुळे जनता संतप्त झाली होती. या कायद्याविरोधी लालाजींनी भाषणे केली. अजितसिंग हे त्यांचे तरुण सहकारी. इंग्रजांनी या दोघांवर हद्दपारीचा हुकूम जारी केला. लालाजींची रवानगी ब्रह्मदेशात मंडाले येथे केली. त्यात सभाबंदीचा कायदा आला. यामुळे एक लष्करी अधिकाऱ्याची गाडी उलथून टाकण्याचा प्रयत्न झाला. गोऱ्या मॅजिस्ट्रेटचा खून करण्याचा प्रयत्न झाला. 'वंदे मातरम्' या बंगाली लोकप्रिय वृत्तपत्राचे संपादक श्री. अरविंद घोष. सरकारने अरविंद घोष यांच्यावर खटला भरला. या खटल्यात बाबू बिपिनचंद्र पाल यांनी साक्ष देण्यास नकार दिला म्हणून बाबूजींना सहा महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा देण्यात आली. अन्याय कोठेही झाला तरी लोकमान्य त्याची गंभीरपणे दखल घेत आणि केसरीमधून अत्यंत कडक शब्दात राज्यकर्त्यांच्या मनमानी धोरणाचा निषेध करीत.

लो. टिळक समर्थ विद्यालयाच्या आर्थिक अडचणींचा विचार करुन निधी गोळा करण्यासाठी दौऱ्यावर होते. त्यांनी स्वावलंबन, दारूबंदी, स्वदेशी या विषयावर भर दिला. त्यांना बिपिनचंद्र पाल तुरुंगातून सुटल्याचे समजले. टिळकांनी आनंद व्यक्त करताना "आपण अशा देशभक्तांना तुरुंगवास घडू नये म्हणून काहीच करु शकत नाही" याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला. त्यांनी न्याय आणि कायदेशीरपणा यामधील फरक स्पष्ट केला. कायदा जेव्हा जुलूम करतो तेव्हा असा कायदा मोडणे हे नागरिकाचे कर्तव्य ठरते.

लो. टिळकांनी राष्ट्रीय चळवळीमध्ये नैतिक दृष्टिकोणातून मद्यपान बंदीला खूप महत्त्व दिले. अशिक्षित, आर्थिकदृष्ट्या दुर्बल अशा समाजाची विशेषत: त्यांच्या कुटुंबाची यामुळे खूप हानी होते. कौटुंबिक जीवनच उद्ध्वस्त झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. हिंदू आणि मुस्लीम धर्मात मद्यपानाचा निषेध करण्यात आला आहे. ब्रिटिश राज्यकर्ते, गोरे अधिकारी मद्यपान करतात. त्यांचे अनुकरण करण्याची प्रवृत्ती समाजात बळावत होती. या अनिष्ट प्रथेविरुद्ध जनमत तयार करण्यासाठी समाजाचे प्रबोधन करण्याची नितांत गरज होती. लोकहितवादी यांनी १८४९ च्या सुमारास आपल्या लेखांमधून मद्यपानाच्या व्यसनाचा निषेध केला होता. लो. टिळकांनी अशा सामाजिक हिताच्या उपक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी तरुण, ध्येयवादी वृत्तीच्या

कार्यकर्त्यांची दमदार फळी निर्माण केली होती. मद्यपान बंदीच्या चळवळीने वेग घेतला आणि समाजातील सर्व जातीजमातीच्या नेत्यांनी या मोहिमेला उत्स्फूर्त पाठिंबा व्यक्त केला. मद्यपान बंदीमुळे सरकारचे उत्पन्न बुडते म्हणून अबकारी खात्याच्या अधिकाऱ्यांनी या मोहिमेस आक्षेप घेतला. उत्साही कार्यकर्त्यांनी खेडोपाडी जाऊन मद्यपानामुळे होणाऱ्या अनिष्ट परिणामाविषयी व्याख्याने दिली. सुदैवाने या मोहिमेमध्ये लो. टिळकांबरोबर ना. गोखले, श्री. न. चिं. केळकर सहभागी झाले. अनेक अधिकाऱ्यांनी या मोहिमेस पाठिंबा दिला. त्यामध्ये गोऱ्या अधिकाऱ्यांचाही समावेश होता. मद्यपान बंदीच्या चळवळीचे स्वरुप, जाहीर सभांमधून मद्यपान निषेध करणे आणि मद्यपानाच्या दुष्परिणामासंबंधी माहिती देणे असे होते. त्यानंतर ध्येयवादी वृत्तीच्या तरुणांनी या चळवळीला आक्रमक रुप दिले. मद्यपान विक्री करणाऱ्या दुकानांसमोर या उत्साही तरुणांनी निदर्शने केली. मद्यपान करण्यासाठी दुकानात प्रवेश करणाऱ्या लोकांना त्यांनी मद्यपान करु नये म्हणून आवाहन केले. लो. टिळकांनी या उत्स्फूर्त चळवळीचे स्वागत करुन अशी अनिष्ट प्रथा, हे भयंकर व्यसन नष्ट करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न व्हायला हवेत असे तरुणांना सांगितले. त्याचा योग्य परिणाम झाला. मद्यपान विक्री करणाऱ्या दुकानासमोर बापट, केतकर या तरुणांनी दुकानासमोर निदर्शने केली. या निदर्शनामुळे आपला धंदा बुडतो असे वाटल्यावरुन दुकान मालकाने ह्या तरुणांना मारहाण केली. तरुणांच्या आवाहनाचे स्वरुप वेगवेगळे होते. कधी ते नम्रपणे मद्यपान करणाऱ्यांना आवाहन करीत, कधी यामुळे त्यांचे कौटुंबिक जीवन उद्ध्वस्त होईल असे कळकळीने सांगत. पण जे या व्यसनाच्या पुरे अधीन झाले होते त्यांच्यावर या आवाहानाचा परिणाम होत नसे. अशी मंडळी या तरुणांना बाजूला सारुन त्यांना शिवीगाळ करुन दुकानात प्रवेश करीत. पण या मद्यपींचे शिव्याशाप, गैरवर्तन शांतपणे सहन करीत या तरुणांनी आपले कार्य चालूच ठेवले. लो. टिळकांनी स्वत: शहरात फिरुन या तरुणांच्या कार्याची, त्यांनी प्रकट केलेल्या सहनशीलतेची पाहणी केली. मद्यपान बंदीमुळे "आपला धंदा बंद होण्याची पाळी आली. मी माझा उदरनिर्वाह कसा करु ? असा प्रश्न एका दुकानदाराने लोकमान्यांना केला. 'असा घृणास्पद व्यवसाय करु नको. मी तुला चांगला व्यवसाय

मिळवून देईन' असे लोकमान्यांनी आश्वासन दिले. पण गोरगरीब महिलांनी लो. टिळकांची भेट घेतली. "या व्यसनामुळे आमचे घरदार रस्त्यावर आले होते. तुमच्यामुळे आम्हाला चांगले दिवस पाहायला मिळाले" असे सांगून" महिलांनी लो. टिळकांपुढे साष्टांग नमस्कार घातला. सामान्य माणसे लो. टिळकांचा उल्लेख संभाषणामधून 'महाराज' असा करीत असत.

मद्यपानाविरुद्ध मंदिरे, मशिदी येथे प्रवचनामधून प्रचार करण्यात आला. त्यामुळे अबकारी अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले. कंत्राटदारांनी कलेक्टरकडे तक्रार केली. कलेक्टरने प्रत्येक दुकानासमोर पोलीस बंदोबस्त ठेवला. निदर्शने करणाऱ्या कार्यकर्त्यांना पकडून त्यांच्यावर खटले भरण्यात आले. कलेक्टर आणि अन्य अधिकाऱ्यांनी आपला अधिकार गाजविण्यासाठी कठोर उपाय योजले. त्यात त्यांना आसुरी आनंद मिळत होता. लो. टिळकांनी केसरीतील आपल्या लेखांमधून प्रबोधन केले. पाश्चात्त्य देशांत तेथील थंड हवामानाचा विचार करताना मद्यपान करणे आरोग्याच्या दृष्टीने योग्य असेलही पण गोरे राज्यकर्ते असल्यामुळे त्यांचे अंधानुकरण करण्याची प्रवृत्ती देशात वाढत आहे. ही प्रवृत्ती समाज विघातक आहे. या व्यसनाला राज्यकर्त्यांनी संरक्षण देणे अन्यायकारक आहे. मद्यपान करणाऱ्यांची संख्या कमी आहे तेव्हा बहुसंख्य नागरिकांनी या घातक व्यसनाविरुद्ध आवाज उठवला पाहिले." काही ब्राह्मणविरोधी उपद्व्यापी लोकांनी हे पुण्यातील ब्राह्मणांच्या डोक्यातून निर्माण झालेले खेळ आहेत असा अपप्रचारही केला. पण ब्राह्मणांनी तसेच निर्व्यसनी ब्राह्मणेतर नेत्यांनी या अपप्रचाराला चोख उत्तर दिले.

●●●

# १५

# राजद्रोहाचा दुसरा खटला

कॉंग्रेसमधील फूट पडल्याचे प्रकरण इंग्रज राज्यकर्त्यांना फायद्याचे ठरले. राज्यकर्त्यांच्या बेबंदशाहीला आता मर्यादा राहिल्या नव्हत्या. मुझफ्फुरपूर येथे खुदीराम आणि प्रफुल्लचंद्र यांनी किंग्जफोर्ड या बॅरिस्टरची बगी बॉम्बने उडवून दिली. बगीत बॅ. केनेडी यांची पत्नी, त्यांची मुलगी आणि गाडी चालक असे तिघे होते. तिघेही ठार झाले. पोलिसांसमोरच प्रफुल्लने आत्महत्त्या केली पण खुदीरामला पकडण्यात आले. बंगालमध्येही बॉम्ब उडविण्यात येत होते. खुदीरामला फाशी देण्यात आले. खुदीरामने गीता हृदयाशी जवळ बाळगली होती आणि 'वंदेमातरम्' चा मंत्रघोष करीत त्याने प्राण सोडला. राष्ट्रीय नेते आणि संपादक या नात्याने लो. टिळकांनी या गंभीर आणि दुर्दैवी प्रसंगाची केसरीमध्ये लेख लिहून दखल घेतली. त्यांनी 'देशाचे दुर्दैव' या शीर्षकाचा लेख लिहिला. गरीब आणि शांतताप्रिय देशात दोन निरपराध गोऱ्या स्त्रिया बॉम्ब हल्ल्यात मरण पावल्या. बंडखोर पक्षाच्या कार्यकर्त्यांबद्दल लोकांना तिटकारा वाटेल, असे प्रकार रशियातही घडत आहेत. गोरे अधिकारी हट्टी आणि दुराग्रही आहेत त्यामुळे तरुण पिढी बंडखोर मार्गाचा अवलंब करण्यास प्रवृत्त होत आहे. ब्रिटिशधार्जिण्या इंग्रजी वृत्तपत्रांनी अशा कृत्यामुळे इंग्रजी राज्य संपेल काय ? असा प्रश्न विचारून या बंडखोर तरुणांचा उपहास केला आहे. जुलमी रशियात जे घडत आहे तेच आता या देशात घडत आहे. राज्यकर्त्यांचा स्वार्थ उदात्त असेलही. पण त्यामुळे हिंदुस्थानचे नुकसान होत आहे. जनतेला स्वराज्याचे हक्क हवे आहेत. राज्यकर्त्यांनी जनतेच्या इच्छेची कदर केली नाही तर जनता घोर कृत्ये केल्याशिवाय राहणार नाही. तीस कोटी जनतेत एकाही व्यक्तीने संतापाने, त्वेषाने

काहीही करु नये असे म्हणणे चुकीचे आहे. देशात अशी कृत्ये होऊ नये असे राज्यकर्त्यांना वाटत असेल तर त्यांनी दूरदर्शीपणाने, विचारपूर्वक निर्णय घ्यावे. लोकांवर जुलूम करुन असा अत्याचार बंद होणार नाही. याला इतिहासातील घटना साक्ष देतात. मुझफ्फूरपूर येथे घडलेला प्रकार खेदजनक आहे, योग्य नाही असे आमचे मत आहे. पण विषवृक्ष वाढणार नाही याची खबरदारी राज्यकर्त्यांनी घेतली पाहिजे. खून होऊ नयेत म्हणून प्रजेने राज्यकर्त्यांना सहकार्य करावे हा प्रजेचा धर्म आहे. पण राज्यकर्त्यांनी लोकमताचा आदर करणे हे त्यांचे कर्तव्य आहे. 'देशाचे दुर्दैव' या त्यांच्या गाजलेल्या लेखातील हा महत्त्वाचा भाग आहे. त्यांनी हा अग्रलेख १२ मे, १९०८ रोजी लिहिला. त्यानंतर त्यांनी 'बॉम्बगोळ्याचा खरा अर्थ, 'दुहेरी इशारा,' 'बॉम्बगोळ्याचे रहस्य' असे लेख लिहिले. 'हे उपाय टिकत नाहीत' असा एक अग्रलेख त्यांनी लिहिला. 'देशाचे दुर्दैव' हा अग्रलेख लिहिताना लोकमान्यांनी त्याच अंकात 'बॉम्बगोळ्याचा अनर्थ' या शीर्षकाखाली दोन टिपण्या लिहिल्या. एका टिपणीत त्यांनी आयर्लंडमध्ये इंग्रजांनी दडपशाहीचे धोरण स्वीकारल्यामुळे त्याचे किती घोर परिणाम झाले याची इंग्रज राज्यकर्त्यांना माहिती आहे. आयर्लंडमध्ये जनतेने केलेल्या उग्र चळवळीमुळे अखेर दहशतीचे कायदे पार्लमेंटला रद्द करावे लागले.

'देशाचे दुर्दैव' या अग्रलेखामुळे राज्यकर्त्यांचे पित्त खवळले, त्याचबरोबर 'हे उपाय टिकाऊ नाहीत' या अग्रलेखामुळे राज्यकर्ते संतप्त झाले. 'दडपशाहीचे भूत सरकारच्या अंगात मधूनमधून संचार करते. प्रागतिक पक्षाच्या कारकिर्दीमध्येच सभाबंदी, वृत्तपत्रसंबंधीचा कायदा असे कायदे पास व्हावे आणि दडपशाहीच्या पिशाच्चांचा सुळसुळाट व्हावा याचे आश्चर्य वाटते. आता खुद्द मांत्रिकच व्रतभ्रष्ट झाले आहेत. राष्ट्राचा विकास साधणाऱ्या, राष्ट्राच्या उत्कर्षासाठी तेज निर्माण करणाऱ्या प्रवृत्तीविरुद्धच दडपशाही करणे याला पिछेहाटीचे धोरण म्हणतात. भाषणस्वातंत्र्य आणि मुद्रणस्वातंत्र्य यामुळे राष्ट्राचा विकास होतो. अधिकारी वर्गाला बॉम्बगोळे बंद करायचे आहेत. ही त्यांची इच्छा स्तुत्य आहे. पण अधिकाऱ्यांचा बुद्धिभ्रंश झाला आहे. मतिभ्रंश झाला की विनाश होतो. बॉम्बगोळ्यामागे देशभक्तीची भावना आहे. बंगाली नेते अतिरेकी नाहीत. पॅरिस येथे प्रेसिडेंटचा खून होतो. पोर्तुगालच्या पार्लमेंटमध्ये

बॉम्बगोळा टाकण्यात येतो. अमेरिकेत कोट्यधीशाचा खून होतो. पैशासाठी खून करणे आणि देशभक्तीने प्रेरित होऊन खून करणे यात फरक आहे. युरोपातील जुलमी राजांनीही प्रजेला नि:शस्त्र केले नाही. मुस्लीम राज्यकर्ते जुलमी होते. पण त्यांनीही प्रजेला नि:शस्त्र केले नाही. प्रजा लष्करी सामर्थ्याशी कधीही बरोबरी करु शकत नाही. पण हिंदुस्थानात पौरुषाचा वध हत्याराच्या कायद्याने करण्यात आला. मोगलांचा उदारपणा इंग्रजात नाही. इंग्रजांचे लष्करी सामर्थ्यही तुलनेने नि:सत्त्व आहे. औरंगजेबाच्या सेनेवर जसे प्रसंग ओढवले तशा प्रसंगांना तोंड देण्याची पाळी इंग्रजांवर आली तर इंग्रजांची सत्ता हिंदुस्थानात फार काळ टिकणार नाही. राज्यकर्ते जुलमी आहेत हे त्यांना कोणत्या भाषेत समजावून सांगायचे ? अर्ज, विनंत्या त्यांच्या दृष्टीने वरवरचा फेस आहे. फेस फार काळ टिकत नाही. आता संतापाचा अतिरेक झाल्यामुळे कार्यकर्ते सशस्त्र झाले. त्यांनी बॉम्बगोळ्याचा वापर केला. आततायी माथेफिरूंना बॉम्बगोळे तयार करण्यासाठी फार सामग्री लागत नाही. पदरी घोर निराशा पडल्यानंतर तरुण देशभक्त माथेफिरू बनतात. बुद्धिमान तरुणांच्या वाट्याला निराशा येणार नाही याची दक्षता सरकारने घ्यावी. पुन्हा बॉम्बगोळ्यांचे स्फोट नको असतील तर सरकारने स्वराज्याच्या महत्त्वाचे हक्क जनतेच्या स्वाधीन करण्यास सुरुवात करावी. दडपशाहीचे मार्ग टिकाऊ नाहीत.'

सरकारला 'देशाचे दुर्दैव' हा लेख आक्षेपार्ह वाटला. लो. टिळकांवर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्यांना अटक करण्यासाठी सरकारने खंबीरपणे पावले उचलली. 'काळकर्ते' श्री. शिवराम महादेव परांजपे यांच्यावरही राजद्रोहाचा खटला भरण्यात आला. २४ जून रोजी लो. टिळकांना पोलिसांनी मुंबई येथील सरदारगृहात अटक केली. कोर्टकचेऱ्या बंद झाल्यावर वारंटीची अंमलबजावणी पोलिसांनी केली. आठ दिवस लो. टिळकांचा मुंबईतच मुक्काम होता. श्री. शि. म. परांजपे यांना मदत करण्यासाठी ते मुंबईत आले होते. 'ते उपाय टिकाऊ नाहीत' या अग्रलेखासाठी सरकारने पुन्हा दुसरे वॉरंट काढले. लो. टिळकांना जामीन नाकारण्यात आला. त्यावेळचे उच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्या. दावर हे पूर्वी बॅरिस्टर होते. पूर्वी त्यांनी लो. टिळकांना जामीन मिळवून दिला होता. आता न्या. दावर यांनी लो. टिळकांचा जामीनाचा अर्ज

मंजूर केला नाही. तो अर्ज न्या. दावर यांनी फेटाळून लावला आणि जामीनासाठी लो. टिळकांनी पुन्हा श्रम घेऊ नयेत असे उद्‌गारही त्यांनी काढले.

इकडे पुण्यात लो. टिळकांच्या गायकवाड वाड्यातील राहत्या घराची, त्यांच्या केसरी-मराठी कार्यालयाची झडती घेतली गेली. तेथे पोलिसांना आक्षेपार्ह असे काहीही मिळाले नाही. लो. टिळकांनी स्वत:च्या अक्षरात स्फोटक द्रव्याविषयाच्या दोन पुस्तकांची नावे टिपून ठेवली होती. हा महत्त्वाचा पुरावा आहे अशी पोलीस अधिकाऱ्याची समजूत झाली. पोलिसांनी टिळकांच्या सिंहगड येथील घराची तपासणी केली. त्यांना तिथेही आक्षेपार्ह असे काही मिळाले नाही. प्रथम लो. टिळकांना डोंगरीच्या तरुंगात ठेवण्यात आले. नंतर पोलिसांनी न्यायालयाच्या इमारतीतच त्यांची राहण्याची सोय केली. जनतेने त्यांच्या दर्शनासाठी गर्दी करू नये म्हणून पोलिसांनी ही खबरदारी घेतली होती. रस्त्यावरुन पोलिसांच्या गाडीतून लो. टिळकांना दररोज नेणे आणि आणणे पोलिसांना धोक्याचे वाटले. कारण त्यामुळे जनतेमध्ये प्रक्षोभ निर्माण होण्याची शक्यता होती. तरीही लो. टिळकांना अटक झाल्याची आणि त्यांच्यावर राजद्रोहाचा गंभीर आरोप ठेवल्याची बातमी देशात वणव्यासारखी पसरली.

१९०८ सालीच सरकारने वृत्तपत्रांवर कडक निर्बंध घालण्यासाठी सातवा कायदा केला होता. बातमी देणारा, बातमीवर लिहिणारा आणि बातम्या छापणारा या सर्वांना हा कायदा लागू होता. या कायद्यामध्ये वृत्तपत्रे, छापखाना इत्यादींच्या जप्तीची तरतूद करण्यात आली होती. वृत्तपत्रांची विक्री करणे, ती वाटणे ती लोकांना दाखवणे हाही गुन्हा होता. संशयावरून झडती घेण्याचे अधिकार पोलीस अधिकाऱ्यांना दिले होते. हा कायदा आपल्याला त्रास देण्यासाठीच आहे हे लो. टिळकांना समजले होते. पण स्वराज्यासाठी तळहातावर शिर घेऊन आपली तेजस्वी लेखणी तलवारीप्रमाणे परतणाऱ्या निधड्या छातीच्या योध्द्यास याचे मुळीच भय वाटले नाही. या कायद्याला गुन्हेगारी कायद्याचे (क्रिमिनल प्रोसिजर कोड) चे स्वरूप दिले होते. त्यामुळे सक्तमजुरीची शिक्षा आणि दंड या दोन्ही शिक्षा देण्याचे अधिकार न्यायालयाला होते. लो. टिळकांना अटक केल्यानंतर मुंबईमध्ये विशेष बंदोबस्त ठेवण्यात आला होता. खटला सुरु होण्याच्या दिवशी न्यायालयाभोवती गर्दी झाली. वकील, वृत्तपत्रांचे

प्रतिनिधी आणि बाकांवर बसू शकतील असे लोक एवढ्यांनाच न्यायालयात प्रवेश देण्यात आला. युरोपियन पोलीस सर्वांवर लक्ष ठेवून होते. सोमवार, १३ जुलै, १९०८ ते बुधवार, २२ जुलै, १९०८ पर्यंत दहा दिवस न्यायालयाचे कामकाज चालू होते.

लो. टिळकांविरुद्ध चाललेल्या राजद्रोहाच्या खटल्याला ऐतिहासिक महत्त्व आहे. खटल्यापूर्वी टिळकांनी खास ज्यूरींना हरकत घेतली. ज्यूरींमध्ये सात युरोपियन होते आणि दोन पारशी होते. युरोपियन ज्यूरी इंग्रज राज्यकर्त्यांच्या बाजूचे. ज्युरीपैकी कुणालाही मराठी भाषा समजत नव्हती. त्यामुळे न्याय मिळण्याची शक्यता नव्हती. टिळकांनी त्याला हरकत घेतली. पण न्यायाधीशांनी सर्व ज्यूरीतील सदस्य नामवंत व्यक्ती असून त्यांना शिक्षण, व्यवहारज्ञान उत्तम आहे, या व्यक्ती वरच्या दर्जाच्या आहेत असे सांगून टिळकांची हरकत फेटाळून लावली. लो. टिळकांना मदत करण्यासाठी खापर्डे, दादासाहेब करंदीकर, बॅ. बॅप्टिस्टा, न. चिं. केळकर उपस्थित होते. सरकारच्या बाजूने बॅ. ब्रॅन्सन, इनव्हिरॅरिटी, विनिंग उपस्थित होते. दोन्ही खटल्याची चौकशी एकाचवेळी होईल असे न्या. दावर यांनी स्पष्ट केले. सरकारतर्फे 'देशाचे दुर्दैव' आणि 'हे उपाय टिकाऊ नाहीत' या दोन्ही अग्रलेखांबद्दल देशद्रोहाचा खटला भरला आहे हे सांगण्यात आले. 'तीनही आरोप मला मान्य नाहीत. मी निर्दोष आहे' हे लो. टिळकांनी सांगितले. सरकारतर्फे बॅ. इनव्हिरॅरिटी यांनी खटला दोन अग्रलेखांबद्दल भरला आहे हे न्यायालयाला सांगितले. 'इंग्रजांचे राज्य आहे हेच देशाचे दुर्दैव आहे. त्यामुळे तरुण बॉम्ब फेकण्यास प्रवृत्त झाले. सरकार स्वार्थ पाहते. जनतेने दंगल माजवू नये एवढीच काळजी सरकार घेते. असे लिहिणे म्हणजे सरकारची बदनामी करणे. आरोपीने लोक मनात आणतील तर ते राज्य उलथवू शकतील असे म्हटले आहे. आरोपीने रशियाचा उल्लेख केला आहे. आरोपीला तरुणांनी रशियाचे अनुकरण करावे असे सुचवायचे आहे. देशातील तीस कोटी जनता संतप्त आहे. सरकार फक्त आपल्या गोऱ्या लोकांचे हित पाहते असे त्यांनी म्हटले आहे'. इनव्हिरॅरिटी यांनी केसरींतील उतारे वाचून दाखवले.

त्यानंतर भाषांतरकार श्री. भास्कर विष्णू जोशी याची साक्ष झाली. जोशी हा लोकमान्यांचा विद्यार्थी, शंकरशेट पारितोषिकाचा मानकरी पण त्याने राज्यकर्त्यांचा

नोकर या नात्याने सरकारचीच बाजू घेतली. लो. टिळक यांनी दोन दिवस जोशी याची कसून उलटतपासणी घेतली. टिळकांनी इंग्रजी भाषांतरामधील 'डेस्पॉटिक', 'ब्युरोक्रसी', 'फॅनॅटिक', 'इन्हलजीनियस', 'रिसायटर ऑफ वैदिक मंत्राज्', 'इनेब्रिऐटेड', 'मॅनहूड', अशा अनेक इंग्रजी शब्दाच्या वापरामुळे मराठी अग्रलेखांतील मराठी शब्दांचा चुकीचा अर्थ लावण्यात आला आहे, हे टिळकांनी न्यायाधीश आणि ज्युरींना सांगितले. लो. टिळकांनी भाषांतरकार जोशी याच्याकडून कौशल्याने सर्व काही वदवून घेतले. जोशी याच्या साक्षीला वृत्तपत्रांमधून ठळकपणे प्रसिद्धी मिळेल आणि जनतेला कामकाजाची माहिती मिळेल या हेतूने लो. टिळकांनी दोन दिवस जोशीची कसून तपासणी घेतली. टिळकांनी उलटतपासणीमध्ये जोशीला चांगलेच अडचणीत आणले होते. इन्स्पेक्टरने लो. टिळकांचा लेखी जबाब वाचून दाखवला. लो. टिळकांनी मराठीला कोणते इंग्रजी प्रतिशब्द आहेत त्याची यादी दिली.

लो. टिळकांनी आपल्या एकवीस तास दहा मिनिटे केलेल्या बचावाच्या भाषणामध्ये आपली बाजू अत्यंत प्रभावीपणे, तर्कशुद्ध पद्धतीने न्यायालयासमोर मांडली. त्यांची प्रकृती ठीक नव्हती. तरीही या परिस्थितीत त्यांनी अत्यंत धीरोदात्त वृत्तीने बचावाचे भाषण केले. केवळ या दोन लेखांच्या आधारे माझ्यावर देशद्रोहाचा आरोप ठेवण्यात आला आहे. त्यासाठी कोणतेही पुरावे सादर करण्यात आलेले नाहीत. न्यायालयापुढे आलेले भाषांतरही चुकीचे आणि खोडसाळपणाचे आहे. मी मराठीत लेख लिहिले आणि चुकीच्या भाषांतराच्या आधारावर ज्युरी आपला निर्णय देणार. इंग्लडमध्ये ज्युरी सभोवतालच्या सर्व माहितीचा उपयोग करून घेतात. कृत्यांचे साहजिक परिणाम हे तत्त्व शंभरवर्षापूर्वी इंग्लंडमध्ये १७९२ च्या कायद्यात स्वीकारले होते. पण हे तत्त्व चुकीचे असे आता मान्य झाले आहे. राजद्रोहाची कलमे इंग्लंड आणि हिंदुस्थानात सारखीच आहेत. न्यायाधीशांनी कायदा सांगावा आणि ज्युरींनी पुरावा आहे का ? हे ज्युरींनी पाहिले पाहिजे. माझ्या लेखांमुळे काही विपरीत परिणाम झाला असा आपल्यापुढे पुरावा नाही. 'राजद्रोह करण्याचा प्रयत्न' असा आरोप आहे. न्या. बॅटी यांनी एका खटल्यात 'कृत्य करण्यास प्रवृत्त होणे, प्रयत्न सिद्ध झाला म्हणजे ते काम झाले' असा अर्थ काढला होता. गुन्हा करण्याचा हेतू

सिद्ध झाला पाहिजे. लो. टिळकांनी इंग्लंडमधील क्रिमिनल कायद्याचे कलम आणि स्पष्टीकरण याचा दाखला दिला. लेख प्रसिद्ध झाल्यामुळे गुन्हा करण्याचा हेतू सिद्ध होत नाही हे त्यांनी स्पष्ट केले. मग ज्या अधिकाऱ्यांनी, पत्रकारांनी लेख वाचले आणि त्यांना प्रसिद्धी दिली तेही गुन्हेगार ठरतात ? लेख हा फक्त एक टक्का पुरावा आहे. त्यामागील लेखकाचा हेतू आपण पाहावा. आरोप सिद्ध करण्याची जबाबदारी सरकारची आहे. ती माझी जबाबदारी नाही. टिळकांनी देशद्रोहासंबंधीच्या भाषणासंबंधी 'अर्किन्स स्पीचेस ऑन सिडिशन' या इंग्रजी ग्रंथाचा दाखला दिला. या पुस्तकात 'लॉक'ने राजाची तुलना पोलीस शिपायाशी केली आहे. यात राजाची बदनामी होते. पण इंग्लंडमध्ये हा गुन्हा आहे असे मानले नाही. कायद्याच्या गैरवापर होऊ नये याची खबरदारी ज्यूरींनी घेतली पाहिजे. 'ज्यूरींनी सरकारचा होयबा बनू नये' असेही टिळकांनी आपल्या भाषणात सांगितले. पत्रकारांचे स्वातंत्र्य नष्ट होणार नाही असे सरकारतर्फे सांगण्यात येते. सरकारविरुद्ध लेखन केले तर नापसंती निर्माण होणे स्वाभाविक आहे. नापसंतीची मर्यादा ज्यूरींनी ठरवायची असे अर्किन्स या लेखकाने आपल्या ग्रंथात म्हटले आहे. ज्यूरींनी लेखक, त्याची परिस्थिती याचा विचार करुन निर्णय घ्यायचा असतो. अधिकारी वर्गावर केलेली टीका ही सरकारवरील टीका नाही. अधिकारी बदलतात. सरकार तेच असते. आपल्या मतांचा प्रसार करण्याचे स्वातंत्र्य प्रत्येकाला आहे. म्हणूनच जग प्रगतीपथावर आहे. भाल्यांच्या खटल्यात न्या. बॅटी यांनी हेच म्हटले आहे. असे स्वातंत्र्य नसेल तर सर्व तत्त्वज्ञ तुरुगांत जातील. मोर्ले साहेबांचेही हेच मत आहे. लो. टिळकांनी मी इथे न्याय मागण्यासाठी उभा आहे माझ्यावर दया करा अशी माझी मागणी नाही हे स्पष्ट केले. न्यायाधीशांनी, ज्यूरींनी न्याय सांभाळायचा आहे. सरकारची बाजू घेणे हे त्यांचे काम नाही. लो. टिळकांना अखेरचे उत्तर देण्याचा हक्क नव्हता. बॅ. ब्रॅन्सन अखेरीस काय मुद्दे मांडतील याचा तर्काने अंदाज घेऊनच टिळकांनी आपली बाजू मांडली.

गुन्ह्याच्या कलमामध्ये 'हेतू' आणि 'प्रयत्न करणे' असे दोन महत्त्वाचे शब्द आहेत. सरकारबद्दल अप्रीती निर्माण करण्याचा प्रयत्न बुद्धिपुरस्सर व्हायला हवा. मी अप्रीती निर्माण करण्याचा प्रयत्न केला आणि तो सरकारने किंवा अन्य कोणी

यशस्वी होऊ दिला नाही असा पुरावा सादर केलेला नाही. अप्रीती किंवा द्वेषबुद्धी निर्माण करण्याचा आरोप माझ्यावर आहे. माझ्या हातून अप्रीती निर्माण झाली असती तर फक्त प्रयत्न करण्याचा आरोप माझ्यावर ठेवला नसता. हेतू आणि उद्देश यामध्ये फरक आहे. जेव्हा गुन्हा घडतो तेव्हा उद्देशाकडे लक्ष देण्याचे कारण नाही. येथे तर प्रयत्न करण्याचाच आरोप ठेवण्यात आला आहे. लो. टिळकांनी रतनलाल यांच्या 'क्रिमीनल लॉ' ग्रंथातील खटल्याचे उदाहरण दिले. आरोपीच्या हातातील कुऱ्हाड काढून घेण्यात आली. तो फिर्यादीच्यापासून चार पावले दूर होता. ज्युरीने आरोपीला दोषमुक्त केले. खून करण्याचा प्रयत्न पूर्ण झाला नाही. कदाचित त्याने पश्चात्ताप होऊन विचार बदलला असता. ज्या कलमाच्या आधारे टिळकांवर आरोप ठेवला होता त्याप्रमाणे राजद्रोह निर्माण करण्याचे कार्य किंवा ते अयशस्वी होण्याचे कार्य याविषयी काहीच पुरावा सादर केलेला नाही असे टिळकांनी ज्युरीच्या निदर्शनास आणले. त्यांनी न्या. लॉरेन्स जेफिन्स आणि न्या. बॅटी यांनी राजद्रोहाच्या खटल्यावर दिलेल्या निकालासंबंधी निवेदन केले. या न्यायमूर्तींनी गुन्हा पूर्ण विचारांती झाली पाहिजे आणि आरोपीच्या  शक्तीबाहेरच्या कारणांनी तो निष्पन्न झाला असे सिद्ध झाले पाहिजे असे या न्यायमूर्तींचे मत होते. न्यायाधीश किंवा ज्यूरी कायद्यात न्याय्य बदल करु शकतात. न्यायाधीशांच्या सांगण्याप्रमाणे ज्यूरींनी निकाल द्यावा असे त्यांच्यावर बंधन नाही. लो. टिळकांनी फ्रेंच राज्यक्रांतीनंतर इंग्लंडमध्ये माजलेल्या असंतोषाचे उदाहरण दिले. १७९२ ते १८०० दरम्यान अनेक राजद्रोहाचे खटले चालू होते. जोन्स नावाच्या गृहस्थाने एक चोपडे प्रसिद्ध केले. या चोपड्यात पार्लमेंटमध्ये सुधारणा व्हावी असे विचार मांडले होते. अर्किन्स या कायदेपंडिताने राजद्रोह करण्याचा हेतू होता की नाही हे ठरवण्याचे काम ज्यूरींचे आहे, न्यायाधीशांचे नाही असे न्यायालयात सांगितले. ज्यूरीने मत दिले नाही. न्यायाधीशांनी शिक्षा केली. या प्रकरणाचा निकाल पार्लमेंटमध्ये लागला. अखेर 'आरोपीचा हेतू ठरविण्याचे काम न्यायाधीशाचे नाही ते ज्यूरीचे आहे' असा कायद्यात बदल करण्यात आला. हा कायदा आजही अंमलात आहे हे लो. टिळकांनी सांगितले. वृत्तपत्रातील लेखांबद्दल राजद्रोह केल्याचे आरोप पत्रकारांवर ठेवण्यात आले तेव्हा इंग्लंडमधील ज्यूरींनी इंग्रज गृहस्थाला आपले प्रामाणिक

मत मांडण्याचा अधिकार आहे असे सांगून आरोपीला दोषमुक्त ठरवले. १७९६ साली जॉन गिल याने सरकार हटवादीपणा करेल तर प्रत्येक इंग्रज फासावर जाण्यास तयार होईल असा इशारा दिला. या खटल्यातही ज्यूरीने गिल यास दोषमुक्त ठरवले. 'प्रयत्न' करणे या शब्दासाठी टिळकांनी अमेरिकेतील खटल्यांचे उदाहरण दिले.

'पायोनियर' या वृत्तपत्राने 'कल्ट ऑफ दी बॉम्ब' असा अग्रलेख लिहिला. त्याला उत्तर म्हणून 'बॉम्बगोळ्याचे रहस्य' हे लेखाला शीर्षक देण्यात आले. बॉम्ब टाकणे वाईट आहे हे आपले मत आहे. पण त्यामागच्या कारणांचा आपण अग्रलेखामध्ये शोध घेतला इतकेच. टिळकांनी भाषांतराच्या चुका काढून दाखवल्या. 'साप साप म्हणून भुई बडवू नका' याचा अर्थ टिळकांनी सरकारला साप म्हटले असा केला आहे. टिळकांनी 'पायोनियर', 'एशियन', 'एम्पायर', या इंग्रजी वृत्तपत्रांनी दृष्टबुद्धीने लिहिलेल्या लेखांची उदाहरणे सादर केली. शिवाय बंगाली, गुजराथी वृतपत्रांनी तसेच ना. गोखले यांनीही आपल्याप्रमाणेच विचार मांडले आहेत हे ज्यूरीच्या निदर्शनास आणले. इंग्रजी वृत्तपत्रांनी हिंदी जनतेसंबंधी अत्यंत कडक शब्द वापरले आहेत. त्यांच्या भाषेच्या मानाने केसरीतील लेखन विचारपूर्वक, संयमाने केले आहे हेही टिळकांनी स्पष्ट केले. 'पायोनियर' लिहितो तेव्हा त्यांचा हेतू वाईट नसतो. मग आपलाच हेतू वाईट आहे असे का समजता ? असा त्यांनी प्रश्न केला. इंग्रज मोंगलाप्रमाणे उदार नाहीत असे मत थॉमस मन्रो याने व्यक्त केले होते. दादाभाई नौरोजी यांच्या ग्रंथात याचे विवेचन पहायला मिळते. परमेश्वर योग्य निकाल देण्याची बुद्धी आणि धैर्य आपल्याला देवो असे म्हणून लोकमान्यांनी आपले एकवीस तास चाललेले भाषण संपवले.

सरकारचे मुख्य वकील बॅ. ब्रॅन्सन यांनी छोटेच भाषण केले. सरकारी वकीलाने टिळकांनी मांडलेल्या मुद्यांकडे ज्यूरींनी लक्ष देऊ नये असे सांगितले. जोशी यांनी केलेल्या भाषांतराचे ब्रॅन्सन यांनी समर्थन केले. लो. टिळकांच्या लेखातील भाषेचा विचार व्हावा. त्यांच्या भाषेने कायद्याच्या मर्यादेचे उल्लंघन केले आहे असे त्यांनी सांगितले. लो. टिळकांनी अनेक पुस्तके, निकाल यांचे दाखले दिले त्याकडे ज्यूरींनी दुर्लक्ष करावे असे त्यांनी सुचवले.

लो. टिळकांनी या महत्त्वाच्या खटल्यात आपली बाजू मांडण्याची जबाबदारी स्वत: का स्वीकारली असे अनेक प्रश्न त्यावेळी निर्माण झाले. त्याच्यासंबंधी चर्चा झाली. बॅ. जीना हे नामवंत बॅरिस्टर. लो. टिळकांच्यावतीने त्यांना काम पाहायचे होते. कदाचित बॅरिस्टरना देण्यासाठी पुरेसे पैसे नव्हते हेही कारण पुढे करण्यात आले. पण लो. टिळकांनी याचा ध्येयवादी दृष्टिकोणातून विचार केला होता. बॅ. जीनांसारखे निष्णात बॅरिस्टर वकिली डावपेचाच्या आधारे, आपल्या कायद्याच्या अभ्यासाच्या आधारे आपली बाजू मांडतील. त्यामुळे आपली सुटका होईलही पण लो. टिळकांना इथे वकिली डावपेच नको होते. आपण स्वत: बचावाची जबाबदारी स्वीकारली तर आपल्या भाषणामधून सरकारचे एकतर्फी धोरण आणि आपली व्यापक राजकीय दृष्टी याच्या प्रत्यय जनतेस येईल असे त्यांना वाटले. शिवाय सरकारने लो. टिळकांना शिक्षा करायचीच या उद्देशाने खटला भरला होता. १९०८ साली खरे पाहता लो. टिळकांचे वय बावन्न वर्षाचे होते. ते थकले होते. तरीही त्यांनी "सरकारला मला शिक्षा करायची आहे हे स्पष्ट आहे. मी त्या संकटाला सामोरे जाण्यास तयार आहे" असे म्हणून त्यांनी स्वत:च एकवीस तास बचावाचे भाषण केले. त्यांच्या भाषणामधून त्यांचे धैर्य, त्यांचे प्रसंगावधान, कायद्याचा व्यासंग व त्यांची स्मरणशक्ती याचा प्रत्यय न्यायालयाला आणि जनतेला आला !

●●●

# १६

# मंडालेचा राजबंदी

ब्रॅ. ब्रॅन्सन यांच्या भाषणानंतर न्यायाधीशांनी समारोप केला 'प्रयत्न करणे' या संबंधी लो. टिळकांनी कुऱ्हाड खांद्यावर घेऊन दुसऱ्याचा पाठलाग करणाऱ्या व्यक्तीचे उदाहरण दिले होते. न्यायाधीशांनी त्यांना दोषमुक्त ठरवले असे लो. टिळकांनी सांगितले पण दुखापत करण्याच्या आरोपाखाली त्या आरोपीस न्यायालयाने शिक्षा ठोठावली हे सांगितले नाही. त्यांनी हे स्पष्ट केले. टिळकांनी संपूर्ण सत्य सांगितले नाही असे त्यांचे म्हणणे ! टिळकांनी एकवीस तास भाषण केले. त्या भाषणाला प्रसिद्धी मिळेल. त्याचा वाचकांवर, जनतेवर काय परिणाम होईल याचा विचार ज्यूरींनी करावा असे त्यांनी सांगितले. अखेर बंद खोलीत जाऊन ज्यूरींनी चर्चा केली आणि निर्णय घेतला. ज्युरीमध्ये मतभेद होता. सात विरुद्ध दोन असे प्रमाण होते. कायद्याप्रमाणे बहुमताचा निर्णय स्वीकारला गेला आणि न्यायाधीशांनी वयोमानाचा विचार करून आपण फक्त सहा वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा देत आहोत हे सांगितले. ही शिक्षा हद्दपारीची होती. लो. टिळकांच्या बुद्धिमतेची, व्यासंगाची तारीफ करून आपण चुकीच्या मार्गाने जात आहात असे न्यायमूर्तींनी आपले मत व्यक्त केले. न्यायाधीशांनी शिक्षा दिल्यानंतर तुम्हाला पूर्ण पीठापुढे अपील करण्याचा अधिकार नाही हेही सांगितले.

लो. टिळक म्हणाले, "ज्यूरींचा निर्णय विरुद्ध लागला आहे. तरीही मी निरपराध आहे. विश्वातील प्राणीमात्रांचे नियंत्रण करणारी याहून एक उच्च शक्ती आहे. माझी सुटका होण्यापेक्षा मला क्लेश सहन करावा लागावा अशी ईश्वराची इच्छा असावी. माझ्या या क्लेशांमुळे मी हाती घेतलेले त्या कार्याचा अधिक उत्कर्ष व्हावा अशी

ईश्वराची इच्छा असावी." हे लो. टिळकांचे उद्‌गार आता चिरंतन पावले आहेत. लो. टिळकांनी आपल्या वयाकडे, व्याधींकडे न्यायालयाचे लक्ष वेधले नाही. ते खरे कर्मयोगी होते. त्यांनी आपल्या देहाचा विचार केला नाही. त्यांनी देशाच्या उत्कर्षाचा, स्वराज्याचा ध्यास घेतला होता. आपल्या तुरुंगवासापेक्षा त्यांना आपण हाती घेतलेल्या पवित्र कार्याची अधिक चिंता होती. त्यांचे हे ऐतिहासिक उद्‌गार आजही मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या दालनात कोरलेले पहायला मिळतात. या उद्‌गारांचे स्मरण होताच या अलौकिक पुरुषाच्या त्यागाचे, धैर्याचे स्मरण होते आणि आपण आजही नम्रपणे त्यांच्या पवित्र स्मृतीस वंदन करतो.

लो. टिळक काळ्या पाण्याच्या शिक्षेवर जाणार याचे वृत्त प्रसिद्ध करताना इंग्रजी वृत्तपत्रांनी आनंद व्यक्त केला. टाईम्स ऑफ इंडिया 'तर नेहमीच लो. टिळकांविरुद्ध आगपाखड करीत असे.' 'बॉम्बे गॅझेट'नेही आपला आसुरी आनंद व्यक्त केला. बंगालमधील सुप्रसिद्ध 'वंदे मातरम्' या वृत्तपत्राने लो. टिळकांच्या धैर्याची, विद्वत्तेची, त्यागाची मुक्तकंठाने प्रशंसा केली. त्यांचे न्यायालयातील भाषण देशभक्तीचा, कायद्याच्या व्यासंगाचा, धीरोदात्त वृत्तीचा आदर्श वस्तुपाठ होता. "टिळकांसारखा महापुरुष पुन्हा होणार नाही" असे संपादकीयामध्ये लिहिले. कलकत्त्याच्या अमृतबझार पत्रिकेने लो. टिळकांच्या विद्वत्तेची, धैर्याची ख्याती युरोप, अमेरिकेत पसरली आहे याची दखल न्यायाधीशांनी घेतली नाही उलट न्यायाधीशांनी आपला अहंकार जपण्यासाठी त्यांनी दोषी ठरवून कडक शिक्षा केली असे म्हटले. मद्रासमधील 'हिंदू'या वृत्तपत्राने लो. टिळकांनी प्रकट केलेली अलौकिक बुद्धिमत्ता, कायद्याचा गाढा व्यासंग, त्यांच्या धीरोदात्त व्यक्तिमत्त्वाला लाभलेले आध्यात्मिक अधिष्ठान याचा आवर्जून उल्लेख केला. त्याकाळात 'टिळक' हा एक प्रभावी मंत्र बनला होता.

लो. टिळकांना काळ्या पाण्याची शिक्षा झाल्याचे वृत्त वाऱ्यासारखे पसरले. मुंबईतील सर्व आर्थिक व्यवहार, बाजारपेठा, गिरण्या, कारखाने सहा दिवस बंद होते. लो. टिळकांना कडक पोलीस बंदोबस्तात नेण्यात आले. सर्वत्र पोलीस होते. घोडदळाची तुकडी होती. रात्रीचा काळोख पसरला होता. आषाढाचा पाऊस पडत होता.

तरी आपल्या लाडक्या नेत्याचे दर्शन घेण्यासाठी लोकांच्या झुंडी बाहेर पडल्या होत्या. जनतेला लो. टिळकांना पाहता येऊ नये म्हणून पोलिसांनी खूप दक्षता घेतली होती. ना. गोखले त्यावेळी इंग्लंडमध्ये होते. लो. टिळकांच्या अटकेचे वृत्त कळताच ना. गोखले यांनी भारतमंत्री मोर्ले यांच्याकडे आपला निषेध नोंदवला. मोर्ले यांनी मुंबईचे गव्हर्नर सीडनहॅम यांना समज दिली. टिळकांचे लेख इतकी कडक शिक्षा ठोठावण्याइतके कडक नव्हते असे मोर्ले यांचे मत बनले. मोर्ले यांनी ताबडतोब सक्तमजुरीऐवजी साधी कैद, दंडाची माफी, जेवणाच्या सोयीसाठी स्वतंत्र स्वयंपाक्याची नेमणूक असा बदल केला. सीडनहॅम यांनीही तत्परतेने त्याची अंमलबजावणी केली.

लो. टिळकांना काळ्या पाण्याची शिक्षा झाली याचे अपार दु:ख त्यांच्या सहकाऱ्यांना झाले. दादासाहेब खापर्डे, न. चिं. केळकर, काकासाहेब खाडिलकर, टिळकांचे भाचे धोंडोपंत विद्वांस यांना शोक आवरणे कठीण गेले. पुण्यात येताच खाडिलकर गायकवाडवाड्याच्या प्रवेशद्वाराजवळ लहान मुलाप्रमाणे रडले. टिळकांच्या पत्नी सत्यभामाबाई दारात उभा होत्या. त्यांना पाहून खाडिलकरांना अश्रू आवरणे कठीण गेले. सत्यभामाबाई या लो. टिळकांच्या धर्मपत्नी. त्यांनी लो. टिळकांवर यापूर्वी अशा आपत्ती कोसळल्याचे पाहिले होते. त्या म्हणाल्या "अहो, अश्रू का ढाळता ? त्यांनी कुणाची चोरी केली नाही. राजद्रोहाच्या खटल्यात शिक्षा झाली ना ? ही देशासाठी सहा वर्षाची शिक्षा आहे !" लो. टिळकांच्या धर्मपत्नींचे हे उद्‌गार त्यांना आपल्या थोर पतीबद्दल वाटणाऱ्या अभिमानाची व आदराची साक्ष देतात.

मंडालेस जाण्यापूर्वी टिळक बासष्ट दिवस साबरमती येथे होते. याकाळात टिळकांनी प्रिव्ही कोन्सिलकडे करायच्या अपिलाची तयारी केली. शिवाय स्वत:चे कुटुंब, वृत्तपत्रे यांचीही त्यांना काळजी होती. हायकोर्टाने अपील फेटाळले. त्यानंतर प्रिव्ही कौन्सिल, पार्लमेंट यांच्याकडे करायच्या अर्जाच्या प्रती टिळकांनी खापर्डे यांच्याकडे दिल्या. गुप्तपणाने टिळकांना बडोदामार्गे मुंबईत आणले. गाडी थांबेल त्या स्टेशनवर 'टिळक महाराजकी जय' अशा घोषणा देणारे जनतेचे थवे उभे होते. मुंबईहून खास बोटीने रंगून मार्गे मंडाले येथे आणण्यात आले. रंगून येथेही दोन हजार लोक त्यांच्या नावाचा जयजयकार करण्यासाठी उपस्थित होते. टिळकांना

महिन्यातून एक पत्र आणि तीन महिन्यांनी नातेवाईकांची भेट अशी खास सवलत देण्यात आली होती. प्रथम न. चिं. केळकर, धोंडोपतंत विद्वांस यांनी त्यांची भेट घेतली. "मंडाले येथील हवा अतिशय खराब आहे. उन्हाळ्याच्या दिवसात तर तुरुंग तापलेल्या भट्टीप्रमाणे असतो. हिवाळ्यात अतिशय कडक थंडी आणि उन्हाळ्यात अतिशय कडक उन्हाळा अशी येथील हवा. या तुरुंगात येणारा प्रत्येकजण आजारी पडतो. अशा विषम आणि प्रतिकूल हवेत वास्तव्य करुन लो. टिळकांनी अखंडपणे ग्रंथवाचन, ग्रंथलेखन करावे याचे आश्चर्य वाटते. ही एक अभूतपूर्व घटना होय" हे मत नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे आहे. यावरुन लो. टिळकांनी सहा वर्षे या तुरुंगात कशा अवस्थेत काढली असतील याची थोडीशी कल्पना येते.

लो. टिळकांना पत्रव्यवहार इंग्रजीतून करावा लागला. कारण प्रत्येक पत्राची तपासणी तुरुंगांधिकारी करीत होते. लो. टिळकांचा घरी ग्रंथसंग्रह मोठा होता. या ग्रंथांची काळजी घेण्याच्या सूचना त्यांनी पत्रांतून दिल्या. तसेच आपल्याला आवश्यक असे ग्रंथ त्यांनी मागवून घेतले. त्यांना हवी तेवढी पुस्तके पाठविण्याची सवलत देण्यात आली होती. त्यांनी पुणे, मुंबई आणि काही ग्रंथ इंग्लंडमधून मागवून घेतले त्यांनी तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाला उपयुक्त होईल म्हणून फ्रेंच आणि जर्मन भाषांचा अभ्यास केला. या भाषेची पुस्तके त्यांनी मागवून घेतली. बौद्ध धर्माचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी पाली भाषेचा अभ्यास केला. त्यांनी ग्रीक तत्त्वज्ञ प्लेटो, ॲरिस्टॉटल, जर्मन तत्त्वज्ञ कांट, जर्मन नास्तिक तत्त्वज्ञ नित्झे, अशा पाश्चात्त्य तत्त्वज्ञांच्या ग्रंथांचे सूक्ष्मरीतीने वाचन केले. त्यावर चिंतन केले. 'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहून झाल्यानंतर त्यांनी शंकर दर्शन, हिंदू कायदा, हिंदू धर्माचा इतिहास, शिवाजी महारांजाचे चरित्र अशा ग्रंथांचे लेखन करण्याचा मनाशी संकल्प केला होता. गणितावरही स्वतंत्र संशोधन करुन त्यांना ग्रंथ लिहायचा होता. मंडालेच्या या अतिशय भयानक हवामानामध्ये लो. टिळकांच्या चित्तवृत्ती अखंड ग्रंथवाचन, ग्रंथलेखन, चिंतन यामध्ये किती रमल्या होत्या हे दिसून येते. तुरुंगवासातही ते स्थिप्रज्ञवृत्तीने राहून केवळ ग्रंथलेखन आणि देशाची समस्या याच्याच विचारात मग्न होते.

इकडे दादासाहेब खापर्डे हे लोकमान्यांच्या सुटकेसाठी प्रयत्नशील होते. सुटकेसाठी काही अटी मान्य कराल का ? असा प्रश्न लोकमान्यांना पत्रातून विचारला.

लो. टिळकांना हा प्रश्न आवडला नाही. पण त्यांनी सुटकेसाठी प्रयत्न करायचे झाल्यास त्या प्रयत्नाचा कायदेशीरपणा, न्याय आणि मानवतावादी दृष्टिकोनातून विचार करावा असे लो. टिळकांनी सांगितले. या अटीपलीकडे आपण जाऊ नये असे त्यांनी खापर्डे यांना निक्षून सांगितले. 'माझी सुटका झाली तर मला सत्कार समारंभ नकोत. पण सामान्य नागरिकाला जे स्वातंत्र्य आहे ते मला मिळायला हवे. मी माझ्या कुटुंबासाठी किंवा स्वत:साठी कधीच जगलो नाही. माझी सुटका करून मला सरकार माझ्या जनतेपासून दूर ठेवणार असेल तर मला सुटका नको. मला दया नको. मी क्षमायाचना करणार नाही' असे निस्संदिग्ध शब्दात त्यांनी खापर्डे यांना कळवले. त्यांना आपल्या मुलांची, पत्नीची काळजी होती. पण ती जबाबदारी त्यांनी आपल्या नातेवाईकांवर आणि मित्रांवर सोपवली होती. त्यांच्या पत्नींची प्रकृती ठीक नव्हती. मुले लहान होती. मंडालेसारख्या तुरुंगात, विषम हवामानात त्यांची प्रकृतीही वारंवार बिघडत होती. पण त्यांनी आपली सर्व चिंता, अस्वस्थ मन यावर मात करून ग्रंथवाचन, ग्रंथलेखन यावर आपले लक्ष केंद्रित केले होते. सरकारने घातलेल्या अटी स्वीकारणे म्हणजे आपल्या एकंदर जीवनकार्यावर आपल्याच हाताने हरताळ फासणे होईल असे त्यांना वाटले.

श्री. वासुदेव रामराव कुलकर्णी यांनी लो. टिळकांचे आचारी म्हणून तुरुंगात काम केले. तेही कैदीच होते. त्यांनी आपल्या आठवणींमधून लो. टिळकांच्या मंडाले येथील वास्तव्यासंबंधी लिहिले आहे. लो. टिळकांची दिनचर्या कशी होती ? ते लवकर उठत. मंत्रपठण, ध्यानधारणा यानंतर स्नान. भोजनातील पदार्थाबाबत त्यांनी कधी नापसंती व्यक्त केली नाही. त्यांची प्रकृती बिघडली. मधुमेहाचा त्रास झाला. लोकमान्य टिळकांनी साखर, भात याचे प्रमाण कमी करून सत्तूच्या पुऱ्या, फळे, दूध, तूप घेण्यास सुरुवात केली. त्यांना मलावरोध, डायरिया, दात हिरड्यांचा त्रास अशा व्याधी होत्या. लो. टिळकांनी आपल्या पद्धतीने साधा औषधोपचार आणि खाण्यातील बदल यातून व्याधी आटोक्यात ठेवण्याचा प्रयत्न केला.

शारीरिक व्याधी होत्या तशा कौटुंबिक चिंताही होत्या. लो. टिळकांच्या पत्रव्यवहारात पत्नीच्या प्रकृतीची काळजी मुलांच्या शिक्षणाची पुढील व्यवस्था,

मुली, जर्मनी येथे शिकणाऱ्या जावयाच्या खर्चाची व्यवस्था या गोष्टींचा उल्लेख असे. शिवाय केसरीची व्यवस्था, खाडिलकर आणि न. चिं. केळकर यांच्या कामाची विभागणी, छापखान्याचे भाडे, कर्जाची फेड आणि वसुली, रायगड येथील शिवरायाच्या समाधीची व्यवस्था, पैसा फंड अशा अनेक व्यवहारांचा तपशील त्यांच्या पत्रव्यवहारांमधून पाहायला मिळतो. त्यांच्या पत्नी सत्यभामाबाई यांनाही मधुमेह होता. मुलांच्या अभ्यासाची त्यांना विशेष चिंता होती असे दिसते. मुलांनी सायकलचा हट्ट धरला. ते कॉलेजमध्ये शिकत होते. त्यांना सायकली देण्याची व्यवस्था झाली. थोरल्या मुलाने चष्मा वापरायला सुरुवात केली. टिळक रागावले ! आपण चष्म्यावाचून वाचन करतो, लेखन करतो. आपली दृष्टी चांगली नाही. या तरुण वयात चष्म्याची गरज काय ? असेही त्यांचे मत होते. पत्रांमधून ते आपल्या प्रकृतीविषयी विशेष लिहित नसत. आपली पत्रे पत्नी आणि मुले यांना वाचून दाखविण्याच्या सूचना ते नेहमी धोंडोपतांना देत असत.

लो. टिळकांना घरातील सर्वांची नेहमी काळजी वाटत होती. धोंडोपंतांनी टिळकांना त्यांच्या पत्नी सत्यभामाबाई यांचे दु:खद निधन झाल्याची बातमी तारेने कळवली. ७ जून, १९१२ रोजी त्यांच्या धर्मपत्नीची प्राणज्योत मालवली. लोकमान्य टिळकांना मोठा धक्का बसला. या दु:खामधून सावरणे त्यांना फार कठीण गेले. त्यांनी पत्रात लिहिले. "ज्या गोष्टीची मला मनात सारखी भीती वाटत होती नेमके तेच घडले. मी अनेक संकटांना धैर्याने तोंड दिले आहे. पण पत्नीचे निधन हा एक जबरदस्त आघात आहे. पत्नीच्या अखेरच्या क्षणी मी तिथे नाही याचे मला फार दु:ख होते. आता माझ्या मुलांच्या शारीरिक, बौद्धिक विकासाकडे लक्ष देण्याची तुझी जबाबदारी आहे. ती जबाबदारी तू पार पाडावी अशी माझी इच्छा आहे. चि. मथू, चि. दुर्गी तिथे असतील. मी तिथे नसल्याने सर्वांनाच हे दु:ख तीव्रतेने जाणवले असेल. मुले रामभाऊ, बापू यांना या प्रसंगी सावरण्याची गरज आहे. या संकटात मी तुझ्यावर विसंबून आहे." धोंडोपंत विद्वांस टिळकांचे भाचे त्यांना उद्देशून टिळकांनी हे पत्र लिहिले. या प्रसंगाला तोंड देण्यासाठी टिळकांनी मन खंबीर करण्याचा प्रयत्न केला तरी ते शारीरिक व्याधींनी गांजले होते. याचवेळी त्यांची

शिक्षा माफ करण्याचे अपील 'हाऊस ऑफ लॉर्डस्' ने फेटाळले होते. शिवाय दूरच्या देशात ते असल्यामुळे आपल्या अंत:करणात दाटलेले दु:ख हलके करण्यासाठी, काही बोलण्यासाठी या तुरुंगात कुणीही नव्हते. त्यांनी रामभाऊ आणि बापू या दोन मुलांनाही पत्र लिहिले. 'आई गेल्याचे दु:ख आहे. तरीही दु:खाने खचून न जाता तुम्ही शिक्षण पूर्ण करा. शिक्षण हे महत्त्वाचे !'

लो. टिळकांच्या सुटकेचे दिवस जवळ येत चालेले होते. त्यांचे वाचन अखंडपणे चालू होते. दोन वर्षात त्यांनी आपला 'गीतारहस्य' ग्रंथ पूर्ण केला होता 'वेदिक क्रोनॉलॉजी' हा ग्रंथ अपूर्ण होता. नित्झे, श्रुडर यांचे ग्रंथी त्यांनी मागवून घेतले. सुटका होण्यापूर्वी त्यांनी सर्व ग्रंथ दोन मोठ्या पेट्यांमध्ये ठेवून त्या पेट्या पाठवून दिल्या. ८ जून, १९१४ रोजी त्यांना रंगून येथे आणले. त्यानंतर 'मेयो' बोटीतून त्यांनी प्रवास केला. पुण्यात येईपर्यंत ते कोणत्या स्टेशनवर उतरणार ही माहिती पोलिसांनी गुप्त ठेवली होती. २५ जनू रोजी लो. टिळकांची सुटका झाल्याची जाहीर घोषणा सरकारतर्फे करण्यात आली. सुटका झाली तरी गायकवाड वाड्यासमोर पोलीस चौकी बसवण्यात आली. टिळकमहाराजांच्या दर्शनासाठी लोकांच्या झुंडी वाड्यावर थडकू लागल्या. याच वेळी इंग्लंडने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले. टिळकांनी आपले राजकीय विचार समजावे म्हणून कलेक्टरला एक पत्र लिहिले आणि ते वृत्तपत्रांमधून प्रसिद्ध केले.

त्यांनी मोर्ले मिंटो सुधारणांबद्दल आशावादी दृष्टिकोण ठेवला. सरकारशी आपले मतभेद आहेत. पण त्यात द्वेषभावना नाही. आयरिश होमरूलप्रमाणे सुधारणा व्हाव्या असे वाटले. इंग्रज स्वातंत्र्यप्रिय आहेत सध्या इंग्लंड युद्धात गुंतल्यामुळे सर्वांनी सरकारला सहकार्य करावे असे आपल्याला वाटते. यानंतर लो. टिळकांनी 'गीता-रहस्यांवर' प्रवचने दिली आणि त्यांनी हा महान ग्रंथ छापण्याची तयारी सुरु केली.

●●●

# १७

# श्रीमद्‌भगवद्‌गीतारहस्य

'श्रीमद्‌भगवद्‌गीतारहस्य अथवा कर्मयोगशास्त्र' हा ग्रंथ टिळकांनी १९१०-१९११ या वर्षात मंडाले येथे लिहिला. त्यावेळी हिवाळा होता. मंडाले येथे अतिशय कडक थंडीचे दिवस होते. त्यांनी आपल्या प्रस्वावनेमध्ये गीतेविषयीचे चिंतन बालवयात सुरु झाले असे म्हटले आहे. १८७२ साली त्यांच्या वडलांची प्रकृती बिघडली होती. त्यावेळी टिळकांचे वय अवघे सोळा वर्षाचे. त्यावेळी मॅट्रिकची परीक्षा व्हायची होती. वडलांनी गीता ऐकण्याची इच्छा व्यक्त केली. टिळकांनी गीता वाचून दाखवली. गीता वाचताना या महान ग्रंथांचा मानवासाठी कोणता संदेश आहे हे जाणून घेण्याची इच्छा त्यांच्या मनात या कोवळ्या वयातच जागृत झाली. या जिज्ञासेचा कसा विकास झाला याचे विवेचन त्यांनी प्रांजळपणे या ग्रंथांच्या प्रस्तावनेत केले आहे. बालवयात होणारे संस्कार महत्त्वाचे असतात. त्यावेळी मन संस्कारक्षम असते. या विषयासंबंधी टिळकांच्या मनात सतत कुतूहल होते. आपल्या बांधवाविरुद्ध गुरुजनांविरुद्ध युद्ध करण्यास अर्जुन तयार नव्हता. त्याला ते पाप वाटले. भगवंतांनी अर्जुनाला कर्म करण्यास प्रवृत्त केले. मग या गीतेत ब्रह्मज्ञान आणि भक्तिमार्ग याच्या विवरणाला महत्त्व का प्राप्त झाले ? ही शंका लो. टिळकांना सतत अस्वस्थ करीत होती. गीतेवर अनेक विद्वानांनी ग्रंथ लिहिले आहेत. ते ग्रंथ वाचून लो. टिळकांचे समाधान झाले नाही. ग्रंथाचा खरा उद्देश समाजवून घेण्यासाठी लोकमान्यांनी गीतेची पारायणे केली. त्यांनी वेद, उपनिषदे, महाभारत आणि इंग्रजी तत्त्वज्ञांच्या ग्रंथांचाही अभ्यास केला. आपले विचार, चिंतन त्यांनी व्याख्यानांमधून वेळोवेळी मांडले. शेवटी गीता ही निवृत्तीचा संदेश देत नाही तर ती कर्म निष्ठापूर्वक करण्याचा संदेश देते असे

त्यांचे ठाम मत झाले. पण ग्रंथलेखन करण्यास त्यांना वेळ मिळाला नाही. सातत्याने जनतेचे प्रबोधन, केसरीमधील लेखन, अधूनमधून घडलेला तुरुंगवास अशा सामाजिक, राजकीय कार्यात ते गुंतलेले होते. १९०८ साली त्यांची रवानगी मंडाले येथील तुरुंगात झाली. तेव्हा त्यांनी संदर्भ ग्रंथ मिळवून 'गीतारहस्य' लिहिले. स्वातंत्र्यपूर्व काळातील थोर विचारवंत नेत्यांनी तुरुंगवासामध्ये अखंड लेखन, वाचन केले आणि तुरुंगातील आपल्या सहकाऱ्यांबरोबर तात्त्विक विषयांवर चर्चा केली. अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. या थोर देशभक्तांनी तुरुंगवासाचे संशोधन, वाचन, लेखन करण्यासाठी विद्यापीठात रूपांतर केल्याचे पाहायला मिळते. त्यामुळे लो. टिळकांसारख्या थोर नेत्यांच्या त्यागाबद्दल, बुद्धिमतेबद्दल आपल्या मनात असलेला आदर द्विगुणित होतो. यापूर्वी लो. टिळकांनी लेखनिकाला तोंडी मजकूर सांगून सर्व लेखन केले. मंडालेमध्ये लेखनिकाची सोय नव्हती. त्यांनी दररोज दहा बारा पानांचे स्वत: लेखन करून 'गीतारहस्य' हा महान ग्रंथ पूर्ण केला. प्रकृती अस्वास्थ्य, प्रतिकूल हवामान याची तमा न बाळगता त्यांनी या ग्रंथाचे लेखन पूर्ण केले !

वैदिक धर्माचा तात्त्विक इतिहास उपनिषदे, ब्रह्मसूत्रे आणि गीता या ग्रंथात आहे. या ग्रंथांना 'प्रस्थानत्रयी' म्हणतात. याचे कारण हे ग्रंथ वैदिक धर्माचे, आधारस्तंभ आहेत. शंकराचार्यांनी गीतेवर भाष्य लिहिले. शंकराचार्यांनी गीतेवर आपले स्वतंत्र मत मांडले आणि चिकित्सा केली म्हणून ते भाष्य ठरते. शंकराचार्यांनी कर्माला महत्त्व दिले नाही. कर्मसंन्यास करून ज्ञान संपादन करणे त्यांना मोक्षदायक वाटले. त्यांनी आत्मा आणि ब्रह्म एकच आहेत आणि त्यात अद्वैत आहे असे सांगितले. त्यानंतर रामानुज यांनी माया आणि अद्वैत ही शंकराचार्यांची दोन्ही मते मान्य केली नाहीत. शरीरातच ईश्वर आहे असे त्यांचे मत आहे. पुढे मध्वाचार्यांनी 'द्वैतवाद' हा नवा विचार मांडला. या द्वैतवादामुळे निष्काम कर्म करण्यापेक्षा भक्तिमार्ग महत्त्वाचा असे मत त्यांनी मांडले. संत संप्रदायामध्ये ज्ञानेश्वरांनी गीतेवर केलेले भाष्य हे अत्यंत महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रामध्ये 'ज्ञानेश्वरी' मधून संत ज्ञानेश्वरांनी केलेले निरूपण विद्वानापासनू ते सामान्यजनापर्यंत सर्वांना भावले आहे. लो. टिळकांनी 'गीता रहस्य' लिहिताना विशिष्ट संप्रदाय निर्माण करण्याचा आपला हेतू नाही हे नि:संदिग्ध शब्दात सांगितले आहे. सर्व विद्वान आचार्यांचे त्या दृष्टिकोनातून लेखन, चिंतन

होते. गीतेच्या संस्कृत श्लोकांचा सरळ अर्थ त्यांनी दिला आहे. लोकमान्यांच्या दृष्टीने 'गीतारहस्या'चे लेखन हा एक ज्ञानयज्ञ आहे. एखाद्या ग्रंथामुळे संप्रदाय निर्माण झाला की तोच ग्रंथ प्रमाणभूत मानण्याची प्रवृत्ती दिसून येते. ख्रिस्ती, मुस्लीम ग्रंथही अशा संप्रदायातून निर्माण झाले आहेत. त्यामुळे संप्रदायामध्ये मतभेद निर्माण होतात. युद्ध करावे की न करावे अशा द्विधा मन:स्थितीत अर्जुन आहे. युद्ध केल्यास पापाचा स्पर्श न होता कसे करावे हा अर्जुनापुढे प्रश्न आहे. निष्कामबुद्धीने युद्ध कर असे अर्जुनाच्या प्रश्नाला भगवंतांचे स्पष्ट उत्तर आहे. टीकाकारांनी या महत्त्वाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले आहे असे टिळकांचे मत आहे.

लो. टिळकांनी 'कर्म जिज्ञासा'- 'कर्मयोग शास्त्र' अशा प्रकरणांमधून या विषयावर अभ्यासपूर्ण, मूलगामी विवेचन केले आहे. जीवनात अशा प्रसंगी काय करावे असा संभ्रम निर्माण होतो टिळकांनी त्याची अनेक उदाहरणे दिली आहेत. शेक्सपियरची 'हॅम्लेट', 'कोरियोलेनेस' ही नाटके यासाठी प्रसिद्ध आहेत. महाभारतातही असे अनेक प्रसंग आहेत. 'सत्य' हे तत्त्व जगातील सर्व ग्रंथांनी सर्वश्रेष्ठ मानले आहे. पण महाभारतामध्ये 'ज्यात सर्वांचे हित आहे तेच खरे सत्य' अशी सत्याची व्याख्या केली आहे. धर्मराजासारखा थोर राजा प्रसंगी अर्धवट खोटे बोलतो. चोरी करू नये' हेही तत्त्व सर्वमान्य आहे. पण पोटाची खळगी भरण्यासाठी, अन्नाविना तडफडत असताना चोरी केल्याची उदाहरणे महाभारतात आहेत. माता-पिता, गुरू हे वंद्य आहेत पण त्यांचीही हत्या केली जाते. काम, क्रोध, लोभ हे मानवाचे शत्रू खरे पण ते अनावर होतात तेव्हा शत्रू ठरतात. एरव्ही त्यांची विशिष्ट मर्यादेपर्यंत गरज भासतेच. शौर्य, धैर्य, दया, शील आणि मैत्री हे सद्‌गुण आहेत. तरीही देश, काळ पाहून यातही बदल करावा लागतो. महाभारतात यासंबंधी अनेक थोर पुरुषांच्या कथा आहेत. गीतेमध्ये या सर्व कथांचे सार थोडक्यात सांगितले आहेत. कोणत्या प्रसंगी काय करावे यासंबंधी विवेचन करणारा गीतेसारखा दुसरा ग्रंथ नाही असे लो. टिळकांनी स्पष्ट केले आहे.

लो. टिळकांनी 'कर्म' आणि 'योग' हे शब्द एकत्र आणून गीतेमध्ये 'कर्मयोग शास्त्र' याची मांडणी केली आहे वैदिक धर्मात यज्ञयाग हे कर्म मानले आहे. यज्ञ हा 'पुरुषार्थ मानला आहे. गीतेमध्ये 'कर्म' हा शब्द अत्यंत व्यापक अर्थाने वापरला आहे

मनुष्य आपल्या जीवनात जे काही करतो ते सर्व कर्म. त्याचा जन्म आणि मरण हेही कर्मच. गीतेमध्ये योग आणि कर्मयोग हे शब्द एकाच अर्थाने वापरले आहेत. महाभारतात शंकराचार्य यांनी योगाचा हाच अर्थ स्वीकारला आहे. कर्म चांगले की वाईट हे कर्मयोगशास्त्राच्या आधारे ठरवता येते. त्यालाच चांगलेवाईट, पापपुण्य, शुभअशुभ अशी नावे आहेत. पाश्चात्त्य देशात आधिभौतिकवर अधिक भर आहे. भारतीयांनी आध्यात्मिकदृष्ट्या नीतीनियम ठरवले आहेत. आपण जेव्हा आपल्यामध्ये वसत असलेल्या ईश्वरी शक्तीच्या प्रेरणेने जग चालले आहे असे मानले त्यालाच आध्यात्मिक दृष्टी असे म्हणतात. काही पाश्चात्त्य तत्त्वज्ञही आधिभौतिकपेक्षा, आध्यात्मिक दृष्टीला महत्त्व देतात. गीतेमध्ये नवव्या अध्यायात 'जे भक्त माझे निरंतर चिंतन करतात. जे मला निष्काम भावनेने भजतात त्यांचा योगक्षेम मी चालवतो.' अशा आशयाचा श्लोक आहे. 'योगक्षेम' याचा अर्थ व्यापक आहे. कर्म करण्याचे अनेक मार्ग आहेत. पण त्यातील उत्तम साधनाला 'योग' असे नाव आहे. लो. टिळकांनी दुसऱ्या अध्यायातील 'योग:कर्मस्तु कौशलम्' याचा अर्थ स्पष्ट करताना समत्व बुद्धीमुळे कर्माच्या पापपुण्याची बाधा होत नाही असे म्हटले आहे. गीतेत योग आणि कर्मयोग हे शब्द एकाच अर्थाने वापरलेले आहेत.

धर्म हा शब्द उच्चारला की जगातील अनेक धर्मांचे स्मरण होते पारलौकिक सुखाचा मार्ग असा धर्माचा अर्थ आहे. ऐहिक व्यवहारात राजधर्म, प्रजाधर्म असे शब्द आहेत. असे शब्द या क्षेत्रातील नैतिक बंधने दर्शवतात. महाभारतामध्ये धर्म याचा अर्थ समाजधारणा असा आहे. कर्मयोगशास्त्रात आध्यात्मिक उन्नतीला प्राधान्य आहे. लो. टिळकांनी ग्रीक, जर्मन आणि इंग्लिश पंडितांचा दाखल दिला आहे. थोर ग्रीक तत्त्वज्ञ सॉक्रेटिस याची ईश्वरावर श्रद्धा होती. पण देवावरील निष्ठेमागे नैतिक अधिष्ठान हवे असे त्याचे मत होते. ग्रीक तत्त्वज्ञ ॲरिस्टॉटल याने सुखाची व्याख्या व्यापक अर्थाने केली आहे. आपण जेव्हा दुसऱ्यांना सुखी करण्यासाठी प्रयत्नशील असतो तेव्हा आपल्या समाजातील सुखाची वृद्धी होते. त्याला दुसऱ्याची सेवा करण्यामध्ये आनंद मिळाला पाहिजे. असा मानव द्वेष, मत्सर या दुर्गुणांपासून नेहमी दूर असतो. असा मानव शांत, संयमी आणि मितभाषी असतो.

लो. टिळकांनी कर्मयोगाला महत्त्व देऊन त्याचे विवरण अतिशय प्रभावी भाषेत केले आहे. तिसऱ्या अध्यायात 'यज्ञासाठी उत्तम कर्म कर' असा भगवंतांचा आदेश आहे. लो. टिळकांनी 'यज्ञ' या शब्दाचा अर्थ विसाव्या शतकातील बदललेल्या जीवनाच्या संदर्भात स्पष्ट केला आहे. 'यज्ञ' म्हणजे मानवाच्या दैनंदिन जीवनातील कर्म. त्यांनी मनुस्मृती, ऋग्वेद यातील उदाहरणे देऊन जो स्वत:साठी अन्न शिजवतो तो पापी आणि जो आपल्या भोजनात इतरांना सहभागी करून घेतो तो पुण्यवान असे म्हटले आहे. 'इशा' उपनिषदामध्ये फलाची अपेक्षा न करता अत्यंत निष्ठापूर्वक कार्य करत शंभर वर्षे जगावे असे म्हटले आहे. गीतेच्या तिसऱ्या अध्यायामध्ये जनक राजाने निष्काम बुद्धीने कार्य केल्याचे उदाहरण देऊन, लोकसंग्रहाच्या वृत्तीने कार्य करावे असा उपदेश भगवंतांनी केला आहे. लो. टिळकांनी याचे विवेचन करताना 'लोकसंग्रह' हा शब्द अत्यंत व्यापक अर्थाने वापरला आहे असे म्हटले आहे. लोकसंग्रह याचा अर्थ सर्व मानवजात. त्यांनी योग्य मार्गाने जावे यासाठी आपण स्वत: मानवजातीचा चुकीच्या मार्गाकडे वळून विनाश होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. आपल्या प्रस्तावनेमध्ये टिळकांनी जॉन स्टुअर्ट मिल, स्पेन्सर आणि कांट या प्राश्चात्त्य तत्त्वज्ञांच्या विचारांचा आवर्जून उल्लेख केला आहे. भारताचे भूतपूर्व राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांनी १९११ साली एक प्रबंध प्रसिद्ध केला होता. त्याचा उल्लेख लो. टिळकांनी आपल्या प्रस्तावनेत केला आहे. डॉ. राधाकृष्णन् यांनी जर्मन तत्त्वज्ञ कांट आणि गीता यामधील व्यक्त झालेल्या तत्त्वज्ञानाची तुलना करून त्यामध्ये खूप साम्य असल्याचे प्रतिपादन केले होते. लो. टिळकांनी या प्रबंधाचे स्वागत करून हे साम्य अधिक व्यापक आहे असे म्हटले आहे. इंग्लंडमधील ग्रीन या तत्त्वज्ञावर कांटच्या तत्त्वज्ञानाचा खूप प्रभाव होता. टिळकांच्या मते ग्रीन याने आपल्या ग्रंथात व्यक्त केलेली मते गीतेमधील विचारांशी अधिक जुळणारी आहेत.

गीतेमध्ये 'सर्वभूतदितेरता:' असे म्हटले आहे. यात सर्व प्राणीमात्राचे सुख हा विचार आहे. सुख आणि हित या शब्दामध्ये फरक आहे. अर्जुनाने युद्ध केले नसते तर सर्व सुखी झाले असतेही पण श्रीकृष्णाने जे मानवाच्या हिताचे आहे ते अर्जुनाने करावे आणि युद्धास तयार व्हावे असा उपदेश केला आहे. कर्म नैतिक की अनैतिक

हे ठरविण्यासाठी कर्म करणाऱ्या मानवाची बुद्धी, त्याची वासना आणि त्याचा हेतू याचा विचार करणे आवश्यक ठरते. गीतेमध्ये दानाचे सात्त्विक, राजस आणि तामस असे तीन प्रकार सांगितले आहेत. म्हणूनच कर्मापेक्षा, मनापेक्षा बुद्धी श्रेष्ठ असे गीतेने मानले आहे. जर्मन तत्त्वज्ञ कांट नीतीचा विचार करताना कर्म करणाऱ्या व्यक्तीच्या शुद्ध बुद्धीचा विचार प्रथम करतो. आधिभौतिक दृष्टिकोणातून हर्बट स्पेन्सर याने सुखाचा विचार केला. पण त्याने स्वत:चा स्वार्थ साधणे म्हणजे सुख नव्हेतर स्वार्थत्याग करून दुसऱ्याच्या सुखासाठी झटणे यात खरे सुख असे म्हटले आहे. ॲरिस्टॉटल या ग्रीक तत्त्वज्ञाने हेच मत व्यक्त केले होते. भगवद्‌गीता हा ग्रंथ ग्रीक, जर्मन, इंग्लिश तत्त्वज्ञांचे विचार येण्यापूर्वी अनेक शतके लिहिण्यात आला होता याचा लो. टिळकांनी अभिमानाने उल्लेख केला आहे. कठोपनिषदा मध्ये 'प्रेयस आणि श्रेयस' यांचा उल्लेख आहे. प्रेयस म्हणजे तात्कालिक, क्षणभंगुर सुख, श्रेयस म्हणजे चिरंतन, कल्याणकारी सुख !

भूतपूर्व राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन् यांनी आपल्या गीतेवरील इंग्रजी ग्रंथाच्या प्रस्तावनेत गीतेमध्ये कर्म करण्याचाच प्रमुख संदेश आहे असे म्हटले आहे. हिंदू धर्माने संसारातील, जगातील समस्यांकडे पाठ फिरवली आहे हा एक मोठा गैरसमज आहे असे त्यांनी स्पष्ट केले आहे. हिंदू धर्मातील भक्तांनी गोरगरीब आणि भुकेने तडफडणाऱ्या जनतेकडे दुर्लक्ष करून केवळ ज्ञानसाधना, चिंतन करावे असे म्हणणे म्हणजे सामाजिक समस्यांकडे डोळेझाक करणे ! या जगात चांगल्या प्रकारे जगून, जगाच्या कल्याणासाठी, सुखासाठी झटावे असा गीतेचा-भगवंतांचा आदेश आहे. श्रीकृष्णांनी युद्धाचे समर्थन करण्याच्या उद्देशाने गीता सांगितली नाही. ज्या काळात गीता लिहिली गेली त्या काळात समाजामध्ये अनेक स्थित्यंतरे होत होती. समाजामध्ये बौद्धिक सामाजिक, राजकीय स्तरावर अनेक प्रकारचे संघर्ष चालू होते अशा परिस्थितीमध्ये मानवाला, समाजाला अनिष्ट प्रवृत्तीपासून वाचविण्यासाठी प्रसंगी युद्धाचा मार्ग नाईलाजाने स्वीकारावा लागतो. पण हे कर्म किंवा युद्ध ध्येयवादी वृत्तीने, निष्कामबुद्धीने आणि शत्रूबद्दल अकारण द्वेषबुद्धी न बाळगता करावे लागते. श्रीकृष्णाने मानवाला अनिष्ट, दुष्ट शक्तींपासून वाचविण्यासाठी युद्ध करण्यास अर्जुनाला प्रवृत्त केले.

'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहिण्यासाठी लो. टिळकांनी पाचशेहून अधिक ग्रंथांचे वाचन केल्याचा उल्लेख आहे. प्राचीन संस्कृत ग्रंथांबरोबरच त्यांनी ग्रीक, जर्मन, इंग्लीश तत्त्वज्ञांच्या ग्रंथांचेही वाचन केले. गीतेचा अभ्यास विद्वान पंडितांनी वेगवेगळ्या दिशेने, पद्धतीने केला. पण लो. टिळकांनी 'गीतेच्या' अभ्यासाला एक वेगळी, प्रकाशाची वाट दाखवली. गीतेचा अर्थ समजून घेताना केवळ भारतीय तत्त्वज्ञानाच्या आध्यात्मिक दृष्टिकोनातून पाहू नये. वाचकांनी पाश्चात्त्य तत्त्वज्ञांच्या दृष्टिकोनाचाही विचार करावा असे टिळकांनी आवर्जून सांगितले आहे. हिंदू धर्मातील तत्त्वज्ञांनी कर्म-योगाचा विचार मांडताना नीतिशास्त्राला महत्त्वाचे स्थान दिले आहे. गीतेमधील कर्मयोगाला नैतिक अधिष्ठान देण्यात आले आहे. कर्म तर जीवनात करावेच लागते. पण कोणते कर्म केल्याने स्वतःचे आणि समाजाचे कल्याण साधता येईल याचा विचार गीतेने केला आहे. हिंदू धर्मात नीतिशास्त्राला स्थान नाही असा गैरसमज पसरविण्यात आला होता. लो. टिळकांनी हा गैरसमज दूर केला. अशी उणीव भारतीय तत्त्वज्ञानात नाहीच. उलट गीतेमधील तत्त्वज्ञान प्राश्चात्त्य तत्त्वज्ञानापेक्षा श्रेष्ठ आहे हे टिळकांनी गीतारहस्याद्वारे पटवून दिले. "ज्या शतकात जन्माला आलो त्या शतकाला भूषण ठरेल असा ग्रंथ मी लिहिणार आहे" असे उद्‌गार टिळकांनी काढले होते. विसाव्या शतकाला भूषण ठरेल असाच हा ग्रंथ आहे हे मान्य करावे लागेल.

'गीतारहस्य' प्रसिद्ध होताच तो खरेदी करण्यासाठी वाचकांनी गायकवाड वाड्यासमोर रांगा लावल्या. सर्वांना परवडेल इतके मूल्य. फक्त तीन रुपयांना हा ग्रंथ वाचकांना देण्यात आला. प्रत्येक व्यक्तीला एकच ग्रंथ देण्यात आला. दोन दिवसातच 'गीतारहस्याच्या' सहा हजार प्रती खपल्या. हा ग्रंथ 'इंग्रजीत का लिहिला नाही' असा प्रश्न काही महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी लोकमान्यांना विचारला होता. 'पाश्चात्त्य देशांना कर्मयोग शिकवण्याची गरज नाही. त्यांनी कर्मयोगाचा स्वीकार केल्यामुळेच त्या देशांनी प्रगती केली आहे. आपल्या देशबांधवांनी कर्मयोगाचे महत्त्व जाणले पाहिजे' असे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. हा ग्रंथ लिहिताना लो. टिळकांनी आपल्यापुढे पन्नाशीकडे झुकलेल्या वाचकांची पिढी डोळ्यासमोर ठेवली नव्हती. त्यांची दृष्टी तरुण पिढीवर खिळलेली होती. तरुण पिढीने दैववादी न होता सतत कार्य करण्याचा

ध्यास घ्यावा अशी त्यांची इच्छा होती. कर्मयोग शास्त्राचा उगम लोकहिताच्या भावनेत आहे. समाजाच्या उन्नतीसाठी, उत्कर्षासाठी तरुण पिढीने स्वार्थत्याग करुन, निष्ठेने कार्य करण्यासाठी उद्युक्त हे उद्दिष्ट पुढे ठेवूनच लो. टिळकांनी 'गीतारहस्या'सारखा थोर ग्रंथ तरुण पिढीपुढे ठेवला. त्यांनी तरुणांना "उत्तिष्ठत । जाग्रत । प्राप्यवरानिबोधत" उठा ! जागे व्हा ! भगवंतांनी दिलेला हा वर समजून घ्या हा कठोपनिषदामधील संदेश दिला !

●●●

# १८

# 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे !'

लो. टिळकांची सुटका झाल्यानंतर युरोपमध्ये इंग्लंडने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारल्यामुळे देशातील परिस्थितीत बदल होत होते. टिळकांच्या आगमनामुळे राजकीय क्षेत्रात चैतन्य निर्माण झाले. योगी अरविंद हे जहाल क्रांतिकारक होते. पण त्यांनी पाँडिचरीला जाऊन योगसाधना करण्याचा निर्णय घेतला. मवाळ पक्षाने मोर्ले-मिंटो समितीच्या सुधारणांना संमती देऊन राज्यकर्त्यांना शरण जाण्याचे सौम्य धोरण स्वीकारले होते. अशा या स्थितीत राजकीय जीवन अधिक गतिमान व्हावे, स्वराज्याच्या प्रश्नाला चालना मिळावी असे राजकीय क्षेत्रातील कार्यकर्त्यांना मनापासून वाटत होते. मंडालेच्या तुरुंगात सहा वर्षे काढल्यानंतर लोकमान्यांच्या प्रकृतीमधील फरक त्यांच्या असंख्य अनुयायांना जाणवत होता. शरीरावर, चेहऱ्यावर श्रमाच्या, थकल्याच्या खुणा जाणवल्या तरी त्यांची वृत्ती शांत, संयमी होती. त्यांच्या वृत्तीमधील चैतन्य सर्वांना प्रेरणा देत होते. या प्रसंगी मवाळ आणि जहाल गटांनी एकत्र येऊन देशामध्ये ऐक्याचे वातावरण निर्माण व्हावे असे सर्वांना मनोमनी वाटत होते. लो. टिळकांनी पुण्यात येताच जे जाहीर पत्रक प्रसिद्ध केले त्यामध्ये इंग्रज राज्यकर्त्यांना या युद्धाच्या कठीण काळात संपूर्ण सहकार्य देण्याचे आश्वासन दिले होते. मवाळ आणि जहाल गटाच्या नेत्यांनी एकमेकांमधील मतभेद मिटवून एकाच व्यासपीठावरुन देशाच्या समस्या मांडण्यात येतील असे आश्वासक वातावरण निर्माण केले. ॲनी बेझंट, ना. गोखले यांनीही सकारात्मक भूमिका स्वीकारली. पण याच काळात १९ फेब्रुवारी, १९१५ रोजी ना. गोपाळकृष्ण गोखले यांचे अकाली आणि दुर्दैवी निधन झाले. त्यावेळी त्यांचे वय अवघे एकोणपन्नास होते. लो. टिळक त्यांच्या अंत्ययात्रेला उपस्थित होते.

"ना. गोखले हे देशाचा मौल्यवान हिरा होते. ना. गोखले हे सामान्य कुटुंबातील तरुण त्यांनी स्वत:च्या बुद्धिमत्तेच्या बळावर, अपार कष्ट करुन देशात अनन्य साधारण स्थान प्राप्त करुन घेतले. त्यांनी देशासाठी मोठा स्वार्थत्याग केला आणि देशसेवेला वाहून घेतले." अशा शब्दात लो. टिळकांनी ना. गोखलेंना श्रद्धांजली वाहिली. फेरोजशहा मेथांचे दु:खद निधन झाले. १९१६ साली दोन महत्त्वाच्या घटना घडल्या लो. टिळक आणि मवाळ गट यांच्यामध्ये समेट झाल्याने काँग्रेसमध्ये ऐक्याची भावना निर्माण झाली. याचवेळी टिळकांनी होमरूल लीगची स्थापना केली. आयर्लंडच्या नेत्यांनी होमरूलची मागणी केली होती. त्याच पद्धतीने देशात होमरूलची मागणी करण्यासाठी लीग स्थापन करण्यात आली. ब्रॅ. बॅप्टिस्टा यांनी होमरूलसाठी आग्रह धरावा असे लोकमान्यांना सुचवले. लोकमान्यांनी होमरूलवर आपले लक्ष केंद्रित केले.

बॅ. बॅप्टिस्टा यांनी लो. टिळकांच्या १९०८ च्या खटल्यात मोलाचे साहाय्य केले होते. पुण्यात आयोजित केलेल्या सभेचे अध्यक्ष स्थान बॅ. बॅप्टिस्टा यांनी स्वीकारावे असा त्यांनी निर्णय घेतला. लो. टिळकांना नव्या नेत्यांना संधी द्यायची होती. लो. टिळकांनी बॅ. जिनांना पत्र लिहून 'काँग्रेस कमिटीने होमरूलविषयी निर्णय घ्यावा. बहुमताचा निर्णय आपल्याला मान्य असेल. पण पुन्हा राष्ट्रीय सभा दुभंगली जाऊ नये' असे कळवले.

२३ जुलै, १९१६ रोजी लो. टिळकांचा एकसष्टावा वाढदिवस साजरा करण्यात आला. घरी धार्मिक विधी झाले. मंदिरांमधूनही अभिषेक, वेदपठन करण्यात आले. यानिमित्ताने गोरगरीब रुग्णालयातील गरीब रुग्ण यांना आर्थिक साहाय्य करण्यात आले. कर्नाटक-महाराष्ट्रामधून एक लाख रुपयाचा निधी जमला. लो. टिळकांनी औपचारिकता म्हणून मानपत्र आणि निधी यांचा स्वीकार केला. एक लक्ष रुपयामध्ये आपला स्वत:चा निधी जमा करुन ती रक्कम राष्ट्रीय कार्यासाठी खर्च व्हावी अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. इकडे होमरूलचे निमित्त करून टिळक सरकारविरुद्ध द्वेष पसरवतात असे त्यांच्यावर आरोप ठेवून राजद्रोहाचा त्यांच्यावर आरोप ठेवण्यात आला. आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने कौटुंबिक आणि राजकीय, सामाजिक स्तरावर त्यांचा मानसन्मान होत असतानाच त्यांच्यावर ही नोटीस बजावण्यात आली

टिळकांनी शांतपणे नोटीस स्वीकारली आणि 'हा सरकारचा अहेर आहे' असे सर्वांना सांगितले. लो. टिळकांची बाजू मांडण्याची जबाबदारी बॅ. जिनांनी स्वीकारली. लो. टिळकांनी यात भाग घेतला नाही. सरकारी बॅरिस्टर बिनिंग याने 'सरकारी कारभाराविरुद्ध टिळकांनी भाषणे केली. सरकारविरुद्ध द्वेष पसरवण्याचे कार्य केले' असा आरोप केला. बॅ. जिना यांनी लो. टिळकांची बाजू समर्थपणे मांडली 'सरकार-ब्रिटिशांचे राज्य नष्ट करण्याचा त्यांचा उद्देश नाही. लोकमान्यांची तक्रार सरकार-अधिकाऱ्याविरुद्ध आहे ब्रिटिश सरकारविरुद्ध नाही.' निकाल विरुद्ध लागला. पुन्हा उच्च न्यायालयासमोर हा खटला राहिला. उच्च न्यायालयाने राजद्रोहाचा आरोप काढून टाकला.

काँग्रेसचे पुढील अधिवेशन बेळगाव येथे २९ एप्रिल रोजी भरले, टिळकांवर खटले भरले. त्यांना तुरुंगात डांबले की त्यांची लोकप्रियता कमी होईल असा सरकारचा अंदाज होता. तो मात्र साफ खोटा ठरला. बेळगाव येथील अधिवेशनाच्या अध्यक्षा होत्या ॲनी बेझंट. बेझंट यांच्या विनंतीनुसार लो. टिळकांनी भाषण केले. "होमरूलवर ब्रिटिश सरकारचे नियंत्रण असेल. त्यांच्या सहकार्यानेच होमरूलची संकल्पना साकार करण्यात येईल. सध्याच्या राज्यकारभारामध्ये जनतेच्या हिताच्यादृष्टीने बदल घडवून आणणे हे होमरूलचे उद्दिष्ट आहे. सरकारी अधिकारी कलेक्टरपासून ते शिपायापर्यंत जनतेच्या हिताचे निर्णय घेत नसतील तर त्यांना बदलावे लागेल. असे केल्याने राजद्रोह होत नाही" लो. टिळकांनी आपल्या भाषणात "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' हे प्रसिद्ध वाक्य उच्चारले. "आपला देश आता वयात आला आहे. देश आता सज्ञान आहे. याचा विचार करुन पालकांनी या सज्ञान मुलावर महत्त्वाची जबाबदारी टाकली पाहिजे" अशा सोप्या शब्दात त्यांनी होमरूलची कल्पना श्रोत्यांसमोर मांडली. या विषयावर त्यांनी केसरीमधूनही वेळोवेळी लेखन केले. अहमदनगर जिल्ह्यात त्यांनी होमरूलची कल्पना अधिक स्पष्ट शब्दात मांडली 'स्वराज्य' याचा अर्थ ब्रिटिश राज्यकर्त्यांना हटवले जाईल असा नाही, आपल्या देशातील व्यापार, उद्योग यांच्यामध्ये वाढ व्हावी, जनतेचे अज्ञान, दारिद्र्य नष्ट व्हावे आणि देशात शांती सुबत्ता नांदावी ही स्वराज्यामागील कल्पना आहे. युरोपमध्ये महायुद्धाच्या ज्वाळा भडकत होत्या.

इंग्लंडला सैन्याची गरज होती. इंग्लंड अडचणीत असताना त्यांच्या मदतीस आपण धावून गेले पाहिजे हा विचार टिळकांनी आपल्या भाषणात मांडला. तरुणांनी लष्करात भरती व्हावे असे त्यांनी जाहीर आवाहन केले. त्याचबरोबर ब्रिटिशांनी देशाला राजकीय हक्काचे आश्वासन द्यावे हा विचार स्पष्ट शब्दात त्यांनी आपल्या भाषणांमधून मांडला.

लो. टिळक काँग्रेसच्या बैठकीसाठी दिल्लीला गेले. तेथून ते कलकत्त्याला रवाना झाले. महाराष्ट्राबाहेरही लो. टिळकांचा कीर्तिसुगंध पसरला होता. ते जेथे जातील तेथे त्यांचे दर्शन घेण्यासाठी, त्यांचे व्याख्यान ऐकण्यासाठी गर्दी होत असे. भारतमंत्री मॉंटेग्यू यांना भेटण्यासाठी लोकमान्य दिल्लीला गेले तेव्हा लोकांनी त्यांनी खांद्यावर उचलून नेले. मथुरा, आग्रा ज्या ठिकाणी गाडी थांबेल तेथे त्यांच्या दर्शनासाठी, त्यांना पुष्पहार अर्पण करण्यासाठी लोक उपस्थित असत. टिळकांच्या पायाला जखम झाली होती. त्याचा त्यांना त्रास होत असे. पण सर्व ठिकाणाहून व्याख्यानासाठी पत्रे तारा यांचा पाऊस पडत होता. वऱ्हाड-नागपूर या भागात त्यांनी सोळा दिवसात बत्तीस व्याख्याने दिल्याची नोंद आहे. ते मोटारने प्रवास करीत तेव्हा अहोरात्र त्यांच्या दर्शनासाठी तासन्तास रस्त्याच्या कडेला लोक उभे राहत. 'टिळक महाराज की जय', 'वंदे मातरम्' अशा घोषणांनी संपूर्ण आसमंत दुमदुमत असे.

सरकारतर्फे युद्धामध्ये हिंदुस्थानातील तरुणांनी भाग घ्यावा, लष्करात भरती व्हावे असा प्रचार चालू होता. लो. टिळकांनी सरकारच्या या आवाहनाला पाठिंबा दिला होता. पण त्याचवेळी इंग्रज सरकारने वृत्तपत्रांवर कडक निर्बंध लादण्याचे धोरण अंमलात आणले. लो. टिळकांनी नियमाची अडचण नसेल तर स्वत: रणांगणावर सैनिक म्हणून लढण्याची तयारी दर्शवली. तरुणांनी या संकटप्रसंगी इंग्रजांना साहाय्य केले तर इंग्रज सरकार आमच्या स्वराज्याच्या मागणीला अनुकूल प्रतिसाद देईल अशी आशा लो. टिळकांनी व्यक्त केली. लो. टिळकांनी नाशिक येथे केलेल्या भाषणात 'स्वराज्य हा महत्त्वाचा मुद्दा राहील' असे स्पष्ट केले. मिल या विचारवंताच्या वचनाचा त्यांनी दाखला दिला. "जगातील कोणत्याही राष्ट्राला अन्य राष्ट्रांना गुलामगिरीत ठेवण्याचा अधिकार नाही." आता इंग्रज सरकार आमच्याकडे गुलाम

म्हणून पाहत नाही. आमचा बांधव म्हणून उल्लेख होतो. म्हणून स्वराज्याची मागणी करण्याची हीच वेळ आहे" असे त्यांनी स्पष्ट केले.

इंग्रज सरकारने ॲनी बेझंट यांना अटक करताच देशात संतापाची लाट उसळली. लो. टिळकांनी या अटकेचा कडक शब्दात निषेध केला. बेझंट यांच्या अटकेचा परिणाम स्वराज्याच्या दृष्टीने चांगला झाला. बॅ. जिना, मदन मोहन मालवीय यांच्यासरख्या नेत्यांनी होमरूलला पाठिंबा दिला. मुस्लीम परिषदेनेही बेझंट यांच्या अटकेविरुद्ध आवाज उठवला. सरकारच्या या दडपशाहीविरुद्ध शांततामय पद्धतीने आंदोलन करण्याचा निर्णय नेत्यांनी घेतला. या असहकाराच्या धोरणामुळे देशात नवचैतन्य निर्माण झाले. यापूर्वी 'स्वराज्य' हा शब्द उच्चारणे गुन्हा होता. आता या दडपशाहीविरुद्ध उठाव करण्यासाठी जनता निर्भयपणे सज्ज झाली. लो. टिळकांनी होमरूलसाठी झंझावाती प्रचार सुरु केला. याचवेळी मॉंटेग्यू यांची भारतमंत्री पदावर नियुक्ती झाली. ॲनी बेंझट यांची सुटका झाली. मॉंटेग्यू भारतात येणार असल्यामुळे होमरूलच्या मागणीला भरघोस पाठिंबा मिळू लागला.

२६ नोव्हेंबर, १९१७ रोजी लो. टिळकांच्या नेतृत्वाखाली होमरूलचे शिष्टमंडळ भारतमंत्री मॉंटेग्यू यांना भेटले. टिळकांनी मॉंटेग्यू यांचे हार घालून स्वागत केले. या ठिकाणी लो. टिळकांचा नामवंत, थोर नेता अशा शब्दात गौरव झाला. हिंदुस्थानात याच थोर नेत्याचा प्रभाव अधिक आहे असे त्यांच्या बाबतीत सांगण्यात आले. लो. टिळक आपल्या पोशाखाबाबतीत एरव्ही दक्ष नसत. पण या खास भेटीसाठी त्यांनी परीटघडीचा पोशाख आणि नवा पुणेरी जोडा यांना प्राधान्य दिले. सरकारने सुचविलेला मसुदा, राज्यकारभारातील सुधारणा समाधानकारक वाटल्या नाहीत तर आपण काय कराल ? असा मॉंटेग्यू यांनी प्रश्न केला. 'जे काही मिळेल त्याचा स्वीकार करून अधिक सवलतीसाठी मी प्रयत्नशील राहीन' असे टिळकांनी उत्तर दिले. लो. टिळक हे देशातील सर्वात अधिक लोकप्रिय नेते आहेत. त्यांनी मनात आणले तर ते इंग्लंडच्या युद्धाच्या संकटात सर्वतोपरी मदत करु शकतील' अशी नोंद मॉंटेग्यू यांच्या रोजनिशीत झालेली आहे.

कलकत्ता येथे भरलेल्या कॉंग्रेसच्या अध्यक्षपदी ॲनी बेझंट यांची निवड झाली.

त्यांनी देशाच्या राजकीय आंदोलनामध्ये यावर्षी महत्त्वाची कामगिरी बजावली होती. ॲनी बेझंट यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात होमरूलसाठी प्रखर आंदोलन करावे असे प्रतिपादन केले. भारतमंत्री मॉंटेग्यू यांनी हिंदुस्थानमध्ये जनतेचे सरकार स्थापन करण्यास तयार आहे असे आश्वासन दिले. त्याबद्दल समाधान व्यक्त करणारा ठराव या सभेत मंजूर झाला. लो. टिळकांनी आपल्या भाषणामध्ये मॉंटेग्यू यांच्या घोषणेचे स्वागत करुन त्यांच्या आश्वासनाचा तपशील मुद्देसूद पद्धतीने सभेपुढे मांडला. इंग्रज सरकार लोकनियुक्त सरकार स्थापन करण्यास तयार आहे. याची अंमलबजावणी टप्याटप्याने होणार आहे. ही अंमलबजावणी कशाप्रकारे आणि किती कालावधीत करायची याचा निर्णय इंग्रज सरकार घेईल. लो. टिळकांनी अली बंधूंना तुरुंगात ठेवल्याबद्दल सरकारचा निषेध केला. याप्रसंगी अलीबंधूंच्या माताजींना सन्मानाने व्यासपीठावर बसवण्यात आले होते. लो. टिळकांनी अली बंधूंच्या माताजींचा त्यांनी थोर निर्भय देशभक्तांना जन्म दिल्याबद्दल यथोचित गौरव केला. या अधिवेशनामध्ये प्रारंभापासून ते अधिवेशनाच्या अखेरपर्यंत लो. टिळक केंद्रस्थानी होते आणि त्यांनी सर्व समितींच्या कामकाजामध्ये भाग घेऊन मौलिक मार्गदर्शन केले. या अधिवेशनामध्ये लो. टिळकांच्या पायाची जखम त्यांना खूप वेदना देत होती. "पण देशकार्यात माझे शरीर काम करीत नाही तर मन सतत कार्यरत असते" असे त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

१९१८ च्या जुलै महिन्यात मॉंटेग्यू चेम्सफर्ड यांच्या समितीचा अहवाल भारतात आला. १७० पृष्ठांच्या अहवालाचा लो. टिळकांनी कसून अभ्यास केला. हिंदुस्थानात या अहवालाचा एकमुखाने निषेध करण्यात आला. या अहवालाचे स्वागत करून लो. टिळकांनी या अहवालातील त्रुटींवर नेमके बोट ठेवले. या अहवालात अंदाजपत्रक तयार करणे, लोकनियुक्त सरकारच्या आदेशाचे अधिकाऱ्यांनी पालन करणे, याचा उल्लेख नव्हता. या सुधारणा हळूहळू अंमलात येतील असे आश्वासन अहवालात देण्यात आले होते. सप्टेंबर, १९१८ मध्ये कॉंग्रेसचे खास अधिवेशन मुंबईत भरले. लो. टिळकांनी अध्यक्षपद स्वीकारण्यास नम्रपणे नकार दिला. पण टिळकांनी या अहवालाचा निषेध करताना अत्यंत मुत्सद्दीपणाचे दर्शन घडवले. "आपल्या मागण्या

इंग्रज सरकारने एक टक्का मानल्या आहेत. सरकारी अहवाल अत्यंत मुत्सद्देगिरीने, कौशल्याने तयार केला आहे. आता या एक टक्का आश्वासनाचा स्वीकार करुन आपण होमरूलसाठी सुरु ठेवलेले आंदोलन अधिक प्रखर करु या" असे त्यांनी सभेपुढे निवेदन केले. लो. टिळकांच्या निवेदनाचे सभेत स्वागत करण्यात आले. 'हिंदुस्थानातील जनता राज्यकारभार चालवण्यासाठी समर्थ आहे आणि अहवालामध्ये यासंबंधी केलेल्या मताशी ही सभा सहमत नाही' असा ठराव या सभेत पास करण्यात आला.

●●●

# १९

# चिरोल प्रकरण आणि लोकमान्यांचे इंग्लंडमधील प्रचारकार्य

मंडालेहून परत आल्यानंतर टिळकांनी चिरोल या पत्रकाराने लिहिलेले एक पुस्तक वाचले. चिरोल लंडन टाइम्स चा लेखक. लो. टिळक मंडाले येथे असताना चिरोलने भारताचा दौरा केला. भारतामध्ये झालेल्या असंतोषाचा अभ्यास करण्यासाठी तो इथे आला होता. त्याने आपल्या माहितीच्या आधारे लंडन टाइम्समध्ये स्तंभलेखन केले. नंतर ते लेख पुस्तकरुपाने प्रसिद्ध करण्यता आले. या पुस्तकाला त्याने 'भारतीय असंतोष', 'इंडियन अनरेस्ट' असे नाव दिले. आपल्या पुस्तकामध्ये चिरोलने टिळकांसंबंधी अवास्तव लेखन करून त्यांची बदनामी केली. लो. टिळकांना या लेखकाने त्यांची बदनामी करण्याच्या उद्देशाने लेख लिहिले याची खात्री पटली. त्यांनी लंडनमधील आपल्या वकिलांना चिरोल आणि प्रकाशक मॅक्मिलन यांच्याविरुद्ध फिर्याद दाखल करण्यास सांगितले. चिरोल याने न्यायालयामार्फत काही फोटो, राजद्रोहाच्या आरोपावरुन त्यांना झालेल्या शिक्षा ही माहिती पाठवली. या माहितीच्या आधारे आपण लिहिलेल्या लेखांमुळे लो. टिळकांची बदनामी होत नाही असे चिरोलने सांगितले. या खटल्याच्या निमित्ताने लो. टिळकांना सरकारी गुप्त कागदपत्रे पाहायची होती. पण सरकारने त्यांच्या विनंतीला प्रतिसाद दिला नाही. इंग्लंडमध्ये जाण्यासाठी टिळकांनी आपला नेहमीचा पोशाख बदलला. त्यांनी कोट, पँट आणि बूट या वेषात इंग्लंडमध्ये प्रवेश केला. पण त्यांनी पुणेरी पगडी मात्र काढली नाही. इंग्लंडमध्ये गेल्यानंतर त्यांच्या बॅरिस्टरने हा खटला चालविण्यात अर्थ नाही. निकाल आपल्याविरुद्ध लागेल असे टिळकांच्या निदर्शनास आणले. सर सायमन या ख्यातनाम कायदेपंडिताने

लो. टिळकांची बाजू न्यायालयापुढे मांडली. एकूण अकरा दिवस चाललेल्या या खटल्यामध्ये सर सायमन यांनी लो. टिळकांची बाजू समर्थपणे मांडली. पण चिरोलचे बॅरिस्टर कार्सन यांनी चिरोलची बाजूही आपल्या युक्तिवादाने भक्कम केली. लो. टिळकांना शिक्षा झाली होती. शि. म. परांजपे यांच्यासारख्या त्यांच्या मित्रांना ही शिक्षा झाली होती. काही समुदायाच्या छायाचित्रांत लो. टिळक मध्यभागी होते. समुदायातील एक दोन व्यक्तींनी देशसेवेसाठी चोऱ्या केल्या होत्या. लो. टिळकांना त्या व्यक्तींची नावेही माहीत नव्हती. पण बॅरिस्टरने लो. टिळकांचे असे सहकारी आहेत हे न्यायालयाला पटवून दिले. रँड आणि जॅक्सन यांच्या खुनाशीही टिळकांचा अप्रत्यक्ष संबंध होता हे त्यांनी केसरीमध्ये लिहिलेल्या लेखांच्या आधारे बॅ. कार्सन याने सिद्ध करण्याचा खटाटोप केला. अखेर या खटल्याचा निकाल लो. टिळकांच्या विरुद्ध लागला. या खटल्यासाठी तीन लाखांचा भुर्दंड सहन करावा लागला. इंग्लंड जर्मनीशी युद्ध करीत आहे. या युद्धात इंग्रज सरकारला आपले सहकार्य हवे आहे. त्यामुळे या खटल्याचा निकाल आपल्याविरुद्ध लागणार नाही असा लो. टिळकांचा अंदाज होता. दुर्दैवाने तो खोटा ठरला.

लो. टिळक इंग्रज सरकारचे कठोर टीकाकार होते हे खरे आहे. पण त्यांचा ब्रिटिशांच्या न्यायव्यवस्थेवर गाढ विश्वास होता. ताई महाराज खटल्यात त्यांना प्रिव्ही कौन्सिलने न्याय दिला होता. इंग्लंडमधील 'ग्लोब' या वृत्तपत्रावरील खटलाही त्यांनी जिंकला होता. चिरोल यांने लो. टिळकांच्या राजकीय क्षेत्रातील घटनांचा आधार घेऊन लेख लिहिले होते. या लेखांचे स्वरूपही राजकीय होते. रँड, जॅक्सन यांच्या खुनाशी लो. टिळकांचा सुतराम् संबंध नव्हता हे न्यायालयाने मान्य केले होते. टिळकांनी अनेक प्रसंगी निधी उभारला. पण त्याचे हिशेब चोख ठेवण्याची त्यांनी नेहमी दक्षता घेतली होती. तरीही चिरोलने लो. टिळकांनी राजकीय क्षेत्रात अनेक उलाढाली केल्या आणि त्यांचे चारित्र्यही स्वच्छ नाही असे आपल्या लेखांमधून भासविण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. चिरोलने आपल्या पुस्तकामधून लो. टिळकांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविण्याचा प्रयत्न केला. पण त्यामुळे लो. टिळकांच्या प्रतिष्ठेला, त्यांच्या लोकप्रियतेला आणि जनमानसात असलेल्या त्यांच्या स्वच्छ प्रतिमेला मुळीच

धक्का पोचला नव्हता. शिवाय चिरोलचे हे पुस्तक किती वाचकांनी वाचले होते ? याचे उत्तरही नकारार्थीच द्यावे लागेल. मात्र चिरोलला इंग्रज राज्यकर्त्यांनी सर्व गुप्त कागदपत्रे दाखवून त्याला सहकार्य दिले होते. शिवाय चिरोलला उपयोगी पडेल अशी माहिती देण्याचे आदेश राजकर्त्यांनी सर्व स्तरावरील अधिकाऱ्यांना दिले होते. त्यावेळी लो. टिळक चिरोलविरुद्ध फिर्याद दाखल करतील याची मुंबई येथील सरकारला कल्पना नव्हती. चिरोलने हे पुस्तके मोर्ले यांना अर्पण करून 'सर' हा सन्मान आपल्या पदरात पाडून घेतला. या खटल्याचा तीन लाख रुपयाचा खर्च भागविण्यासाठी लो. टिळकांनी आपला वाडा गहाण ठेवण्याची तयारी केली. पण जनतेनेच उत्स्फूर्तपणे निधी जमा करून या खर्चाची व्यवस्था केली. चिरोल खटल्याच्या प्रतिकूल निकालामुळे लो. टिळक खचून गेले नाहीत. निराशा त्यांच्या मनाला स्पर्श करु शकत नव्हती. यश किंवा अपयश यांची फिकीर न करता देशाच्या भवितव्याचाच विचार करायचा ही त्यांच्या मनाची धारणा होती. उलट अपयशामुळे खचून न जाता पुन्हा जोमाने आपल्या कार्यात स्वत:ला झोकून देण्याची त्यांची वृत्ती होती. इंग्लंडमध्ये टिळकांचे अकरा महिने वास्तव्य होते. चिरोल खटल्यात त्यांचा काही काळ वाया गेला. पण नंतरच्या काळात त्यांनी स्वराज्याच्या प्रयत्नासाठी कंबर कसली. त्यांच्या भाषणबंदीचा हुकूम सरकारने मागे घेतला. याचवेळी युद्ध संपल्याची घोषण झाली. लो. टिळकांनी पंतप्रधानांचे या विषयाबद्दल मन:पूर्वक अभिनंदन केले.

लो. टिळकांनी संसदेच्या संयुक्त समितीपुढे आपली बाजू मांडण्यासाठी पूर्व-तयारी केली. समितीपुढे निवेदन करण्यासाठी होमरूल शिष्ट मंडळामध्ये अनेक नामवंत नेत्यांचा समावेश होता. स्वराज्याचे ध्येय टप्प्याटप्प्याने साध्य करून घ्यावे असा समितीचा सूर होता. 'पण ही मागणी हास्यापद ठरते. आपण आपल्या देशाचे अवमूल्यन करण्यात पुढाकार घ्यायचा का ?' असा लो. टिळकांनी नेत्यांना सवाल केला. यानंतर मात्र सर्व वाटाघाटी लो. टिळकांच्या नेतृत्वाखालीच पार पडल्या. इंग्लंडमध्ये 'ब्रिटिश काँग्रेस कमिटी' होती. 'इंडिया' हे मुखपत्र होते 'इंडिया' या नियतकालिकाने हिंदुस्थानाची बाजू नेहमी प्रभावीपणे मांडली होती. पण ब्रिटिश काँग्रेसची भूमिका अगदीच मवाळ होती. 'इंडिया' या नियतकालिकाद्वारे 'इंडिया' चे

संपादक मि. पोलक यांनी काँग्रेसच्या स्वराज्यासंबंधीच्या ठरावांना प्रसिद्धी दिली नव्हती. लो. टिळकांनी याविषयी खास पत्रके प्रसिद्ध करुन होमरुलच्या मागणीचा तपशील ब्रिटिश जनतेपुढे ठेवला. लो. टिळकांच्या या पुढाकाराबद्दल पोलक यांनी नाराजी व्यक्त केली. पण लो. टिळकांनी त्याकडे दुर्लक्ष केले. हिंदुस्थानातील राष्ट्रीय सभेच्या निर्णयाला संपूर्ण पाठिंबा देऊन त्या कार्याची सविस्तर माहिती ब्रिटिश जनतेपुढे ठेवणे हे ब्रिटिश काँग्रेसचे कर्तव्य आहे, हे टिळकांनी इंग्लंडमधील कमिटीच्या नेत्यांना पटवून दिले.

लो. टिळक इंग्लंडमध्ये स्वराज्याच्या वाटाघाटीमध्ये गुंतले होते. पण त्यांचे हिंदुस्थानात घडत असलेल्या घटनांकडे बारीक लक्ष होते. १९१९ मध्ये रौलट कायदा पास करण्यात आला. त्यामुळे हिंदुस्थानात प्रचंड असंतोष पसरला. गांधीजींनी देशात या जुलमी कायद्याच्या विरोधात हरताळ पाळण्याचे आवाहन केले. या आंदोलनामुळे झालेल्या गोळीबारात आठ निरपराध सैनिकांनी प्राण गमावले. पंजाबमध्ये जालियनवाला बागेत डॉ. सत्यपाल यांनी या विरोधात सभेचे आयोजन केले होते. जनरल डायर या क्रूर अधिकाऱ्याने बेछूटपणे गोळीबार करण्याचे आदेश दिल्यामुळे एक हजार मुले, स्त्रिया आणि पुरुष यांची निघृणपणे हत्या करण्यात आली. या हत्याकांडाबद्दल देशभरात निषेध करण्यात आला. थोर कवी रवींद्रनाथ यांनी या हत्याकांडाचा निषेध करुन 'सर' हा किताब इंग्रज सरकारकडे परत केला. या घटनांबाबत सातत्याने जागरुक राहून लो. टिळकांनी सतत पत्रव्यवहार चालू ठेवला होता. त्यांनी 'केसरी', 'मराठा' मध्ये लेख पाठवून युरोपमधील राजकीय परिस्थितीची जनतेला माहिती दिली. याचवेळी मजूर पक्षाने एका मोठ्या सभेचे आयोजन इंग्लंडमध्ये केले होते. या सभेत रौलट कायद्याचा निषेध करण्यात आला. या प्रसंगी लो. टिळकांनी मजूर पक्षाच्या नेत्यांच्या विनंतीवरुन भाषण केले आणि हिंदुस्थानची बाजू ब्रिटिश जनतेपुढे मुद्देसूदपणे मांडली. लो. टिळकांनी ऑक्सफर्ड आणि केंब्रिज विद्यापीठामध्ये देशातील विद्यार्थ्यांपुढे भाषण केले. त्यांनी या बुद्धिमान तरुणांना देशाच्या सेवेसाठी जीवन सत्कारणी लावावे असे कळकळीचे आवाहन केले. लो. टिळकांनी हिंदुस्थानच्या स्वराज्याच्या प्रश्नाच्या दृष्टीने ब्रिटिश जनतेत आणि विशेषत: राजकीय नेत्यांमध्ये

अनुकूल मत निर्माण करण्यासाठी विशेष परिश्रम केले. त्यांनी मजूर पक्षाला देणगी दिली. बॅ. बॅप्टिस्टा यांच्या सहकार्याने त्यांनी हिंदुस्थानची स्वराज्याची मागणी कशी न्याय्य आहे हे जनतेस पटवून देण्यासाठी अतिशय परिणामकारक भाषेत माहितीपत्रके प्रसिद्ध केली. पॅरिस येथे भरलेल्या शांतता परिषदेच्या अध्यक्षांना निवेदन पाठवून या परिषदेत हिंदुस्थानच्या प्रतिनिधींना भाग घेण्याची संधी द्यावी असे लो. टिळकांनी आवाहन केले. लो. टिळकांनी आपल्या विविध भाषणांमध्ये आम्ही ब्रिटिश सरकारच्या विरोधी मताचे नाही हे स्पष्ट करुन हिंदुस्थानातील जनतेवर सातत्याने अन्याय करणाऱ्या जुलमी नोकरशाहीविरुद्ध आहोत हे वेळोवेळी स्पष्ट केले.

संसदेच्या संयुक्त समितीपुढे होमलीगच्या समितीतर्फे लो. टिळकांनी निवेदन केले. जनतेच्या प्रतिनिधींच्या हाती राज्यकारभार सोपविण्यात इंग्रज सरकारने दिरंगाईचे धोरण स्वीकारू नये. जबाबदार लोकनियुक्त सरकार स्थापन करण्यासाठी इंग्रज सरकारने विशिष्ट काळामध्ये हे धोरण अंमलात आणले जाईल असे आश्वासन द्यावे अशी विनंती लो. टिळकांनी ब्रिटिश संसद समितीच्या अध्यक्षांना केली. टिळकांनी इंग्लंडमधील वास्तव्यामध्ये ऐतिहासिक महत्त्वाच्या प्रेक्षणीय स्थळांना भेट दिली नाही. त्यांनी ब्रिटिश ग्रंथालय आणि हिंदुस्थानच्या कार्यालयातील ग्रंथालय इथे बसून प्राचीन संस्कृतीविषयीची माहिती गोळा करण्यात अधिक रस घेतला. हे त्यांच्या संशोधन वृत्तीला धरूनच होते.

लो. टिळकांनी इंग्लंडमध्ये मजूर पक्षाशी मैत्रीचे संबंध जोडले. त्यांच्या सभेत भाषण केले. निवडणुकीत आर्थिक साहाय्य केले. पण निवडणुकीत मजूर पक्षाला बहुमत मिळाले नाही. मजूर पक्षाचे शंभर उमेदवार निवडणूक जिंकतील अशी अपेक्षा होती पण फक्त त्रेसष्ट उमेदवार यशस्वी झाले. त्यामुळे लो. टिळकांनी मुत्सद्दीपणाने जी पावले टाकली होती ती फोल ठरली. मजूर पक्ष हिंदुस्थानच्या जनतेच्या बाजूने कौल देईल अशा धोरणाने होमरूलच्या समितीच्या सदस्यांनी प्रयत्न केले. अखेर संयुक्त समितीपुढील साक्षींचे काम संपले. त्यानंतर इंग्लंडमध्ये राहण्यात अर्थ नाही हे लो. टिळकांना उमगले. त्यांनी परत मायदेशी जाण्याचा निर्णय घेतला.

●●●

# २०

# अखेरच्या श्वासापर्यंत स्वराज्याचा ध्यास

२७ नोव्हेंबर, १९१९ रोजी लो. टिळकांनी आपल्या मायभूमीत प्रवेश केला. बंदरावर त्यांचे स्वागत झाले. मुंबईत काही संस्थांनी त्यांच्या सन्मानार्थ भोजन आयोजित केले. नेहमीप्रमाणे त्यांचा सरदारगृहात मुक्काम होता. पुण्यातही पुणे नगर परिषदेने त्यांचा सत्कार करुन त्यांना मानपत्र अर्पण केले. १६ डिसेंबर रोजी त्यांचे मद्रास-आग्रा-चेन्नई येथे मोठे स्वागत करण्यात आले. 'लोकनियुक्त सरकारच्या स्थापनेसाठी सर्वांनी प्रचंड चळवळ उभी करावी' असे त्यांनी जनतेला आवाहन केले. कॉंग्रेसच्या बैठकीसाठी त्यांनी अमृतसरला प्रयाण केले. मुंबईत त्यांच्या सन्मानार्थ सर्व रेल्वे स्टेशन फुलांनी सजवले होते. वाटेत प्रत्येक स्टेशनवर त्यांचा सत्कार करण्यासाठी, त्यांचे दर्शन घेण्यासाठी गर्दी होत होती. याचवेळी इंग्रज सरकारने राज्यसुधारणांविषयी जाहीरनामा प्रसिद्ध केला होता. या सरकारच्या धोरणाचे कोणत्या शब्दात स्वागत करावे याविषयी चर्चा झाली. बॅ. बॅप्टिस्टा यांनी 'शक्य तितक्या प्रकारे सहकार्य आणि जेथे आवश्यकता भासेल तेथे विरोध' असा पर्याय सुचवला. अमृतसरच्या सभेत पंजाबमधील क्रूर हत्याकांडाचा तीव्र शब्दात निषेध करण्यात आला. राज्यसुधारणाविषयक जाहीरनाम्याबद्दल सरकारचे आभार मानण्यात आले. तरीही सुधारणा अद्याप अपुऱ्या आहेत असे ठरावात सुचवण्यात आले. याचवेळी पंजाबमधील नेत्यांची सरकारने सुटका केली होती. या नेत्यांच्या स्वागतासाठी जनता मोठ्या संख्येने उपस्थित होती. या सभेत राजकीय क्षेत्रातील आग्रहावरुन गांधीजी आणि लो. टिळक यांच्यामध्ये मतभेद झाले. 'हिंदुस्थानच्या राजकारणाला सत्याचे अधिष्ठान हवे' असे मत गांधीजींनी मांडले. 'राजकीय क्षेत्रात सत्याला स्थान नाही'

असे स्पष्ट मत लो. टिळकांनी दिले. गांधीजी आणि लो. टिळक दोघेही महापुरुष ! गांधीजींनी अखेरपर्यंत सत्यावरील अविचल निष्ठा कायम ठेवली. लो. टिळकांचे मतही त्यांनी अनुभवलेल्या कटू प्रसंगावर आधारित होते इतकेच.

टिळकांनी प्रांतिक सभेच्या निमित्ताने कराची, हैदराबाद, शिकारपूर या सिंध प्रांतातील भागांचा दौरा केला. आपल्या भाषणांमध्ये त्यांनी गांधीजींची सत्याग्रहाची चळवळ कितपत यशस्वी होईल याबद्दल शंका व्यक्त केली. उत्स्फूर्त सहकार्याच्या धोरणापेक्षा सत्याग्रहाचा विचार अधिक प्रभावी ठरतो हे त्यांनी मान्य केले. पण सत्याग्रह चळवळ यशस्वी होण्यासाठी जनतेमध्ये मोठ्या प्रमाणात स्वार्थत्याग करण्याची आणि अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्याची तयारी असली पाहिजे. सत्याग्रह यशस्वी होण्यासाठी तसे वातावरण अद्याप निर्माण झाले नाही असे लोकमान्यांचे मत होते. हे आपले प्रांजळ मत असले तरी म. गांधीजींच्या धोरणाला आपण विरोध करणार नाही. सत्याग्रह चळवळ यशस्वी होण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू असे त्यांनी सभांमधून जाहीर केले.

लो. टिळकांच्या बाबतीत ब्राह्मण ब्राह्मणेतर वाद वेळोवेळी उफाळून येत होता. पुण्यामध्ये त्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. तेव्हा काही ब्राह्मणेतर नेत्यांनी त्याला विरोध दर्शवला. किर्लोस्कर थिएटरमध्ये त्यांचा सत्कार समारंभ चालू असताना अतिशय अनुचित प्रकार घडला. पण चौकशीअंती मवाळ पक्षाच्या विघ्नसंतोषी लोकांनी काही ब्राह्मणेतर नेत्यांना हाताशी धरुन हा प्रकार घडवून आणल्याचे निष्पन्न झाले. बेळगाव येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनामध्ये हा वाद उफाळून आला होता. या सभेत 'आम्ही मुस्लीम आणि हिंदू याच्यामध्ये ऐक्य घडवून आणतो. मग ब्राह्मणेतर समाजाला का दूर ठेवायचे ! आमच्यामध्ये बेबनाव असेल तर त्याचा फायदा उठविण्यासाठी इंग्रज सरकार तत्परतेने प्रयत्न करते. आपण ब्राह्मणेतर समाजाच्या बाजूने आहोत हे त्यांना पटवून देऊ या' असे टिळकांनी मत मांडले. ब्राह्मण सर्व ठिकाणी प्रामुख्याने दिसतात याचे मुख्य कारण ते सुशिक्षित आहेत. सर्वांना शिक्षणाचा लाभ मिळाला पाहिजे. सर्व साक्षर झाले पाहिजेत. ब्राह्मणेतरांनी शिक्षण संपादन केले तर त्यांनाही महत्त्वाची पदे सहज मिळतील. ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर यांच्यामधील फरक स्पष्ट करताना टिळकांनी

सुशिक्षित आणि अशिक्षित या शब्दात तो फरक स्पष्ट केला. एकदा महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्यता निवारण्याच्या विषयावर लो. टिळकांना बोलण्याची विनंती केली. बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड अध्यक्षस्थानी होते. या समारंभास मी 'टिळक' म्हणून उपस्थित राहणार आहे. 'केसरीचा संपादक' म्हणून नाही हेही त्यांनी अगोदरच स्पष्ट केले. या सभेत लो. टिळकांनी आवेशपूर्ण भाषण केले. "अस्पृश्यता देवास मान्य असेल तर मी देवच मानणार नाही." असे आपल्या भाषणाच्या ओघात त्यांनी जाहीर केले. ब्राह्मणांनी अस्पृश्यांवर जुलूम केला हे मान्य पण आता या व्याधीचे समूळ उच्चाटन व्हायला हवे असे ते म्हणाले. लो. टिळकांच्या या उद्गारांचे प्रचंड टाळ्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले. महर्षी शिंदे यांनी जाहीरनाम्यावर सर्वांच्या सह्या घेतल्या. न. चिं. केळकर, दादासाहेब खापर्डे यांनी सह्या केल्या. लो. टिळकांनी महर्षी शिंदे यांना बोलावून आपण सुधारक आहोत हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. पण जाहीरनाम्यावर त्यांनी सही केलीच नाही. नेमकी हीच घटना आज लो. टिळक अस्पृश्यता निर्मूलनाच्या विरोधात होते हे सांगण्यासाठी कारणीभूत ठरते. लो. टिळक सामाजिक सुधारणा चळवळीच्याविरुद्ध होते. त्याचे एकच प्रमुख कारण होते. आपली बुद्धी आणि शक्ती त्यांनी राजकीय क्षेत्रात देशाला स्वराज्य मिळवून देण्यासाठी वेचली. न्या. रानडे यांनी सामाजिक, धार्मिक क्षेत्रात परिवर्तनाचा आग्रह धरला होता. त्याच प्रमाणे ते राजकीय क्षेत्रात स्वातंत्र्यासाठीही प्रयत्नशील होते. न्या. रानडे यांनी आफ्रिका, अमेरिका येथे निग्रोंवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आपण अवाज उठवतो, गोऱ्यांचा निषेध करतो. पण आपल्या देशात आपण अस्पृश्य जनतेला त्याच प्रकारची वागणूक देतो याची आपल्याला खंत वाटत नाही असे सांगून त्यांनी अस्पृश्यता नष्ट झाली पाहिजे या विचारांचा जोरदार पुरस्कार केला होता. गोपाळ गणेश आगरकर तर प्रखर बुद्धिवादी होते. त्यांनी देव, धर्म, धार्मिक, सामाजिक रुढी याविरुद्ध घणाघाती प्रचार केला. गांधीजींनी अस्पृश्यता निवारण्यासाठी खंबीर पावले उचलली होती. त्यांनी आश्रमात एका दलित दांपत्याला ठेवून घेतल्यामुळे जनतेत प्रक्षोभ झाला होता. तरीही म. गांधींनी त्या दांपत्याला ठेवून घेतले. त्यांनी हरिजनांच्या साहाय्यासाठी 'हरिजन सेवक संघा'ची स्थापना केली. भारतरत्न बाबासाहेब आंबेडकरांनी गांधीजींच्या या अस्पृश्यता निवारणाच्या

धोरणाबद्दल संशय आणि अविश्वास व्यक्त केला होता. "अस्पृश्यता निवारणाच्या आपल्या कार्यामध्ये हिंदू समाजाचा रोष ओढवला जाऊ नये याची गांधीजींनी सदैव दक्षता घेतली. अस्पृश्यतेविरुद्ध गांधीजींनी प्रवचने झोडली पण त्यासाठी त्यांनी सत्याग्रह केला नाही आणि उपोषणही केले नाही. जेव्हा अस्पृश्यनेत्यांनी दलितांना मंदिरात प्रवेश मिळावा, सार्वजनिक विहिरीवर पाणी भरण्याची परवानगी द्यावी यासाठी सत्याग्रह केला तेव्हा गांधीजींनी या सत्याग्रहास पाठिंबा दिला नाही. उलट सत्याग्रहाचे हत्यार हे इंग्रज राज्यकर्त्यांविरुद्ध वापरायचे असते, आपल्याच देश-बांधवांविरुद्ध सत्याग्रह करणे योग्य नाही असा युक्तिवाद केला. गुजराथमधील एका खेड्यात अस्पृश्यांच्या मुलांना शाळेत प्रवेश नाकारला म्हणून त्यांच्या पालकांनी आंदोलन केले. लगेच गावकऱ्यांनी त्यांच्यावर बहिष्कार घातला. त्यांना धमक्या दिल्या. अखेर अस्पृश्य समाजाने ते गाव सोडण्याचा निर्णय घेतला. या घटनेविरुद्ध 'गांधीजींनी निषेध नोंदवला नाही. आपल्या अनुयायांना हस्तक्षेप करण्याचा आदेश दिला. उलट गाव सोडणाऱ्या अस्पृश्यांनी गाव सोडून स्वावलंबी होण्याचा निर्णय घेतल्याबद्दल त्यांच्या निर्णयाचे स्वागत करून ईश्वर तुमच्या पाठीशी आहे असे गांधीजींनी सांगितले.' भारतरत्न डॉ. आंबेडकरांनी गांधीजींच्या धोरणाबद्दल आपल्याला अविश्वास का वाटतो हे पटवून देण्यासाठी यासारखी अनेक उदाहरणे दिली आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९४५ साली प्रसिद्ध झालेल्या ग्रंथामध्ये गांधीजींचे धोरण केवळ भूतदयावादी होते समाजामध्ये समता, बंधुता आणि स्वातंत्र्य प्रस्थापित करण्यासाठी नव्हते हे स्पष्ट केले आहे. लो. टिळकांनी १९२० साली जाहीरनाम्यावर सही केली नाही. पण पंचवीस वर्षांनंतरही गांधीजींसारख्या नेत्याविरुद्ध तेच आक्षेप नोंदवले जात होते हे लक्षात घेण्यासारखे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गांधीजींनी फक्त स्वराज्यावर लक्ष केंद्रित केले होते असे म्हटले आहे. लो. टिळकांच्या बाबतीत हेच म्हणता येईल. लो. टिळकांनी आपण सामाजिक सुधारणेला अग्रक्रम का देत नाही याची तर्कशुद्ध मीमांसा वेळोवेळी केली होती. एकूण लो. टिळकांनी किंवा म. गांधींसारख्या नेत्यांनी अस्पृश्यता समस्येचा बुद्धिवादी किंवा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार केला नव्हता हे स्पष्ट होते. या दोन्ही थोर नेत्यांनी स्वराज्य संपादन करणे हेच प्रमुख ध्येय मानले होते.

अमृतसर येथे झालेल्या ठरावाच्या आधारे लो. टिळकांनी होमरूल लीगच्या सभेमध्ये ठरल्याप्रमाणे काँग्रेसने लोकशाहीपक्ष अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरु केले. ॲनी बेझंट यांनी या लीगमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला होता. गांधीजींनी होमरुल लीगचे अध्यक्षपद स्वीकारले पण त्यांचा या लीगच्या धोरणाबद्दल भ्रमनिरास झाला होता. गांधीजींनी "स्वदेशी हिंदू-मुस्लीम ऐक्य, हिंदी ही राष्ट्रभाषा आणि भाषावार प्रांतरचना" या सुधारणांना प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला. त्यांनी काँग्रेस पक्ष हा खऱ्या अर्थाने राष्ट्रीय पक्ष व्हावा असे मत व्यक्त केले. होमलीगच्याद्वारे आपल्याला अहिंसा सत्य आणि असहकार या तत्त्वानुसार सत्याग्रह करण्याचा मार्ग खुला नसेल अशी भीती व्यक्त केली. लो. टिळकांनी काँग्रेस लोकशाही पक्षाचे धोरण विशद करताना जातीव्यवस्था, चालीरीती यासारखे निर्बंध दूर करुन, धर्मनिरपेक्ष विचाराने प्रेरित होऊन कार्य करण्याचे या पक्षाचे धोरण राहील हे स्पष्ट केले. हिंदुस्थानातील जनता स्वतंत्र राज्यसरकार स्थापन करण्यास समर्थ आहे. मॉंटेग्यू सुधारणा कायद्यातील तरतुदी अपुऱ्या आणि असमाधानकारक आहेत. आपल्या मागण्या मान्य करुन घेण्यासाठी इंग्लंडमधील संसदेच्या मजूर पक्षाचे, तसेच आपल्या देशाच्या मागण्याबद्दल सहानुभूती व्यक्त करणाऱ्या नेत्यांचे सहकार्य घेऊन आणि "प्रबोधन, संघर्ष आणि संघटना" या मार्गाने यापुढे या पक्षातर्फे आंदोलन चालू ठेवण्याचा निर्धार लो. टिळकांनी व्यक्त केला.

२२ मे, १९२० रोजी लो. टिळकांचा भव्य सत्कार करण्यात आला. या प्रसंगी त्यांना तीन लक्ष रुपयांची थैली अर्पण करण्यात आली. या सभेत टिळकांनी आपल्या स्वराज्याविषयीच्या कल्पना सभेपुढे मांडल्या. राजकीय सुधारणा हा एक महत्त्वाचा टप्पा असून आपले अंतिम ध्येय संपूर्ण स्वराज्य आहे हे त्यांनी या सभेत सांगितले या सभेत आता आपली शरीरप्रकृती नेहमीप्रमाणे साथ देत नसून यापुढे राजकीय क्षेत्रात सक्रिय भाग घेणे आपल्याला शक्य होणार नाही असे सूचक उद्‌गार त्यांनी काढले. २७ मे, १९२० रोजी त्यांनी बनारस येथील अखिल भारतीय काँग्रेसच्या सभेत भाग घेतला. त्या सभेत गांधीजींनी असहकाराच्या धोरणाचा जोरदार पुरस्कार केला. बनारसहून परत आल्यानंतर टिळकांनी जगन्नाथ महाराजांच्या दत्तक पुत्राच्यावतीने बाबा महाराज आणि छत्रपती शाहू महाराज यांच्यावतीने अर्ज केला. तो मंजूर

करण्यात आला. ताई महाराज प्रकरणात केवळ आपल्या मित्रांना साहाय्य करण्याच्या उद्देशाने लो. टिळकांनी लक्ष घातले. विघ्नसंतोषी लोकांनी अनेक विघ्ने आणली. अखेरीस या प्रकरणात लो. टिळकांनी घेतलेल्या न्याय्य भूमिकेचा विजय झाला !

जुलै महिन्यात लो. टिळकांचा सरदारगृहात मुक्काम होता. सरदारगृहात गांधीजी आणि शौकत अली यांनी त्यांची भेट घेतली. या भेटीत गांधीजींच्या असहकाराच्या धोरणाबाबत सविस्तर चर्चा झाली. २० जुलै रोजी सायंकाळी बाहेर पाऊस होता. लो. टिळकांची प्रकृती ठीक नव्हती. तरीही या हवेत बाहेर जाऊन त्यांनी दिवाण चमणलाल यांच्याबरोबर असहकाराच्या धोरणाबद्दल दोन तास चर्चा केली. असहकाराचे धोरण जाहीर झाले तर सर्व स्वातंत्र्य सैनिकांनी या संग्रामात धडाडीने उडी घेतली पाहिजे असे लो. टिळकांनी आपले मत व्यक्त केले. बाहेर फिरण्याचा लोकमान्यांच्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम झाला. त्यांच्या आजाराचे पर्यवसान न्यूमोनियामध्ये झाले. २८ जुलै रोजी त्यांची शुद्ध हरपली. या अवस्थेमध्ये त्यांच्या मुखातून स्वातंत्र्यलढ्याच्या प्रमुख घटनांचा उल्लेख येत होता. त्यांना सारख्या उचक्या येत होत्या. फुफ्फुस, कोठा यांना सूज आली होती. त्यामुळे हृदयावर अधिक दाब पडला. लो. टिळकांची मनोभावे सेवा करणारे डॉ. साठे आणि डॉ. देशमुख त्यांचे निस्सीम भक्त होते. त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. बेशुद्ध अवस्थेत लो. टिळकांनी देशाच्या भवितव्याविषयी चिंता व्यक्त केली. त्यांनी आपल्या कुटुंबीयांबद्दल एकही शब्द उच्चारला नाही. ३१ जुलैपर्यंत त्यांची नाडी मंद होती. अखेर एक ऑगस्टच्या पहाटे त्यांची प्राणज्योत मालवली ! त्यांच्या महानिर्वाणामुळे देशाच्या स्वातंत्र्यसंग्रामाच्या तेजस्वी इतिहासातील एका महापर्वाची समाप्ती झाली !

लो. टिळक निवर्तल्याचे वृत्त देशभरात पसरले. जनता शोकाकुल झाली. लो. टिळकांचे पुण्यातच वास्तव्य होते. तेव्हा अंत्यसंस्कार पुण्यात व्हावे असे अनेकांना वाटले पण त्यांचे अंत्यसंस्कार मुंबईतील चौपाटीवर व्हावे असा निर्णय घेण्यात आला. आपल्या आवडत्या नेत्याचे अखेरचे दर्शन घेण्यासाठी पुण्यासह अनेक ठिकाणाहून लोकांनी धाव घेतली. दिवस पावसाचे. पण पाऊसपाण्याची पर्वा न करता हजारो नागरिक या अंत्ययात्रेत सहभागी झाले. म. गांधी, पं. नेहरु, शौकत अली,

डॉ. किचल्स् असे अनेक नेते उपस्थित होते. पं. नेहरु, म. गांधी, शौकत अली या नेत्यांनी लोकमान्यांचे पार्थिव वाहनापर्यंत नेण्याची जबाबदारी पार पाडली. चौपाटीवर अंत्यविधी पार पाडण्यास सरकारने खास परवागनी दिली. लोकमान्यांच्या पार्थिवावर अग्निसंस्कार करण्यात आले तेव्हा पश्चिमेला सूर्यास्त होत होता. लो. टिळक देशाच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक क्षेत्रात सूर्याप्रमाणे तळपले. आकाशात प्रखर प्रकाशाने तळपणाऱ्या सूर्याचा अस्त होत असतानाच लो. टिळकांनी सर्वांचा अखेरचा निरोप घेतला. हजारोच्या संख्येने उपस्थित असलेल्या नागरिकांनी अश्रुपूर्ण नेत्रांनी आपल्या आवडत्या नेत्याला मूक श्रद्धांजली वाहिली. लोकमान्यांनी निर्भय आणि नि:स्वार्थी वृत्तीने आणि प्रखर ध्येयवादाने आपल्या पवित्र अंत:करणात क्रांतिज्योत सदैव प्रज्वलित ठेवली होती. आता ही क्रांतिज्योत त्याच्या पार्थिव देहापासून मुक्त होऊन देशातील असंख्य देशभक्तांच्या अंत:करणात प्रकाशित झाली. या थोर नेत्याचे देहावसान झाले आणि देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील असहकाराच्या आणि सत्याग्रहाच्या नव्या तेजस्वी पर्वाचा प्रारंभ झाला !

●●●

# २१

# निष्काम, ध्येयवादी वृत्तीची आज नितांत गरज

सुप्रसिद्ध अमेरिकन इतिहास संशोधक, लेखक कार्ल सांडबर्ग यांनी अमेरिकेचे थोर नेते अब्राहम लिंकन यांच्या चरित्राचे संशोधन करून त्यांचा पत्रव्यवहार, भाषणे आणि जीवनचरित्र यांचे अनेक खंड प्रसिद्ध केले आहेत. त्यांनी थोर नेत्यांच्या जीवनचरित्राचे स्मरण किती प्रेरणादायी ठरते हे सांगण्यासाठी काव्यमय भाषेत उदाहरणे दिली आहेत. या थोर अलौकिक नेत्यासंबंधी आपल्याला अनेक कथा परिचयाच्या असतात. त्यांच्यासंबंधी नवीन काहीच सांगण्यासारखे नसते. सूर्यकिरणांच्या प्रकाशात चमचमणाऱ्या शुभ्र बर्फाचे मुकुट धारण करणारी पर्वतशिखरे शतकानुशतके तशीच आहेत. अथांग सागराच्या लाटा सातत्याने उसळून मानवाच्या धैर्याला, प्रयत्नशीलतेला सतत आव्हान करीत आहेत, आकाशात चमकणाऱ्या असंख्य तारका आपण नेहमी डोळे भरून नेहमी पाहतो. ही निसर्गाची विलोभनीय दृश्ये आपण पाहतो तेव्हा आपल्या मनात दाटलेले नैराश्य, अंत:करणातील अस्वस्थ करणारे दु:ख केव्हाच नाहीसे होते आणि ही दृश्ये आपल्याला पुन्हा नव्या उमेदीने, आत्मविश्वासाने जगण्याचे बळ देतात. लोकमान्य टिळकांसारख्या लोकोत्तर नेत्याच्या जीवनचरित्राकडे दृष्टिक्षेप टाकल्यास आपल्याला हाच सुखद अनुभव येतो. त्यांचे पुण्यस्मरण स्फूर्तिदायक ठरते.

लो. टिळकांचे महानिर्वाण होऊन आता नव्वद वर्षांचा काळ लोटला आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विज्ञानामुळे विशेषत: संगणकाने केलेल्या क्रांतीमुळे जगातील आर्थिक व्यवहारांना, ज्ञानसंपादन करण्याच्या प्रक्रियेला विलक्षण गती लाभली. वैश्विक अर्थव्यवस्थेमुळे जीवनाचा पोतच बदलून गेला. जीवनात

लौकिकदृष्ट्या प्रगती करण्यासाठी जीवघेण्या स्पर्धेमध्ये तरुणांना उतरण्यासाठी सज्ज व्हावे लागते. या स्पर्धेत उतरण्यासाठी आणि स्पर्धेत टिकण्यासाठी व्यक्तीच्या अंगभूत सद्‌गुणांपेक्षा त्याच्या बाह्य रुपालाच महत्त्व प्राप्त झाले. आकर्षक व्यक्तिमत्त्व, संभाषण कौशल्य, अद्ययावत पोशाख यांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले. अद्ययावत कपडे परिधान करणाऱ्या आकर्षक व्यक्तिमत्त्वाच्या पुरुषाचा 'परिपूर्ण पुरुष' ('परफेक्ट मॅन') या शब्दांत जाहिरातींमधून गौरव होतो. लौकिक यश हेच जीवनाचे उद्दिष्ट अशी समजूत समाजात रुजत चालली आहे. विशेषत: लौकिक यशाच्या मागे लागण्याच्या या वाढत्या प्रवृत्तीमुळे सामाजिक प्रश्नांकडे पाठ फिरविण्याची वृत्ती समाजात बळावत आहे. ध्येयवाद, त्याग, शुद्ध आणि पवित्र अंत:करण, समाजाच्या हितासाठी स्वत:ला झोकून देण्याची वृत्ती अभावानेच पाहायला मिळते. अशा या पार्श्वभूमीवर लो. टिळकांच्या समर्पित जीवनाकडे, त्यांनी समाजासाठी, देशासाठी भोगलेल्या कारावासाकडे आणि निष्कामवृत्तीने केलेल्या अजोड सामाजिक, राजकीय कार्याकडे दृष्टिक्षेप टाकून आज अंतर्मुख होण्याची नितांत गरज निर्माण झाली आहे.

लो. टिळकांच्या काळात महाविद्यालयीन शिक्षणक्रम पूर्ण करून इंग्रज सरकारच्या पदरी इमानाने नोकरी करणारा तरुण वर्ग होता. पण आपल्याला उच्च शिक्षणाचा लाभ होतो तो जनतेने कररुपाने भरलेल्या पैशातून, जनतेच्या पैशातून आपण शिक्षण घेतो मग जनतेचे ऋण फेडण्याची जबाबदारी आपल्यावर आहे अशी जाणीव किती तरुणांमध्ये दिसून येते ? लो. टिळकांनी अशा उदात्त दृष्टिकोनातून आपल्याला लाभलेल्या उच्च शिक्षणाचा विचार केला होता. देशसेवेला वाहून घेण्याची प्रतिज्ञा त्यांनी आपल्या महाविद्यालयीन जीवनातच केली. 'ज्या देशात हजारांमधून निदान काही तरुण देशसेवा, समाजसेवा याचा ध्येयवादी वृत्तीने विचार करीत नाहीत तो देश जिवंत असला तरी मेल्याप्रमाणेच आहे' असे त्यांनी मत व्यक्त केले होते. लो. टिळकांनी सामाजिक, राजकीय आणि पत्रकारितेच्या क्षेत्रांत जे संस्मरणीय कार्य केले ते व्रत म्हणून केले. व्रतामध्ये कर्तव्यनिष्ठेची, त्यागाची आणि नि:स्वार्थी वृत्तीने कार्य करण्याची भावना असते. या क्षेत्रात व्यवसाय म्हणूनही कार्य करता येते. पण व्यवसायामध्ये नीतिमत्तेचा विचार प्रामुख्याने होतो. व्यवसायामध्ये नीतिमत्तेचे

भान सुटले की व्यक्तीची, समाजाची नैतिकदृष्ट्या घसरण सुरू होते. लो. टिळकांच्या व्रतस्थ वृत्तीला ध्येयवादाचे, नैतिक आणि आध्यात्मिक मूल्यांचे भक्कम अधिष्ठान लाभले होते. 'गीतारहस्य' हा महान ग्रंथ त्यांनी आपल्या जीवनाच्या अखेरच्या पर्वात लिहिला. पण त्यांनी गीतेची केवळ पारायणे केली नाहीत तर गीतेचा संदेश आपल्या अंत:करणात झिरपेल आणि त्या संदेशाप्रमाणे आपले जीवन असेल याची त्यांनी अखेरपर्यंत प्राणपणाने दक्षता घेतली.

लो. टिळकांनी बी.ए., एल्एल्.बी. या पदव्या प्रथम श्रेणीमध्ये संपादन केल्या होत्या. त्यांचे इंग्रजी, मराठी आणि संस्कृत या भाषांवर प्रभुत्व होते. त्यांचा कायद्याचा सखोल अभ्यास होता. न्या. रानड्यांसारख्या विचारवंतांनी त्यांच्या कायद्याच्या ज्ञानाची प्रशंसा केली होती. त्यांना इंग्रज सरकारच्या राज्यकारभारात मानाची नोकरी सहज मिळाली असती. पण त्यांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या प्रलोभनांकडे पाठ फिरवून अल्प वेतनात काम करुन शिक्षणसंस्था स्थापन केल्या. ख्रिस्ती धर्मातील ज्येसुइट पंथाच्या धर्मगुरूंचे उदाहरण समोर ठेवून साधी राहणी आणि अविरत परिश्रम या पद्धतीने काम करण्याचा त्यांनी निर्धार केला. "आपला देश पारतंत्र्यामध्ये आहे. देशातील तरुण पिढीचा लौकिक, नैतिक आणि धार्मिक दृष्टिकोनातून उत्कर्ष साधण्यासाठी त्यांना चांगले शिक्षण देऊन त्यांच्यावर सुसंस्कार करण्याची गरज आहे. या पद्धतीच्या शिक्षणामुळेच आपल्या मागासलेल्या देशाची प्रगती होऊन देशाला पाश्चात्त्य राष्ट्रांच्या तुलनेने मानाचे स्थान प्राप्त होईल" असा प्रगल्भ दृष्टिकोण लो. टिळकांनी शिक्षणसंस्था स्थापन करताना आपल्यासमोर ठेवला होता.

लो. टिळकांचे व्यक्तिमत्त्व चतुरस्र होते. ते विद्याव्यासंगी होते. ते थोर संशोधक होते. ते कायदे पंडित होते. या कोणत्याही क्षेत्रात त्यांनी आपल्या जीवनात कार्य केले असते तरी त्यांना उदंड कीर्ती आणि मानसन्मान यांचा लाभ झाला असता. त्यांच्या प्रचंड विद्याव्यासंगाला मराठी, इंग्रजी आणि संस्कृत भाषेवरील प्रभुत्वाची जोड लाभली होती. त्यांनी 'केसरी' आणि 'मराठा' या नियतकालिकांचे संपादन करण्याची जबाबदारी केवळ समाज आणि देशहिताच्यादृष्टीने स्वीकारली होती. ग्रंथलेखनामुळे लाभणारी कीर्ती चिरकाल टिकणारी असते. वृत्तपत्र लेखनाचे स्वरुप तात्कालिक

असते. तरीही एक राष्ट्रीय, सामाजिक कर्तव्य म्हणून लो. टिळकांनी 'केसरी', मराठामध्ये सातत्याने लेखन केले. त्यांनी लेखनासाठी राजकारण, समाजकारण आणि अर्थकारण हे विषय निवडले. जनतेत देशाभिमान नाही. इंग्रज राज्यकर्ते जनतेवर जुलूम करतात पण त्या अन्यायाविरुद्ध चीड नाही. स्वावलंबन आणि आत्मविश्वास यांचा जनतेमध्ये अभाव आहे. स्वाभिमान, निष्काम समाजसेवा आणि स्वावलंबन या गुणांचे महत्त्व जनतेला पटवून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य लो. टिळकांनी पत्रकार या नात्याने हाती घेतले. त्या काळात विद्वान होते. पण ते क्रियाशील नव्हते. अनेक विषयांवर विचारमंथन करून लो. टिळकांनी ते ज्ञान जनतेपर्यंत पोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्या काळात केले. लो. टिळकांनी लिहिलेल्या विषयाचे स्वरुप गंभीर होते. पण त्यांनी अतिशय सुबोध, सरळ आणि प्रासादिक शैलीत लेखन केले. त्यांच्या लेखनामधून समाजाच्या उन्नतीबद्दल वाटणारी तळमळ, राज्यकर्त्यांकडून होणाऱ्या जुलमाबद्दल वाटणारा प्रचंड संताप व्यक्त होत असे. राजकर्त्यांविरुद्ध अत्यंत परखड भाषेत लेखन करून त्यांच्या जुलमी राजवटीची लक्तरे लो. टिळकांनी वेशीवर टांगली. त्या लेखनाबद्दल त्यांना प्रथम सहा महिने, नंतर दीड वर्षे आणि अखेरीस सहा वर्षे तुरुंगवास भोगावा लागला. पण त्यांनी आपल्या तेजस्वी लेखणीची आणि वाणीची धार कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीत, बोथट होऊ दिली नाही. लेखनासाठी त्यांच्याकडे कार्यालय, टेबल, खुर्ची असे साहित्य नव्हते. घरीच वळकटीचा आधार घेऊन लेखन करायचे. रात्रीच्या वेळी मिणमिणत्या दिव्याच्या प्रकाशात लेखन करायचे अशी परिस्थिती. पण प्रखर बुद्धिमता. अंत:करणात प्रज्वलित झालेली देशाच्या स्वातंत्र्याची ज्योत आणि ध्येयवादी वृत्ती यामुळे त्यांच्या लेखनातील प्रत्येक शब्दामागे नि:स्पृह, निर्भय कर्मयोग्याची साधना होती. पुण्यात अन्य वृत्तपत्रे नव्हती असे नाही. पण 'केसरी'ची कीर्ती वाढत गेली. केसरी आणि लो. टिळकांचे विचार घरोघरी पोचले. केसरीच्या लेखांच्या, संपादकीयाचे मथळे आजही टिळकांच्या परखड लेखनाची आणि निर्भय वृत्तीची साक्ष देतात. 'राज्य करणे म्हणजे सूड उगवणे नाही.' 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय ?' 'राजद्रोह कशाला म्हणतात?' 'पुनश्च हरि: ॐ', 'ते आमचे गुरु नव्हेत !'. 'भ्रमाचा भोपळा फुटला,' 'देशाचे दुर्दैव,' हे उपाय टिकाऊ नाहीत' 'बॉम्बगोळ्याचे रहस्य'- इंग्रजांसारख्या परकीय राज्यकर्त्यांविरुद्ध इतक्या परखडपणाने लिहून

लो. टिळकांनी त्यांचा अनेकवेळा रोष ओढवून घेतला. पण भीतीपोटी त्यांनी केव्हाही अन्यायाविरुद्ध राज्यसरकारला जागे करण्याच्या या पवित्र कार्यात कसूर केली नाही. त्यांनी अखेरपर्यंत या जुलमी राज्यकर्त्यांविरुद्ध लेखणी, वाणीद्वारे कडवी झुंज दिली. त्यांच्या लेखांची संपादकीयांची शीर्षके याची आजही साक्ष देतात. भारताला स्वातंत्र्याचा लाभ होऊन आता साठ वर्षांहून अधिक काळ लोटला आहे पण आजही संपादकांना आपल्याच सरकारपुढे जनतेचे गाऱ्हाणे मांडण्यासाठी लो. टिळकांच्या या शीर्षकांचा आधार घ्यावा असे वाटते.

१८९६-९७ साली लो. टिळकांनी स्वदेशीची चळवळ खेड्यांतील शेतकऱ्यांपर्यंत पोचवली. त्यांना कायद्याच्या मर्यादेत राहून प्रत्यक्ष प्रतिकार करण्यास लो. टिळकांनी प्रवृत्त केले. नागरी भागातील मध्यम वर्गामध्ये इंग्रज सरकारच्या जुलमी कायद्याचा प्रतिकार करण्यासाठी त्यांनी प्रचार केला. मध्यमवर्गाला यासाठी त्यांनी संघटित केले. परदेशी कापडावरील जकात कमी करून सरकारे स्वदेशी कापडावरही तेवढीच जकात बसवली. लो. टिळकांनी ठिकठिकाणी या विषयावर अभ्यासपूर्ण प्रबोधनपर लेखन करून सर्वस्तरावर जागृती केली. सरकारकडे कोणतीही मागणी करताना त्या मागणीमागे जनतेची प्रचंड शक्ती उभी आहे याची सरकारला खात्री पटली पाहिजे. जनतेला संघटित करण्यासाठी जनतेत आणि जनतेचे नेतृत्व करणाऱ्या नेत्यांमध्ये स्वार्थत्याग, धैर्य आणि निर्भयवृत्ती हे गुण वसत आहेत याची प्रचिती जनतेला आली पाहिजे हे लोकमान्यांचे महत्त्वपूर्ण विचार होते. या विचारसरणीचे अधिष्ठान देऊन या विचारसरणीचा आग्रह धरण्याचे आणि ही विचारसरणी राष्ट्रसभेच्या कार्यपद्धतीत समाविष्ट करण्याचे पहिले श्रेय लोकमान्यांना द्यायला हवे. 'केसरी वृत्तपत्र हे स्वदेशी चळवळीचा ज्ञानकोश होते' अशा शब्दात सुप्रसिद्ध लेखक, पत्रकार श्री. शि. म. परांजपे यांनी केसरीचा आणि लो. टिळकांच्या कार्याचा गौरव केला होता.

लो. टिळकांनी जनजागृतीसाठी केवळ भाषणे आणि अभ्यासपूर्ण लेखन केले नाही. जनजागृतीबरोबरच जनतेला स्वराज्याच्या चळवळीमध्ये सामील करून घेण्यासाठी त्यांनी अभिनव उपक्रम हाती घेतले. त्यांना सामाजिक परिस्थितीची आणि जनतेच्या मानसिकतेची पूर्ण जाणीव होती. जनतेच्या कल्पनाशक्तीला भावेल

आणि त्यांच्या अंत:करणाला भिडेल अशा योजना त्यांनी वेळोवेळी हाती घेतल्या. इंग्रज सरकार राज्यकर्ते होते. पण त्याचबरोबर इंग्रजांनी औद्योगिक, वैज्ञानिक क्षेत्रात नेत्रोद्दीपक प्रगती केली होती. त्यामुळे सामान्य जनतेच्या मनामध्ये न्यूनगंडाची भावना निर्माण झाली होती. न्या. रानडे यांनी संस्था स्थापन केल्या. राष्ट्रीय काँग्रेसच्या व्यासपीठावरून जनतेचे प्रश्न मांडण्याची सोय झाली. पण या संस्था स्थापन करताना न्या. रानडे यांच्यासारख्या विचारवंत नेत्यापुढे पाश्चात्त्य देशातील संस्था होत्या. या संस्थांमध्ये सहभागी होणारा समाज उच्चवर्णीय आणि उच्चविद्याविभूषित होता. त्यामुळे अशा संस्था स्थापन करण्यामागील विचार आणि या संस्थांच्याद्वारे होणारे कार्य याची सामान्य जनतेला माहिती नव्हती. लो. टिळकांना या परिस्थितीचे अचूक भान होते. स्वराज्याचे विचार सामान्य जनतेत रुजण्यासाठी, स्वराज्याच्या चळवळीत त्यांना सहभागी करून घेण्यासाठी जनतेपुढे वेगळे कार्यक्रम कल्पकतेने आयोजित करण्याचा विचार देशामध्ये प्रथम लो. टिळकांनी केला. इथेही त्यांनाच पहिले श्रेय द्यावे लागते. १८९४ साली राजकारणात नवी शक्ती निर्माण करण्यासाठी लो. टिळकांनी गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरुप दिले. १८९५ साली शिवाजी उत्सवाचा शुभारंभ केला, गणेशोत्सवामुळे जनतेमध्ये धर्मभावना चेतवली गेली. महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये शिवाजी महाराजांचे अनन्यसाधारण स्थान आहे. आबालवृद्धांमध्ये शिवाजी-महाराजांबद्दल परम आदराची भावना आहे ! शिवरायांचा कालखंड इतिहासामध्ये सुवर्णाक्षरांनी लिहिला गेला आहे. या उत्सवांच्या माध्यमांमधून लो. टिळकांनी महाराष्ट्राच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि धार्मिक श्रेष्ठत्वाचे दर्शन जनतेला घडवले. शिवाजीमहाराजांच्या उज्ज्वल कारकिर्दीमध्ये संत तुकाराम, संत रामदास यांनी जनजागृतीचे कार्य केले हाते. जनतेला या वैभवाचे दर्शन घडवून लो. टिळकांनी जनतेत आत्मविश्वासाची व स्वाभिमानाची भावना जागृत केली. या उत्सवाच्या आयोजनासाठी लोकमान्यांनी तरुण, ध्येयवादी वृत्तीच्या कार्यकर्त्यांची फौज निर्माण केली. लो. टिळकांनी जनतेच्या धार्मिक भावना न दुखावता अतिशय कौशल्याने त्यांच्यामध्ये स्वदेशभक्तीची ज्योत प्रज्वलित केली 'राष्ट्रीय महोत्सवाची आवश्यकता' या विषयावर त्यांनी लेख लिहिला रामदासांनी मठ स्थापन करून, रामनवमी साजरी

करुन 'शिवरायास आठवावे', 'मराठी तितुका मेळवावा', 'महाराष्ट्र धर्म वाढवावा' असे उदात्त विचार जनतेच्या अंत:करणात ठसविण्याचा यशस्वी प्रयत्न केला होता. तशाच प्रकारच्या जागृतीचे महान कार्य लो. टिळकांनी या उत्सवांचे आयोजन करुन केले.

लो. टिळकांनी प्रबोधनासाठी भाषणे दिली. पण भाषणापेक्षा त्यांनी समाजसेवेला प्राधान्य दिले होते. समाजजीवनात अनेक कसोटीचे प्रसंग येतात. नैसर्गिक, मानवी आपत्तींना तोंड द्यावे लागते. अशा कसोटीच्या काळातच नेत्यामधील गुणांचा प्रत्यय जनतेला येतो. प्लेग आणि दुष्काळ यांनी थैमान घातले तेव्हा लो. टिळकांनी अविश्रांत परिश्रम करुन कार्यकर्त्यांच्या मदतीने संस्मरणीय कार्य केले. दुष्काळात त्यांनी सधन व्यापाऱ्यांना देणग्यांचे आवाहन करुन दुष्काळग्रस्त विणकरांच्या पुनर्वसनासाठी संस्था (गिल्ड) स्थापन केली. कायद्याच्या मर्यादांचे उल्लंघन न करता आपली गाऱ्हाणी सरकारपर्यंत पोचवून दुष्काळग्रस्त, प्लेगग्रस्त जनतेला त्यांनी न्याय मिळवून दिला. याप्रकारे संघटित होऊन सरकारकडून न्याय संपादन करता येतो हे लो. टिळकांनी जनतेस पटवून दिले. या काळात त्यांनी सरकारला सहकार्य केले पण ब्रिटिश सैनिकांनी निष्पाप जनतेच्या विशेषत: महिलांच्या जीवाशी खेळ खेळल्याबद्दल त्यांनी त्यांची अत्यंत कडक शब्दात निर्भत्सना केली. त्यांनी नोकरशाहीच्या जुलमी वर्तनाविरुद्ध सातत्याने आपला बुलंद आवाज उठवला. प्रभावी लेखणी परजली. त्यामुळे त्यांना जनतेच्या अंत:करणात अढळस्थान लाभले.

●●●

# २२

# नि:शस्त्र क्रांतिवादाचे पुरस्कर्ते- लो. टिळक

१९०५ साली लोकमान्यांनी लाला लजपतराय, बाबू बिपिनचंद्र पाल यांच्या सहकार्याने नि:शस्त्र क्रांतिकारक राष्ट्रीय पक्षाची स्थापना केल्याचा उल्लेख लजपतराय यांनी 'यंग इंडिया' या वृत्तपत्रात केला आहे. लो. टिळक खरोखरच क्रांतिवादी होते का ? याचे सुरेख विश्लेषण थोर विचारवंत आचार्य जावडेकर यांनी केले आहे. मग क्रांतिवादी असूनही त्यांनी अखेरपर्यंत कायदेशीर राजकारणच का केले असाही प्रश्न विचारला जातो. लोकमान्य टिळकांनी राष्ट्रीय कॉंग्रेस सभेवरच आपले लक्ष केंद्रित केले होते. ही राष्ट्रीय सभा जनतेची प्रातिनिधिक सभा व्हावी या दृष्टीने ते सदैव प्रयत्नशील होते. या राष्ट्रीय संघटनेत सामान्य जनतेचा सहभाग असावा हे उद्दिष्ट त्यांनी आपल्यापुढे ठेवले होते. या राष्ट्रीय सभेत सामान्य जनता सहभागी झाली तरच क्रांतिवादी राजकारण यशस्वी होऊ शकेल असे त्यांचे ठाम मत होते. सामान्य जनतेचा सहभाग मोठ्या प्रमाणात नाही म्हणूनच त्यांनी कायदेशीर मार्गाने आपले राजकारण चालू ठेवले. लोकमान्यांचा लोकशाहीप्रधान संघटनेवर दृढ विश्वास होता. यासाठी त्यांच्यापुढे इंग्लंडमधील पार्लमेंट, तेथील मजूर आणि हुजूर (कान्झरव्हेटिव्ह) पक्ष पुढे होते. लोकमान्य टिळक हे खऱ्या अर्थाने राष्ट्रीय नेते होते. राजकीय क्षेत्रात नेतृत्व करताना आपल्या कार्यास जनतेचा पाठिंबा राहील याची त्यांनी नेहमी दक्षता घेतली. त्यांच्या संपूर्ण राजकीय जीवनाला या तत्त्वाचे अधिष्ठान लाभले आहे. म्हणूनच लोकमान्य, लजपतराय आणि बिपिनचंद्र पाल यांनी आपल्या मागण्यांच्यामागे जनतेची शक्ती उभी राहिली पाहिजे असा आग्रह राष्ट्रीय सभेपुढे धरला होता.

बंगालमध्ये या राज्याची फाळणी झाल्यामुळे आंदोलनाची प्रचंड लाट उसळली. या शक्तीचा राजकारणासाठी उपयोग करुन घ्यावा आणि या आंदोलनाला नि:शस्त्र क्रांतीचे स्वरुप द्यावे यासाठी लोकमान्यांनी १९०५ ते १९०८ पर्यंत खूप परिश्रम घेतले. ही नवी शक्ती राष्ट्रीय सभेस घातक ठरेल अशी भीती सर फेरोजशहा मेथा यांच्यासारख्या कट्टर नेमस्तवादी नेत्यांनी व्यक्त केली होती. फेरोजशहांसारख्या हट्टी आणि दुराग्रही नेत्यांमुळे राष्ट्रशक्ती काही काळ क्षीण बनली होती. या अवस्थेत देशात चैतन्य निर्माण करण्यासाठी 'लाल बाल आणि पाल' या तीन नेत्यांनी नि:शस्त्र बहिष्कार योगाची घोषणा केली.

लोकमान्यांनी आयर्लंडमधील ग्रिफिथ या नेत्याच्या नेतृत्वाखाली चाललेल्या सिनफेन पक्षाच्या नि:शस्त्र क्रांतीचा अभ्यास केला होता. त्यांनी 'सिन फेन ॲन इल्यमिनेशन (Sinn Fein an illumination) या ग्रंथातील इंग्रजी ग्रंथाच्या आधारे केसरीत लेख लिहिले "नि:शस्त्र क्रांतीचा प्रयोग यशस्वी होण्यासाठी बहुसंख्य जनतेने या क्रांतीस सक्रिय पाठिंबा द्यायला हवा. सिनफिनच्या धोरणानुसार जुलमी राज्यकर्त्यांचे अस्तित्व नाकारुन बहुसंख्य जनतेने स्वत:चे सरकार स्थापन करावे" यासाठी सशस्त्र क्रांतीची गरज भासणार नाही असेही ठाम मत या ग्रंथात नोंदवले आहे. याचा अर्थ लोकमान्य टिळकांनी स्वदेशी चळवळ, विलायती मालावरील बहिष्कार नि:शस्त्र बहिष्कार या पद्धतीने इंग्रज राज्यकर्त्यांना प्रखर विरोध करण्याचे धोरण आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास करून विचारपूर्वक स्वीकारले होते याचा प्रत्यय येतो.

राष्ट्रीय सभेमध्ये झालेल्या मतभेदाचा फायदा मुत्सदी इंग्रज राज्यकर्ते कसा उठविण्याचा प्रयत्न करीत होते हे मोर्ले यांनी लॉर्ड मिंटो यांना पाठविलेल्या पत्रावरुन स्पष्ट होते. "काँग्रेसमध्ये फूट पडण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत नोकरीशाहीच्या धोरणात थोडा बदल आणि थोड्या सुधारणा करण्याचा प्रयत्न ना. गोखले यांनी करावा. त्यांनी यात पुढाकार घ्यावा. आपण ना. गोखले यांच्या मागणीला झुकते माप ठेवावे" असे मधाचे बोट या मुत्सद्दी राज्यकर्त्यांनी नेमस्त पक्षापुढे ठेवले होते.

मॉंटेग्यू यांनी जाहीर केलेला सुधारणा कायदा अत्यंत असमाधानकारक आहे हे राष्ट्रीय सभेने जाहीर केले. मजूर पक्षाच्या सहकार्याने या कायद्यातील दोष काढून टाकण्यात येतील असे या पक्षाने जाहीर केले. पण असा बदल कायद्यात झाला नाही तर शक्य तेथे सहकार नाहीतर सनदशीर विरोध असे राष्ट्रीय सभेचे धोरण राहील असे लोकमान्यांनी जाहीर केले. नेमस्त राजकारणाने काही साध्य होणार नाही. विनाअट सहकार्य देण्यातही यापुढे अर्थ नाही. आता या नोकरशाहीविरुद्ध प्रखर हल्ले चढवून त्यांना हटविण्याची वेळ येऊन ठेपली आहे हे लोकमान्यांनी जाहीर केले. म. गांधींच्या नेतृत्वाचा उदय या वेळी होत होता. म. गांधींनी सत्य, अहिंसा आणि असहकार या धोरणांचा अवलंब करून देशात इंग्रजांविरुद्ध सत्याग्रहाची चळवळ उभी करण्याचा निर्धार जाहीर केला. लोकमान्यांनी प्रथम गांधीजींच्या या धोरणाबद्दल संशय व्यक्त केला होता. पण नंतर "जनता या सत्याग्रहामध्ये तुमच्या पाठीशी असेल तर मीही तुमचाच आहे" असे नि:संदिग्ध शब्दात जाहीर केले. "राज्यकर्त्यांच्या जुलमी कायद्याविरुद्ध कितीही सद्‌बुद्धीने, कायदेशीर मार्गाने आंदोलन केले तरी ते बेकायदेशीर ठरते. अशा परिस्थितीला प्रभावीपणे तोंड देण्यासाठी गांधीजींना सत्याग्रहाचा मार्ग सुचला आहे. सर्व अडचणींमधून मार्ग काढण्यासाठी गांधीजींनी या नि:शस्त्र क्रांतीचा-सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारला आहे आणि या परिस्थितीत तो योग्य आहे" लो. टिळकांनी गांधीजींच्या चरित्रात लिहिलेल्या प्रस्तावनेत त्यांनी गांधीजींच्या शांततामय सत्याग्रह मार्गाला आपला पाठिंबा आहे हे स्पष्ट केले आहे.

डॉ. रामचंद्र गुहा हे व्यासंगी संशोधक आणि इतिहास लेखक आहेत. अलीकडे प्रसिद्ध झालेल्या 'आधुनिक भारताचे शिल्पकार' (मेकर्स ऑफ मॉडर्न इंडिया) या ग्रंथामध्ये लो. टिळकांचा 'क्रांतिवादी राष्ट्रपुरुष' असा उल्लेख करून लो. टिळकांनी धर्मावरील श्रद्धेपेक्षा राष्ट्रभक्ती अधिक महत्त्वाची मानली' याचा उल्लेख केला आहे. 'भारताचा प्राचीन इतिहास, देशातील थोर सांस्कृतिक परंपरा याचा विचार केला तर जगातील कोणतेही राष्ट्र भारताची बरोबरी करु शकणार नाही. भारत हे ईश्वरनिर्मित राष्ट्र आहे' लो. टिळक भारताच्या विश्वातील अद्वितीय स्थानाचा गौरव या शब्दात करीत असत' असा उल्लेख स्टॅन्ले व्हॉलपर्ट या लेखकाने लो. टिळकांच्या चरित्रात

केला आहे. लो. टिळकांनी आपल्या केसरीमधील लेखामध्ये 'ऐतिहासिक राष्ट्रपुरुषाची गरज का आहे' हे जनतेस समजावून देण्यासाठी इंग्लंडला नेल्सन या राष्ट्रपुरुषाबद्दल आदर आहे. फ्रान्समध्ये नेपोलियनचा गौरव होतो मग आम्ही शिवाजीमहाराजांसारख्या थोर राष्ट्रपुरुषाचा गौरव करण्यासाठी उत्सव का साजरे करु नयेत ? असा प्रश्न विचारला. भारतातील इंग्रजीपत्रे फ्रान्स किंवा इंग्लंड यांना राष्ट्रपुरुषाबद्दल दाखवलेल्या प्रेमाबद्दल आक्षेप घेत नाहीत. पण आम्ही शिवाजीमहाराजांच्या कर्तृत्वाचा अभिमान बाळगून उत्सव साजरा केला तर इंग्रज राज्यकर्त्यांची बाजू घेणारी अँग्लोइंडियन मंडळी त्यामुळे हिंदू-मुस्लीम यांच्यामध्ये संघर्ष होईल असा अपप्रचार करण्यास प्रवृत्त होतील. बादशाह अकबर किंवा आणखी एखाद्या थोर ऐतिहासिक पुरुषाचा उत्सव साजरा करण्यास आमची हरकत असणार नाही असेही लोकमान्यांनी त्याकाळी सांगितले होते. शिवाजीमहाराजांसारख्या नेत्यांनी देशाचे सामर्थ्य, चैतन्य नष्ट होत नाही हे आपल्या कर्तृत्वाने सिद्ध केले होते. त्या काळात शिवाजीमहाराजांसारख्या द्रष्ट्या, शूर राष्ट्रपुरुषाच्या उदयाची नितांत गरज होती. भविष्यात भारतामध्येही अशा नेत्याचा उदय होईल. तो मुस्लीम नेताही असू शकेल असेही लो. टिळकांनी स्पष्ट केले होते.

कलकत्ता येथील अधिवेशनामध्ये लो. टिळकांनी नेमस्त पक्षाच्या राजकीय नेत्यांच्या शरणागती पत्करणाच्या वृत्तीबद्दल अतिशय उपरोधिक शब्दात टीका केली होती. त्याचे उदाहरण डॉ. गुहा यांनी दिले आहे. 'जॉन मोर्ले यांची भारताचे मंत्री म्हणून नियुक्ती झाल्यानंतर नेमस्त पक्षाच्या नेत्यांनी मोर्ले यांच्या ग्रंथातील उताऱ्यांचे वाचन केले. ग्लॅडस्टन यांच्या चरित्रात मोर्ले काय म्हणाले याचा त्यांनी उल्लेख केला. मोर्ले हे तीस वर्षे एका वृत्तपत्राचे संपादक होते म्हणून त्यांचा गौरव केला. हे उदारमतवादी नेते इंग्लंडमधील राजकारणात उदारमतवादी असतात. भारताचा प्रश्न निघाला की हेच नेते हुजूर पक्षाची भाषा बोलू लागतात. हा सर्वांचा अनुभव आहे. तरीही मोर्ले भारतमंत्री झाले म्हणून त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडण्यात येतो. हे पाहून आपल्याला हसू येते. हे करण्याऐवजी त्यांनी भगवद्गीतेमधील श्लोक वाचले असते तर त्याचा परिणाम अधिक चांगला झाला असता. नेमस्त पक्षाच्या थोर

नेत्यांबद्दल माझ्या मनात आदराची भावना आहे. महाभारतामध्ये श्रीकृष्णाने पांडव आणि कौरव यांच्यामध्ये समेट घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले. श्रीकृष्णाची शिष्टाई असफल झाली तर ? हा विचार अगोदरच करून कौरव आणि पांडव यांनी युद्धाचीही तयारी ठेवली होती. आपल्या मागण्या नामंजूर झाल्या तर सरकारच्या धोरणाविरुद्ध तीव्र संघर्ष करण्यासाठी आपण तयार आहोत का ?' लो. टिळकांनी क्रांतिवादी राजकारणाचा जोरदार पुरस्कार करताना नेमस्त पक्षाच्या सौम्य, पडखाऊ धोरणाची अतिशय मिस्कील शब्दात टीका केली होती. याचे उदाहरण म्हणून डॉ. गुहांनी त्यांचे भाषण आपल्या ग्रंथात प्रसिद्ध केले आहे.

●●●

# २३

# समाजधारणेसाठी धर्म

गीता हा ग्रंथ समाजधारणेसाठी, समाजाच्या उत्कर्षासाठी निर्माण झाला. असेच ग्रंथ समाजाला प्रेरणा देऊ शकतात. संसाराकडे पाठ फिरवून आत्मज्ञान संपादन करणारा तो ज्ञानी, सत्पुरुष असा विचार त्याकाळी समाजात रुढ झाला होता. समाजाच्या धारणेसाठी ज्ञानी पुरुषाला कर्माचा त्याग करता येत नाही हे अधिकारी पुरुषाने समाजाला सांगणे आवश्यक होते. लोकमान्यांनी आजन्म या विषयावर चिंतन करुन अनेक संस्कृत, इंग्रजी ग्रंथांचा अभ्यास करुन समाजापुढे 'गीतारहस्य' सारखा महान ग्रंथ ठेवला. लोकमान्यांनी याला 'कर्मयोगशास्त्र' असे नाव दिले आहे. पाश्चिमात्त्य पंडित कर्मयोगशास्त्राऐवजी त्याला सदाचारशास्त्र, नीतिशास्त्र, कर्तव्यशास्त्र अशी नावे देतात. ही सर्व नावे लौकिक आहेत हे लोकमान्यांनी स्पष्ट केले. जे पाश्चिमात्त्य तत्त्वज्ञांचे ग्रंथ वाचतात त्यांची संस्कृत वाङ्मयात नीतीच्या मूलतत्त्वाचा विचार नाही अशी समजूत होते. यासाठी लोकमान्यांनी महाभारतातील सर्व थोरपुरुष कर्मयोगीच होते हे आवर्जून सांगितले. ब्राह्मण आणि वेदांती ब्राह्मण कर्मयोगाबद्दल उदासीन असावेत अशी समजूत प्रचलित असेल. पण त्यात तथ्य नाही. कारण व्यास ब्राह्मण होते. त्यांनी क्षत्रियांचा इतिहास लिहिला. जनक, श्रीकृष्ण क्षत्रिय होते. ते ज्ञानी आणि कर्मयोगी होते. महाभारतातील थोर पुरुषांचे चरित्र कोणता संदेश देते ? कर्मयोगशास्त्र सांगण्यासाठीच महाभारतात धर्म-अधर्माचे विवेचन येते. गीतेमध्ये सदाचाराच्या किंवा धर्माच्या मूलतत्त्वांचा विचार मांडला आहे. म्हणून लोकमान्यांनी या ग्रंथांच्या अखेरीस प्राश्चात्त्य पंडितांची नीतीची मूलतत्त्वे आणि गीतेमधील अध्यात्म-ज्ञान यांची तुलना करुन पाश्चात्त्य पंडितांच्या मतांचे मूलग्राही विवेचन लोकमान्यांनी केले आहे.

धर्म-अधर्माचे ज्ञान हा मनुष्याचा विशिष्ट गुण आहे. कारण प्राण्यांमध्ये तो सर्वांत बुद्धिमान आहे कर्माचा बरेवाईटपणा ठरविण्यासाठी त्या व्यक्तीच्या बुद्धीचा विचार होतो. कर्म करण्याचा हेतू आणि कर्माच्या परिणामाची जाणीव हे लक्षात घेणे आवश्यक ठरते. लोकमान्यांनी युधिष्ठाराच्या महायज्ञाचे उदाहरण दिले आहे. युधिष्ठाराच्या महायज्ञाची तुलना दरिद्री ब्राह्मणाने कुटुंबाला उपाशी ठेवून केलेल्या अन्नदानाशी केली आहे. येथे दारिद्र्यात असूनही ब्राह्मणाने अतिथीचे प्राण वाचवले आणि स्वार्थत्याग केला हे महत्त्वाचे. धैर्यासारख्या गुणाबरोबरच शुद्धबुद्धीचे महत्त्व येथे अधोरेखित केले आहे. संकटकाळीही ज्याचे नैतिक धैर्य ढळत नाही तो नीतिमान असे जर्मन तत्त्वज्ञ कांट याने म्हटले आहे. गीतेमध्ये 'पत्रं, पुष्पं, फलं, तोयं' या वाक्यामधूनही श्रीकृष्णांनी दान किती यापेक्षा त्यामागील पवित्र अंत:करणाला महत्त्व दिले आहे. लोकमान्यांनी बायबलमधील येशू ख्रिस्ताच्या वचनाचा दाखला दिला आहे. प्रार्थनामंदिरामध्ये अनेकांनी देणग्या दिल्या पण प्रभू येशू ख्रिस्तांनी अत्यंत गरीब विधवेने दिलेल्या चार नाण्यांची प्रशंसा केली. कारण लहान कर्महीे अनेकवेळा नैतिकदृष्ट्या मौलिक ठरते हे येशू ख्रिस्तांनीही मानले होते. शुद्ध आणि पवित्र बुद्धीने कर्तव्य केले आणि भीष्म आणि द्रोण रणांगणात पडले तरी त्याचे पाप तुला लागणार नाही असे भगवंतांनी अर्जुनाला सांगितले. बौद्ध ग्रंथांचा दाखला देऊन लोकमान्यांनी पूर्णावस्थेत पोचलेला पुरुष नेहमीच शुद्ध आणि निष्पाप असतो हे स्पष्ट केले आहे. लोकमान्यांनी सद्सद्विवेक बुद्धीप्रमाणे वर्तन करणारा पाश्चिमात्त्य आधिदैवत पंथाचा पुरुष किंवा पुष्कळांचे पुष्कळ हित पाहणारा" आधिभौतिक पंथातील पुरुष हे दोन्हीही पंथ अपुरे आहेत असे म्हटले आहे. वैदिक धर्मात, ख्रिस्ती धर्मात आणि बौद्ध धर्मात शरीर, वाणी आणि मन हे शुद्ध आणि पवित्र असले पाहिजे असे म्हटले आहे.

ब्रह्म आणि आत्मा एक त्यालाच मराठीमध्ये 'जे पिंडी ते ब्रह्मांडी' असे म्हणतात. सर्व भूतमात्रांत एकच आत्मा याला समबुद्धियोग म्हणतात. ही भावना सतत जागृत ठेवणे हेच आत्मज्ञान किंवा आत्मसुखाचे उद्दिष्ट. ही साम्यबुध्दी सदैव जागृत असली की, सर्व प्राणीमात्राच्या सुखाचा विचार कर असे वेगळे सांगावे लागत नाही. 'पुष्कळांचे

पुष्कळ सुख' या पाश्चात्त्य विचारापेक्षा ही साम्यबुद्धि अधिक श्रेष्ठ आहे. यातच नीतिधर्माचा विचार आहे हे लोकमान्यांनी अनेक उदाहरणे देऊन सांगितले आहे. शुद्ध मन असेल तरच सत्कार्य करण्याची प्रवृत्ती दिसून येते. मन हिशेबी असेल तर सत्कार्य होऊ शकत नाही. अशा अध्यात्मदृष्ट्या विचार करणाऱ्या पाश्चात्त्य पंडितांनी गीतेप्रमाणेच कर्मापेक्षा शुद्ध बुद्धीस अधिक महत्त्व दिले आहे. लोकमान्यांनी कांट या जर्मन तत्त्वज्ञाच्या 'थेअरी ऑफ एथिक्स' या ग्रंथाचा उल्लेख केला आहे. ग्रीन या इंग्रज तत्त्वज्ञानेही आपल्या नीतिशास्त्रावरील ग्रंथात हाच विचार मांडला आहे. डायसन या वेदांती जर्मन पंडितांनी नीतिविवेचनाची हीच पद्धत स्वीकारली आहे. निष्काम कर्म हे वासना नष्ट झाल्याचे लक्षण आहे असे डायसन यांनी म्हटले आहे. ग्रीक तत्त्वज्ञ ॲरिस्टॉटल यानेही हाच विचार मांडला आहे. गीतेने आध्यात्मिकदृष्ट्या पूर्णावस्था म्हणजेच सर्व नीतिनियमांचे पालन असे म्हटले आहे. यालाच मोक्ष म्हणतात. थोर विचारवंत आणि संत विनोबाजी यांनी मोक्षाची अतिशय सोपी आणि सुंदर व्याख्या केली आहे. ते म्हणतात, 'सर्व मोहांचा जेव्हा क्षय होतो त्यालाच मोक्ष म्हणतात.' संसारात छायाप्रकाशाप्रमाणे सुखदु:ख येते. पण कर्म करताना जे अटळ आहे ते स्वीकारले पाहिजे. म्हणून दु:ख आहे म्हणून अस्वस्थ व्हायचे नाही आणि सुख आहे म्हणून फार हुरळून जायचे नाही अशा आशयाचा श्लोक दुसऱ्या अध्यायात आहे. यालाच साम्यबुध्दी म्हणतात.

लोकमान्यांनी लॉरेनसर या लेखकाने गीता आणि बायबलमधील नवा करार यामधील शंभराहून अधिक वाक्ये दाखवून त्यामध्ये विलक्षण साम्य आहे हे सिद्ध केले आहे. या आपल्या संशोधनाच्या आधारे गीताकारांना बायबल माहीत होते असा निष्कर्ष काढला आहे. पण डॉ. लॉरेनसर यांची मते पाश्चात्त्य संस्कृत पंडितांनी, मॅक्समुल्लरसारख्या ज्येष्ठ संशोधकांनी खोडून काढली आहेत. गीता ही ख्रिस्त शतकापूर्वी लिहिली आहे, हे आता सिद्ध झाले आहे. लो. टिळकांनी गीतेतील तत्त्वे बायबलमध्ये आढळून येतात ती बौद्ध धर्मातून किंवा वैदिक धर्मातून येशू ख्रिस्त किंवा त्यांच्या शिष्यांनी घेतली असण्याची शक्यता अधिक आहे हे पटवून दिले आहे.

लोकमान्य टिळकांच्या 'गीतारहस्य' या थोर ग्रंथांचे विवेचन करताना आणि त्यांनी हे तत्त्वज्ञान सामान्य जनास पटवून देण्यासाठी ज्या सुबोध, सरळ भाषेमध्ये

हा ग्रंथ लिहिला याचा विचार करताना लो. टिळकांच्या जीवनचरित्राकडे दृष्टिक्षेप टाकणे अगत्याचे वाटते. लोकमान्यांनी संस्कृतमधील ग्रंथ, पाश्चात्त्य तत्त्वज्ञांचे ग्रंथ, ख्रिस्ती धर्माचे बायबल आणि बौद्ध धर्मातील ग्रंथ यांचा सखोल अभ्यास केला होता हे स्पष्ट होते. पण जे तत्त्वज्ञान त्यांनी आपल्या प्रभावी भाषेत मांडले त्या तत्त्वज्ञानाप्रमाणे त्यांनी बालपणापासून ते आपल्या समर्पित जीवनाच्या अखेरपर्यंत निष्ठापूर्वक वर्तन केले हे लक्षात घेणे अगत्याचे आहे. लो. टिळकांचे जीवनच कर्मयोग्याचे होते. त्यांच्या विद्वत्तेला, अमर्याद स्वार्थत्यागाची आणि आजन्म देशसेवेची जोड लाभली होती. विद्वतेला शुद्ध चारित्र्याची जोड नसेल तर विद्वत्ता निरर्थक ठरते. विद्वत्तेला नम्रतेची साथ नसेल तर ती धोकादायक ठरते. लोकमान्यांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वामध्ये प्रखर बुद्धिमत्ता, अखंड व्यासंग, शुद्ध चारित्र्य आणि नम्रता यांचा प्रत्यय येतो. गीतेतील वचनाप्रमाणे ते स्थितप्रज्ञ होते. बुद्धी आणि प्रज्ञा यामध्ये संत विनोबांनी फरक केला आहे. द्वेषबुद्धी, दुष्टबुद्धी असे म्हणतात. पण प्रज्ञा नेहमी अविचल, अढळ असते. लोकमान्यांची प्रज्ञा अशी अविचल होती. ते आपल्या निश्चयापासून, ध्येयापासून कधीही ढळले नाहीत.

गीतेमधून कर्तव्यनिष्ठेचा, निष्काम कर्माचा संदेश भगवंतांनी दिला आहे. आपला देश पारतंत्र्यात आहे. देशसेवेला, समाजसेवेला वाहून घेणे हे आपले परम कर्तव्य आहे हे त्यांनी मानले. गीतेने आपली प्रज्ञा स्थिर ठेवून, प्रत्येक प्राणीमात्रांत ईश्वराचा अंश आहे असे मानून मानवतेची सेवा करण्याचा व्यापक विचार मांडला आहे. भगवंताच्या आदेशानुसार आपण फळाची अपेक्षा न करता, कर्तव्यनिष्ठेने, ध्येयवादी वृत्तीने समाजासाठी, देशासाठी आपला देह कारणी लावण्याचा त्यांनी निर्धार केला आणि अखेरच्या श्वासापर्यंत ते या निश्चयापासून कधी ढळले नाहीत. तरुण पिढीला अव्वल दर्जाचे शिक्षण देण्यासाठी ते अध्यापक झाले. त्यानंतर त्याहीपेक्षा विशाल क्षेत्रात प्रवेश करुन त्यांनी सर्व स्तरातील समाजाचे प्रबोधन करण्यासाठी 'केसरी' 'मराठा' मधून सातत्याने निर्भिड आणि निर्भयपणे लेखन केले. समाजाच्या संकटकाळी नि:स्वार्थी वृत्तीने कार्य करण्याची आणि समाजाचे दु:ख, दैन्य दूर करण्याची त्यांची वृत्ती होती. प्लेग आणि दुष्काळ या निसर्गनिर्मित संकटाच्या फेऱ्यात स्त्रीपुरुष, गोरगरीब

होरपळून निघाले तेव्हा त्यांनी काळवेळ न पाहता, प्रकृती अस्वास्थ्याकडे दुर्लक्ष करुन जनतेच्या अडीअडचणीतून मार्ग काढत त्यांना परोपरीने साहाय्य केले. या सर्व कार्यात गीतेमधील आध्यात्मिक विचारांची त्यांना सदैव साथ होती.

जुलमी नोकरशाहीविरुद्ध संपादक या नात्याने वृत्तपत्रामधून लोकमान्य नेता या नात्याने भाषणांमधून त्यांनी सातत्याने तोफ डागली. जनतेच्या बाजूने लढताना, भ्रष्ट नोकरशाहीची लक्तरे वेशीवर टांगताना त्यांनी परिणामाची पर्वा केली नाही. त्यांच्यावर राजद्रोहाचे खटले भरण्यात आले. त्यांना शिक्षा झाली. मंडालेसारख्या अतिउष्ण हवामानाच्या प्रदेशात त्यांना सहा वर्षाची शिक्षा भोगावी लागली. पण त्यांची वृत्ती सदैव शांत, संयमी राहिली. राज्यकर्त्यांबद्दल त्यांच्यामध्ये द्वेषभावना नाहीत. ईश्वराने नेमून दिलेल्या कार्यामध्ये ईश्वरी इच्छेमुळेच आपल्याला या यातना भोगाव्या लागतात आणि आपल्याला होणाऱ्या क्लेशामुळे आपले स्वराज्य प्राप्तीचे ध्येय साकार होण्यास हे क्लेश फलदायी ठरतील या आध्यात्मिक दृष्टीतून त्यांनी हे सर्व करण्याचा दृढ निश्चय केला. समाजाला नवी दृष्टी लाभावी म्हणून लोकमान्यांनी गीतारहस्यामधून आपले जीवनचरित्रच जणूकाय वाचकांसमोर ठेवले आहे. इंग्रजीमध्ये एखाद्याच्या शुद्ध चारित्र्याचे उदाहरण देताना त्यांचे जीवन हे खुल्या ग्रंथाप्रमाणे आहे असे म्हणण्याचा प्रघात आहे. लोकमान्यांचे जीवन असे आहे म्हणूनच गीतारहस्याचे वाचन करताना आपण त्यांच्या लोकोत्तर जीवनकार्याचे प्रत्यक्ष दर्शन घेत आहोत असा अनुभव येतो !

लोकमान्यांनी 'ओरायन' (आर्यांचे मूळवसतिस्थान) 'दी आर्क्टिक होम ऑफ वेदाज' (वेदांचा कालनिर्णय) 'वेदिक क्रोनॉलॉजी' आणि 'वेदांग ज्योतिष' हे ग्रंथ इंग्रजीमध्ये लिहिले. 'श्रीमत्‌भगवत्‌गीतारहस्य' हा महान ग्रंथ मात्र त्यांनी मराठीत लिहिला. या महान मराठी ग्रंथाचे इंग्रजी, बंगाली, कानडी, तेलगू, तामीळ आणि हिंदी भाषांमध्ये अनुवाद प्रसिद्ध झाले आहेत. सर्व भाषांमध्ये या ग्रंथाच्या अनेक आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या आहेत. विद्वान पंडितांबरोबरच आध्यात्मिक वृत्तीच्या सर्व स्तरावरील नागरिकांनी या ग्रंथाचे उत्स्फूर्त स्वागत केले आहे.

●●●

## २४

# लोकमान्य टिळक - महापुरुषाचे प्रेरणादायी स्मरण

लोकमान्यांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाचे वर्णन करताना श्रीकृष्णाला, अर्जुनाने आपले गुरु द्रोणाचार्य यांचे ज्या शब्दात वर्णन केले त्याचे स्मरण होते. शब्द आहेत संत ज्ञानेश्वरांचे ! 'सागर वरवर गंभीर दिसतो पण तो तसा नसतो. सागर प्रक्षुब्ध होत असतो. द्रोणाचार्यांचे अंत:करण नेहमी शांत आणि गंभीर असते. गगनाला अंत नाही असे म्हणतात. त्याचेही मोजमाप होऊ शकते. द्रोणाचार्यांचे हृदय नेहमी शांत, अथांग ! वज्र फुटेल, अमृतही विटेल पण द्रोणाचार्यांची शांतवृत्ती कधीही ढळणार नाही. आईच्या मायेची नेहमी वाखाणणी होते. पण द्रोणाचार्य म्हणजे मूर्तिमंत कृपा आणि प्रेम ! इथे दयेचे माहेर आहे आणि हा तर विद्येचा सागर आहे !

लोकमान्यांच्या उदात्त, सतत प्रेरणादायी ठरणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचे मोठेपण जणू काय या अर्जुनाने केलेल्या आपल्या थोर गुरुच्या वर्णनात सामावलेले आहे. भारताच्या दृष्टीने एकोणिसाव्या शतकातील उत्तरार्ध अत्यंत महत्त्वाचा कालखंड होता. राजकीय, सामाजिक, धार्मिक क्षेत्रांमध्ये मोठी स्थित्यंतरे घडवून आणणारा हा कालखंड ! इंग्रजांच्या लष्करी सामर्थ्यापुढे, त्यांच्या औद्योगिक, वैज्ञानिक प्रगतीपुढे शरणागती पत्करुन आपला धर्म, आपला समाज अत्यंत मागासलेला अशी न्यूनगंडाची भावना मनात ठेवून या पाश्र्चात्त्य देशांकडे मार्गदर्शनाची अपेक्षा ठेवणारा समाज. पण पाश्र्चात्त्य देशामध्ये ज्याप्रमाणे वैचारिक क्रांती होऊन समाजजीवन ढवळून निघाले, त्याचप्रमाणे पाश्र्चात्त्य विचारांच्या आधारे नवा समाज घडविण्याची प्रतिभा लाभलेले राजाराम मोहन रॉयसारखे विचारवंतही देशाला लाभले. रामकृष्ण परमहंस आणि त्यांचे थोर शिष्य स्वामी विवेकानंद यांनी हिंदू धर्माकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली.

धर्म आणि धार्मिक, सामाजिक रुढी यातील मूलभूत फरकांची जाणीव त्यांनी समाजाला करुन दिली. हिंदू धर्मातील तत्त्वज्ञान हे जगातील इतर धमापेक्षा प्रगल्भ आणि श्रेष्ठ असल्याबद्दल स्वामी विवेकानंद यांनी जागतिक व्यासपीठावरून सर्व धर्मगुरुंना आपल्या अमोघ वाणीने पटवून दिले. समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी धर्म आहे. इथे भेदाभेद, जातिभेद नाही. धर्म, वंश, द्वेष नाही हे स्वामीजींनी स्पष्ट केले. जिथे अज्ञान, दारिद्र्य आहे तिथे दारिद्र्य आणि अज्ञान दूर करुनच धर्माचा विचार गोरगरीब जनतेपुढे मांडावा हे त्यांनी तळमळीने सांगितले. लो. टिळकांनी भगवद्‌गीतेने दाखविलेल्या प्रकाशवाटेने ऐन तारुण्यातच दुष्काळग्रस्त, प्लेगग्रस्त जनतेच्या मदतीसाठी जिवाचे रान केले. त्याचप्रमाणे बडोदा संस्थानात अधिकारी म्हणून कार्य करणारे त्यांचे स्नेही बापट, कोल्हापूरचे मित्र बाबामहाराज यांच्या अडचणीच्याप्रसंगी लो. टिळक मदतीसाठी अक्षरश: धावनू गेले. बाबामहाराज दत्तक प्रकरणी त्यांच्याविरुद्ध कपट कारस्थान करुन त्यांच्या शुद्ध चारित्र्यावर शिंतोडे उडविण्याचे प्रकार घडले. अशा या प्रतिकूल परिस्थितीला लोकमान्यांनी खंबीरपणे, शांतपणे तोंड दिले. पण ते आपल्या दिवंगत मित्राच्या मैत्रीला जागले. अखेर लोकमान्यांचा विजय झाला. पण त्यांना भयंकर दिव्यामधून जावे लागले. थोर पुरुषांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये शील आणि नि:स्वार्थीवृत्तीने लहानथोरांना साहाय्य करण्याचे व्रत या सद्‌गुणांना महत्त्व देण्यात येते. लो. टिळकांना असहाय जनतेविषयी आत्मीयता होती आणि त्यांना साहाय्य करण्यासाठी ते सदैव तत्पर असत. त्यांची मित्रनिष्ठाही स्पृहणीय होती. धैर्य, सत्याचा आग्रह, मदतीला तत्परतेने धावून जाण्यात व्यक्त होणारी त्यांची नि:स्पृहता, ऐपतीप्रमाणे सढळ हाताने सत्पात्री दान करण्याचे दातृत्व, या सद्‌गुणांमुळे त्यांचे वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवन उजळून गेले होते. चिरोल या पत्रकाराने त्यांच्याविरुद्ध बदनामीकारक लेखन केले. बदनामी खटल्याचा निकाल इंग्लंडमधील न्यायाधीशांनी टिळकांच्याविरुद्ध दिला. पण दुसरी आवृत्ती प्रसिद्ध करताना टिळकांविरुद्ध लिहिलेला सर्व मजकूर गाळून चिरोलने दुसरी आवृत्ती प्रसिद्ध केली.

लो. टिळकांच्या आध्यात्मिक विचारांचे वर्णन विचारवंत लेखक प्रा. ग. प्र. प्रधान यांनी 'आध्यात्मिक मानवतावाद' असे केले आहे. लोकमान्यांनी भगवद्‌गीतेमधील

आध्यात्मिक अधिष्ठान लाभलेल्या कर्मयोग शास्त्रानुसार आपल्या संपूर्ण जीवनात कार्य केले. त्यांचे ध्येयवादी, निस्वार्थी जीवनच या कर्मयोग शास्त्राच्या दिव्य प्रकाशात उजळून गेले आहे.

महाराष्ट्राचे सांस्कृतिक दैवत थोर कवी कुसुमाग्रज यांनी, मुंबईच्या चौपाटीवर अथांग सागराकडे निर्भयवृत्तीने आपली तीक्ष्ण नजर फेकीत उभ्या असलेल्या लोकमान्य टिळकांच्या भव्य पुतळ्याचे अतिशय प्रेरक शब्दात वर्णन केले आहे. मनात निराशेचा अंधार पसरला आहे. अंतःकरणात वादळ घोंघावत आहे. यावेळी लोकमान्य टिळकांच्या पुतळ्यावर नजर स्थिर होते. काही क्षणातच निराशेचे ढग विरतात. अंतःकरणातील वादळ शमते !

'ती कणखर मूर्ती धीट मराठी थाट
आदळतो जीवर अजून पश्चिम वात
ती अजिंक्य छाती ताठर आणि रणशील
जी पाहून सागर थबके, परते आत'

●●●

## संदर्भ ग्रंथ


(१) मंडालेचा राजबंदी .. .. - श्री. अरविंद गोखले

(२) लोकमान्य टिळक (इंग्रजी) चरित्र - प्रा. ग. प्र. प्रधान
- प्रा. अ. के. भागवत

(३) लोकमान्य टिळक .. .. - प्रा. न. र. फाटक

(४) लोकमान्य टिळक दर्शन .. - श्री. भा. द. खेर

(५) अष्टदर्शन .. .. - श्री. विंदा. करंदीकर

(६) श्रीमत्‌भगवत्‌गीतारहस्य .. - लो. बाळ गंगाधर टिळक

(७) आधुनिक भारत .. .. - आचार्य शं. द. जावडेकर

(८) दुर्दम्य .. .. - प्रा. गंगाधर गाडगीळ

(९) Makers of Modern India .. - Dr. Ramchandra Guha

(१०) Story of Philoshophy .. .. - Will Durant

(११) Bhagwat Gita .. .. - Dr. S. Radhakrishnan



वाय १४३-११०५-२.२०१३

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर

महाराष्ट्राचे शिल्पकार

# लोकमान्य टिळक

लेखक

प्रा. पु. द. कोडोलीकर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई